मनुष्याणाम् वृत्तीरर्थ:।

ISSN 0973-8452


मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक

# अर्थसंवाद

भारतीय सौर आश्विन-मार्गशीर्ष
ऑक्टोबर-डिसेंबर २०१४ / खंड ३८ अंक ३


- म. गांधी राष्ट्रीय ग्रामीण [illegible]
  उर्जा संशोधन स्थितीचे अध्ययन
- महाराष्ट्रातील दारिद्र्य: एक अभ्यास
  महाराष्ट्रातील शेती क्षेत्राचे बदलते स्वरूप
  महाराष्ट्रातील सहकारी चळवळ
  पंतप्रधान जनधन योजना
  लोकसंख्येची गुणात्मकता
- महाराष्ट्रातील पाणी प्रश्न-सद्यस्थिती
  राष्ट्रीय उच्च शिक्षा अभियान
- आदिवासी जमाती: आर्थिक समस्या
- नागपूर जिल्ह्यातील लिंबूवर्गीय फलोत्पादन
- ठिबक सिंचन: कृषिविकासातील महत्त्व
  पी.एचडी. प्रबंधाचा सारांश
- ग्रंथ परीक्षण: गुंतवणूक पंचायतन
  अर्थ शब्दांची वाट पाहे



लोककल्याणमूलस्य अर्थशास्त्रस्य सिध्दये। शोधचर्चाविवादार्थ संवादोऽयं प्रवर्तितः।।

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक

# अर्थसंवाद

ऑक्टोबर-डिसेंबर २०१४ / खंड ३८ अंक ३

International Research Journal

ISSN 0973-8452

Reg. No. 31918/77

मराठी अर्थशास्त्र परिषद

मनुष्याणाम् वृत्तीरर्थः।

www.marthpari.org

**प्रमुख संपादक**

अविनाश रामलाल निकम

**सहाय्यक संपादक**

शंकर सुदामराव पवार

**सल्लागार मंडळ**

(२०१२-१५)

प्रशांत काटोले

अशोक खाचणे

राहुल म्होपरे

अशोक हळ्ळी

**संपादकीय पत्रव्यवहार**

डॉ.अविनाश निकम

मातृपितृ कृपा,प्लॉट नं.३०,

परिमल कॉलनी,

यशवंत क्लासेसच्या मागे,

शहादा-४२५४०९

जिल्हा नंदुरबार.

मोबा: ९८२२६६५१४१

लेखातील मते लेखकांचीच

## अनुक्रमणिका

अविनाश निकम, शहादा
संपादकीय संवाद........................२२९

संतोष कदम, सोलापूर
शिवकालीन अर्थव्यवस्थेचे राजकोषीय धोरण........................२३१

अविनाश कुलकर्णी, पुणे
भारतातील नागरी दारिद्र्याचे स्वरूप........................२३६

निरगुडे इमाम अब्दूल, श्रीरामपूर
महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना........................२४८

शिवाजी यादव, पैठण
उर्जा संशोधन स्थितीचे अध्ययन........................२६०

वाल्मिक परहर, मंडणगड
महाराष्ट्रातील दारिद्र्य: एक अभ्यास........................२६५

सुरेखा फाकडे, पेठवडगाव
महाराष्ट्रातील शेती क्षेत्राचे बदलते स्वरूप........................२७१

हनुमंत शिंदे, पुणे
महाराष्ट्रातील सहकारी चळवळ........................२७९

वसंत नथ्थू हिस्सल, उमरगा
पंतप्रधान जनधन योजना........................२८८

बापूसाहेब सोनवणे, औरंगाबाद
लोकसंख्येची गुणात्मकता........................२९५

बंडू कदम, जगन्नाथ पाटील, कोल्हापूर
महाराष्ट्रातील पाणी प्रश्न-सद्यस्थिती........................२९९

माधुरी लेले, नागपूर
राष्ट्रीय उच्च शिक्षा अभियान........................३०७

मनोज गायकवाड, शहादा
आदिवासी जमाती: आर्थिक समस्या........................३११

लिलाधर खरपुरिये, मोहपा
नागपूर जिल्ह्यातील लिंबूवर्गीय फलोत्पादन योजना........................३१८

मदन शिंदे, पाटोदा
ठिबक सिंचन पध्दतीचे कृषिविकासातील महत्त्व........................३२५

नितीन चौधरी, सुलोचना मानकर, अकोला
पी.एचडी. प्रबंधाचा सारांश........................३३१

मंजुषा मुसमाडे, पुणे
ग्रंथ परीक्षण........................३३६

ज. फा. पाटील, पुणे
अर्थ शब्दांची वाट पाहे........................३४३

## मराठी अर्थशास्त्र परिषद

**कार्यकारी मंडळ २०१४-१५**

**अध्यक्ष**

श्रीराम देविदास जोशी (जळगाव)

**कार्याध्यक्ष**

चारुदत्त श्रीधर गोखले (जळगाव)

**कार्यवाह खजिनदार**

आर. बी. भांडवलकर (यवतमाळ)

**प्रमुख संपादक-अर्थसंवाद**

अविनाश रामलाल निकम (शहादा)

**विश्वस्त**

सूर्यकांत जगदाळे (उस्मानाबाद)
मुक्ता जहागिरदार (अमरावती)
अर्जुन महाडिक (कोल्हापूर)

**सदस्य**

रामकृष्ण टाले (नागपूर)
तुकाराम मुंडे (मानवत)
तुकाराम बारबोले (उस्मानाबाद)
राहुल म्होपरे (कोल्हापूर)
संजय तुपे (नाशिक)
बालाजी सुरवसे (फोंडा)
अशोक खाचणे (जळगाव)
राजू शिंदे (धुळे)
महादेव पाटील (मिरज)
हनुमंत नन्नवरे (अकलुज)
सुभाष गुर्जर (वरवट-बकाल)
बालाजी शिंदे (परभणी)
विद्या पाटील (धुळे)
रामेश्वर भिसे (अकोला)



**अक्षर रचना-** सुनिल मुरलीधर भांडारकर, शहादा.
**मुद्रणालय-** सातपुडा ऑफसेट, जळगाव.



**कार्यालयीन पत्रव्यवहार:**

(आजीव सदस्य नोंदणी, जाहिरात पाठविणे)
मुद्रक-प्रकाशक: आर. बी. भांडवलकर
कार्यवाह खजिनदार, मराठी अर्थशास्त्र परिषद,
गजानन नगर, पिंपळगावरोड,
यवतमाळ - ४४५ ००१
भ्रमणध्वनी: ९४२३१३४६८६


**अर्थसंवाद वर्गणी:**

- परिषदेचे सदस्य:
  आजीव सदस्य: रु.३०००/- (एकरकमी)
- संस्था सदस्य व अर्थसंवाद वर्गणीदार:
  शैक्षणिक संस्था: रु.१०००/-(त्रैवार्षिक)
  व्यावसायिक संस्था:रु.१०००/-(त्रैवार्षिक)
  ग्रंथालये: रु.१५००/-(पंचवार्षिक)
- वर्षगणना: १ एप्रिल ते ३१ मार्च
- संस्थांना आजीव सभासद होता येत नाही.
- कृपया आजीव सदस्य वर्गणी **मराठी अर्थशास्त्र परिषद** या नावाने डिमांड ड्राफ्टद्वारेच कार्यवाहांकडे पाठवावी.
- अर्थसंवादची वर्गणी **मराठी अर्थशास्त्र परिषद** या नावाने डिमांड ड्राफ्टद्वारेच प्रमुख संपादकाकडे पाठवावी.
- **मनीऑर्डर व वार्षिक वर्गणी स्वीकारली जात नाही.**


**अर्थसंवादसाठी अनुदानाबद्दल आभार:**

१) भारतीय सामाजिक विज्ञान अनुसंधान परिषद, दिल्ली यांच्याकडून रु.१,५०,०००/- रक्कम २०१४-१५ या वर्षासाठी मिळाली.
२) महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.


**टिप:** म.रा.सा.सं.मंडळाने अनुदान दिले असले तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ आणि राज्य शासन सहमत असेलच असे नाही.

# संपादकीय संवाद....

## वाहतुक अन् विकास...

कुठल्याही अर्थव्यवस्थेच्या पायाभूत सुविधांचा विचार करताना वाहतुक-दळणवळण व्यवस्थेचा उल्लेख नक्कीच केला जातो. डोंगराळ-दुर्गम भागाच्या विकासाचा प्रश्न येतो त्यावेळी वाहतुक व्यवस्थेचा पर्यायानं रस्त्यांच्या विकासाचा विचार होतो. खरंच आहे, रस्ते असतील तर त्या भागाचा अन्य जगताशी संबंध येणार. आधुनिक जगातील सोयी-सुविधा पोहोचतील, अन्न-औषधी पोहोचेल, शिक्षण पोहोचेल. रस्ते उत्तम असतील तर औद्योगिक कंपन्याही पोहोचतील. भारतात अद्यापही २.७% खेड्यांपर्यंत आपण कच्चे रस्तेदेखील पोहोचवू शकलो नाहीत. सातपुड्याच्या दुर्गम भागात महाराष्ट्र-मध्य प्रदेश सीमेवरील खाच-खळग्यांच्या रस्त्यावर प्रत्यक्षात घडलेला अन् गाजलेला हा किस्सा.... जीपगाड्यांच्या टपवर बसून एसीचा आनंद घेत प्रवास करणारे प्रवासी दिसणं हे नेहमीचच चित्र असतं. एक प्रवासी जीपगाडी प्रवाशांनी भरगच्च भरून आपल्या वाटेनं चालली होती. आरटीओ साहेबांनी तिला अडवलं. गाडीत प्रवाशांना खूपच कोंबलंय हे पाहून साहेबांनी गाडीतील सर्व सीट्स बाहेर उतरवायला सांगितले. टपवर बसलेले साईडनं लटकलेले सर्वच उतरले. अन् मोजले तर त्यांना आश्चर्य वाटलं. तब्बल ५६ सीट्स त्या गाडीत होते. एका बसचे सीट्स त्या जीपगाडीत होते. जीप ड्रायव्हर सोडण्याविषयी विनंती करू लागला. आरटीओ साहेब म्हणाले, इतक्या लोकांना तू एका गाडीत कसं बसवलं होतं ते दाखव. त्यानं एक-एक प्रवासी करत सर्व बसवून दाखवले. साहेबांनी ड्रायव्हरलाही त्याच्या सीटवर बसण्याचा इशारा केला अन् त्याला सांगितलं, जाऊदे आता.

मानवी शरीरात रक्त वाहिन्यांचं काम जितकं महत्त्वाचं आहे तितकच महत्त्वाचं काम अर्थव्यवस्थेत रस्त्यांचं आहे. पाश्चात्य देशात वाहतुक व्यवस्थेचा विकास प्रथम झाला नंतर ती राष्ट्रे विकसित झाली. इंग्रजांनी भारताला लुटण्यासाठी प्रथम रेल्वेचा विकास केल्याचा इतिहास आहे. जिथं नैसर्गिक साधन संपत्ती विपुल आहे त्या भागाचा विकास जलद गतीनं होतो असं म्हटलं जातं. परंतु ज्या भागात रस्ते विकास झाला आहे, ज्या भागातून उत्तम चौपदरी रस्ते गेले आहेत त्या भागाचा विकास तुलनेनं अधिक वेगानं होतो असं लक्षात आलं आहे. हे पाहता केंद्र सरकारनं दररोज ३० किमी रस्ता बांधण्याचं नव्या वर्षातील आपलं उद्दिष्ट असल्याचं जाहीर केलं आहे. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी इलेट्रिक, बायोडिझेल, बायोगॅस, इथेनॉलवर बसेस चालविण्याचा मानस व्यक्त केला आहे. पूर्णपणे इथेनॉलवर चालणारी केनियाच्या कंपनीची बस सध्या नागपुरात धावते आहे. वाहतुक क्षेत्रात नवीन तंत्रज्ञानाच्या साह्यानं देशातील पर्यावरण उत्तम राखत वातावरणातील कार्बन-डायऑक्साईड कमी करण्यावर भर देण्याची योजना आहे. सामान्यपणे असं म्हटलं जातं की रस्त्यानं प्रवास केला तर एका किलोमीटरसाठी दोन रुपये लागतात. रेल्वेनं एक किलोमीटर प्रवासासाठी एक रुपया लागतो तर तेवढ्याच अंतरासाठी जलमार्गानं प्रवास केल्यास केवळ ४० पैसे लागतात. शिवाय पर्यावरणाचं देखील रक्षण केलं जातं ते वेगळं. त्यामुळे नव्या सरकारनं जलवाहतुकीला सर्वोच्च प्राधान्य

दिलं आहे. आगामी काळात जलवाहतुक शक्य आहे अशा भागासाठी मोठ्या प्रमाणावर नवीन योजना, आगामी अर्थसंकल्पात जलवाहतुक विकासासाठी पुरेसा निधी अपेक्षित आहे. एक ऑस्ट्रेलियन कंपनी कमी वजनाचे लहान ॲल्युमिनिअमचे जहाज तयार करते. या जहाजांची खरेदी झाल्यास आंध्र, तामीळनाडू, गोवा, महाराष्ट्र व गुजरातच्या जलवाहतुकीस उत्तम पर्याय ठरू शकतील. देशातील नद्यातून जलवाहतुकीसाठी अलिकडेच २२ हजार कोटी रुपयांचे प्रस्ताव असून ते केन्द्र सरकारच्या विचाराधीन आहे.

रस्त्यांच्या बाबतीत राजस्थान, गुजरात इतकेच नव्हे तर मध्य प्रदेशही वेगानं विकसित होत आहे. रस्ता विकासाशिवाय पर्यटन विकास होऊ शकत नाही ही बाब राज्ये आत्मसात करताहेत. आपला महाराष्ट्र रस्ते विकासाबाबत सर्वात पुढे अद्यापही होऊ शकला नाही, ही बाब बहुसंख्य पर्यटक व्यक्त करतात. चीन-जपानसारख्या देशांनी सार्वजनिक वाहतुक व्यवस्थेचा पध्दतशीर विकास करून तिला प्रभावी केलं आहे. मुंबई शहरात वाहतुक व्यवस्थेवर लोकसंख्येचा ताण येतो आहे हे पाहता सरकारनं वाहतुक क्षेत्रात मोठं परिवर्तन आणलं आहे. मुंबईतील रेल्वेचं महत्त्व सर्वज्ञात आहे. वर्सोवा-घाटकोपर मेट्रोच्या रुपानं मुंबईत आता मेट्रो सुविधा उपलब्ध होऊन मुंबईची पश्चिम व पूर्व उपनगरे जोडणारा दुवा कार्यरत झाला आहे. देशातील आकर्षण ठरलेली पहिली मोनो रेल्वे मुंबईतील चेंबूर-वडाळा मार्गावर धावते आहे. यासोबत पूर्व द्रुतगती मार्ग, पश्चिम द्रुतगती मार्गाचं काम पूर्ण झालं आहे. यासह १७ उड्डाणपूल, ३६ स्कायवॉक खुले झाले असून यामुळे मुंबईची वाहतुक अधिक सुलभ व गतिमान होण्यास मदत झाली आहे. आगामी काळात कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रोरेल कारिडोर, मुंबई ट्रान्सहार्बर लिंक, विरार-अलिबाग कॉरिडॉर, विस्तारित मुंबई-उरण पायाभुत प्रकल्पाअंतर्गत २७० किमीहून अधिक लांबीच्या रस्त्यांची उभारणी यामुळे मुंबईचे स्थान आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत अधिक उंचावणार आहे. देशाचे जगाशी कनेक्टिव्हीटी वाढविण्याचे प्रयत्न अधिक जोमाने सुरू आहेत. त्यासाठी अत्याधुनिक - महत्त्वाकांक्षी नवीन प्रोजेक्ट हाती घेण्यात आले आहेत. देशांतर्गत हवाई जाळे अधिक विकसित करण्याचे प्रयत्न आहेत. एकंदरित वाहतुक क्षेत्राच्या प्रगतीमुळे अर्थव्यवस्थेतील औद्योगिकरणाची वाट अधिक सुलभ, अधिक वेगवान होणार आहे. जागतिकीकरणात टिकण्यासाठी तेवढं तर करावच लागणार आहे.

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे कार्याध्यक्ष प्रा.चारुदत्त गोखले यांनी सलग अकरा अंकांना जाहिरात देऊन सहकार्य केलं, याशिवाय परिषदेचे कार्याध्यक्ष प्रा.चारुदत्त गोखले व स्थनिक कार्यवाह डॉ.रामेश्वर भिसे यांनी संयुक्तपणे प्रयत्न करून या अंकासाठी जाहिरात उपलब्ध करून दिली त्याबद्दल त्यांचे मन:पूर्वक आभार! या अंकास शोधनिबंध पाठविलेल्या सर्व लेखकांचे आभार मानतो. अर्थसंवाद अंकास वाचक स्वीकारतील अशी अपेक्षा आहे.

यशस्वी अधिवेशन: मराठी अर्थशास्त्र परिषदेचे ३८ वे राष्ट्रीय वार्षिक अधिवेशन अकोला येथील श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात डॉ. श्रीराम जोशी यांच्या अध्यक्षतेखाली यशस्वीरित्या संपन्न झाले. विशेष म्हणजे डॉ. माधव चितळे यांचे नागरीकरण का व कसे ? विषयावर अभ्यासपुर्ण व पायाभूत सुविधांशी निगडीत व्याख्यान झाले. अधिवेशनाचे आयोजन उत्कृष्ट होते.

अविनाश रामलाल निकम
प्रमुख संपादक, 'अर्थसंवाद'

# शिवकालीन अर्थव्यवस्थेचे राजकोषीय धोरण

**संतोष कदम, सोलापूर,**
अर्थशास्त्र विभागप्रमुख,
संतोष भी.पाटील कॉलेज मंद्रुप,
ता. दक्षिण सोलापूर, जिल्हा सोलापूर.
Email: sansar2004@rediffmail.com

देशाच्या इतर भागांच्या तुलनेत महाराष्ट्र हा ऐतिहासिक साधनसामग्रीच्या बाबतीत कमालीचा समृद्ध वारसा लाभलेला प्रदेश आहे. ही अर्थातच अभिमानास्पद गोष्ट आहे. ध्येयनिष्ठ आणि तळमळीच्या अशा गेल्या दोनेक पिढयांतील अभ्यासकांना तसेच नव्या अभ्यासकांनाही ऐतिहासिक सामग्री सतत आवाहन करीत आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास बहुतेकांना माहिती आहे. परंतु एवढे मोठे साम्राज्य सांभाळत असताना अर्थातच त्यांना त्यांच्या साम्राज्याचे आर्थिक नियोजन करावे लागत असणारच. मग त्यासाठी शिवाजी महाराजांनी आपल्या साम्राज्याचे आर्थिक नियोजन कसे केले होते, शिवाजी राजांना साम्राजातून किती उत्पन्न मिळत होते, त्यांनी कोणकोणत्या गोष्टींवर खर्च करण्याचे धोरण स्वीकारले होते या सर्व गोष्टींवर आजपर्यंत फारशी चर्चा झाली नसल्याचे दिसते. याऊलट शिवाजी राजांचा इतिहास गड, किल्ले, लढाया, त्यांचे बालपण याच्या पलीकडे कधी गेलाच नसल्याचे दिसते. वास्तविकपणे एवढं मोठं साम्राज्य सांभाळत असताना त्यांनी साम्राज्यविस्ताराबरोबर आपली अर्थनीति काय ठेवली होती हे शोधून काढणे सध्याच्या काळात फार मोठी दिशा देणारे ठरेल. थोडक्यात, शिवकाळाचा विविध अंगाने अभ्यास होणे गरजेचे आहे आणि असा विविधांगी अभ्यास झाला तरच खऱ्या अर्थाने आपण शिवाजी महाराजांना समजू शकू. यासाठीच प्रस्तुत शोधनिबंधामध्ये शिवकाळाची सुरुवातीला चर्चा करून शिवकालीन अर्थव्यवस्था कशी होती यावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे. त्यानंतर शिवकाळात राजकोषीय धोरण कोणत्या प्रकारचे होते याचा शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे. या अभ्यासासाठी वापरलेली सर्व साधनसामग्री ही दुय्यम स्वरूपाची असून त्यामध्ये डॉ. अ.रा. कुलकर्णी लिखित 'शिवकालीन महाराष्ट्र' व जदुनाथ सरकारलिखीत 'शिवाजी ॲण्ड हिज टाईम्स' या दोन ग्रंथांचा विशेष वापर केला आहे.

शिवकाळ:

छत्रपती शिवाजी महाराज हा एक महाराष्ट्राचा मानदंड आहे. सतराव्या शतकात त्यांनी मराठी राज्याची स्थापना केली पण त्यांच्या अकाली निधनामुळे संपूर्ण मराठी मुलूख आपल्या वर्चस्वाखाली आणण्याचे त्यांचे स्वप्न अपूर्ण राहिले, ते आजतागायत नंतरच्या पिढीकडूनही पूर्ण झालेले नाही. कारण त्या काळी शिवाजीराजांचे राज्य हे महाराष्ट्रातील काही भागापुरतेच मर्यादित असले तरी मराठी भाषिकांचा, मराठी संस्कृतीचा प्रदेश याहून बराच मोठा होता. या प्रदेशावर जरी त्या काळी परकीयांची सत्ता होती तरी तेथील मराठी संस्कृती नष्ट झाली नव्हती. याचाच अर्थ त्या काळी मराठी राज्याची स्थापना ही शिवाजी महाराजांकडून झालेली या देशाची थोर सेवा होय. परंतु शिवाजी महाराज हे केवळ राज्याची स्थापना करून स्वस्थ बसले नाहीत; तर हे मराठी राज्य कसे सुजलाम् सुफलाम् होईल व त्याचा आर्थिक पाया बळकट होऊन हे राज्य कसे टिकून राहील याचाही त्यांनी विचार केला. १६५६ मध्ये त्यांनी जावळी जिंकली, तेव्हापासून त्यांच्या स्वराज्य विस्ताराच्या कार्याला प्रारंभ झाला असे म्हणता येईल. म्हणूनच १६५६ ते १६८० या २४ वर्षांच्या कालखंडात महाराष्ट्र काबीज करत पुढे कर्नाटक दिग्विजय करून त्यांनी मराठी राज्याची पताका दक्षिणेतही फडकवली. शिवाजी महाराजांच्या राजकीय कामगिरीचा आराखडा आता सर्वश्रुत आहे. ते केवळ वीरशिरोमणीच नव्हते, तर कुशल संघटक आणि संयोजकही होते.

## शिवकालीन अर्थव्यवस्था:

शेती-

सतराव्या शतकातील सामाजिक आणि आर्थिक व्यवहाराचा केंद्रबिंदू म्हणजे खेडे होय. या खेड्यातील शेती व्यवसाय हाच जीवनाचा प्रमुख मार्ग असल्याने बहुतांशी लोक प्रामुख्याने त्यावरच अवलंबून असत. त्यामुळे शिवकाळात खेड्यांना अग्रस्थान तर होतेच; पण तेथील लोकसंख्येचे प्रमाणही आजच्या खेड्यांच्या मानाने जास्त होते. अशा खेड्यांमध्ये वतनदार पाटील, वेठबिगार, कुलकर्णी, शेटे, महाजन, देशमुख, देशपांडे, बलुतेदार, कारागीर, सेवक वर्ग यासारखे अनेक घटक कार्यरत होते. अशा खेड्यांमध्ये शेती हा प्रमुख व्यवसाय होता. शेती व्यवसाय असल्याने आज पेरले आणि उद्या उगवले असे होत नाही. त्यामुळे उत्पादनाची वाट पहात रहावे लागते. कारण लागवड व प्रत्यक्ष उत्पादन यातील कालावधी मोठा असतो. म्हणूनच शेतीव्यवसाय सुरळीत चालू ठेवण्यासाठी व स्वत:च्या उदरनिर्वाहासाठी हवा असणारा पैसा शेतकरी गावच्या सावकराकडून कर्जाने घेत असत. त्यासाठी प्रसंगी २५टक्के व्याजदराने हा पैसा घेतला जाई. म्हणूनच शिवकाळात शिवाजी राजांनी अशा गरजू शेतकऱ्यांना सरकारी खजिन्यातून धान्य देण्याची व्यवस्था केली होती. थोडक्यात आपल्या साम्राज्यातील शेती व्यवसाय हाच जनतेचा मुख्य व्यवसाय असल्याने तो वाढीस लागला पाहिजे व त्यातून शेतकरी सुखी व समृद्ध झाला पाहिजे अशी भावना शिवाजी राजांची होती. शेतकऱ्याला त्या काळीसुध्दा प्रामुख्याने पावसाच्या कृपेवरच अवलंबून रहावे लागे. पाऊस वेळेवर व प्रमाणशीर नाही पडला तर राजा गरीब तर संपूर्ण साम्राज्यात दुष्काळाची झळ बसत असे. शिवाजी महाराजांची अर्थनीती ही शेतकरी सुखी तर राजा सुखी, शेतकरी गरीब तर राजा गरीब, राज्य गरीब या तत्त्वावर आधारित होती. या अर्थनीतीला अनुसरूनच शिवाजी राजांनी

शेतकऱ्यांना अर्थिक सहाय्य (अनुदान) देण्याचे धोरण आखले होते. याशिवाय शेतीच्या विकासासाठी शिवाजी महाराजांनी पडीक जमीन लागवडीखाली आणणे, फक्त लागवड झालेल्या जमिनीवरच सारा आकारणी करणे, पिकांच्या प्रकारानुसार सारा आकारणी करणे, शेतकऱ्यांना शेतसाऱ्याच्या थकबाकीत सूट देणे, सारामुक्त जमीन देणे, कालव्यांद्वारे, पाटांद्वारे शेतीला पाणी पुरवठा करणे, यासारख्या मार्गाचा अवलंब केल्याचे आढळते.

उपव्यवसाय :

स्वावलंबन हे ग्रामीण जीवनाचे ध्येय असल्याने शिवकाळात खेड्यांमधून विविध व्यवसाय निर्माण झाले होते. शेती हा प्रमुख व्यवसाय असल्यामुळे त्याच्या विकासासाठी लागणारे बरेचसे उपव्यवसाय अशा खेड्यांमधून सुरू होते. यामध्ये सोनार, लोहार, तांबट, चांभार, सुतार, कोष्टी, तेली, मांग, धनगर इत्यादी उपव्यावसायिकांचा समावेश होतो. अशा व्यवसायातील उत्पादने ही प्रामुख्याने खेड्यातील गरजा पूर्ण करण्यासाठी वापरली जात असत. परंतु कसबी कारागिर आपल्या वस्तू नजीकच्या बाजारात नेऊन विकत असत.

व्यापार :

शिवाजी महाराजांनी राज्याच्या सर्वांगिण विकासासाठी व्यापारवृध्दीला प्राधान्य दिल्याचे आढळते. कारण शिवाजी राजांना व्यापारवृध्दीशिवाय आपल्या राज्याला भरभराट येणार नाही याची खात्री होती. त्याकरीता त्यांनी व्यापारांना अनेक सवलती व जकातीत सूट दिल्याची अनेक उदाहरणे आढळतात. तसेच कायदा व सुरक्षिततेचे राज्य निर्माण करून व्यापारवृध्दीला एकप्रकारे हातभार लावल्याचे दिसते, तर दुसरीकडे परकीय व्यापाराबाबत शिवाजी राजांनी "अखंड सावधानतेचे धोरण" स्वीकारले होते. कारण त्याकाळी परकीय व्यापाऱ्यांचे उद्दिष्ट हे केवळ व्यापारापुरतेच मर्यादित नव्हते.

उद्योग:

शिवकाळात कोकण भागात बरीच गजबजलेली व्यापारी केंद्रे होती. चौल, दाभोळ, कल्याण, भिवंडी, वेंगुर्ला, पेण या ठिकाणांचा शिवकाळातील भरभराटीस आलेली औद्योगिक व व्यापारी केंद्रे असा उल्लेख आढळतो. चौल व दाभोळ या बंदरांची तर सुरत व गोव्याशी तुलना केली जात असे. शिवाजी राजांच्या ताब्यात असलेली राजापूर, दाभोळ, केळेशी ही बंदरे मुंबईच्या व्यापाराला अत्यंत आवश्यक अशी होती .

कोकण हा मराठी राज्याचा कणा होता. मीठ तयार करणे हा कोकणातील प्रमुख उद्योग होता. ठाणे, कुलाबा, रत्नागिरी या जिल्ह्यात पुष्कळ मीठागरे होती. या भागातील लोकांचा शेती हा प्रमुख व्यवसाय असला तरी तो सांभाळून मीठ तयार करण्याचा उद्योग ते करत असत. मीठाच्या वाहतुकीसाठी शिवाजी राजांनी खास गलबतांचा तांडा निर्माण केला होता. एकदा परकीय मीठाच्या उत्तम प्रतिमुळे व कमी किंमतीमुळे राज्यातील मोठी बाजारपेठ परकीयांनी काबीज केली. त्यातच देशातील मीठ उत्पादकांना त्याच्यांशी स्पर्धा करणे जमेनासे झाले व त्यातून बरीचशी मिठागरे ओस पडली. यावर पूर्ण विचार करून शिवाजी राजांनी मीठाच्या धंद्यास संरक्षण देण्याचे ठरविले. त्यासाठी त्यांनी परकीय मालावर मोठ्या प्रमाणात

जकात बसवली व त्याची अत्यंत काटेकोरपणे अंमलबजावणी केली. त्यातूनच जगातील पहिल्या *संरक्षण नितीचा* प्रारंभ झाला. जर्मनीत १९ व्या शतकात फ्रेडरीक लिस्ट च्या धोरणानुसार संरक्षण धोरणाचा स्वीकार केल्याने जर्मनीची त्याकाळी अभूतपूर्व प्रगती झाली. परंतु या धोरणाची खरी सुरुवात छत्रपती शिवाजी महाराजांनी १७ व्या शतकातच केली होती हे इथं आवर्जून नमूद करावेसे वाटते. कल्याण-भिवंडी भागात उत्तम प्रकारचे लाकूड भरपूर प्रमाणात मिळत असे आणि हे लाकूड बोटी बांधण्यासाठी अत्यंत उपयुक्त असल्याने शिवाजी राजांनी कल्याण भिवंडी येथेच बोटी बांधण्याचा कारखाना सुरू केला होता.

## शिवकालीन राजकोषीय धोरण:

### करविषयक धोरण:

शिवाजी महाराजांनी आपल्या राज्याच्या उत्पन्नासाठी काही नियमित करांबरोबर काही प्रासंगिक करांचाही आधार घेतल्याचे दिसते. जे नियमित कर होते त्यांची प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष कर अशी विभागणी आपणाला करता येईल. कारण यातील काही करांचा भार जनता दुसऱ्यावर न ढकलता स्वत: भरत असे, तर काही करांचा भार मात्र दुसऱ्यावर ढकलता येत असे. प्रत्यक्ष करांमध्ये इनामपट्टी, मिरासपट्टी , सिंहासनपट्टी , कर्जाची पट्टी, गावटका, मोहीम पट्टी, ईदसुभराती, उरुसपट्टी तसेच माळयाकडून, कोळयाकडून व वेठबिगारांकडूनही त्यांच्या उत्पन्नावर प्रत्यक्ष कर आकारले जात असत. या शिवाय हेजीबपट्टी, सादिलवार पट्टी, खर्चपट्टी, पाटदाम, घरटका, कोतवाली कर, इमारतपट्टी, बोखारटका यासारखे विशिष्ट करही लादले जात होते. थोडक्यात वरील सर्वप्रकारचे कर हे प्रत्यक्ष कर होते. याबरोबरच शिवकाळात व्यवसाय कर, सराफपट्टी, विक्रीकर, कारागिरी कर, तेलपट्टी, मोहतर्फा, जकात, उद्योगधंद्यावरील कर, भेटवस्तूवरील कर यासारखे काही अप्रत्यक्ष करही शिवाजी महाराजांचे प्रशासन जनतेकडून वसूल करत असे. तसेच काही रक्कम जनतेला केलेला दंड, जनतेला आकारलेले शुल्क इत्यादी रूपाने प्रशासनास प्राप्त होत असे.

शिवकाळातील कर पद्धतीविषयी थोडक्यात बोलावयाचे झाल्यास एक स्पष्ट होते की या काळातील सर्व कर हे पुरोगामी स्वरूपाचे होते, ज्यामध्ये प्रत्येक व्यक्तीच्या व व्यवसायिकाच्या उत्पन क्षमतेनुसार ते आकारले जात होते. याचाच अर्थ शिवकालीन करव्यवस्था ही समन्याय या करतत्वाचा अंगिकार करणारी होती, त्यात लवचीकता हा गुणधर्म होता. कारण बरेचसे कर साम्राज्यातील परिस्थिती कशी आहे यावर अवलंबून असत. या करपद्धतीत सहजता व सोपेपणा होता अणि सर्वात महत्वाचे म्हणजे या करव्यवस्थेत मितव्ययता हा गुणधर्मही होता.

### खर्चविषयक धोरण :

शिवकाळात विविध मार्गांनी येणारे उत्पन्न कोणकोणत्या गोष्टीवर आणि किती प्रमाणात खर्च केले जात होते हे पाहणे गरजेचे ठरेल. शिवाजी राजांचे जे प्रशासन होते त्याचे चार विभाग याठिकाणी करावे लागतील. एक म्हणजे मध्यवर्ती सरकार (शिवाजी राजांना मदत करणारे मंत्रिमंडळ), दुसरा प्रांतिक सरकारे (शिवाजी राजांनी आपल्या राज्याचे तीन प्रांत केले होते; जसे उत्तर, दक्षिण व आग्नेय), तिसरा स्थानिक प्रशासन (खेडेगावात प्रत्यक्षात कार्यरत असणारा वर्ग) व चौथा लष्करी प्रशासन. यासर्व विभागांवर शिवाजी राजांना मोठया प्रमाणात खर्च करावा लागत होता. यातील

लष्करी प्रशासनाचा खर्च सर्वात जास्त होता. कारण यामध्ये पागा, पायदळ,आरमार, किल्ले यावर खर्चाचे प्रमाण जास्त होते. पुन्हा यातील आरमार, किल्ले यासाठी शिवाजी राजांना मोठा खर्च करावे लागे, कारण त्याकाळी ज्याच्याकडे मोठे आरमार व जास्त किल्ले असतील तो भौतिक व आर्थिक दृष्ट्या सर्वाधिक बलवान असे सूत्र होते. तसेच शिवाजी राजांना युध्दावरही मोठ्या प्रमाणात खर्च करावा लागत होता. तरीही शिवाजी राजांनी बरीचशी युद्धे ही कमी खर्चातच लढली असतील हे त्यांनी मिळवलेलं साम्राज्य व उत्पन्नाची आवक पाहता सिद्ध होते. कारण त्यांच्या सैनिकांकडील सर्व शस्त्रे ही स्थानिक बनावटीची होती. याशिवाय शिवाजी राजांकडून काही पैसा इनाम किंवा बक्षिस रूपानेही दिला जात असे. महत्वाचे म्हणजे शिवकाळातील खर्चामध्ये शिवाजी राजांवरील खर्च याचाही उल्लेख पहायला मिळतो. शेवटी सर्वात महत्वाचे म्हणजे शिवाजी राजांनी आपल्या राज्यासाठी केलेला उत्पादक स्वरूपांचा खर्च, जो शेती व इतर व्यवसायाच्या प्रगतीसाठी केला गेला याचा विचार करावा लागेल. याकाळात राज्याच्या उत्पन्नाची सारी मदार ही शेतीव्यवसायावरच होती. त्यामुळेच शिवाजी राजांनी शेतीच्या विकासाकडे दुर्लक्ष केले नाही. याचाच एक भाग म्हणजे शेतकऱ्यांना उत्पादक कारणांसाठी केलेला कर्ज पुरवठा, अधिकाऱ्यांना शेतकऱ्यांना सहकार्य करण्याबाबत दिलेले आदेश, शेतीसाठी पाणीपुरवठ्याच्या केलेल्या सोई याचा उल्लेख करता येईल. याचबरोबर मीठ व्यवसायाच्या वृध्दीसाठी संरक्षण नीतीचा स्वीकार करून व बोटी बांधून मीठ व्यवसायाला गती देण्याचे कार्य केले गेले.

थोडक्यात एखाद्या राजाची राजवट कशा प्रकारची आहे, हे जाणून घ्यावयाचे असेल तर त्या राज्याच्या संपत्तीची वाटणी कशी केली जाते याचा विचार करावा लागतो. राष्ट्राच्या संपत्तीचा वापर लोकजीवन सुखी व शिस्तबद्ध करण्यासाठी झाला पाहिजे. अशी समृध्दता आर्थिक किंवा अन्य स्वरूपाची असो, पण ती प्राप्त करून घेण्यासाठी राज्याचा पैसा उदारहस्ते खर्च झाला पाहिजे. राष्ट्रीय संपत्तीचा खर्च समतोलपणे विविध कार्यासाठी केला तर लोककल्याण साधणे सहज शक्य असते. या दृष्टिकोनातून शिवकालीन अर्थव्यवस्थेचा विचार करता आपल्याला असे नक्कीच म्हणता येईल की, जी काही उपलब्ध संपत्ती होती तिचा विनियोग शिवाजी महाराजांच्या राज्यात लोककल्याणासाठी होत होता. म्हणूनच शेवटी शिवकालीन अर्थव्यवस्थेसंबंधी एका वाक्यात समारोप करताना असे म्हणता येईल की शिवकालीन अर्थव्यवस्था ही मानवी चेहऱ्याने विकसित होणारी अर्थव्यवस्था होती.

### संदर्भ ग्रंथ:

१) अ. रा. कुलकर्णी ( १९९३), *शिवकालीन महाराष्ट्र*, राजहंस प्रकाशन, पुणे.

२) Jadunath Sarkar, (1973) *Shivaji and His Time*, Orient Longman LTD, New Delhi.

३) डॉ. वसंत मोरे, ( २००२), *छ. शिवाजी की साहित्यिक प्रतिमा कितनी सही-कितनी प्रेरक ?*, शिवसंग्राम प्रकाशन, कोल्हापूर.

# भारतातील नागरी दारिद्र्याचे स्वरुप

**अविनाश कुलकर्णी, पुणे,**
टिळक महाराष्ट्र विद्यापीठ.
भ्रमणध्वनी: ९८२२२०३१८७

जागतिक बँकेच्या अहवालानुसार जगातील १.२ अब्ज लोकसंख्या अत्यंत दारिद्र्यात जीवन जगत असून यापैकी १/३ लोकसंख्या भारतात आहे. नियोजन आयोगाच्या अहवालानुसार २००९-१० मध्ये देशातील २७.८२ कोटी ग्रामीण व ७.६४ कोटी शहरी लोकसंख्या दारिद्र्यात आहे. देशातील् दारिद्र्यात राज्यनिहाय मोठी तफावत दिसून येते.

खासगीकरण - उदारीकरण - जागतिकीकरण अर्थात खा-उ-जा च्या पार्श्वभूमीवर भारतात सन १९९०-२००० च्या दशकात आर्थिक सुधारणांचे पर्व सुरू झाले. या आर्थिक सुधारणांचे परिणाम आता स्पष्टपणे दिसू लागले आहेत. भारतीय अर्थव्यवस्थेच्या विकासाचा निर्देशांक, भांडवली बाजाराचा निर्देशांक आणि नियोजन आयोगाने घोषित केलेले भारतातील दारिद्र्याचे घटते प्रमाण यातून निश्चितच भारतातील आर्थिक सुधारणांचे यथायोग्य दर्शन घडू लागले आहे. परंतु विकासाच्या बदलत्या परिणाममध्ये दारिद्र्याचे मोजमाप करणारी परिमाणे मात्र तिच आहेत. त्यामुळे दारिद्र्याचे प्रत्यक्षातील प्रमाण शासकीय नोंदीप्रमाणे घटले असले तरी दारिद्र्याच्या विविध अंगांचा आणि सामाजिक बदलांचा तसेच सामाजिक सुरक्षिततेचा अंतर्भाव करून दारिद्र्याचे नवे परिमाण मांडणे काळानुरूप आवश्यक बनले आहे.

या शोधनिबंधात दारिद्र्याचा अभ्यास करताना सर्वप्रथम दारिद्र्य म्हणजे काय? हे पाहताना दारिद्र्य या संकल्पनेची व्याख्या व अर्थ पुढीलप्रमाणे पाहू. जे लोक आपल्या दैनंदिन राहणीमानाची किमान पातळी गाठू शकत नाहीत किंवा मूलभूत गरजांची पुर्तता करू शकत नाहीत, त्यांना गरीब किंवा दारिद्र्यातील लोक म्हणून संबोधले जाते.

भारतात सर्वसाधारणपणे दारिद्र्याची जी व्याख्या केली जाते तिचा आधार. अन्न, वस्त्र आणि निवारा या किमान गरजांची पूर्तता हा आहे. या संदर्भातून विविध विचारवंतांनी मांडलेल्या दारिद्र्य या संकल्पनेच्या व्याख्या व अर्थ पुढीलप्रमाणे-

दादाभाई नौरोजी यांनी ब्रिटिश राजवटीने प्रसिद्ध केलेल्या आकडेवारीच्या आधारे भारतीयांचे दरडोई उत्पन्न रु. २०/- होते तर त्यावेळी किमान जीवनमानासाठी रु. ३४/- आवश्यक असल्याचे निर्दशनास आणून भारतातील दारिद्र्याची तीव्रता स्पष्ट केली. डॉ. दांडेकर व रथ यांनी भारतीयांसाठी दररोज २२५० कॅलरीजचा निकष लक्षात घेऊन १९६०-६७ मध्ये दारिद्र्यासाठीचे विवेचन केले आहे. भारतीय नियोजन मंडळाने सहाव्या पंचवार्षिक योजनेच्या काळात (१९८०-८५) दारिद्र्य या संकल्पनेची व्याख्या केली आहे त्याप्रमाणे, ग्रामीण भागात प्रतिदिनी प्रतिमाणसी किमान २४०० उष्मांक व शहरी भागात प्रतिदिनी प्रतिमाणसी किमान २१०० उष्मांक ज्या व्यक्तीस प्राप्त होत नाहीत ती दारिद्र्यात आहे असे समजावे.

या विविध व्याख्यांमधून दारिद्र्याची संकल्पना व अर्थ हे फक्त अर्थशास्त्रीय दृष्टिकोनातूनच मांडले गेल्याचे निष्पन्न होते. परंतु मानवी विकासाच्या दृष्टिकोनातून दारिद्र्य या संकल्पनेचा बहुआयामी विचार होणे आवश्यक आहे. त्यामुळे अशा बहुआयामी संकल्पनेच्या संदर्भातील व्याख्या व अर्थ पुढीलप्रमाणे पाहू.

गिलिन आणि गिलिन यांच्या मते, ज्या परिस्थितीत एखादी व्यक्ती अपुरे उत्पन्न किंवा गैर खर्चामुळे स्वत:ची तसेच मुलांची शारीरिक व मानसिक व्यवस्था ठेवू शकत नाही व सामाजिक मूल्यांप्रमाणे जीवन व्यतीत करू शकत नाही. त्या परिस्थितीला दारिद्र्य असे म्हणता येईल. या व्याख्येतून दारिद्र्य ही संकल्पना फक्त व्यक्तीच्या उत्पन्नाशी किंवा त्याला अन्नातून मिळणाऱ्या उष्मांकाशीच संबंधित नसून मानसिक तसेच सामाजिक मूल्यांच्या संदर्भात जीवन व्यतीत करण्याच्या संदर्भात विस्तारीत असल्यामुळेच ही व्याख्या अधिक व्यापक व अभ्यासपूर्ण असल्याचे दिसून येते. अशा या व्यापक दृष्टिकोनातून दारिद्र्य या संकल्पनेचा या शोधनिबंधात आढावा घेताना जी सैद्धांतिक पार्श्वभूमी वापरणे योग्य होणार आहे त्याचे विवेचन खालीलप्रमाणे-

**सैद्धांतिक पार्श्वभूमी:** ब्रिटिश राजवटीत भारतातील संपत्तीचा प्रचंड ओघ इंग्लंडकडे जात असल्याने भारत दरिद्री, कंगाल बनला असल्याच्या संदर्भात भारतीय आर्थिक राष्ट्रवादाचे जनक दादाभाई नौरोजी यांनी मांडलेल्या आर्थिक नि:सारणाच्या सिद्धांताची/विचारांची पार्श्वभूमी या शोधनिबंधाच्या विविध मुद्यांच्या विवेचनाचा आधार आहे. त्यामुळे या आर्थिक नि:सारणाच्या सिद्धांताची माहिती थोडक्यात पुढीलप्रमाणे पाहू.

इ.स. १८५१ पासून १८७१ पर्यंतच्या वीस वर्षांच्या काळात दादाभाईंनी हिंदुस्थानच्या संपत्तीचे शोषण कोणकोणत्या प्रकारे चालू आहे आणि त्यामुळे हिंदी जनता किती दरिद्री झालेली आहे याचा बरोबर अंदाज केला आणि हे द्रव्यशोषण थांबविल्याखेरीज हिंदी जनतेचा कोणत्याही प्रकारचा उद्धार होणार नाही असा ठाम सिद्धांत मांडला. आर्थिक नि:सारणातून उद्‌भवणाऱ्या दारिद्र्यासारख्या आर्थिक समस्यांवर उपाय कोणते? याबाबींचा मागोवा व विश्लेषण भारतीय अर्थतज्ज्ञांनी केले यालाच आर्थिक नि:सारणाचा सिद्धांत असे म्हटले जाते.

ब्रिटिशकाळात व्यापार, रेल्वे बांधणी, लष्कर, विविध कर, गुंतवणूकीवरील व्याज इ. अनेक मार्गांनी एकंदर १६ कोटी रुपये परदेशस्थ लोकांचे राज्य हिंदुस्थानात (भारतात) असल्याकारणाने

दरवर्षी परदेशात पाठविले जात होते. हिंदी संपत्तीला ही जी मोठी गळती लागलेली आहे, तिचे मूळ स्वरूप दोन प्रकारचे आहे: एक राजकीय आणि दुसरे व्यापारी किंवा औद्योगिक होय. या आर्थिक नि:सारणाच्या सैद्धांतिक दृष्टिकोनातून बघितल्यास, स्वतंत्र भारतातील स्वकीयांनीच परकीय देशामध्ये केलेल्या गुंतवणूकी, अर्थात काळ्यापैशाची समस्या तसेच भारतीयांचे सोने खरेदी आणि तेलाच्या वाढत्या आयतीमुळे देशाच्या व्यापारातील वाढता असमतोल, वाढती महागाई, औद्योगिकीकरण आणि नागरीकरणाच्या समस्या इ. यामुळे भारतात आर्थिक विषमता वाढीस लागलेली दिसून येते. त्यामुळे असे म्हणता येते की, भारतातील आर्थिक विकासाच्या प्रकियेत दारिद्र्यामध्ये शासकीय आकडेवारीनुसार संख्यात्मक घट झालेली दिसत असली तरी गुणात्मक घट मात्र झालेली दिसून येत नाही. यादृष्टिकोनातून सापेक्ष दारिद्र्याचे विवेचन विविध मुद्यांच्या आधारे या शोधनिबंधात करण्यात आले आहे.

खासगीकरण - उदारिकरण - जागतिकीकरण अर्थात खा-उ-जा च्या पार्श्वभूमीवर भारतास आर्थिक महासत्तेची स्वप्ने दिसू लागली आहेत. या दिवा स्वप्नपूर्तीमध्ये भारतातील दारिद्र्याच्या अभ्यासाचे महत्त्व काय आहे ते या शोधनिबंधामध्ये पुढीलप्रमाणे मांडले आहे.

शोधनिबंधाचे महत्त्व व गरज: भारताच्या माजी पंतप्रधान स्वर्गीय इंदिराजींच्या काळात गरिबी हटाव चा नारा देणाऱ्या काँग्रेच्या कार्यकाळात देशातील गरिबी हटल्याचा दावा सरकारकडून बुधवारी दि. ५ फेब्रुवारी २०१४ रोजी संसदेत करण्यात आला आहे. २००४-०५ साली देशातील गरिबांची संख्या ४०.७४ कोटी होती. परंतु २०११-१२ या वर्षात ही संख्या प्रचंड कमी होऊन २७ कोटी झाल्याची माहिती नियोजन आणि संसदीय कामकाज राज्यमंत्री राजीव शुक्ला यांनी दिली.

भारतातील दारिद्र्याच्या या संख्यात्मक प्रगतीचा आलेख जरी सुखावह असला तरी, भारतातील दारिद्र्यामध्ये विकासाच्या वाटेवर काही बदल अथवा परिवर्तन होत आहे, त्याची डोळसपणे चिकित्सा करणे आवश्यक आहे. भारतातील दारिद्र्याचे मोठे प्रमाण असणाऱ्या उत्तर आणि पूर्व भारतातून आर्थिक विकासाचे फायदे मिळवून प्रगत झालेल्या पश्चिमेकडील राज्याकडे अर्थात महाराष्ट्राकडे आणि त्यातही विशेषत: मुंबई, पुणे, नाशिक या पश्चिमकडे असलेल्या प्रदेशांमध्ये खूप मोठ्याप्रमाणावर लोकसंख्येचे रोजगारासाठी स्थलांतर सन २००१ नंतर झालेले असल्याचे दिसून येते. त्यामुळे या शहरांमधील नागरी सेवा-सुविधा यांवर मोठा ताण पडला असून नागरिकांच्या उत्पन्नात जरी वाढ झालेली असली तरी आजही बहुसंख्य नागरिकांना उत्तम अन्न, वस्त्र, निवारा यांसारख्या मूलभूत गरजांच्या बरोबरीनेच आरोग्य, शिक्षण, आणि सामाजिक सुरक्षा उपलब्ध नाहीत. यांसारख्या महत्त्वपूर्ण बाबींचा दारिद्र्य या संकल्पनेशी कशाप्रकारे संबंध आहे हे अभ्यासण्यासाठीच या शोधनिबंधाची गरज असून या वाढत्या शहरीकरणाच्या संदर्भात या शोधनिबंधांचे महत्त्व अनन्यसाधारण असल्याचे दिसून येते.

अभ्यासपद्धती व मर्यादा: हा शोधनिबंध पूर्णपणे दुय्यम साधन सामग्रीवर आधारित असून या शोधनिबंधासाठी, संदर्भ ग्रंथ, विविध वृत्तपत्रातील बातम्या व लेख,

नियतकालिकांमधील लेख व माहिती तसेच इंटरनेटवरील उपलब्ध माहितीचा आधार घेण्यात आला आहे. तसेच या शोधनिबंधाच्या संदर्भात अंशत: निरिक्षण या साधनाचासुद्धा उपयोग करण्यात आला आहे. परंतु शहरी दारिद्र्याच्या संदर्भात अर्थात मुंबई, पुणे या शहरांचा विशेषत्वाने अभ्यास करण्यात आला आहे. ही या शोधनिबंधाची मर्यादा आहे.

या शोधनिबंधाची उद्दिष्ट्ये, गरज व महत्त्व, आणि अभ्यासपद्धती व मर्यादा हे वरीलप्रमाणे जाणून घेतल्यानंतर या शोधनिबंधाच्या संदर्भात भारतातील दारिद्र्याचा आढावा आणि दारिद्र्याचे विविध राज्याच्या संदर्भात किंवा प्रदेशांच्या संदर्भात तसेच नागरी व ग्रामीण भागाच्या संदर्भातील विषम प्रमाण याचा आढावा पुढीलप्रमाणे घेऊ.

भारतातील दारिद्र्याचा आढावा: डॉ. दांडेकर व रथ यांनी २२५० कॅलरीजचा निकष लक्षात घेऊन १९६०-६७ मध्ये ग्रामीण भागात ४०% आणि नागरी भागात ५०% लोकसंख्या दारिद्र्य रेषेखाली असल्याचे सांगितले. मोन्टेकसिंग अहलुवालिया यांनी १९६०-६१ च्या किंमतीच्या आधारे ग्रामीण व शहरी भागासाठी अनुक्रमे रु. १८० व रु. २४० उपभोग खर्च आधारभूत मानला व त्याआधारे १९७३-७४ मध्ये ग्रामीण भागातील ४६% लोकसंख्या दारिद्र्य रेषेखाली असल्याचा निष्कर्ष काढला.

भारतीय नियोजन आयोगाने सन २००५ मध्ये प्रा. सुरेश तेंडुलकर यांच्या अध्यक्षतेखाली दारिद्र्याचा अभ्यास करण्यासाठी समिती स्थापन केली. या समितीने पायाभूत बदल सुचविले व बहुआयामी निकष अमलात आणून दारिद्र्य निर्धारण करण्यात आले. त्यांच्या निकषानुसार सन २००४-०५ मध्ये ग्रामीण भागात ४१.८% तर शहरी भागात २५.७% लोक दारिद्र्य रेषेखाली जीवन जगत असल्याचा निष्कर्ष समितीने काढला.

म्हणजेच दारिद्र्याचे मोजमाप करण्याच्या पद्धतीत बदल केल्यास दारिद्र्याच्या प्रमाणातही बदल होतो. त्यामुळेच फक्त उपभोग मूल्य व उष्मांक हीच दारिद्र्याचे मोजमाप करणारी साधने परिपूर्ण आहेत असे मानणे योग्य नाही. कारण दारिद्र्य हे भौतिक नसून ते बुद्धिपुरस्सर व व्यक्ती सापेक्ष आहे. अर्थात दारिद्र्य हे बहुआयामी आहे.

ऑक्सफोर्ड दारिद्र्य आणि मानव विकास संस्थेने बहुआयामी दारिद्र्य निर्देशकांचा उपयोग केला आहे. त्यानुसार भारतात २००७ मध्ये ६४.५ कोटी लोकसंख्या दारिद्र्य रेषेखाली जीवन जगत होती. यापैकी ४२.१ कोटी लोकसंख्या उत्तर-भारत आणि पूर्व भारतातील आठ राज्यातून असल्याचे निष्पन्न झाले. यामध्ये बिहार, छत्तीसगढ, झारखंड, मध्यप्रदेश, ओरिसा, राजस्थान, उत्तरप्रदेश आणि प.बंगाल इ. राज्यांचा समावेश होता. या आठ राज्यात असणाऱ्या गरिबांचे प्रमाण ४१ कोटीपेक्षा जास्त असल्याचे दिसून आले.

भारतातील आर्थिक सुधारणांच्या पार्श्वभूमीवर आणि खा-उ-जा पार्श्वभूमीवर भारतातील विकासाचा समतोल साधला जाणे आवश्यक असतानाच विकासाचा निर्देशांक वेगाने विकसीत होताना हा विकास भारताच्या विशिष्ट भागातच झपाट्याने होऊ लागला. विशेषत: पश्चिम भारतातील गुजरात आणि महाराष्ट्रात विकासाचा वेग वाढला. त्यामुळे मुंबई, ठाणे, नाशिक, पुणे इ. भागात नागरीकरणाचा वेग या कालावधीत चढाच राहिला याचे मुख्य कारण आहे,

विकासाच्या असमतोलामुळे उत्तर-भारत व पूर्व भारतातील आठ राज्यातील नागरिकांचे खूप मोठ्या प्रमाणात देशातील पश्चिमेकडील विकसित भागात स्थलांतर झाले आहे.

त्यामुळेच दारिद्र्य आणि बेरोजगारी ज्या प्रदेशात होती व आहे अशा प्रदेशातून विकसित प्रदेशात स्थलांतराचे प्रमाण खूप मोठ्या संख्येने वाढले आहे. यातूनच अनेक समस्या उभ्या राहिल्या आहेत. या स्थलांतरीत लोकांना राहण्यासाठी जागा, तसेच नागरी सेवा-सुविधा देताना या भागातील स्थानिक स्वराज्य संस्था व शासकीय यंत्रणांवर खूप मोठा ताण निर्माण झाल्याने झोपडपट्टी सदृश वस्त्यांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झालेली दिसून येते. तसेच स्थानिक लोकांच्या रोजगारावर या स्थलांतरामुळे परिणाम झाल्याचे दिसून येऊ लागले आहे. त्याचप्रमाणे सांस्कृतिक व सामाजिक सुरक्षितता या संदर्भात समस्या निर्माण होऊ लागल्यामुळे मूळ स्थानिक रहिवासी असणाऱ्या लोकांच्या मनात या स्थलांतरीत लोकांबद्दल द्वेषमूलक भावना जागृत होऊ लागली. परिणामी पश्चिम महाराष्ट्रातील विकासाच्या क्षेत्रात भाषिक व सांस्कृतिक समस्यांमुळे सामाजिक सुरक्षिततेचा मुद्दासुद्धा दारिद्र्याच्या संकल्पनेत महत्त्वपूर्ण असल्याचे आता दिसू लागले आहे.

भारतातील नागरी मुलं भूक, आरोग्य, पाणि व स्वच्छता, अपूरे शिक्षण आणि बालमजुरी इ. कारणांमुळे विषमतेला तोंड देत आहेत. पाच वर्षाखालील १० पैकी ७ मुले १० पैकी ६ गरीब महिला या रोगग्रस्त आहेत. गरीब कुटुंबातील जवळपास ५० टक्के महिलांना त्यांच्या होऊ घातलेल्या मुलांसाठी सुरक्षित प्रसुती करता येत नाही.

यामुळेच जागतिकीकरणाच्या वाटेवर विकासाचे खरे चित्र मांडणे आवश्यक बनले आहे. विकासाचा निर्देशांक कितीही चढा राहिला तरी, त्याचे फायदे समाजातील कोणत्या घटकांना कोणत्या स्वरूपात कसे होत आहेत हे महत्त्वपूर्ण आहे. विकासाचा आणि दारिद्र्याचा असमतोल हा फक्त प्रादेशिक, तसेच नागरी व ग्रामीण इतकाच मर्यादित नसून तो भारतातील विविध जाति-जमातींमध्येसुद्धा आढळून येतो. उदा. सन २००४-०५ मध्ये ओरिसा या राज्यात ६१.८ टक्के अनुसूचित जमाती व ७२.६ टक्के अनुसूचित जातीमधील लोक दारिद्र्यात जीवन जगत होते. त्याचवेळी महाराष्ट्रात हेच दारिद्र्याचे प्रमाण अनुक्रमे ४०.४ टक्के व ४३.२ टक्के होते. तर या जमाती व जातीतील दारिद्र्याचे सर्वात कमी प्रमाण हिमाचल प्रदेशात अनुक्रमे २.४ टक्के व ५.६ टक्के होते. त्यामुळे असे म्हणता येते की, दारिद्र्याची समस्या ही फक्त प्रादेशिक, नागरी व ग्रामीण इतकीच मर्यादित नसून या समस्येची व्याप्ती ही जाती व्यवस्थेमध्येसुद्धा विषम प्रमाणात आढळून येते.

भारतातील दारिद्र्याचा आढावा घेत असताना प्रादेशिक विषमता, नागरी व ग्रामीण विषमता आणि जाती-जमातीतील विषमता याचे स्वरूप लक्षात घेत असतानाच, जागतिक आर्थिक महासत्तेच्या वाटचालीत अग्रेसर असणाऱ्या भारतातील विकासीत राज्यातील विशेषत: मुंबई, पुण्यातील नागरी दारिद्र्याचे स्वरूप लक्षात घेणे महत्त्वपूर्ण आहे.

महाराष्ट्रातील विशेषत: मुंबई, पुण्यातील नागरी दारिद्र्याचे स्वरुप - मुंबई व पुण्यातील नागरी दारिद्र्याचे स्वरूप पाहताना आकडेवारी व प्रमाण

यापेक्षा येथील विकासाच्या पार्श्वभूमीवर येथील दारिद्र्याचे वास्तव चित्र मांडणे आवश्यक आहे.

खरे तर, शहरात मुलांना शाळा, दवाखाना आणि खेळाचे मैदान उपलब्ध असते. परंतु जगातील काही श्रीमंत शहरात तसेच मुंबईत मुलांच्या आरोग्य, शिक्षण आणि उपलब्ध संधींच्या बाबतीत खूप मोठ्या प्रमाणात तफावत असल्याचे आढळून आले आहे. युनिसेफच्या २०१२ च्या अहवालानुसार भारतातील मुले ४९ हजार झोपडपट्ट्यांमध्ये रहात आहेत. यापैकी निम्म्या झोपडपट्ट्या या पाच राज्यात म्हणजेच महाराष्ट्र, आंध्र प्रदेश, प.बंगाल, तमिळनाडू आणि गुजरात राज्यात आहेत.

देशातील विकसित राज्यांमध्येच दारिद्र्याच्या या निर्देशाकांचे वास्तव चित्र आपल्याला झोपडपट्ट्यांमधून पहावयास मिळते. सन २००९-१० च्या पर्यावरण अहवालानुसार पुण्यातील ५० टक्के लोकसंख्या झोपडपट्ट्यांमधून राहते.

नागरी गरीबांच्या संख्येने देशातील झोपडपट्ट्यांच्या प्रमाणात पुण्याला तिसऱ्या क्रमांकावर ढकलेले आहे. तर मुंबईचा देशात प्रथम क्रमांक लागतो, मुंबईतील ५५ टक्के लोकसंख्या झोपडपट्ट्यांमध्ये राहते. नागरी दारिद्र्य म्हणजे काय? फक्त लोकांची आकडेवारी आणि झोपडपट्टीच काय? तर येथील जनजीवन अर्थात लोक कसे जगत आहेत याचे वास्तव चित्रच दारिद्र्याचे खरे स्वरुप स्पष्ट करते.

महाराष्ट्राचे दरडोई उत्पन्न हजारोंच्या घरात असले, तरी मुंबईच्या एका कोपऱ्यात, डंपिंग ग्राऊंडवरील कचरा वेचत जगणाऱ्या शेकडो कुटुंबांनी नागरी दारिद्र्याच्या निकषांनाही आव्हान देत मरणाशी संघर्ष चालविला आहे.

मुंबईच्या २४ महापालिका विभागांपैकी एम-पूर्व भागात रफीनगर-१, संजयनगर-२, निरंकारी, शांतीनगर, मोमिनपुरा, पद्मानगर, चिखलवाडी आणि इंदिरानगर या वस्त्या आहेत. यापैकी तीन वस्त्या देवनारच्या क्षेपणभूमीवरच, म्हणजे संपूर्ण मुंबईचा कचरा जिथे गोळा व्हायचा त्यावर, तर तीन वस्त्या क्षेपणभूमीच्या परिसरातच आहेत. रफीनगरमधील १४ बालके सन २०१० मध्ये दगावली आणि ही वस्ती चर्चेत आली. या बालकांच्या मृत्यूचे वैद्यकीयदृष्ट्या स्पष्ट झालेले कारण काहीही असले, तरी कुपोषणच त्या आजारांचे मूळ कारण असल्याने उपचाराचा उपयोग झाला नाही.

कुजट, रोगट दूषित हवा, स्वच्छ पाण्याचे दुर्भिक्ष्य, थंडी ही कारणे या वस्त्यांमधील दारिद्र्य आणखी भयानक करतात. सकाळ उजाडली की खाद्यांवर कापडाची झोळी घेऊन बाहेर पडणाऱ्या माता आपल्या तान्ह्या मुलांना पुरेसे स्तनपानही देऊ शकत नाहीत. त्यामुळे अगोदरच दारिद्र्य भोगणाऱ्या या मुलांची आणखीनच आबाळ होते. त्यात गुन्हेगारीच्या भीतीची भर पडते. अपहरण, बलात्कार आणि त्याहूनही टोकाच्या संकटांचे सावट मुलींवर घिरट्या घालत असते. म्हणून वयात येण्याआधीच मुलींचे लग्न लावून आईबाप सुटकेचा निःश्वास टाकतात.

इथे कचरा वेचून दिवसाकाठी १००-१५० रुपयांपर्यंतची कमाई करणारी कुटुंबे आहेत. पण त्यापैकी २५ ते ५० रुपये केवळ पाणी विकत घेण्यात खर्च होतात. उरलेल्या रकमेतून अन्न, आरोग्य, आणि शिक्षणाचा खर्च तो अशक्यच. अपनालय या संस्थेने सर्वेक्षण केले असता एकट्या रफीनगरात ४०० पैकी २०० हून अधिक

बालके तीव्र कुपोषित, तर २७ बालके कुपोषणाच्या अगदी अखेरच्या टप्प्यात असल्याचे स्पष्ट झाले.

मेळघाटातील कुपोषणाच्या बातम्यांनी अवघा देश हादरला होता. इथियोपियातील दुष्काळग्रस्त मुलांच्या कहाण्यांनी जगाचे डोळे पाणावले होते; पण आमच्या मुंबईतील या वस्तीचे जिणे समोर येऊनही सरकार मात्र ढिम्मच होते. शहरीकरणाच्या प्रक्रियेमध्ये मुंबई या मायावी नगरीत माया कमविण्याच्या स्वप्नांना घेऊन येणाऱ्यांच्या दारिद्र्याचा हा ताळमेळ तर मेळघाटालाही लाजविणारा असाच आहे.

प्रगत राज्य अशी ओळख असलेल्या महाराष्ट्रातील ४० टक्के नागरिक झोपडपट्टीत वास्तव्याला आहेत. मुंबई, औरंगाबाद, नाशिक, ठाणे, नागपूर, अकोला, अमरावती, अचलपूर या शहरांमध्ये ते आहेत. मुंबईनंतर विदर्भात सर्वाधिक लोक झोपडपट्टीत वास्तव्य करीत असल्याचा निष्कर्ष टाटा समाज विज्ञान संस्था, मुंबईने महाराष्ट्रातील लहान व मध्यम शहरांचा अभ्यास करून काढला आहे.

## दारिद्र्याची कारणे व उपाययोजना:

दारिद्र्याची कारणे आणि उपाययोजना या स्वतंत्रपणाने न पाहता त्यांचा एकत्रितरित्या अभ्यास करणे आवश्यक आहे, कारण उपाययोजना प्रभावीपणाने न राबविणे किंवा त्याची माहितीसुद्धा प्रत्यक्ष लाभार्थींना नसणे हीसुद्धा दारिद्र्याची प्रमुख कारणे आहेत. अर्थात कारणे व उपाययोजना या परस्परसंबंधीत आहेत.

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमध्ये भारतातील आर्थिक सुधारणांच्या पार्श्वभूमीवर असमतोल विकास झाल्यामुळे दारिद्र्याच्या प्रमाणातही विषमता असल्याचे आढळून येते. तसेच वेगवेगळ्या भागातील या दारिद्र्याची कारणेसुद्धा वेगवेगळी आहेत. या कारणांमध्ये प्रमुख कारण वाढती लोकसंख्या, बेरोजगारी, व्यसनाधिनता, शिक्षणाचा अभाव ही तर आहेतच. परंतु या कारणांबरोबरच विकासाच्या प्रक्रियेत वाढती आर्थिक विषमता, नैतिकमूल्याचे अध:पतन अर्थात भ्रष्टाचार, काळ्या पैशाची समस्या, आणि परदेशात गुंतवणूक (आर्थिक नि:सारण) इ. कारणेसुद्धा महत्त्वपूर्ण आहेत.

संयुक्त राष्ट्रांचे माजी सरचिटणीस कोफी अन्नान १४ व्या दिल्ली शाश्वत विकास परिषदेसाठी ६ फेब्रुवारी २०१४ रोजी भारतात आले असता त्यांनी आपल्या बीजभाषणात श्रीमंत आणि गरिब यांच्यातील वाढत्या दरीबद्दलही नाराजी व्यक्त केली. ऑक्सफॅमच्या ताज्या अहवालाचा दाखला देत, जगातील सर्वात श्रीमंत अशा ८५ व्यक्तींकडे साडेतीन अब्ज गरिबांएवढी संपत्ती असल्याचे त्यांनी नमूद केले. लक्षावधी लोकांना अन्नापासून वंचित ठेवणारा कसला हा विकास? या परिषदेत त्यांनी परखडपणे आपली मते मांडली. आजही ६८ कोटी लोकांना विद्युतपुरवठा नाही, आजही १ अब्ज ७० कोटी लोकांना स्वच्छ प्रसाधनगृहे उपलब्ध नाहीत, हे दृश्य आपल्या विकासाच्या व्याख्येत कसे काय बसते? अशी पृच्छा त्यांनी केली.

विश्व संपत्ती अहवाल २०१३ नुसार जगातील अतिश्रीमंत व्यक्तींची संख्या १.२ कोटी झाली आहे. या लोकांच्या ताब्यात ४६,२०० अब्ज डॉलर्सची संपत्ती एकवटली आहे. अतिश्रीमंत व्यक्तींबाबत भारताने जगात दुसरे स्थान पटकावले आहे. भारतात अतिश्रीमंतांच्या संख्येत २२.२ टक्क्यांनी वाढ झाली आहे.

भारतासारख्या गरीब देशांत एकीकडे दारिद्र्य रेषेखाली जीवन जगणाऱ्यांचे प्रमाण मोठे असताना दुसरीकडे अतिश्रीमंतांची संख्या वाढणे हे देशातील आर्थिक विषमता व काळ्या पैशाचे प्रमाण स्पष्ट करणारे आहे. दारिद्र्याच्या कारणांमध्ये आर्थिक विषमता हे जसे महत्त्वपूर्ण कारण आहे, त्याचप्रमाणे नैतिक अध:पतन अर्थात भ्रष्टाचार हे सुद्धा महत्त्वपूर्ण कारण आहे.

१९८३ साली झोपडपट्टी सुधारणा अधिनियमातील तरतुदी महाराष्ट्र राज्यातील असंख्य शहरांना लागू करण्यात आल्या. मात्र १९९५ नंतर झोपडपट्टी सुधारणा कार्यक्रमांची अंमलबजावणी केली जात असलेल्या शहरांची संख्या ६१ च्या वर पोहोचली. २०११ मध्ये झोपडपट्टीधारक शहरांच्या संख्येने शतक झळकावले आहे.

मुंबईतील १९९५ पूर्वीच्या ४० लाख झोपडपट्टीवासीयांच्या पुनर्वसनासाठी राज्य सरकारने हाती घेतलेल्या झोपडपट्टी पुनर्विकास योजनेत पहिल्या टप्प्यात २८ हजार सदनिका बांधताना बिल्डरकडून पायाभूत सुविधा शुल्कापोटी ८४ कोटी रु. वसुल करायचे होते, पण ती वसुली झालीच नाही. या प्रकल्पाच्या ७ पैकी ६ इमारतींमध्ये १ लाख ६२ हजार ७५५ चौ.मी. चा अतिरिक्त टीडीआर चा फायदा बिल्डरला देण्यात आला. त्यामुळे विकासकाचा १८७.१७ कोटींचा फायदा झाल्याचा ठपका कॅगने ठेवला.

जळगावच्या पालिकेतील सत्ताधाऱ्यांनी शासकीय व खासगी जमिनी आपल्या मालकीच्या असल्याचे दाखवीत हुडकोची फसवणूक केल्याचा आरोप झाला असून अल्प उत्पन्न गटासाठी ११ हजार ४२४ घरकुलांच्या योजनेसाठी कर्जस्वरुपात मोठी रक्कम मंजूर करून घेतली. या योजनेत २९ कोटी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचा आरोप होऊन गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दारिद्र्याच्या विविध कारणांमध्ये भ्रष्टाचार हे कारणसुद्धा कसे महत्त्वपूर्ण आहे वरील उदाहरणातून स्पष्ट होते. तसेच दारिद्र्याच्या कारणांमध्ये स्वातंत्र्यपूर्व भारतातील आर्थिक नि:सारण हे कारण आजच्या काळातही अत्यंत महत्त्वाचे आहे. कारण या नि:सारणामुळे देशातील भांडवली गुंतवणूक कमी होते, पर्यायाने देशातील आर्थिक विकासाच्या प्रक्रियेमध्ये समस्या निर्माण होते. देशाचे उत्पन्न कमी होते, पर्यायाने देशातील गरिबी वाढते.

काळापैसा धारकांसाठी नंदनवन मानल्या जाणाऱ्या स्वित्झर्लंडमधल्या स्विस बँकेत भारतीयांचे तब्बल २.१८ अब्ज स्विस फ्रँक्स (जवळपास १२ हजार ७४० कोटी रुपये) अधिकृतपणे जमा आहेत. स्विस बँकेनेच ही माहिती १४ जून २०१२ रोजी उघड केली. यामध्ये काळ्या पैशाचा समावेश नाही.

भारतीयांनी स्विस बँकेमध्ये ठेवलेल्या पैशांप्रमाणेच भारताच्या संपत्तीचा खूप मोठा हिस्सा कच्चे तेल आणि सोने चांदी आयातीपोटी परदेशात जातो त्यामुळेसुद्धा भारताचे आर्थिक नि:सारण होत आहे. सन २०११-१२ या आर्थिक वर्षात भारताने ३०३ अब्ज डॉलरची निर्यात तर ४८५ अब्ज डॉलरची आयात राखली आहे. पैकी १६० अब्ज डॉलर हे कच्च्या तेलाच्या, तर ६० अब्ज डॉलर हे सोने व चांदीसारख्या मौल्यवान धातूच्या आयातीवर खर्च झाले.

आर्थिक नि:सारणाच्या या कारणाबरोबरच काळ्या पैशाची समस्यासुद्धा भारतातील गरीबी आणि दारिद्र्याचे एक प्रमुख कारण आहे. सरकारी

उपाययोजना, सेवा-सुविधा, आणि विकास कामांवर खर्च करण्यासाठी सरकारी तिजोरीत जमा होणारा पैसा काळ्या पैशामुळे खासगी तिजोरीत जमा होतो. त्यामुळे देशातील गरीबी व दारिद्र्य निर्मुलनाच्या कार्यावर परिणाम होतो.

भारतातील काळ्या पैशाचा अंदाज घेण्यासाठी सरकारने वेळोवेळी अभ्यासगट नेमले होते. त्यामध्ये डॉ.एस.आचार्य यांच्या मार्गदर्शनाखाली १९८५ मध्ये नेमलेली नॅशनल इन्स्टीट्यूट ऑफ पब्लिक फायनान्स ॲण्ड पॉलीसी महत्त्वाची आहे. या समितीच्या मते १९७५-७६ मध्ये देशाच्या एकूण उत्पन्नाच्या १५ ते १८% व १९८३-८४ मध्ये १९ ते २१% काळा पैसा होता. २००७ मध्ये स्विस बँक असोसिएशनच्या २००६ च्या अहवालाप्रमाणे स्विस बँकेत कोणत्याही देशातील नागरिकांपेक्षा भारतीयांचा पैसा जास्त (१४५६ अब्ज डॉलर्स म्हणजे ७२ लाख ८० कोटी रु.) एवढा काळा पैसा परदेशात नेण्यात आला ही बाब ग्लोबल फिनान्शिअल इंटेग्रीटी या संस्थेने प्रसिद्ध केली. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या सर्वेक्षणानुसार भारतात एकूण राष्ट्रीय उत्पन्नाच्या ५०% एवढा काळा पैसा असल्याचे मत व्यक्त केले आहे.

भारताबाबत केलेल्या अंदाजानुसार गेल्या ६० वर्षांत भारतातून एकूण २१३ अब्ज डॉलर्स देशाबाहेर बेकायदेशीररित्या नेण्यात आले असा आरोप केला जातो. अशा रितीने काळ्या पैशाची समस्या देशाच्या अर्थव्यवस्थेला अधिकच घातक ठरत असल्याचे दिसून येते आहे. याच आर्थिक नि:सारणातील पैसा जर देशासाठी खर्च झाला तर देशात मोफत आरोग्य, शिक्षण, उत्तम पायाभूत सुविधा, स्वस्त वीज यांची उभारणी करणे शक्य होईल. तसेच कोट्यावधी रुपयांच्या घोट्याळ्यातील पैशातून गरीब जनतेला घरगुती वापरावयाच्या गॅसच्या दरामध्ये कायमस्वरुपी सवलत देता येईल.

भ्रष्टाचार, आर्थिक नि:सारण, आणि काळा पैसा ह्या समस्या दारिद्र्य निर्मुलनाच्या उपाययोजनांमधील प्रमुख अडथळे आहेत. त्याचप्रमाणे शासकीय उदासीनता वा दप्तर दिरंगाई हे सुद्धा कारण महत्त्वपूर्ण आहे. केंद्राने पुण्यातील नागरी गरिबांसाठी बेसीक सर्व्हिसेस टू अर्बन पूअर या योजनेखाली २०,५२८ घरे मंजूर केली. परंतु, पुणे महानगर पालिकेने फक्त २,२९४ घरे पूर्ण केली व ३,४७४ घरांचे काम चालू असल्याचे सांगितले जाते. तसेच १४,७६० घरे बांधण्याचे काम अजून चालू सुद्धा झाले नाही.

अशाप्रकारे दारिद्र्याच्या कारणांमध्ये शिक्षण, लोकसंख्या, बेरोजगारी, व्यसनाधिनता, प्रादेशिक विषमता, सामाजिक विषमता यांसारख्या कारणांबरोबरच भ्रष्टाचार, आर्थिक नि:सारण, काळ्या पैशाची समस्या, आणि शासकीय उदासीनता ही कारणेसुद्धा महत्त्वपूर्ण असल्याचे आढळून येते.

भारतातील नागरी दारिद्र्याचा हा आढावा घेत असताना या शोधनिबंधाच्या अभ्यासातून पुढील महत्त्वपूर्ण निष्कर्ष दृष्टोत्पत्तीस आले आहेत.

**निष्कर्ष:**

दारिद्र्याच्या नव्या प्रारुपावरूनच आपण समाजातील वर्ग, वर्ण, जात, वंश इ.मधील विषमता आणि भेद याचा छेद करून आर्थिक सुधारणेच्या माध्यमातून सामाजिक सुधारणेकडे वाटचाल करणे अत्यंत आवश्यक आहे. त्यासाठीच दारिद्र्याचे निकष ठरविताना आणि

दारिद्र्याचे मोजमाप करताना फक्त दरडोई उत्पन्न आणि अन्नघटकांद्वारे मिळणारा उष्मांक याद्वारेच मोजमाप करणे यथायोग्य होणार नाही, तर वाढती आर्थिक विषमता आणि सामाजिक विषमता - शिक्षण, आरोग्य, निवारा, रोजगाराची हमी इ. परिमाणातून दारिद्र्याचे यथायोग्य स्वरुप स्पष्ट करणे आवश्यक आहे हा महत्त्वपूर्ण निष्कर्ष या शोधनिबंधाच्या अभ्यासातून दृष्टोत्पत्तीस येतो.

त्याचप्रमाणे भारतातील दारिद्र्य अर्थात गरिबी कमी झाली असा शासनाचा दावा असला तरी जागतिकीकरणाच्या पार्श्वभूमीवर आणि आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत दारिद्र्याच्या मोजमापासाठी वापरण्यात येणारे निकषही परिवर्तनीय किंवा लवचिक असणे आवश्यक आहे.

काँग्रेस सरकारच्या कार्यकाळात गरिबी हटल्याचा दावा सरकारकडून ५ फेब्रुवारी २०१४ रोजी संसदेत करण्यात आला आहे. २००४-०५ साली देशातील गरिबांची संख्या ४०.७४ कोटी होती. परंतु २०११-१२ या वर्षात ही संख्या प्रचंड कमी होऊन २७ कोटी झाल्याची माहिती तत्कालीन नियोजन आणि संसदीय कामकाज राज्यमंत्री राजीव शुक्ला यांनी संसदेत दिली. नियोजन आयोगाच्या मासिक उत्पन्नाच्या निकषानुसार २०१२-१३ सालच्या सर्वेक्षणासाठी ग्रामीण भागासाठी ८१६ रु. दरडोई उत्पन्न तर शहरी भागासाठी १००० रु. दरडोई उत्पन्न हे निकष दारिद्र्याच्या मूल्यमापनासाठी ठरविण्यात आले.

सन २०१२-१३ च्या महागाई निर्देशांकानुसार आणि शहरी भागातील जीवनमानाचा सर्वसाधारण विचार करता जेथे कमाईतील ५० रु. दररोज पिण्याच्या पाण्यासाठीच खर्च करावे लागतात तिथे गरिबीचा नागरी निकष रु. १०००/- हाच अत्यंत गरिब असल्याचे स्पष्ट होते. त्यामुळेच परंपरागत निकषानुसार दारिद्र्याचे मूल्यमापन न करता, दारिद्र्याचा विचार शिक्षण, आरोग्य, रोजगार, आणि सामाजिक सुरक्षितता या निकषांनुसारसुद्धा करणे काळानुरुप आवश्यक असल्याचा निष्कर्ष दिसून येतो.

नियोजन आयोगाने काढलेला निष्कर्ष खोटा ठरेल अशी माहिती सरकारच्याच एका पाहणीतून उपलब्ध झाली आहे. देशातील कोणत्याही कुटुंबाला खाद्यपदार्थ, शिक्षण, वैद्यकीय उपचार या मूलभूत गरजा भागविण्यासाठी दरडोई मासिक खर्चापोटी १ हजार ५०६ रुपये म्हणजेच दिवसाकाठी ४८ रुपये ५८ पैसे लागतात, असे सरकारच्या राष्ट्रव्यापी नमुना पाहणीत स्पष्ट झाले आहे. खरे तर देशातील ७० टक्के नागरिक गरीब आहेत, असे काँग्रेस अध्यक्षा सोनिया गांधी यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय सल्लागार मंडळाचे सदस्य एन.सी. सक्सेना यांनी सरकारला सांगितले.

वरील विवेचनातून हे निष्कर्षास येते की, दारिद्र्याचे खरे प्रमाण आणि मोजमाप करण्यात प्रचलित निकष हे महत्त्वपूर्ण असले तरी ते परिपूर्ण आहेत असे मात्र म्हणता येत नाही. कारण दारिद्र्य हे बहुआयामी आहे.

भारतातील नागरी दारिद्र्याचे स्वरुप, त्याची कारणे व उपाययोजना आणि त्याची अंमलबजावणी याचा आढावा घेत असताना जे निष्कर्ष आढळून आले ते वरीलप्रमाणे मांडले आहेत. या सर्व बाबींचा विचारविनिमय करून यासंदर्भात पुढील सर्वसाधारण सूचना वा शिफारसी करण्यात येत आहेत.

यापुढे विकासाच्या नव्या संकल्पनांची-प्रारुपांची गरज असल्याचे अन्नान यांनी सांगितले.

या नव्या प्रारुपामध्ये स्वच्छ पाणी, जैवविविधता, ऊर्जा, पर्यावरणीय संसाधने यांचे योग्य ते मूल्यमापन अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. या प्रमुख सूचनेबरोबरच पुढील शिफारसीसुद्धा आवश्यक आहेत.

दारिद्र्य निर्मुलनास जेवढे महत्त्व दिले जाते त्यापेक्षा भ्रष्टाचार निर्मुलनास महत्त्व देऊन शासकीय योजनांची प्रभावीपणे व तत्परतेने अंमलबजावणी करण्यात यावी. तसेच अर्थव्यवस्था खुली करत असताना, त्याचे फायदे तोटे कोणाला कसे होतील याचा विचार केला जावा. लोकांनी अयोग्य सामाजिक चालीरीती, रुढी परंपरा यास बगल द्यावी. भारतातील उत्तर आणि पूर्वेकडील राज्यांनी विस्तृत रोजगार निर्मितीचे धोरण तयार करून अंमलबजावणी करावी की, जेणे करून स्थलांतराचे प्रमाण कमी होईल.

या सर्व सूचनांबरोबरच लोकांनी परंपरागत शिक्षणाऐवजी रोजगाराभिमुख शिक्षण आणि प्रशिक्षणाला प्राधान्य द्यावे. तसेच गरिबांच्या वस्त्यांमध्ये समाजसेवी संघटना व संस्थांमार्फत सहज शिक्षणाच्या माध्यमातून गरिबी ही फक्त पैशाच्या अथवा उत्पन्नाच्या स्वरुपात नसून ती बुद्धीपुरस्सर म्हणजे वैचारिक स्वरुपात आहे ही जागृती करून गरिबी विषयीच्या आणि वर्तनाविषयीच्या अध्ययनातून गरिबी वा दारिद्र्य निर्मुलनासाठी प्रयत्न होणे अत्यंत आवश्यक आहे.

अन्यथा झोपडपट्टी पुनर्वसन योजना, इंदिरा आवास योजना व राजीव आवास योजना यांसारख्या योजनांमुळे जमिनीवरील बैठ्या झोपडपट्ट्यांच्या जागी गगनचुंबी इमारतीतील झोपडपट्ट्या निर्माण होतील. कंत्राटी पद्धतीवर आणि अंगमेहनतीची कामे करणारी बहुसंख्य जनता मिळालेल्या अल्प मजुरीतून व्यसनाधीनतेत व अनैतिकतेमध्ये लीन होत आहे. त्यामुळे त्यांच्या निवाऱ्याच्या स्वरुपात बदल करून दारिद्र्याचे उच्चाटन होईल असे म्हणणे धैर्याचेच होय.

**समारोप:**

भारतातील शहरी आणि ग्रामीण दारिद्र्याचे प्रमाण नियोजन आयोगाच्या नोंदीनुसार घटले असले तरी वाढते शहरीकरण, स्थलांतर, नागरी सेवा-सुविधा यांवरील अतिरिक्त ताण यासंदर्भातून दारिद्र्याचे स्वरूप मांडण्याचा प्रयत्न या शोधनिबंधातून करण्यात आला आहे.'

भारतीय अर्थव्यवस्था वेगाने विकसित होत आहे. जगातील विकसनशील अर्थव्यवस्थांमधील अग्रेसर अर्थव्यवस्था म्हणून ओळखली जाते. असे असले तरी गरीबी किंवा दारिद्र्य हे भारतीय अर्थव्यवस्थेचे एक प्रमुख अंगभूत वैशिष्ट्य आजही अधोरेखीत होत आहे. विकासाच्या वाटेवर गरीबी आणि दारिद्र्याचे निकष आणि परिमाणसुद्धा बदलणे आवश्यक आहे. कारण दारिद्र्याच्या सापेक्ष आणि निरपेक्ष स्वरुपात मूलभूत बदल.घडून येऊ लागले आहेत याची नोंद दारिद्र्याचा अभ्यास करताना व त्यावरील उपाययोजनांचा अभ्यास करताना अत्यंत महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

दारिद्र्याची व्यापकता मोठी व भिन्न आहे. समाजातील सर्व घटकांचे, पर्यायाने गरिबांचे उत्तम सामाजिकीकरण होणे अत्यंत आवश्यक आहे. अन्यथा इंदिरा आवास योजना, राजीव गांधी आवास योजना, झोपडपट्टी पुर्नवसन प्रकल्पातील व अन्य योजनेतील कोणत्याही इमारतीत व वस्तीत फिरताना पान-तंबाखूजन्य पदार्थांच्या पिचकाऱ्यांनी रंगविलेल्या भिंती व कानेकोपरेच आपले स्वागत करतील. तसेच विकृत कल्पनेतून साकारलेली

प्रसाधन गृहातील भित्तीचित्रे व साहित्य आपणास कोणत्या आर्ट गॅलरीत (कलादालनात) आलो आहोत ते सांगू लागतील. व्यसनाधुंद झालेल्या घरातील भांडणांचे विस्मयकारक चित्र आपल्या नजरा खिळवून ठेवतील.

त्यामुळेच, अन्न-वस्त्र, निवारा नुसतेच फुकट देऊन गरिबी वा दारिद्र्य निमुर्लनाचे भौतिक चित्र बदलता येणार असले तरीही त्यांच्या सामाजिकीकरणाच्या पातळीतून त्यांचे दारिद्र्याचे खरे रंग प्रतिबिंबित होतच राहतील. यासाठीच दया, क्षमा, शंती तेथे देवाची वस्ती अर्थात वैचारिक संपन्न समाज निर्मिती म्हणजेच योग्य सामाजिकीकरण हेच खरे दारिद्र्य निमुर्लनाचे उत्तम साधन व स्वरुप होय.

### संदर्भ सूची:


१) *भारतातील सामाजिक समस्या*, प्रकाशक - कुलसचिव, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे, सन २००७

२) *आर्थिक विचारांचा इतिहास*, प्रकाशक - कुलसचिव, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे सन २००८

३) *अर्थसंवाद*, प्रकाशक - मराठी अर्थशास्त्र परिषद, अंक ऑक्टोबर - डिसेंबर २०१२, ऑक्टोबर - डिसेंबर २०१३

४) *सहकारी महाराष्ट्र*, प्रकाशक - महाराष्ट्र राज्य सहकारी संघ मर्यादित, पुणे अंक जानेवारी २०१४

५) *दै. लोकसत्ता, दै. महाराष्ट्र टाइम्स*

६) http://articles.timesofindia. indiatimes. com/2011-03-03/pune

७) www.igidr.ac.in/conf/ysp/MP.ppt

८) http://www.hindustantimes.com/ india-news/newdelhi/article1-819001.a

# महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेमुळे स्त्रियांना उपलब्ध रोजगार

निरगुडे इमाम अब्दुल, श्रीरामपूर,
अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
आर.बी.एन.बी.कॉलेज, जि. अहमदनगर
भ्रमणध्वनी: ८८८८६५०२१७

भारत हा एक कृषीप्रधान देश आहे. देशातील एकूण लोकसंख्येपैकी बहुतांश लोक ग्रामीण भागात राहतात. ग्रामीण भागात राहणाऱ्या एकूण लोकांपैकी बहुसंख्य लोकांचा प्रमुख व्यवसाय शेती आहे. भारतातील बहुतांश शेती ही पावसावर अवलंबून आहे. तसेच भारतीय शेती ही हंगामी स्वरुपाची आहे. परिणामी हंगामाच्या काळात ग्रामीण भागातील मजूरांना रोजगार उपलब्ध होतो. बिगर हंगामाच्या काळात मात्र त्यांना बेकार रहावे लागते. त्यामुळे त्यांचे उत्पन्न कमी राहते. कमी उत्पन्नामुळे त्यांना आपला उदरनिर्वाह भागविणे कठीण जाते.

भारतीय अर्थव्यवस्थेपुढे ज्या अनेक समस्या आहेत. त्यापैकी दारिद्र्य व बेरोजगारी या दोन महत्त्वाच्या समस्या आहेत. भारताच्या ग्रामीण व शहरी भागात बेरोजगारी आहे. ग्रामीण भागातील बेरोजगारीचे स्वरुप हे शहरी भागातील बेरोजगारीपेक्षा वेगळे आहे. ग्रामीण भागात खुली बेरोजगारी व छुपी बेरोजगारी आहे. भारताच्या एकूण लोकसंख्येत स्त्रीयांचे प्रमाण जवळपास ५०% इतके आहे. तसेच देशात अनुसूचित जाती (SC), अनुसूचित जमाती (ST) इतर मागास वर्गीय व अल्पसंख्यांक यांचे प्रमाण बऱ्यापैकी आहे. या वर्गातील लोकांच्या विकासासाठी अधिक लक्ष देण्याची गरज आहे. कारण या वर्गातील लोकात दारिद्र्य व बेकारीचे प्रमाण अधिक आहे.

## महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना:

ग्रामीण भागातील बेरोजगारीची समस्या सोडविण्यासाठी सरकारने अनेक योजना व कार्यक्रम सुरु केले आहेत. त्यापैकीच एक म्हणजे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना होय यासाठी सरकारने राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा २००५ केला. हा कायदा फेब्रुवारी २००६ पासून लागू करण्यात आला. म्हणजेच या योजनेची सुरुवात २ फेब्रुवारी २००६ पासून

झाली. पहिल्या टप्प्यात देशातील विविध राज्यातील मागासलेल्या २०० जिल्ह्यात ही योजना सुरु करण्यात आली. १ एप्रिल २००८ पासून देशातील सर्व जिल्ह्यात ही योजना सुरु करण्यात आली. २ ऑक्टोबर २००९ रोजी या योजनेला महात्मा गांधीजींचे नाव देण्यात आले. तेव्हापासून ही योजना महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना म्हणजेच मनरेगा या नावाने ओळखली जाते.

## महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची उद्दिष्टे:

१) भारताच्या ग्रामीण भागात राहणाऱ्या गरजु लोकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देणे. त्याद्वारे सामाजिक सुरक्षा प्रदान करणे.

२) या योजनेच्या माध्यमातून ग्रामीण भागात अनेक टिकाऊ स्वरुपाची कामे हाती घेणे व त्याद्वारे ग्रामीण भागात रस्ते, पाणी व शेतीचा विकास करणे.

३) ग्रामीण भागातील स्त्रीया व अनुसूचित जाती (एस.सी.) व अनुसूचित जमाती (एस.टी.) या वर्गातील लोकांचे सबलीकरण करणे.

४) दुष्काळाची पुनरावृत्ती कमी करण्याच्या दृष्टीने उपयुक्त कामे हाती घेणे. तसेच जलसंधारणाची कामे हाती घेताना पूरनियंत्रणाला प्राधान्य देणे.

५) ग्रामीण भागातील दारिद्र्य व बेकारीची समस्या सोडविणे.

६) नियोजनाच्या विकेंद्रिकरणाला प्राधान्य देताना दारिद्र्य व बेकारी निर्मूलनाच्या योजना हाती घेताना विविध घटकांना नियोजनात समाविष्ट करुन घेणे.

७) पंचायतराज संस्थाचे बळकटीकरण करुन त्यांना अधिकाधिक अधिकार प्रदान करुन ग्रामीण भागात लोकशाही रुजविणे.

८) हिशेब, व्यवहारात व प्रशासनात अधिक पारदर्शकता आणणे.

९) ग्रामीण भागात सर्व समावेशक वृध्दीचे एक महत्त्वपूर्ण साधन म्हणून काम करणे.

१०) ग्रामीण भागातील असंघटीत कामगारांना उपजिविकेचे शाश्वत साधन उपलब्ध करुन देणे.

## राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची वैशिष्ट्ये:

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना ही अतिशय महत्त्वपूर्ण अशी योजना आहे. या योजनेअंतर्गत ग्रामीण भागातील मजूरांना रोजगार उपलब्ध करुन दिला जातो. या योजनेची महत्त्वाची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे-

१) ग्रामीण भागातील प्रत्येक कुटूंबातील एका प्रौढ व्यक्तीला वर्षभरात किमान १०० दिवस रोजगार दिला जाईल.

२) ग्रामपंचायतीकडे कामाची मागणी करणाऱ्या अकुशल मजूरांना या योजनेत रोजगार देण्याची हमी आहे.

३) ग्रामपंचायतीकडे कामाची मागणी करणाऱ्या व्यक्तीला कामाची मागणी केल्यापासून १५ दिवसांच्या आत व ५ किमी अंतरांच्या आत काम दिले जाते.

४) १५ दिवसाच्या आत जर काम देता आले नाही तर बेरोजगार भत्ता मिळविण्यास ती व्यक्ती पात्र असते. हा भत्ता बेरोजगारीच्या पहिल्या ३० दिवसासाठी दररोजच्या मजुरीच्या २५% दिला जातो. त्यानंतर दररोजच्या मजूरीच्या ५०% बेरोजगार भत्ता

दिला जातो.

५) या योजनेअंतर्गत कामाची मागणी करणाऱ्या व्यक्तीस तो रहात असलेल्या गावापासून ५ कि.मी. च्या आत रोजगार पुरवावा लागतो. तो राहत असलेल्या गावापासून कामाचे ठिकाण ५ किलोमीटरपेक्षा जास्त दूर असेल तर १०% जादा वेतन देण्याची तरतूद आहे.

६) कामाच्या ठिकाणी विश्रांतीसाठी सावली, पिण्याच्या पाण्याची सोय व प्रथमोपचार पेटी देणे आवश्यक आहे.

७) ग्रामपंचायतीकडे रोजगाराची मागणी करण्यासाठी विशिष्ट नमुन्यात अर्ज करावा लागतो. रोजगाराची मागणी करणाऱ्या व्यक्तीला जॉब कार्ड दिले जाते हे कार्ड ५ वर्षापर्यंत वैध असते.

८) सर्व मजूरांना मान्य नियमानुसार मजूरीचा दर लागू असतो. त्यानुसार या योजनेमध्ये काम करणाऱ्या प्रत्येक मजुराला किमान वेतन दिले जाते. हे वेतन राज्य सरकार किमान वेतन कायदा १९४८ नुसार ठरविते. त्यानुसार प्रत्येक मजुराला किमान ६० रुपये दररोज मजुरी दिली जाते.

९) मजूरी दर आठवड्याला किंवा जास्तीत जास्त १५ दिवसात मिळणे बंधनकारक आहे.

१०) या योजनेतील कामावर काम करणाऱ्या मजूराला मजूरी रोजीनुसार न देता कामाच्या मोजमापानुसार व प्रतीनुसार दिली जाते.

११) या योजनेतील एकूण लाभार्थ्यांपैकी १/३ लाभार्थी स्त्रिया असाव्यात असे नमूद करण्यात आले आहे.

१२) या योजनेनुसार देण्यात येणारी मजुरी स्त्री व पुरुष मजुरांना समान दराने दिली जाते.

१३) मजुरीची रक्कम ही लाभधारकाच्या वैयक्तिक किंवा संयुक्त बँक किंवा पोस्ट ऑफिस खात्यातच जमा करणे बंधनकारक आहे.

१४) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेचे महत्त्वाचे वैशिष्ट्ये म्हणजे या योजनेअंतर्गत झालेल्या कामाचे सामाजिक ऑडीट करणे बंधनकारक आहे.

१५) राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची अंमलबजावणी गावपातळीवर करण्याची जबाबदारी ग्रामपंचायतीवर असते. त्यामुळे ग्रामपंचायतीची जबाबदारी व भूमिका महत्त्व पूर्ण मानली जाते. तसेच पंचायत समिती, जिल्हा परिषद यांची ही जबाबदारी महत्त्वपूर्ण मानली जाते.

१६) या योजनेअंतर्गत उपलब्ध करुन दिलेल्या कामापैकी५०% काम पूर्ण करण्याची जबाबदारी ग्रामपंचायतीची असते.

**कामाचे स्वरुप:**

या योजनेत प्रामुख्याने उत्पादक स्वरुपाची आणि दुष्काळाची पुनरावृत्ती कमी करण्याचा दृष्टीने उपयुक्त कामांना प्राधान्य दिले जाते. तसेच या योजनेच्या कायद्यातील तरतुदीनुसार ग्रामीण भागात शेती क्षेत्रात पायाभूत सुविधा निर्माण करणे व शेती पूरक उद्योगाशी संबंधित कामाचा समावेश होतो. सर्वसाधारपणे या योजनेमध्ये पुढील प्रकारच्या कामाचा समावेश होतो.

१) जलसंधारणातील विविध कामे उदा. पूरनियंत्रण, शेततळे, पाझर तलाव, गावतळे, विहिर खोदकाम कालवे व तलाव नूतनीकरण

इत्यादी.

२) पिण्याच्या पाण्याची सुविधा निर्माण करणे.

३) सामाजिक वनीकरण व वृक्षारोपण करणे.

४) ग्रामीण भागात रस्ते तयार करणे व जुन्या रस्त्यांची दुरुस्ती करणे.

५) अनुसूचित जाती, जमातीच्या लोकांच्या शेतीसाठी पाण्याची सोय करणे.

६) नालाबंडिंगची कामे करणे.

७) घनकचरा व्यवस्थापनाची कामे करणे.

८) इतर कामे यामध्ये केंद्र सरकार व राज्य सरकार यांच्या सल्ल्यानुसार इतर कामे हाती घेणे.

९) जमिनीची सुधारणा करणे.

१०) गृहबांधणी व्यवस्थापन व बांधकाम साहित्याशी संबंधित कामे.

११) खाणकाम व्यवसाय, वीटभट्टी उद्योग इत्यादी.

### खर्चाची जबाबदारी:

या योजनेसाठी दरवर्षी ४०,००० कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. ही योजना राबविण्यासाठी लागणाऱ्या रकमेपैकी केंद्र सरकार घटक राज्यांना ९०% निधी देणार आहे. उरलेली १०% रक्कम राज्य शासनाला खर्च करावी लागते. स्थूल राष्ट्रीय उत्पन्नाच्या १% खर्च अपेक्षित आहे.

अमर्त्य सेन यांच्या मते एवढी प्रचंड योजना इतरत्र कोठेही राबविली गेलेली नाही. हे एक प्रकारचे गरिबी विरुध्द युध्द आहे. या योजनेत सहभागी व्हायला मिळावे अशी जागतिक बँक व इतर काही संस्थांची इच्छा आहे. मूलत: ही योजना शेतीच्या बिगर हंगाम कालखंडासाठीच आहे.

### महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या प्रगतीचा आढावा:

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या अंमलबजावणीला फेब्रवारी २००६ पासून सुरुवात झाली. केंद्र सरकारकडून या योजनेसाठी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करुन दिला जातो. अर्थात राज्य सरकारला देखील काही रक्कम खर्च करावयाची आहे. केंद्र सरकारकडून या योजनेसाठी २००६-०७ मध्ये १२०७४ कोटी रु. निधी उपलब्ध करुन देण्यात आला होता. २०११-१२ मध्ये ५२६०० कोटी रुपयाचा निधी उपलब्ध करुन देण्यात आला होता. २००६-०७ ते २०१२-१३ या ७ वर्षाच्या कालावधीत एकूण १४३३ कोटी मनुष्यदिवस इतका रोजगार उपलब्ध करुन देण्यात आला. २००६-०७ ते २०१२-१३ या कालावधीत देशाच्या पातळीवर ३०४ लक्ष कामे हाती घेण्यात आली. त्यापैकी २७५ लक्ष इतकी कामे पूर्ण करण्यात आली. या योजनेअंतर्गत जी कामे हाती घेण्यात आली ती भू सुधारणा, ग्रामीण रस्ते, जलसंधारणाची होती. उपलब्ध करुन देण्यात आलेल्या रोजगारात स्त्रीयांना उपलब्ध झालेला रोजगार व एस.सी व एस.टी. यांना उपलब्ध झालेला रोजगार पुढील तक्ता क्र. १ तक्त्यात दर्शविले आहे.

तक्ता क्र. १ वरुन २००६-०७ मध्ये उपलब्ध झालेल्या मनुष्य दिवस रोजगारातील स्त्रीयांचे प्रमाण ४०% इतके होते. २०११-१२ मध्ये हेच प्रमाण जवळपास ४८% पर्यंत वाढल्याचे दिसून येते. तर २०१२-१३ मध्ये हे प्रमाण ५१% इतके होते तसेच एस.सी. व एस.टी. संवर्गातील जवळपास ५०% लोकांचा समावेश २००६-०७ मध्ये असल्याचे दिसते. २०११-१२ मध्ये हेच प्रमाण ४०% पर्यंत कमी झाल्याचे दिसून येते. त्यात एस.टी. या संवर्गातील

### तक्ता क्र. १

### स्त्रिया, एस.सी. आणि एस.टी. यांना उपलब्ध झालेला रोजगार

| वर्ष | मनुष्य दिवस उपलब्ध एकूण रोजगार (कोटीत) | मनुष्य दिवस उपलब्ध रोजगार एस.सी वर्ग (कोटीत) | एकूणाची एस.सी. चे प्रमाण (%) | मनुष्य दिवस उपलब्ध रोजगार एस.टी. वर्ग (कोटीत) | एकूणाची एस.सी. चे प्रमाण (%) | मनुष्य दिवस उपलब्ध रोजगार स्त्रीया (कोटीत) | एकूणाशी स्त्रीयांचे प्रमाण (%) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २००६-०७ | ९०.५१ | २३.२३ | २५.६६ | ३३.०० | ३६.४६ | ३६.७९ | ४०.६४ |
| २००७-०८ | १४३.६८ | ३९.४२ | २७.४३ | ४२.०० | २९.२३ | ६१.०० | ४२.४५ |
| २००८-०९ | २१६.३३ | ६३.३६ | २९.२८ | ५५.०० | २५.४२ | १०३.५७ | ४७.८७ |
| २००९-१० | २८३.६० | ८३.४४ | ३०.४७ | ५८.७४ | २०.७१ | १३६.४० | ४८.०० |
| २०१०-११ | २५७.१५ | ७८.७५ | ३०.६२ | ५३.६१ | २०.८४ | १२१.७४ | ४७.७३ |
| २०११-१२ | २११.४२ | ४६.६० | २२.०० | ३८.३८ | १८.१५ | १०१.१० | ४७.८१ |
| २०१२-१३ | २२९.७८ | ५०.६० | २२.०० | ४१.४० | १८.०० | ११७.३० | ५१.०० |

स्त्रोत : *www.mgnrega.nic.in*

लोकांच्या रोजगाराचे प्रमाण फारसे वाढले नसल्याचे दिसून येते.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेचा उद्देश ग्रामीण भागातील एस.सी., एस.टी. व महिलांना रोजगार उपलब्ध करुन देणे हा आहे. त्यातही रोजगारात महिलांना प्राधान्य दिले जावे असे अपेक्षित आहे. देशातील विविध राज्यात महिलांना उपलब्ध झालेल्या रोजगाराचे प्रमाण पुढील **तक्ता क्र. २** दर्शविले आहे.

**तक्ता क्र. २** तक्त्यात काही राज्ये व केंद्रशासित प्रदेशांचा समावेश केलेला नाही. तक्त्यावरुन २००६-०७ मध्ये उपलब्ध झालेल्या मनुष्य दिवस रोजगारातील महिलांचे महाराष्ट्रातील प्रमाण ३७% इतके होते. देशाची सरासरी ४१% इतकी होती. याच वर्षी तामिळनाडू या राज्यात हे प्रमाण ८१% इतके तर केरळमध्ये हे प्रमाण ६६% इतके होते. २०१२-१३ मध्ये महाराष्ट्रातील प्रमाण ४५% इतके होते. देशाची सरासरी देखील वाढून ती ५१% इतकी झाली. केरळमध्ये याच वर्षी हे प्रमाण सर्वाधिक म्हणजे ९३% इतके होते. उत्तरप्रदेश व जम्मु आणि काश्मिरमध्ये हे प्रमाण सर्वात कमी म्हणजे २०% इतके होते.

तक्ता क्र. २

स्त्रियांना उपलब्ध झालेल्या रोजगाराचे प्रमाण २००६-०७ ते २०१२-१३

| राज्य | स्त्रियांना उपलब्ध झालेल्या रोजगाराचे प्रमाण (%) २००६-०७ | स्त्रियांना उपलब्ध झालेल्या रोजगाराचे प्रमाण (%) २००७-०८ | स्त्रियांना उपलब्ध झालेल्या रोजगाराचे प्रमाण (%) २००८-०९ | स्त्रियांना उपलब्ध झालेल्या रोजगाराचे प्रमाण (%) २००९-१० | स्त्रियांना उपलब्ध झालेल्या रोजगाराचे प्रमाण (%) २०१०-११ | स्त्रियांना उपलब्ध झालेल्या रोजगाराचे प्रमाण (%) २०११-१२ | स्त्रियांना उपलब्ध झालेल्या रोजगाराचे प्रमाण (%) २०१२-१३ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| आंध्र प्रदेश | ५५ | ५८ | ५८ | ५८ | ५७ | ५८ | ५८ |
| आसाम | ३२ | ३१ | २७ | २८ | २७ | २५ | २६ |
| छतीसगड | ३९ | ४२ | ४७ | ४९ | ४९ | ४५ | ४७ |
| गुजरात | ५० | ४७ | ४३ | ४८ | ४४ | ४५ | ४३ |
| हरियाणा | ३१ | ३४ | ३१ | ३५ | ३६ | ३६ | ४० |
| हिमाचल प्रदेश | १२ | ३० | ३९ | ४६ | ४८ | ६० | ६१ |
| जम्मु –काश्मिर | ४ | १ | ६ | ७ | ७ | १८ | २० |
| झारखंड | ३९ | २७ | २९ | ३४ | ३३ | ३१ | ३३ |
| कर्नाटक | ५१ | ५० | ५० | ३७ | ४६ | ४६ | ४६ |
| केरळ | ६६ | ७१ | ८५ | ८८ | ९० | ९३ | ९३ |
| मध्य प्रदेश | ४३ | ४२ | ४३ | ४४ | ४४ | ४३ | ४२ |
| महाराष्ट्र | ३७ | ४० | ४६ | ४० | ४६ | ४६ | ४५ |
| ओडिसा | ३६ | ३६ | ३८ | ३६ | ३९ | ३९ | ३६ |
| पंजाब | ३८ | १६ | २५ | २६ | ३४ | ४३ | ४६ |
| राजस्थान | ६७ | ६९ | ६७ | ६७ | ६८ | ६९ | ६९ |
| तामिळनाडू | ८१ | ८२ | ८० | ४३ | ८३ | ७४ | ७४ |
| उत्तर प्रदेश | १७ | १५ | १८ | २२ | २१ | १७ | २० |
| उत्तराखंड | ३० | ४३ | ३७ | ४० | ४० | ४५ | ४७ |
| पश्चिम बंगाल | १८ | १७ | २७ | ३३ | ३४ | ३२ | ३४ |
| भारत | ४१ | ४३ | ४८ | ४८ | ४८ | ४८ | ५१ |

**स्त्रोत** : *www.mgnrega.nic.in*

राष्ट्रीय पातळीवरील मनरेगा योजनेच्या प्रगतीचा आढावा घेताना आणखी काही बाबी दिसून येतात. त्या म्हणजे २००६-०७ मध्ये प्रत्येक कुटूंबाला सरसरी ४३ मनुष्य दिवस रोजगार उपलब्ध झाला होता. २००९-१० मध्ये हे प्रमाण ५४ मनुष्य दिवसापर्यंत वाढल्याचे दिसून येते. परंतु २०११-

१२ मध्ये परत ४२ पर्यंत कमी झाल्याचे दिसते.

## अभ्यासाचे निष्कर्ष:

१) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतील तरतुदीनुसार ग्रामीण भागातील मजूरांना रोजगार उपलब्ध करुन देताना महिलासाठी ३३% रोजगार उपलब्ध करुन देणे अपेक्षित आहे. या योजनेअंतर्गत देशाच्या पातळीवर उपलब्ध करुन दिलेल्या रोजगारात महिलांचे प्रमाण ५१% इतके आहे.

२) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत काम करणाऱ्या स्त्री व पुरुष मजूरांना समान दराने मजूरी दिली जाते. त्यामूळे स्त्री पुरुष समानता निर्माण होण्यास मदत होत आहे. तसेच स्त्रीयांना मिळणाऱ्या उत्पन्नात वाढ झाल्यामुळे कुटुंबाच्या आर्थिक निर्णयात महिलांचे योगदान महत्त्वाचे ठरत आहे. एकूणच या योजनेमुळे स्त्रीयांचे सबलीकरण होण्यास मदत होत आहे.

३) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत मजूरांना रोजगार उपलब्ध करुन देण्यासाठी जी कामे हाती घेतली जातात, त्यात प्रामुख्याने उत्पादक स्वरुपाची आणि दुष्काळाची पुनरावृत्ती कमी करण्याच्या दृष्टीने उपयुक्त कामांना प्राधान्य दिले जाते. यात सामाजिक वनीकरण, रस्ते दुरुस्ती, नालाबंडींगची कामे, जलसंधारण, फळबाग लागवड रोपवाटिका इत्यादी कामांना प्राधान्य दिले जाते. यामुळे भविष्यात शेतीची उत्पादकता वाढण्यास निश्चितच मदत होणार आहे. तसेच ग्रामीण भागाच्या विकासाला निश्चितच चालना मिळणार आहे. या योजनेअंतर्गत ग्रामीण भागात शेती, शेतीपूरक उद्योग पायाभूत सुविधा इत्यादींच्या विकासामुळे ग्रामीण भागाच्या विकासाला निश्चितच चालना मिळणार आहे.

४) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेत पारदर्शकता आणण्यासाठी व मजूरी वाटपात होणारे घोटाळे व भ्रष्टाचार रोखण्यासाठी या योजनेअंतर्गत काम करणाऱ्या मजूरांची मजूरी ही त्यांच्या बँक किंवा पोस्ट ऑफिस खात्यावर जमा केली जाते. म्हणजेच या योजनेत काम करणाऱ्या बहुतेक मजुरांचे बँकेत किंवा पोस्टात खाते आहे. यामुळे वित्तीय समावेशनाच्या कामाला गती येण्यास निश्चितच मदत झाली आहे.

५) ग्रामीण भागातील दारिद्र्य व बेकारी दुर करणे हा महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेचा मुख्य उद्देश आहे. त्यासाठी ग्रामीण भागातील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासलेल्या जाती जमातीतील लोकांना प्राधान्याने रोजगार उपलब्ध करुन दिले जाते. राष्ट्रीय पातळीवर रोजगारात या लोकांचे प्रमाण जवळपास ४०% इतके आहे. वंचित घटकांना प्राधान्याने रोजगार उपलब्ध होऊ लागल्यामुळे त्यांच्या उत्पन्नात वाढ होण्यास मदत होत आहे. यामुळे सर्वसमावेशक विकासाच्या कामाला निश्चितच गती येणार आहे.

६) कोणत्याही देशातील बेकारी व दारिद्र्य हे विकासाच्या मार्गातील अडथळे आहेत. तसेच दारिद्र्य व बेकारीमुळे आर्थिक व सामाजिक पर्यावरणाचे संतुलन बिघडते. ते दुरुस्त करण्याच्या कामी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण

रोजगार हमी योजनेची निश्चितच मदत होत आहे. तसेच या योजनेमुळे अकुशल श्रमिकांना रोजगाराची संधी उपलब्ध होण्यास निश्चितच मदत होत आहे.

७) ग्रामीण विकास मंत्रालयाच्या २०१२ च्या मनरेगा समीक्षा अहवालात असे निर्देशित केले आहे की, ग्रामीण भागात रोजगार उपलब्ध करुन देणाऱ्या या योजनेमुळे अगदी गरीबातल्या गरीब लोकांना वाढत्या मजूरी दराने रोजगार उपलब्ध करुन दिलेला आहे.

## महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेचे दोष:

या योजनेमुळे ग्रामीण भागात मजूरांना बऱ्यापैकी रोजगार उपलब्ध होतो. असे असले तरी या योजनेत काही दोष दिसून येतात ते पुढीलप्रमाणे-

१) मनरेगा योजनेतील तरतुदींच्या माहितीचा अभाव:
विविध अहवालानुसार आद्यापही मनरेगा योजनेतील तरतुदींची माहिती ग्रामीण भागातील लोकांना नाही. या योजनेतील तरतुदीनुसार ग्रामीण भागातील प्रत्येक कुटुंबातील एका व्यक्तीला वर्षातून कमीत कमी १०० दिवसाच्या रोजगारीची हमी दिलेली आहे. परंतु ग्रामीण भागातील बहुतांश मजूर हे अशिक्षित किंवा अर्धशिक्षित आहेत. त्यामुळे त्यांना जॉब कार्डची तांत्रिक पूर्तता, किमान वेतन, बेरोजगार भत्ता, काम मागणी अर्जाची पोच पावती इत्यादीविषयी पुरेसे ज्ञान नसते. तसेच संबंधित अधिकारी देखील त्यांना पुरेशी माहिती देत नाहीत. एकुणच मनरेगा योजनेतील तरतुदींची पुरेशी माहिती नसल्यामुळे या योजनेतील सर्व लाभ त्यांना मिळत नाहीत.

२) बेरोजगार भत्त्याबाबत अनिश्चितता:
महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत कामाची मागणी करणाऱ्याला १५ दिवसात रोजगार उपलब्ध करुन दिले जाते. १५ दिवसात रोजगार उपलब्ध झाले नाही तर बेरोजगार भत्ता देण्याची तरतुद आहे. बेरोजगार भत्त्यासाठी रोजगार/काम मागणी अर्जाची तारीख व शिक्क्यासह पोचपावती आवश्यक असते. परंतु अनेक मजूरांकडे अशी पोच पावती नसते. त्यामुळे त्यांना बेरोजगार भत्ता मिळत नाही. तसेच बेरोजगार भत्त्याबाबत इतरही अनेक तांत्रिक बाबी पुढे केल्या जातात. एकूणच बहुतांश मजुरांना बेरोजगार भत्ता दिला जात नाही.

३) सदोष नियोजन व प्रशासन:
मनरेगा योजनेच्या अंमलबजावणीत विविध स्तरावरील विविध घटकांना महत्त्व आहे. त्यातही ग्रामीण भागात गावपातळीवर प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्याच्या कामी ग्रामपंचायतीला विशेष महत्त्व आहे. त्यात सरपंच, ग्रामसेवक व इतर सदस्यांवर अंमलबजावणीची जबाबदारी असते. परंतु एवढ्या मोठ्या योजनेच्या अंमलबजावणीचा त्यांना अनुभव नाही. त्यामूळे या योजनेची अंमलबजावणी प्रभावीपणे व योग्य प्रकारे होत नसल्याचे दिसून येते. परिणामी या योजनेचे अपेक्षित लाभ मिळण्यावर मर्यादा येतात.

४) उद्दिष्टांवर लक्ष केंद्रित करण्यात अपयश:
ग्रामीण भागातील बेकारी व दारिद्र्य दूर करण्याच्या उद्देशाने महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना सुरु करण्यात

आली आहे. ग्रामीण भागातील अकुशल मजुरांना वेतन रोजगार उपलब्ध करुन देण्याबरोबरच कायमस्वरुपी साधनसामग्री निर्माण करणे हे देखील या योजनेचे महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. प्रत्यक्षात असे दिसून येते की जलसंधारणाची कामे, जमीन सुधारणा आणि सामाजिक वनीकरणाची कामे हाती घेताना या योजनेची उद्दिष्टे प्रतिबिंबीत होताना दिसून येत नाहीत ही या योजनेची एक मर्यादा आहे.

५) वेतन मिळण्यास विलंब:
महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतील तरतुदीनुसार या योजनेअंतर्गत काम करणाऱ्या मजुरांना मजूरी दर आठवड्याला किंवा जास्तीत जास्त १५ दिवसात मिळणे बंधनकारक आहे. काही वेळेस ही मजुरी १५ दिवसात त्यांच्या खात्यावर जमा होत नसल्याचे दिसून येते. परिणामी त्यांना वेळेवर मजूरी न मिळाल्यामुळे त्यांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागते.

६) निधीचा पुरेपूर वापर होत नाही:
महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेसाठी देशाच्या पातळीवर सरकारने २००६-०७ मध्ये १२०७४ कोटी रु. निधी उपलब्ध करुन दिला होता. त्यापैकी ८८२४ कोटी रु. प्रत्यक्ष खर्च झाला. प्रत्यक्ष निधी वापराचे प्रमाण ७३% इतके होते. नंतरच्या काळात यात सुधारणा होऊन २००९-१० मध्ये निधी वापराचे प्रमाण ८३% पर्यंत वाढले. परंतु नंतर हे प्रमाण कमी झाल्याचे दिसून येते. २०१२-१३ मध्ये निधी वापराचे प्रमाण ६३% इतके होते.

७) निधीचा सदोष वापर:
महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेसाठी उपलब्ध करुन दिलेल्या निधीचा वापर पुरेपुर होत नाही. शिवाय या निधीचा सदोष वापर होत असल्याचे दिसून येते. या योजनेअंतर्गत जी कामे हाती घेतली जातात. त्या कामासाठी आवश्यक ती साधन सामग्री सरकार मार्फत पुरविली जाते. मजुरी वरील खर्च व साधनसामग्रीवरील खर्च याचे प्रमाण ६०:४० असे निर्धारीत करण्यात आले आहे. प्रत्यक्षात मात्र वेतनावरील खर्च एकूण खर्चाच्या ७३% पर्यंत होत असल्याचे दिसून येते. काही तज्ज्ञांच्या मते यामुळे चलनवाढीचा प्रश्न निर्माण झाला आहे.

८) सुरक्षेच्या उपायांचा अभाव:
महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत ग्रामीण भागातील मजूरांना जे काम उपलब्ध करुन दिले जाते. त्या कामाच्या ठिकाणी विश्रांतीसाठी सावली, पिण्याच्या पाण्याची सोय, प्रथमोपचार पेटी उपलब्ध करुन दिली जाते, काही तज्ज्ञांच्या मते कामाच्या ठिकाणी सुरक्षेच्या कोणत्याही उपाययोजना केल्या जात नाहीत. त्यात जीवनरक्षक औषधे दिले जात नाहीत तसेच सर्पदंश झाला किंवा विषबाधा झाली तर याबाबतीत कोणतीही उपाययोजना नसते.

काही तज्ज्ञांच्या मते ग्रामीण भागात अनेक ठिकाणी मजुरांचा अगोदरच तुटवडा आहे. या योजनेमुळे शेतमजुरांचा तुटवडा आणखी जाणवेल. शेतमजुरांच्या टंचाईमुळे शेतीसाठी लागणाऱ्या आदानांच्या किंमतीत वाढ होवून शेतीचा उत्पादन खर्च वाढेल. त्यामुळे अन्नधान्याच्या किंमतीत वाढ

होईल.

ग्रामीण भागातील दारिद्र्य व बेकारी दूर करण्याच्या दृष्टीने मनरेगा ही योजना अतिशय महत्त्वपूर्ण अशी अशी योजना आहे. कारण या योजनेअंतर्गत काम मिळाले नसते तर अनेक गरीब लोकांना बेकार रहावे लागले असते. गरीबांच्या दृष्टीने ही योजना अतिशय चांगली आहे. या योजनेचा शेती क्षेत्र व मजुरी दर यावरील प्रभाव विचारात घेणे आवश्यक आहे. मनरेगा योजनेतील मजूरी दरात वाढ झाल्यामुळे अनेक राज्यात श्रम बाजारात मजूरी दरात वाढ झाली आहे. तसेच श्रमाचा तुटवडा जाणवू लागला आहे. काही शेतकऱ्यांनी असे मत व्यक्त केले आहे की, या योजनेमुळे शेती संकटात सापडली आहे. कारण श्रम महाग झाले आहे. त्यामुळे श्रमाचा खर्च वाढलेला आहे. परिणामी शेती क्षेत्रात गुंतवणूक करण्याची शेतकऱ्यांना प्रेरणा मिळत नाही.

कृषी खर्च व किंमती आयोगाचे चेअरमन डॉ. अशोक गुलाटी यांनी असे मत व्यक्त केले आहे की, २००८ ते २०११ या कालावधीत श्रमाचा खर्च राष्ट्रीय पातळीवर ७४% नी वाढला आहे. आंध्र प्रदेशात ८८% नी व तामिळनाडूमध्ये ९४% नी वाढला आहे.

मनरेगा योजनेच्या कार्यप्रणालीच्या कॅगच्या (CAG) अहवालात काही त्रुटी दर्शविल्या आहेत. त्या म्हणजे १) मजुरी देण्यास विलंब लागतो. २) बेरोजगार भत्ता दिला जात नाही. ३) अपुऱ्या कामाचे प्रमाण अधिक आहे. ४) योजनेअंतर्गत केलेल्या कामाचा दर्जा उत्तम नाही. ५) व्यवहारात अनियमीतता व भ्रष्टाचार इत्यादी दिसून येतो.

शिफारशी:

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी पुढील शिफारशी करता येतील.

१) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना ही अतिशय महत्त्वपूर्ण अशी योजना आहे. या योजनेची अंमलबजावणी प्रभावीपणे करण्यासाठी प्रशासन यंत्रणा अधिक कार्यक्षम बनविणे आवश्यक आहे. यासाठी खेडे, तालुका व जिल्हा स्तरावरील यंत्रणा अधिक सक्षम बनविण्याची गरज आहे.

२) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेमार्फत ग्रामीण भागातील प्रत्येक कुटुंबातील एका व्यक्तीला वर्षभरात १०० दिवसाच्या रोजगाराची हमी दिली जाते. या योजनेची व्याप्ती आणखी वाढवून व त्यात बदल करुन प्रत्येक कुटूंबातील दोन प्रमुख व्यक्तींना (पती-पत्नी) वर्षभरात किमान २०० ते २५० दिवस रोजगाराची हमी दिली पाहिजे.

३) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना ग्रामीण भागात जेवढी लोकप्रिय असायला हवी तेवढी ती नाही. कारण या योजनेची पुरेशी माहिती ग्रामीण भागातील लोकांना नाही. यासाठी या योजनेची माहिती ग्रामीण भागात पोहोचविणे आवश्यक आहे. यासाठी जनजागृतीचे कार्यक्रम ग्रामीण भागात राबविणे आवश्यक आहे. तसेच विविध प्रकारच्या प्रसार माध्यमाद्वारे गरजू लोकांपर्यंत या योजनेची माहिती पोहचविण्याचा प्रयत्न या योजनेची अंमलबजावणी करणाऱ्या

यंत्रणेने करावा.

४) मगरेगा योजनेतील स्त्रीयांचा सहभाग समाधानकारक असला तरी तो देशाच्या सर्व भागात सारखा नाही. म्हणून जेथे तो कमी आहे तेथे तो वाढणे आवश्यक आहे. एकूणच या योजनेतील महिलांचा सहभाग वाढणे आवश्यक आहे. यासाठी या योजनेतील त्यांच्या भूमिकेची त्यांना जाणीव करुन दिली पाहिजे.

५) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत मजूरांना जे काम उपलब्ध करुन दिले जाते ते लगेच उपलब्ध करुन दिले जावे. म्हणजेच १५ दिवसाची वाट न पाहता त्या अगोदर काम उपलब्ध करुन देणे शक्य असेल तर ते द्यावे. तसेच मजुरांना मिळणारी मजूरी वेळेवर मिळण्यासाठी विशेष प्रयत्न करावेत. यासाठी कामांचे मोजमाप लवकर व वेळेवर घ्यावे.

६) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या कार्यक्षम अंमलबजावणीसाठी दरवर्षी जो एकूण निधी उपलब्ध करुन दिला जातो त्या निधीचा पूरेपूर वापर करावा. त्यामुळे रोजगारात वाढ व ग्रामीण विकास या दोन्ही गोष्टी साध्य करता येतील.

७) या योजनेअंतर्गत जे काम उपलब्ध करुन दिले जाते त्यासाठी कामाची मागणी करावी लागते. ग्रामपंचायतीने कामाच्या मागणी अर्जाची पोच पावती तारखेसह द्यावी. जेणेकरुन मजूरांना बेरोजगार भत्याच्या मागणीसाठी त्याचा उपयोग होऊ शकेल.

८) मनरेगा योजनेची अंमलबजावणी करणाच्या कामी समाविष्ट असलेल्या सर्व प्रशासकीय सेवेकांना योजनेची परिपूर्ण माहिती व प्रशिक्षण दिले जावे. त्यामूळे त्यांना योजनेची अंमलबजावणी कार्यक्षमरीतीने करता येईल.

९) २००६-०७ मध्ये जेव्हा ही योजना सुरु झाली तेंव्हा ६० रु. इतकी मजुरी निश्चित करण्यात आली. नंतरच्या काळात मजुरी दरात वाढ करण्यात आली आहे. ही स्वागतार्ह गोष्ट असली तरी मजुरीचे दर शेतमजूरांच्या किंमत निर्देशांकाशी निगडीत असावेत.

१०) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत जॉब कार्ड वितरीत केलेल्या कुटुंबाची संख्या, रोजगाराची मागणी करणाऱ्या कुटुंबाची संख्या, रोजगार उपलब्ध झालेल्या कुटुंबाची संख्या मनुष्यदिवस उपलब्ध रोजगार, एकूण कामे, पुर्ण झालेली कामे, मजुरी अंदाजपत्रक इत्यादी तपशील असलेली माहिती निर्दोष ठेवण्यात यावी.

११) मनरेगा योजनेअंतर्गत काम करणाऱ्या मजुरांना जी मजुरी मिळते त्यात त्यांचा उदरनिर्वाहाचा खर्च भागत नाही. तसेच अनेक वस्तूंच्या किंमती वाढलेल्या आहेत. त्यामुळे उत्पन्न व खर्च यांची तोंड मिळवणी करणे त्यांना कठीण जाते. खास बाब म्हणून मजूरांना गहू, तांदुळ, दाळी, साखर, गोडेतेल इत्यादी वस्तू रास्त दरात उपलब्ध करुन द्याव्यात.

थोडक्यात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना ही अतिशय महत्त्वपूर्ण व मोठी योजना आहे. प्रस्तुत अभ्यासाचा उद्देश या योजनेची ग्रामीण रोजगार निर्मिती व ग्रामीण विकासातील भूमिका समजून घेणे हा आहे. अभ्यासाच्या आधारे असा निष्कर्ष काढता येइल की ही योजना अनेक दृष्टीने फायदेशीर व महत्त्वपूर्ण आहे. कारण या

योजनेमुळे रोजगार निर्मितीबरोबरच ग्रामीण भागाच्या विकासाला निश्चितच मदत होत आहे. या योजनेमुळे पाण्याच्या उपलब्धतेत सुधारणा होण्यास मदत होत आहे. तसेच शेतीची उत्पादकता देखील वाढण्यास मदत होत आहे. परिणामी शेतीच्या उत्पादनात वाढ होण्यास मदत होत आहे. त्याचप्रमाणे मूलभूत सुविधांचा विकास, सामाजिक आर्थिक विकास पर्यावरणाचे संरक्षण इत्यादी बाबी घडून येत आहेत. या योजनेमूळे वित्तीय समावेशनाचे उद्दिष्ट गाठण्यास निश्चितच मदत होत आहे. शिवाय सर्व समावेशक वृध्दीचेही उद्दिष्ट साध्य होण्यास मदत होत आहे.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेमुळे बेकारी कमी होण्याबरोबरच दारिद्र्याचे प्रमाणही कमी होऊ लागले आहे. तसेच ग्रामीण भागाकडून शहरी भागाकडे होणारे मजुरांचे स्थलांतरही कमी होण्यास मदत होत आहे. असे असले तरी या योजनेच्या अंमलबजावणीत काही दोष आहेत. शासनाकडून या योजनेतील दोष दूर करुन प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी योग्य त्या उपाययोजना केल्या जात आहेत. त्या आणखी प्रभावीपणे करणे आवश्यक आहे.

**संदर्भ सूची:**


1) S.K.Misra and V. K. Puri, 2012, *Indian Economy*, Himalaya Publishing House.
2) Gaurav Datt and Ashwani Mahajan, 2012, *Indian Economy*, S. Chand and Company, New Delhi.
3) Indian Economy - *Pratiyogita Darpan*, 2012.
4) *I.A.S. Success Planner 2014* Pratiyogita Darpan.
5) के. सागर, २०१२, *वाणिज्य अर्थव्यवस्था घटक*, के. सागर पब्लिकेशन.
6) महाराष्ट्र शासन, २००८, *राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम २००५ अंतर्गत महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना.*
7) *योजना* - नोव्हेंबर २००८.
8) *योजना* - जानेवारी २००९.
9) *प्रबोधन प्रकाशन ज्योती* - नोव्हेंबर २००५
10) *Southern Economist*, October 15, 2013.
11) *Kisan World* - May 2014.
12) Website - www.mgnrega.nic.in

# ऊर्जा संसाधन स्थितीचे अध्ययन

**शिवाजी भ. यादव, पैठण,**
अर्थशास्त्र विभागप्रमुख,
शिवछत्रपती कला महाविद्यालय,
पाचोड, जि.औरंगाबाद.
भ्रमणध्वनी : ९४२१३१४६९८

ऊर्जा संसाधनाच्या उपलब्धतेवरच त्या राज्याचा विकास ठरतो. ऊर्जा संसाधने महाराष्ट्रात विपुल प्रमाणात नाहीत. मानवाच्या विकासाने नैसर्गिक साधनसामुग्रीचा वापर अतिरिक्त होत आहे. नैसर्गिक साधनाच्या वापरावर निर्बंध घातले नाही तर मानवाच्या अस्तित्वाला धोका निर्माण होऊ शकतो. याचा विचार करुन पर्यायी संसाधनाचा ऊर्जा निर्मितीसाठी वापर वाढविण्याची गरज काळाच्या ओघात सिध्द ठरत आहे. राज्यात पारंपरिक व अपारंपारिक ऊर्जा अशी संसाधनाची विभागणी केली जाते. पारंपरिक ऊर्जा संसाधनामध्ये दगडी कोळसा, जलविद्युत, औष्णिक विद्युत, खनिज तेल व नैसर्गिक वायु, अणू ऊर्जा यांचा समावेश होतो तर अपारंपरिक ऊर्जा संसाधनामध्ये सौर ऊर्जा, पवन ऊर्जा, तरंग ऊर्जा व भरती ऊर्जा, गोबरगॅस यांचा समावेश होतो. राज्यात ऊर्जा संसाधनावर सतत ऊहापोह चालू असतो. भविष्यात पारंपरिक संसाधने फार काळ टिकणार नाहीत यावर शास्त्रज्ञांचे व विचारवंतांचे एकमत झालेले आहे. राज्यात दगडी कोळसाचे वैनगंगा खोऱ्यातील कामठी, उमरेड, पाटणसावगी, वर्धा खोऱ्यातील बांदर, वरोडा, बल्लारपूर, दुर्गापूर, वणी, बून या ठिकाणी, घुगूस येथील तेलवासा, सस्ती-राजुरा येथे साठे आहेत. ऊर्जा संसाधनातील जलविद्युत संसाधन महत्वाचे आहे. कोयना १ ते ३, कोयना धरण, धोम, कन्हेर, मिरा, टाटा मिरा, टाटा खोपोली, टाटा भिवपूरी, वैतरणा धरण, भातसा, तिलारी, राधानगरी, भाटघर, वीर, पवना, पानशेत, वरसगाव, येलदरी, पैठण, पेच, भंडारदरा, उजनी व यवतेश्वर या सर्व ठिकाणी जलविद्युतची निर्मिती केली जाते. त्याचबरोबर अण्विक, अणु व खनिज तेल, नैसर्गिक या स्त्रोतांद्वारे ऊर्जेची निर्मिती राज्यात केली जाते.

राज्यात पारंपरिक साधनाबरोबर ऊर्जा निर्मितीच्या अपारंपरिक सौर ऊर्जा, पवन ऊर्जा, तरंग ऊर्जा व भरती ऊर्जा, गोबरगॅस संसाधनाचे महत्व वाढत आहे. २०११-१२ साली राज्यात दगडी कोळसा, जलविद्युत, औष्णिक विद्युत, अणु विद्युत, खनिज तेल व नैसर्गिक वायु, सौर ऊर्जा, पवन ऊर्जा, तरंग ऊर्जा, भरती ऊर्जा व गोबर गॅस या सर्वांमधून १३६७७ मेगावॅट ऊर्जेचे उत्पादन झाले होते. विजेची मागणी व पुरवठा विचारात घेतली तर विजेची मागणी पुरवठ्यापेक्षा ४४६८ मेगावॅट तूटीची होती. राज्यात विजेचा वापर औद्योगिक ३५%, घरगुती २३%, कृषी १९%, वाणिज्य ८%, सार्वजनिक ४% व रेल्वे ३% असा होतो. यावरुन राज्यात मानवी जीवनाचा आधार ऊर्जा क्षेत्र आहे हे सिध्द होते. राज्याच्या ऊर्जा संसाधनाच्या उपलब्धतेचा विकासावर परिणाम होतो. म्हणून राज्यात ऊर्जा संसाधनाची उपलब्धता पाहणे महत्वाचे ठरते.

**ऊर्जा संसाधने :**

राज्यातील ऊर्जा संसाधनाची विभागणी पारंपरिक व अपारंपरिक ऊर्जा साधने अशी केली जाते.

१)पारंपरिक ऊर्जा संसाधने :

राज्यात दगडी कोळसा, पाणी, औष्णिकता, खनिज तेल, नैसर्गिक वायु व अणु या संसाधनाचा वापर करुन ऊर्जेचे उत्पादन केले जाते.

अ)दगडी कोळसा संसाधने :

जगामध्ये दगडी कोळशाच्या उत्पादनात चीन व अमेरिकेनंतर भारताचा तिसरा क्रमांक लागतो. भारताच्या दगडी कोळशाच्या एकूण साठ्यापैकी ४% साठा राज्यात आहे. महाराष्ट्रात सँडस्टोन व रोल, दगडी कोळसा माती यांचे थर सापडत आहेत. अंदाजे राज्यात कोळशाचा साधारणतः ५,००० दशलक्ष टन साठा आहे. दगडी कोळशाचे साठे पूर्व विदर्भात नागपूर, चंद्रपूर व यवतमाळ या जिल्हयात आढळतात. सर्व दगडी कोळसा अकोकक्षम आहे. नागपूर जिल्हयातील कामटी व उमरेड क्षेत्रात अंदाजे दगडी कोळशाचा साठा अनुक्रमे ७५ दशलक्ष टन व ७० दशलक्ष टन आहेत. वर्धा खोऱ्यातील बांदरमध्ये १०० दशलक्ष टन, वरोडामध्ये ६० दशलक्ष टन, बल्लापूर मध्ये २००० दशलक्ष टन, दुर्गापूर वणी मध्ये २४० दशलक्ष टन दगडी कोळशाचे साठे राज्यात आहेत.

महाराष्ट्रात दगडी कोळशाच्या २२ खाणी आहेत. या २२ खाणीतून १९९४ साली दगडी कोळशाचे उत्पादन १५० लाख टन होते. ते २००० साली २.७६ कोटी टनाने वाढले. दगडी कोळशाचा उपयोग राज्यातील औष्णिक केंद्रे खापरखेडा, बल्लापूर, पारस याचप्रमाणे उद्योगधंदे व रेल्वेसाठी केला जातो. राज्यात दगडी कोळशापासून एकूण ऊर्जेच्या ६७ टक्के ऊर्जेचे उत्पादन केले जाते. यावरुन राज्यातील ऊर्जा संसाधनापैकी दगडी कोळसा या संसाधनाचे महत्व लक्षात येते.

आ) जलऊर्जा संसाधने :

राज्यात पर्वतांच्या रांगा फार मोठया प्रमाणात नाहीत. पर्वताच्या उतारावरुन वेगाने पाणी खाली येते. या पाण्याच्या गतिशील प्रवाहावर विजेची निर्मिती केली जाते. विजेच्या निर्मितीत जलऊर्जा संसाधने महत्वाची आहेत. पाणचक्क्या, धरणे स्त्रोतांतून विजेची निर्मिती केली जाते. कोयना जलविद्युत केंद्रातून ऊर्जेची निर्मिती केली जाते.

'अर्वाचिन महाराष्ट्राची भाग्यरेषा' असे या केंद्रास म्हणतात. कोयनाच्या पहिल्या टप्प्यातून २.४० लाख किलोवॅट, दुसऱ्या टप्प्यातून ५.४ लाख किलोवॅट व तिसऱ्या टप्प्यातून ३.२ लाख किलोवॅट ऊर्जेची निर्मिती केली जाते. महाराष्ट्रात बारमाही वाहणाऱ्या नद्यांची संख्या कमी आहे. यामुळे धरणाची संख्या ही कमी आहे. जलऊर्जा प्रकल्पाची एकूण ऊर्जा निर्मिती क्षमता १९२० मेगावॅट आहे. यामध्ये पोफळीमधून ५६० मेगावॅट, अलोरे ३२० मेगावॅट, धरणाच्या पायथ्याशी ४० मेगावॅट, तांबडवाडी १००० मेगावॅट विद्युत क्षमता आहे. रायगड जिल्हयात टाटा वीज मंडळाचा भिरा, खोपोली व भिवपूरी येथे जलविद्युत केंद्रे आहेत. यांची क्षमता सुमारे ३६५ मेगावॅट आहे.

जायकवाडी-पैठण धरणाच्या पायथ्याशी 'रिव्हर्सेबल टर्बाईल्स'द्वारे १२ मेगावॅट विजेची निर्मिती केली जाते. येलदरी-परभणी वीज केंद्राद्वारे ५ मेगावॅट, पेच-नागपूर ५३ मेगावॅट, भाटघर, वीर, पवना, पानशेत आणि वरसगाव-पुणे विद्युत प्रकल्पाची क्षमता ५१ मेगावॅट आहे. जलविद्युत प्रकल्पाची क्षमता पावसावर अवलंबून आहे.

इ)औष्णिक ऊर्जा संसाधने:

राज्यात औष्णिक विद्युतच्या उत्पादनासाठी बाष्पजनित्रचा वापर केला जातो. कोळसा व खनिज तेल वापरुन बॉयलरमध्ये उच्च तापमानाची व उच्च दाबाची वाफ निर्माण करुन त्याद्वारे बाष्पजनित्र (गॅस टर्बाईन) चालविले जाते. भूगर्भ वायूच्या ज्वलनातून वायूजनित्र चालवून विद्युत निर्मिती केली जाते. यालाच 'ओपन सायकल गॅस टर्बाईन' म्हणतात. राज्यात प्रामुख्याने दगडी कोळशाच्या आधारे औष्णिक विद्युत निर्माण करतात. कोकणातील (ठाणे) औष्णिक विद्युतक्षमता ११८ मेगावॅट, तुर्भे टाटा (मुंबई) ११३० मेगावॅट, पश्चिम महाराष्ट्रातील एकलहरे (नाशिक) ९१० मेगावॅट, खान्देशातील फेकरी ४८२.५ मेगावॅट, मराठवाड्यातील परळी (बीड) ६९० मेगावॅट, विदर्भातील पारस (अकोला) ६२.५ मेगावॅट, कोराडी ११०० मेगावॅट, दुर्गापूर, खापरखेडा ४२० मेगावॅट व बल्लारपूर १८४० मेगावॅट औष्णिक विद्युतची क्षमता आहे. महाराष्ट्रात औष्णिक ऊर्जा संसाधनाद्वारे ८१७५ मेगावॅट एवढी औष्णिक विद्युतची निर्मिती केली जाते.

इ) खनिज तेल व नैसर्गिक वायू ऊर्जा संसाधने :

महाराष्ट्रात ३ फेब्रुवारी १९७४ रोजी अरबी समुद्रात पहिली विहिर खोदली. ते मुंबई जवळ पश्चिमेला १७६ कि.मी. अंतरावर असून या तेलक्षेत्राला 'बॉम्बे हाय' या नावाने ओळखले जाते. या परिसरात २००० चौ.कि.मी. क्षेत्रात ५.५ कोटी टन तेल असण्याची शक्यता आहे. बॉम्बे हाय मधून खनिज तेल व नैसर्गिक वायू उपलब्ध होतो. देशातील खनिज तेल व नैसर्गिक वायूच्या ५०% उत्पादन बॉम्बे हाय मधून होते. महाराष्ट्रात १९८५-८६ साली नैसर्गिक वायूचे उत्पादन ५,१८० दशलक्ष घनमीटर होते. १९९३-९४ साली १३,३५६ दशलक्ष घनमीटर पर्यंत वाढले. महाराष्ट्रातील ऊर्जा संसाधनात खनिज तेल व नैसर्गिक वायु ऊर्जा संसाधन महत्वाचे आहे.

उ)अणुऊर्जा संसाधने :

युरेनियम, थेरिनियम, लिथिअम, प्लॅटिनम यासारख्या आण्विक इंधनांचा वापर अणुऊर्जा निर्माण करण्यासाठी केला जातो. १० ऑगस्ट १९४८ रोजी भारतीय अणुशक्ती मंडळाची

स्थापना करण्यात आली. महाराष्ट्रातील मुंबई व नागपूर येथे अणू शक्तीची केंद्रे आहेत. अप्सरा अणुभट्टी, सायरस अणुभट्टी, झार्लिना अणुभट्टी, पुर्णिमा व ध्रूव अणुभट्टी या ठिकाणी अणु ऊर्जाची निर्मिती होते. तारापूर अणुकेंद्रातून ४२० मेगावॅट विद्युत निर्मिती होते.

२) अपारंपरिक ऊर्जा संसाधने :

महाराष्ट्रात पारंपरिक ऊर्जा संसाधनाबरोबर अपारंपरिक संसाधनाचा उपयोग केला जातो. दगडी कोळसा, पेट्रोलियम पदार्थ व नैसर्गिक वायु ही संसाधन विपुल प्रमाणात नाहीत. यांची साठे राज्यात मर्यादित असून ही फार काळ टिकणारी नाहीत. म्हणून ऊर्जेच्या उत्पादनात वाढ करण्यासाठी पर्यायी अपारंपरिक संसाधने वापरणे गरजेचे झाले आहे. अपारंपरिक ऊर्जा संसाधनाचे नवीनीकरण सहज करता येते. सौर ऊर्जा, पवन ऊर्जा, भरती-ओहोटी ऊर्जा व गोबरगॅस यांचा समावेश अपारंपरिक ऊर्जा स्त्रोतांमध्ये होतो. ही स्त्रोत पुढीलप्रमाणे आहेत:

अ) सौर ऊर्जा संसाधने-

राज्यात विज्ञान व तंत्रज्ञानाच्या प्रगतीतून फोटोसेलच्या सहाय्याने सौर ऊर्जेचे उत्पादन होते. फोटोसेलद्वारे सौर ऊर्जेची साठवणूक करुन तिचा उपयोग पाणी तापविणे, वाहने, दिवे, पंप, रेफ्रिजरेटर्स यासाठी करता येवू शकतो. राज्यात सौर कुकरचा वापर अन्न शिजविण्यासाठी केला जातो. सौर कुकरचा राज्यात वापर वाढत राहावा म्हणून त्याचे महत्व लोकांना पटवून दिले पाहिजे. फोटोसेल्सची किंमत जास्त आणि कार्यक्षमता कमी असल्याने त्याच्या वापरात वाढ होत नाही. त्याची कार्यक्षमता वाढवून किंमत कमी व्हावी. राज्यात सौर संग्राहक यामध्ये दगड, विटा, काचा अशा नैसर्गिक साधनसामुग्रीचा वापर करुन ऊर्जेचे उत्पादन केले जाते. या दिवसात उष्णता शोषली जाते व रात्री तिचे उत्सर्जन केले जाते. सिलीकॉन व गॅलियम या पदार्थांपासून फोटोसेल्सचे उत्पादन केले जाते.

आ) पवन ऊर्जा संसाधने :

महाराष्ट्रात वाऱ्याचा झोत वर्षभर चांगला असतो. वाऱ्याच्या झोताचा उपयोग करुन पवन ऊर्जेचे उत्पादन केले जाते. वाऱ्याचा प्रवाह नेहमीच जास्त दाबाकडून कमी दाबाकडे असतो. पवन ऊर्जेमुळे हवा, पाणी, ध्वनी, मृदा यांचे प्रदुषण होत नाही. हे तंत्रज्ञान पहिल्यांदा जगातील डेन्मार्क देशाने विकसित केले होते. पवन ऊर्जेच्या निर्मितीमध्ये तामिळनाडूनंतर महाराष्ट्राचा क्रमांक लागतो. देशातील एकूण पवन ऊर्जेच्या उत्पादनापैकी १७% उत्पादन महाराष्ट्रात होते. ऊर्जा निर्मितीमध्ये पवन ऊर्जा संसाधनाचा वापर इतर ऊर्जा संसाधनापेक्षा कमी जरी असला तरी त्याचे महत्व निश्चित आहे.

इ)भरती-ओहोटी ऊर्जा संसाधने :

नदीच्या मुखाशी ऊर्जेची निर्मिती केली जाते. याच बरोबर सागरातील लाटा व भरती यांचा ऊर्जा संसाधने म्हणून उपयोग केला जातो. सागरी तरंग व लाटावर चाके पॅडल बसून ऊर्जा निर्मिती केली जाते. राज्यात भरती-ओहोटी ऊर्जा संसाधने मोठ्या प्रमाणात नाहीत.

ई)गोबरगॅस ऊर्जा संसाधने :

गोबरगॅसचे उत्पादन जनावरांच्या आणि माणसांच्या मलमूत्रावर आधारलेले आहे. गोबरगॅस मिळविण्याचे तंत्रज्ञान सर्वसामान्य झाले आहे. गोबरगॅसचा उपयोग केवळ राज्यात स्वयंपाकासाठीच नसून बाष्पनिर्मिती करता येते.

राज्यातील कृषी, उद्योग, बांधकाम क्षेत्राचा विकास ऊर्जेवरच आहे. तेंव्हा राज्यात पारंपरिक व अपारंपरिक ऊर्जा संसाधनाचे महत्व दिसुन येते.

**समस्या:**

महाराष्ट्रात २०११-१२ साली विजेची मागणी १८१४५ मेगावॅट असून पुरवठा १३६७७ मेगावॅट होता. याचा अर्थ राज्यातील विजेच्या मागणीच्या तुलनेत विजेचा पुरवठा ४४६८ मेगावॅट तुटीचा असल्याने विजेच्या भारनियमनामध्ये वाढ करावी लागली. या विजेच्या भारनियमनामधून बाहेर पडण्यासाठी विजेच्या उत्पादनात वाढ होणे गरजेचे आहे. पण ऊर्जा संसाधनाच्या मर्यादेमुळे विजेच्या उत्पादनात अपेक्षित्त वाढ होताना दिसत नाही.

राज्यात दगडी कोळसा आणि जल या संसाधनापासून मोठया प्रमाणात विजेचे उत्पादन केले जाते. औष्णिक, अणु, खनिजतेल व नैसर्गिक वायू संसाधनाच्या वाढीसाठी नवीन तंत्रज्ञानाचा शोध लावला पाहिजे. पण राज्यात या ऊर्जा संसाधनाच्या विकासाकडे दुर्लक्ष केले जाते.

अपारंपरिक संसाधनात सौर ऊर्जा, पवन ऊर्जा, भरती-ओहोटी ऊर्जा, गोबरगॅस संसाधनाचा फारच मर्यादित वापर होतो. राज्यातील एकूण ऊर्जेच्या जवळपास १ टक्काच अपारंपरिक संसाधनापासून ऊर्जा उत्पादन होते.

**उपाय:**

राज्यात नैसर्गिक साधनसामुग्री मर्यादित आहे. दगडी कोळशाचे साठे साधारणत: ५००० दशलक्ष टन पर्यंत राज्यात आहे. विजेची मागणी पुर्ण करण्यासाठी दगडी कोळसा ऊर्जा संसाधनाचा वापर मोठ्या प्रमाणात केला जातो. दगडी कोळसा ऊर्जा संसाधनाचा वापर असाच वाढत राहिला तर भविष्यात दगडी कोळशाचे साठे संपुष्टात येऊ शकतात. तेव्हा त्याचा वापर व पुनर्वापर झाला पाहिजे व सौर ऊर्जा संसाधने विकसित करण्याकडे राज्याचा कल असणे आवश्यक आहे.

**संदर्भ सूची:**


१) Datt Rudra and K.P.M. Sunduram, *Indian Economics.*

२) डॉ.र.पु.कुरुलकर, २००६, *महाराष्ट्राची अर्थव्यवस्था*, विद्या प्रकाशन, नागपूर.

३) कृष्णा भोगे, *भारतीय अर्थव्यवस्था*, भोगे करिअर डेव्हलपमेंट अकॅडमी, साकेत प्रकाशन, औरंगाबाद.

४) प्राचार्य डॉ.मंगला जंगले, *महाराष्ट्राची अर्थव्यवस्था*, प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव, २००८.

५) *महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २००९-१०.*

६) *योजना* - सप्टेंबर २००८, जानेवारी २०१३.

७) *लोकराज्य*- सप्टेंबर, फेब्रुवारी २००८.

८) *www.MaharashtraGovt.in*

# महाराष्ट्रातील दारिद्र्य: एक अभ्यास

**वाल्मिक दगडू परहर, मंडणगड,**
मंडणगड कला, वाणिज्य व
विज्ञान महाविद्यालय, जि. रत्नागिरी,
भ्रमणध्वनी: ९४२०८८१७७०

लोकसंख्या व क्षेत्रफळाबाबत देशातील दुसऱ्या क्रमांकाचे सर्वात मोठे राज्य महाराष्ट्र असून औद्योगिकदृष्ट्या प्रगत राज्य म्हणून ओळखले जाते. सामाजिक व आर्थिक वर्गवारीत इतर राज्यांच्या मानाने अग्रगण्य मानले जाते, मात्र राज्यात मुलभूत गरजांचा प्रश्न, कुपोषण, निम्नस्तरीय मानवी दर्जा, शिक्षणाचा घसरता दर्जा, शेतकऱ्यांच्या आत्महत्याचा गंभीर प्रश्न, न्यून पातळीवरील राहणीमान या समस्यांबरोबर बेकारी व दारिद्र्य या दोन महत्वाच्या समस्या आहेत.

प्रस्तुत शोधनिबंध हा दुय्यम साधन सामग्रीवर आधारित आहे. दारिद्र्य समस्येशी संबंधित विविध संदर्भ ग्रंथ, पाक्षिके, मासिके, नियतकालिके, मानवी विकास अहवाल, महाराष्ट्र आर्थिक पाहणी अहवाल, भारताचा आर्थिक पाहणी अहवाल आदीमधून माहिती संकलित केली आहे. या दुय्यम माहितीच्या आधारे सदरचा शोधनिबंध तयार केला असून लेखात महाराष्ट्राच्या दारिद्र्याचा आढावा घेण्यात आला आहे.

## दारिद्र्याची संकल्पना:

दारिद्र्य ही एकांगी व संकुचित संकल्पना नसून ती विविधांगी व व्यापक स्वरूपाची आहे. दारिद्र्य ही मूलभूत आर्थिक व सामाजिक समस्या आहे. दारिद्र्य ही स्थल, काल सापेक्ष व देशपरत्वे बदलणारी संकल्पना आहे. काल चक्राच्या प्रवाहात दारिद्र्य सातत्याने बदलत जात असते. त्यामुळे दारिद्र्याची निश्चित व काटेकोर व्याख्या करणे कठीण आहे. सामान्यपणे समाजातील जो भाग न्यूनतम जीवन पातळी पासून वंचित, चरितार्थ हेतूने जीवन जगणारा व निम्न दर्जाच्या वस्तूंचा उपभोग घेणारा आणि मूलभूत गरजांपासून बेदखल झालेला असतो अशाचा संबंध दारिद्र्याशी येत असतो. दारिद्र्यातील लोकांची क्रयशक्ती घटल्याने किमान जीवन जगण्यासाठी आवश्यक गरजा पूर्ण करता येत नाहीत.

दारिद्र्याचा अर्थ सांगण्यासाठी विविध पैलूंचा आधार घेण्यात आला असून त्या पैलूंवर आधारित गरिबी ठरविण्यात आलेली आहे. *अन्न, वस्त्र व निवारा या प्राथमिक स्वरूपाच्या गरजा पूर्ण करण्याइतके उत्पन्न न मिळण्याची क्षमता* म्हणजे दारिद्र्य होय. प्रा. अमर्त्य सेन यांच्या मते *एखाद्या व्यक्तिला त्याने जापासलेल्या मूल्यांप्रमाणे जगता न येणे.* म्हणजे दरिद्र्य होय.

किमान गरजा आणि प्रभावी मागणीच्या अंदाजासाठी १९८० - ८५ मध्ये नेमलेल्या तज्ज्ञ गटाने *ग्रामीण भागातील दररोज प्रति व्यक्ती किमान २४०० कॅलरिज आणि शहरी भागासाठी किमान २१०० कॅलरिज मिळविण्यासाठी लागणारे अन्न मिळविण्याची असमर्थता म्हणजे दारिद्र्य होय.* ही दारिद्र्याची व्याख्या विचारात घेतली आहे.

दारिद्र्याच्या वेगवेगळया व्याख्यांचा आधार हा न्यूनतम जीवन जगण्यासाठी आवश्यक मूलभूत गरजांची पूर्तता हा आहे. अन्न, वस्त्र, निवारा, पिण्याचे शुध्द पाणी, शिक्षण, आरोग्य व रोजगार या किमान गरजांची पूर्तता करण्याएवढे उत्पन्न न मिळणारी व्यक्ती दरिद्री मानली जाते.

दारिद्र्याच्या अभ्यासासाठी निरपेक्ष दारिद्र्य व सापेक्ष दारिद्र्य या संकल्पना महत्वाच्या आहेत. निरपेक्ष दारिद्र्यात *किमान गरजा व उष्मांक* हे निकष आधारभूत मानले जातात. सापेक्ष दारिद्र्य संकल्पनेत दोन घटकांमधील *सरासरी राहणीमानातील तुलना* केली जाते. तसेच दोन घटकांमधील उत्पन्न व उपभोग यातील अंतर महत्वाचे मानले जाते. ज्या व्यक्तिला मिळणाऱ्या उत्पन्नातून किमान गरजा पूर्ण करता येत नाहीत. त्यास निरपेक्ष दारिद्र्य तर आहार तज्ज्ञाच्या मतानुसार प्रति व्यक्तिस अन्नातून २२५० उष्मांक मिळणे आवश्यक असते. अन्यथा ती व्यक्ती दारिद्री समजली जाते. दोन कमाल व किमान उत्पन्न गटातील लोकांच्या उत्पन्न, उपभोग व राहणीमानाची तुलना केल्यास कमाल गटातील लोक ज्या प्रकारचे जीवनमान जगतात. त्या प्रकारचे जीवनमान किमान गटातील लोकांना जगता येत नाही. या दोन गटातील उत्पन्न व उपभोग यातील अंतर म्हणजे सापेक्ष दारिद्र्य होय. मिळणाऱ्या उत्पन्नातून किमान गरजा न भागणे व २२५० उष्मांक न मिळणे त्यास निरपेक्ष तर दोन व्यक्तिमधील समान राहणीमानाचा दर्जा नसणे त्यास सापेक्ष दारिद्र्य मानले जाते.

दारिद्र्याची समस्या जाणून घेण्यासाठी खालील निर्देशांक विचारात घेतले जातात.

१.शिरगणती गुणोत्तर (Head Count Ration)

दारिद्र्याचे प्रमाण किती आहे हे समजण्यासाठी या निर्देशांकाचा वापर केला जातो. शिरगणती गुणोत्तर म्हणजे एकूण लोकसंख्येमधील गरीब लोकांचे शेकडा प्रमाण होय. या निर्देशांकाच्या सहाय्याने दारिद्र्याचे मोजमाप खालील प्रमाण केले जाते.

$$\text{शिरगणती गुणोत्तर} = \frac{\text{दरिद्री लोकांची संख्या}}{\text{एकूण लोकसंख्या}}$$

२.दारिद्र्य अंतर / तफावत निर्देशांक (Poverty Gap Index)

गरीब व्यक्तिला मिळणारे उत्पन्न दारिद्र्य रेषेखाली किती अंतरावर आहे. हे निर्देशांकावरून निर्देशनास येते. किती गरीब लोक दारिद्र्य रेषेखाली किती अंतरावर आहेत. याचे मोजमाप करता येते.

$$PGI = \frac{1}{N} \sum_{i=1}^{q} \left[ \frac{z - y_1}{z} \right]$$

N = एकूण लोकसंख्या

Z = दारिद्र्य रेषा

q = दारिद्र्य रेषेखाली गरिबांची संख्या

$y_1$ = दारिद्र्य रेषेखाली लोकांचे उत्पन्न

३. Square Poverty Gap Index:

दारिद्र्याची तीव्रता व बदल या निर्देशाकांच्या सहाय्याने मोजला जातो.

$$PGI = \frac{1}{N} \sum_{i=1}^{q} \left[ \frac{z - y_1}{z} \right]^2$$

सूत्रातील घटकांचा अर्थ Poverty Gap Index प्रमाणे असून त्यांचा वर्ग केला जातो.

**महाराष्ट्र राज्यातील दारिद्र्याचे विश्लेषण:**

भारतातील दारिद्र्याची संकल्पना सापेक्ष नसून ती निरपेक्ष आहे. भारतात प्रथम दारिद्र्य रेषेची संकल्पना मांडण्याचे काम १९६२ साली केंद्रीय नियोजन मंडळाने नियुक्त केलेल्या अभ्यास गटाने केले. विविध निकष आधार धरून वेगवेगळया तज्ज्ञ व समित्यांनी उपभोग खर्च, उत्पन्न व आहारावर आधारित दारिद्र्याचे विभिन्न अंदाज व्यक्त केलेले आहेत.

सन १९९२-९३ मध्ये ज्या ग्रामीण कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न ११,००० रूपयापेक्षा कमी व शहरी भागातील कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न ११,८५० रूपयापेक्षा कमी असलेली कुटुंबे दारिद्र्य रेषेखालील कुटुंबे मानली. ज्या व्यक्तिचे दरमहा खर्च २०० रूपये किंवा त्यापेक्षा कमी असतो तो दारिद्र्यात असेल. या निकषानुसार २०० रूपये प्रती महिना उपभोग असणाऱ्या ग्रामीण भागातील लोकांचे प्रमाण १७ टक्के तर शहरी भागांत हे प्रमाण ३.८ टक्के होते.

१९९२-९३ मध्ये राज्यात एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम राबविण्यासाठी राष्ट्रीय नमुना पाहणी समितीने ग्रामीण भागातील दारिद्र्याचे प्रमाण शोधण्यासाठी प्रति कुटुंब ११,००० रूपये वार्षिक उत्पन्न हा निकष आधार मानला. या आधारे रूपये ० ते ४०००, ४००० ते ६०००, ६००० ते ८५०० व ८५०० ते ११,००० वार्षिक उत्पन्न गटातील दारिद्र्य रेषेखालील कुटुबाचे प्रमाण क्रमशः ४२.९७ टक्के, २१.४८ टक्के ९.८१ टक्के आणि ३.३७ टक्के इतके आहे. राज्यात एकूण ११,००० रूपये वार्षिक उत्पन्न असणाऱ्या दारिद्र्य कुटुंबाचे प्रमाण ७७.८२ टक्के असून सर्वात जास्त कुटुंबे बुलढाणा जिल्ह्यात ९७.७९ टक्के तर सर्वात कमी दारिद्र्य रेषेखालील कुटुंबे असणारा पुणे जिल्हा ५३.९३ टक्के होय.

राष्ट्रीय नमुना पाहणीच्या ५५ व्या फेरीमध्ये उपभोग खर्चावर आधारित गरिबीचा अंदाज व्यक्त केला असून महाराष्ट्र राज्यात सन १९७३-७४ मध्ये दारिद्र्यरेषेखालील लोकांचे एकूण लोकसंख्येशी प्रमाण ५३.०२ टक्के होते त्यापैकी ग्रामीण भागातील जनतेचे दारिद्र्य रेषेखालील प्रमाण ५७.७ टक्के तर नागरी भागातील दारिद्र्य रेषेचे प्रमाण ४३.९ टक्के होते.

सन १९९३-९४ मध्ये राज्यातील एकूण दारिद्र्याचे प्रमाण ३६.९ टक्के असून ग्रामीण व

तक्ता क्र.१

| | शिरगणती गुणोत्तर (HCR) टक्केमध्ये | | | |
|---|---|---|---|---|
| राज्य | १९७३-७४ | २००४-०५ | २००९-१० | २०११-१२ |
| आंध्रप्रदेश | ४८.९ | २९.६ | २१.१ | ९.२० |
| बिहार | ६१.९ | ५४.४ | ५३.५ | ३३.७४ |
| गुजरात | ४८.२ | ३१.६ | २३.० | १६.६३ |
| केरळ | ५९.८ | १९.६ | १२.० | ७.०५ |
| मध्यप्रदेश | ६१.८ | ४८.६ | ३६.७ | ३१.६५ |
| महाराष्ट्र | ५३.२ | ३८.२ | २४.५ | १७.३५ |
| पंजाब | २८.२ | २०.९ | १५.९ | ८.२६ |
| पं.बंगाल | ६३.४ | ३४.२ | २६.७ | १९.९८ |
| भारत | ५४.९ | ३७.२ | २९.८ | २१.९२ |

टीप : २००४-०५ ते २०११-१२ ची आकडेवारी तेंडूलकर समितीच्या अहवालानुसार

शहरी भागातील दारिद्र्य रेषेखालील जनतेचे प्रमाण अनुक्रमे ३७.०९ टक्के व ३५.२ टक्के होते. २००६-०७ मध्ये दारिद्र्य रेषेखालील लोकसंख्येचे प्रमाण १६.२ टक्के होते. त्यामध्ये ग्रामीण व शहरी लोकसंख्येचे दारिद्र्याचे प्रमाण क्रमशः १७.०० टक्के व १५.२ टक्के एवढे आहे.

राज्यातील सन १९७३-७४ ते २००६-०७ काळात दारिद्र्य ५३.०२ टक्क्यांवरून १६.२ टक्क्यांपर्यंत सातत्याने घटत गेलेले असून ग्रामीण भागातील दारिद्र्य शहरी भागापेक्षा वेगाने घटले आहे. महाराष्ट्र राज्याची इतर राज्यांशी तुलना केल्यास भारतात २००६-०७ पर्यंत सर्वात जास्त दारिद्र्य बिहार राज्यात असून ते प्रमाण ४३.०२ टक्के तर सर्वात कमी दारिद्र्य तामिळनाडू राज्यात ६.६ टक्के इतके होते. यावेळी महाराष्ट्र राज्यातील दारिद्र्याचे प्रमाण १६.२ टक्के एवढे होते.

सन २००४-०५ च्या किंमतीच्या आधारे तेंडूलकर समितीने अप्रत्यक्ष किंमतीचा वापर करून २००९-१० साठी दरमहा दरडोई उपभोग खर्चाचा निकष आधारित धरून शिरगणती गुणोत्तरावरून (HCR) सुधारित दारिद्र्य रेषा निश्चित केली. काही निवडक राज्यातील शिरगणती गुणोत्तर तक्ता क्र.१ मध्ये दिल्याप्रमाणे.

१९७३-७४ ते २०११-१२ या काळात सर्व राज्यांमधील दारिद्र्याचे प्रमाण घटलेले दिसते. आंध्रप्रदेश, केरळ व पंजाब या राज्याचे दारिद्र्य प्रमाण १०टक्यापेक्षा कमी तर गुजरात, महाराष्ट्र व पश्चिम बंगाल राज्यातील दारिद्र्य २० टक्के किंवा त्यापेक्षा थोडे अधिक असून बिहार, मध्य प्रदेश या राज्यांचे दारिद्र्याचे प्रमाण तुलनेने जास्त दिसते. आंध्रप्रदेश, केरळ व पंजाब या राज्यांमधील दारिद्र्याचे प्रमाण महाराष्ट्र राज्याच्या तुलनेने कमी दिसून येते.

तेंडूलकर समितीने २००९-१० मध्ये

महाराष्ट्र राज्यातील प्रति व्यक्ती दरमहा दरडोई ग्रामीण भागातील ७४३.७ रूपये तर नागरी भागात ९६१.१ रूपये इतका उपभोग खर्च गृहीत धरून या काळात ग्रामीण व नागरी भागातील एकत्रित दारिद्र्याचे प्रमाण २४.५ टक्के आणि २०११-२०१२ मध्ये ग्रामीण व नागरी मासिक दरडोई खर्च ९६७ व ११२६ रूपये आधार मानून राज्यात १७.३५ टक्के लोक दारिद्र्य रेषेखाली असून त्यापैकी ग्रामीण भागातील २४.२२ टक्के व नागरी भागातील ९.१२ टक्के लोकसंख्या दारिद्र्य रेषेखाली जीवन जगत असल्याचा निष्कर्ष काढला.

**सामाजिक व विभागीय गटानुसार दारिद्र्य प्रमाण:**

सामाजिक गटामध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागास वर्ग व इतर प्रवर्ग यांचा आणि राष्ट्रीय नमुना पाहणी संस्थेने दारिद्र्याचे सर्वेक्षण करण्यासाठी राज्याचे किनारपट्टी (Coastal) अंतर्गत पश्चिम (Inland Western) अंतर्गत उत्तर (Inland Northern) अंतर्गत मध्य (Inland Central) अंतर्गत पूर्व (Inland Eastern) व पूर्व विभाग (Eastern) या सहा विभागांचा समावेश केला आहे.

राष्ट्रीय नमुना पाहणी समितीच्या ५५ व्या फेरीनुसार राज्यातील सामाजिक गटातील ग्रामीण भागातील २३.२२ टक्के लोकसंख्या दारिद्र्य रेषेखाली जीवन जगत होती. त्यापैकी अनुसूचित जमाती ४४.२० टक्के, अनुसूचित जाती ३१.६४ टक्के, इतर मागास वर्ग २१.८९ टक्के व इतर प्रवर्ग लोकांमधील दारिद्र्याचे प्रमाण १२.७८ टक्के र शहरी भागातील लोकांचे दारिद्र्याखालील प्रमाण २६.७५ टक्के असून ४२.७५ टक्के अनुसूचित जमाती, ४०.७१टक्के अनुसूचित जाती, इतर मागास वर्ग ३३.८५ टक्के व इतर लोकांमधील दारिद्र्याचे प्रमाण २१.१४ टक्के इतके होते.

सन १९९३-९४ मध्ये अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीतील लोकांचे दारिद्र्याखालील प्रमाण क्रमशः ५१.६४ टक्के व ५०.३८ टक्के होते. हे प्रमाण २००४-०५ मध्ये अनुसूचित जाती ४४.८ टक्के, अनुसूतिच जमाती ५६.६ टक्के, इतर मागास वर्ग २३.९ टक्के व इतर समाजातील दारिद्र्य प्रमाण १८.९ टक्के इतके होते.

तेंडूलकर समितीनुसार (२००४-०५) २००९-१० मध्ये राज्यातील ग्रामीण भागातील अनुसूचित जमाती, अनुसूचित जाती व इतर मागास वर्गातील लोकांचे दारिद्र्याचे प्रमाण अनुक्रमे ४७.३ टक्के व ४२.३ टक्के व ३१.९ टक्के तर नागरी भागातील अनुसूचित जमाती, अनुसूचित जाती व इतर मागास वर्गातील लोकांच्या दारिद्र्याचे प्रमाण क्रमशः ३४.१ टक्के, ३०.४ टक्के व २४.३ टक्के इतकेहोते.

राज्यातील विभागानुसार दारिद्र्य लक्षात घेता १९९३-९४ मध्ये किनारपट्टी, अंतर्गत पश्चिम, अंतर्गत उत्तर, अंतर्गत मध्य, अंतर्गत पूर्व व पूर्व विभागातील लोकांचे गरिबीचे प्रमाण क्रमशः १३.३ टक्के, २९.३ टक्के, ५०.३ टक्के, ५२.४ टक्के, ५२.६ टक्के व ४९.८ टक्के होते तर १९९९-२००० मध्ये हे प्रमाण किनारपट्टी १२.९ टक्के, अंतर्गत पश्चिममध्ये १५.६ टक्के, अंतर्गत उत्तर विभागात ३४.१ टक्के, अंतर्गत मध्य विभाग ३१.१ टक्के, अंतर्गत पूर्वमध्ये ३८.४ टक्के व पूर्व विभागात ३९.८ टक्के एवढे होते.

जागतिक पातळीवर विकसित देशांना भेडसावणाऱ्या गरिबीची तीव्रता कमी मात्र भारतासारख्या उदयोन्मुख राष्ट्रामध्ये या समस्येची

तीव्रता अधिक जाणवते. देश पातळीवर गरिबीचा समुळ विनाश करण्यासाठी विशेष प्रयत्न केले जात असून, महाराष्ट्र शासनाने दारिद्र्य उच्चाटनाच्या केलेल्या वेगवेगळया प्रयत्नांमुळे राज्यातील दारिद्र्याचे प्रमाण घटलेले दिसून येते. मात्र आंध्र प्रदेश, केरळ व पंजाब अशा काही निवडक राज्यांच्या तुलनेने महाराष्ट्रातील दारिद्र्याचे प्रमाण अधिक आहे. राज्यातील सामाजिक गटातील दारिद्र्याचे प्रमाण घटत असून सन १९९३-९४ ते २००४-०५ या काळात अनुसूचित जातीतील दारिद्र्य कमी झाले मात्र अनुसूचित जमातीतील गरिबीचे प्रमाण वाढलेले आहे. राज्यातील शिरगणती गुणोत्तरात झालेली घट ही शासकीय उपायांची फलश्रुती मानावी लागेल. खुल्या आर्थिक धोरणाने विकासाचा वृध्दी दर सुधारलेल्याने दारिद्र्याच्या प्रमाणात घसरण झाली हे खरे परंतु नागरी भागापेक्षा ग्रामीण भागात आरोग्य सुविधांचा विस्तार, शैक्षणिक पातळी उंचावणे, पायाभूत सुविधांचा विस्तार करणे, कुपोषण, शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखणे व सार्वजनिक वितरण प्रणाली कार्यक्षम करणे इत्यादी उपाय करणे गरजेचे आहे.

संदर्भ सुची:


१. GOI, Planning Commission, *Eleventh FIve Year Plan*, 2007-12, Valume 1.

२. *Economic Survey of India* - 2013

३. *Economic Survey of Maharashtra*- 2012

४. *Press Note on Poverty Estimates* - 2011-12

५. *महाराष्ट्राची अर्थव्यवस्था* - डॉ. र.प. कुरूलकर

६. *महाराष्ट्राची अर्थव्यवस्था* - मंगला जंगले

७. *अर्थसंवाद*, खंड २८, अंक ४, जानेवारी - मार्च २००५, पृष्ठ क्र. ३३७

८. *अर्थसंवाद*, खंड ३६, अंक १, एप्रिल-जून २०१२, पृष्ठ क्र. १०२

९. *समाज प्रबोधन पत्रिका*, अंक १७२, जुलै-डिसेंबर २००५, पृष्ठ क्र. १९५.

# महाराष्ट्रातील शेतीक्षेत्राचे बदलते स्वरूप व शेतीआधारित उद्योगधंदे

सुरेखा अर्जुन फाकडे, पेठवडगांव,
नवीन वसाहत,
ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर
भ्रमणध्वनी: ८००७२७९७४१.

भारतीय अर्थव्यवस्थेत शेती क्षेत्राची भूमिका महत्वाची आहे. अन्नधान्याचा पुरवठा, कच्च्या मालाचा पुरवठा, रोजगारनिर्मिती, सरकारी उत्पन्नाचे साधन, परकीय चलन मिळवून देणारा उद्योग यासारख्या अनेक दृष्टिकोनातून शेतीचे योगदान महत्त्वाचे ठरते. प्रस्तुत लेख *महाराष्ट्रातील शेतीक्षेत्रातील वाटचाल, शेती क्षेत्राचे बदलते स्वरुप आणि शेतीवर अवलंबून असणारे उद्योगधंदे* याविषयी आहे. यामध्ये महाराष्ट्रातील एकूण लागवडीखालील क्षेत्र सिंचनाखालील क्षेत्र, महाराष्ट्रातील प्रमुख पिकांचे उत्पादन, आधुनिक पध्दतीने शेती कसण्याचे प्रकार उदा. संविदा शेती, काटेकोर / अचूक शेती, प्रमंडलीय शेती, सेंद्रिय शेती, निरंतर शेती प्रकारांचा तसेच महाराष्ट्रातील कृषी क्षेत्रावर उपजिवीका करणाऱ्या उद्योगांचा आढावा घेतला आहे.

शेती हा महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेचा मूळ आधार आहे. महाराष्ट्रातील शेतीत ज्वारी, गहू, तांदूळ, बाजरी यासारखी अन्नधान्याची पिके घेतली जातात. तसेच ऊस, कापूस, तंबाखू, मिरची इ. नगदी पिके आणि भुईमूग, तीळ, जवस, मोहरी यासारखी गळिताची पिकेही घेतली जातात. तथापि, मध्य महाराष्ट्र व मराठवाड्यातील बराचसा भाग अल्प पर्जन्यवृष्टीच्या छायेत आहे. महाराष्ट्रात अनेक ठिकाणी पाणीपुरवठ्याचा प्रश्न अधिक गंभीर झाला आहे. यामुळे महाराष्ट्रातील शेती उत्पादन व उत्पादकता यावर गंभीर परिणाम झाला आहे. सध्या राज्यात एकूण २१६.६२ लाख हेक्टर जमीन लागवडीखाली आहे. त्यापैकी केवळ ३६.५ लाख हेक्टर जमीन सिंचनाखाली आहे. म्हणजे अजूनही सिंचनसोयी मोठ्या प्रमाणात वाढविण्याची गरज आहे.

महाराष्ट्रातील एकूण लागवडीखालील जमीन आणि सिंचनाखाली असलेले क्षेत्र यांची आकडेवारी पुढीलप्रमाणे.

तक्ता क्र. १

| अ.क्र. | तपशील | १९६१-६४ | १९८०-८१ | २००८-०९ |
|---|---|---|---|---|
| १. | एकूण लागवडीखालील क्षेत्र (लाख हेक्टर) | १८८.२३ | २०२.७० | २२४.५४ |
| २. | सिंचनाखालील क्षेत्राची टक्केवारी | ६.५ | १२.४ | १७.७ |

*स्रोत - भारतीय अर्थव्यवस्था - रायखेलकर दामजी / ५४०*

वरील तक्त्यावरून स्पष्ट होते की, सन १९६०-६१ ते २००८-०९ या कालखंडात सिंचनाखालील क्षेत्राचे प्रमाण ६.५ टक्क्यांवरून १७.७ टक्के इतके वाढले. तथापि अजूनही पाणीपुरवठयाखालील जमिनीचे प्रमाण वाढण्याची गरज आहे.

**शेती उत्पादन:**

राज्यातील शेतीक्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढला आहे. शेतीमधील अनेक कामे यंत्रामार्फत केली जातात. तसेच बहुपीक पध्दतीचा अवलंब करून मुख्य पिकांबरोबर इतरही पिके घेतली जातात. तसेच रासायनिक खते, किटकनाशके, रासायनिक द्रव्ये इत्यादींचा वापर वाढत आहे. याशिवाय साठागृहाच्या सुविधा, शीतगृहे, पीक विमा योजना यासारख्या बाबींमुळे शेती उत्पादन वाढत आहे. राज्यातील शेती उत्पादनातील वाढ पुढीलप्रमाणे दर्शविता येईल.

तक्ता क्र. २

**महाराष्ट्रातील प्रमुख पिकांचे उत्पादन** (हजार टनांमध्ये)

| तपशील | १९६०-६१ | १९७०-७१ | १९८०-८१ | २०१०-११ |
|---|---|---|---|---|
| तांदूळ | १३६९ | १६२२ | २३६० | २६९६ |
| गहू | ४०१ | ४४० | ८५७ | २३०१ |
| ज्वारी | ४२२३ | १५५७ | ४४२७ | ३४५२ |
| एकूण तृणधान्ये | ६७५५ | ४७३६ | ८९०० | १२३२१ |
| एकूण कडधान्ये | ९८८ | ६७७ | ८३१ | ३०९६ |
| कापूस | २८७ | ८२ | २१५ | ७४७० |
| भुईमूग | ७९९ | ५८६ | ४४० | ४५८ |
| ऊस | १०४० | १४४० | २५९३ | ८५६९१ |

*स्रोत - भारतीय अर्थव्यवस्था - रायखेलकर दामजी / ५४१*

वरील तक्त्यात १९६०-६१ ते २०१०-११ या काळात तांदळाचे उत्पादन दुप्पटीने वाढले आहे. गव्हाचे उत्पादन पाच पटीपेक्षा अधिक आहे. ज्वारीचे उत्पादन फारसे वाढलेले नाही. तर कापूस, भुईमूग, ऊस या व्यापारी पिकांपैकी ऊसाच्या उत्पादनातील वाढ सर्वाधिक आहे. त्यानंतर कापसाचा क्रम लागतो.

महाराष्ट्रात प्रतिव्यक्ती अन्नधान्य

तक्ता क्र. ३

महाराष्ट्र राज्य आणि भारत - शेती उत्पादकतेची तुलना (२०१०-११)

(दर हेक्टरी उत्पादन - किलोग्रॅममध्ये)

| अ.क्र. | पिकांचे नाव | महाराष्ट्र राज्य | भारत (राष्ट्रीय सरासरी) |
|---|---|---|---|
| १. | तांदूळ | १,७७६ | २,२४० |
| २. | गहू | १,७६१ | २,९३८ |
| ३. | ज्वारी | ८५० | -- |
| ४. | कापूस | ३२२ | ५१० |
| ५. | भुईमूग | १,२८१ | १,२६८ |
| ६. | ऊस | ८८,८०० | ६८,५९६ |

*स्त्रोत* - भारतीय अर्थव्यवस्था - रायखेलकर दामजी/ ५४३

उत्पादनाचे प्रमाण १६० किलोग्रॅम आहे. हे प्रमाण पंजाबमध्ये ७८२ किलोग्रॅम आहे. तर राष्ट्रीय पातळीवरील याची सरासरी १९० किलोग्रॅम इतकी आहे. राष्ट्रीय पातळीवरील प्रतिव्यक्ती अन्नधान्य उत्पादनाचे प्रमाण गाठण्यासाठी राज्यात अन्नधान्याचे उत्पादन वेगाने वाढणे गरजेचे आहे.

महाराष्ट्रातील काही निवडक पिकांच्या उत्पादकतेची राष्ट्रीय पातळीवरील उत्पादकतेशी तुलना करता येईल. यामुळे विविध पिकांच्या संदर्भात राज्याची असलेली उत्पादनक्षमता नेमकी किती कमी किंवा जास्त आहे याची कल्पना तक्ता क्र. ३ वरून येईल.

वरील तक्ता क्र. ३ वरून लक्षात येते की, केवळ ज्वारी व ऊस वगळता इतर सर्व पिकांबाबत राज्यातील शेती उत्पादकता राष्ट्रीय सरासरीपेक्षा कमी आहे. ऊसाबाबत राज्यात उत्पादकता अधिक आहेच, शिवाय ती राष्ट्रीय पातळीवर सुध्दा सर्वोच्च आहे.

शेतीची कमी उत्पादनक्षमता व विपणनातील समस्या लक्षात आल्या आणि त्यातूनच संविदा शेती, काटेकोर शेती, प्रमंडलीय शेती, सेंद्रिय शेती, निरंतर शेती असे शेतीचे प्रकार अस्तित्वात आले. त्यासंबंधी थोडक्यात माहिती पुढीलप्रमाणे.

१. संविदा शेती/करार शेती:

जेव्हा कृषि उत्पादन शेतकरी व खरेदीदार यांच्यातील करारानुसार होते आणि कृषि उत्पादन व विपणनाच्या अटी निश्चित होतात तेव्हा त्या शेतीला संविदा / करार शेती म्हणतात.

सामान्यपणे खरेदीदाराशी झालेल्या करारानुसार शेतकरी विशिष्ट कृषि वस्तुंचा पुरवठा करण्यास तयार होतो. खरेदीदाराशी झालेल्या करारानुसार विशिष्ट गुणवत्तेचा कृषि माल विशिष्ट पध्दतीने पुरविला जातो. काही वेळा शेतीमालाचे खरेदीदार हे शेतकऱ्यांना कृषी आदाने, जमीन लागवडीयोग्य बनविणे, तांत्रिक सल्ला पुरविणे, वाहतुक सुविधा उपलब्ध करून देणे इ. सोयी करून देतात. प्रक्रियादार किंवा प्रक्रिया व्यावसायिक संविदा शेतीचा सर्वाधिक वापर करतात. त्यांना संविदा शेतीमुळे संयंत्रांच्या क्षमतेचा पुरेपूर वापर करता येतो. तसेच संविदा शेतीचे महत्वाचे वैशिष्टय म्हणजे यामुळे

बाजारविषयक सुविधा सहजपणे उपलब्ध होतात. यामुळे व्यापारी शेतीला उत्तेजन मिळते. संविदा शेती योग्य व्यवस्थापनाने केल्यास छोट्या शेतकऱ्यांच्या विपणन विषयक समस्या सहजपणे मिटू शकतील.

२. काटेकोर / अचूक शेती:

नि:संदिग्ध अथवा अचूक शेती यात अभिप्रेत आहे. ही अशी कृषी व्यवस्थापन संकल्पना आहे की, जी आंतरक्षेत्रीय बदलाच्या निरीक्षणावर आणि प्रतिसादावर आधारित आहे. ही पध्दती सॅटेलाईट प्रतिभा, माहिती तंत्रज्ञान आणि भूक्षेत्रीय साधनासारख्या नव्या तंत्रज्ञानावर अवलंबून आहे. अचूक शेती, कृषीस्तरीय व्यवस्थापन, अधिक प्रभावी बनविण्याचा प्रयत्न करते. या संदर्भात पीकशास्त्र, पर्यावरण संरक्षण, अर्थशास्त्र लक्षात घेतले जाते.

अचूक शेतीमुळे उत्पादन वाढविण्यासाठी वापरलेल्या पीक आदानांचे परिणाम कृषी व्यवस्थापन क्रियांद्वारे कमी करता येते. यामुळे पादपरक्षण (Phytosanitary) आणि खत खर्चात बचत होऊन शेतकऱ्यांना गुंतवणुकीवर चांगला परतावा मिळतो. योग्य वेळी, योग्य ठिकाणी, योग्य त्या प्रमाणात आदानांचा वापर करून पीक, मृदा, भूगर्भातील पाणी आणि संपूर्ण पीकचक्र यांचा योग्य लाभ घेता येतो. अचूक शेती पीक, मृदा आणि शेतकरी यांचा विचार करते. अचूक शेतीत उच्च तंत्रज्ञानाची पध्दती वापरली जाते.

३. प्रमंडलीय शेती:

प्रमंडलीय शेतीची संकल्पना कृषी उत्पादनांच्या व्यवसायाशी निगडीत आहे. प्रमंडले अन्नधान्य उत्पादनात मोठया प्रमाणात सहभागी होतात. शेती करण्याबरोबरच बियाण्यांचा पुरवठा, कृषी रसायने, अन्नप्रक्रिया, साठवणूक, वाहतूक, वितरण, विपणन, जाहिरातबाजी, किरकोळ विक्री या सर्वांच्या मोठ्या साखळीशी प्रमंडलीय शेती संबंधित आहे. प्रमंडलीय कंपन्या शेतीव्यवसाय नव्या तंत्रज्ञानाचा अवलंब करतात. प्रमंडलीय शेतीचे अंतिम ध्येय म्हणजे ग्राहकांना अन्नधान्याचे वितरण व विक्री करेपर्यंतची संपूर्ण अन्नधान्य उत्पादन प्रक्रिया उर्ध्व पध्दतीने एकत्रित करणे होय. व्यक्तिगत शेती आणि प्रमंडलीय शेती यांच्यात फरक आहे. व्यक्तिगत शेतीमध्ये शेतकरी स्वत: शेती करतात. प्रमंडलीय शेतीमध्ये मात्र विशिष्ट कराराने काम करणारे श्रमिक शेती करतात. व्यक्तिगत शेती करणाऱ्यांमध्ये छोट्या शेतकऱ्यांचे प्रमाण योग्य आहे. भांडवल, नवीन तंत्रज्ञान, कृषी आदाने इ. बाबतीत अनेक समस्या छोट्या शेतकऱ्यांमध्ये आढळतात. पण प्रमंडलीय कंपन्या या बाबी पुरवितात. त्यामुळे संबंधित मोठ्या कंपन्यांना उत्पादनात प्रमाणाच्या बचती (Economies of Scale) मिळतात.

४. सेंद्रिय शेती:

माती, रोपे, पशूपक्षी, मानव आणि पृथ्वी यांचे आरोग्यसंवर्धन आणि शाश्वत स्वरूपाचा विकास या दृष्टीने सेंद्रिय शेतीला महत्व आहे. सेंद्रिय शेतीत योग्य पीकपालट, पिकांचे अवशेष, जनावरांचे मलमूत्र, द्विदल धान्ये, जैविक कीडरोग, तणनाशके यांच्या वापरांद्वारे शेतजमिनीची उत्पादकता वाढविण्याचे प्रयत्न केले जातात. सेंद्रिय शेतीत हे गृहित धरण्यात येते की, जमीन हे जिवंत माध्यम आहे. त्यात शेतीस उपयुक्त ठरणाऱ्या अनंत जीवयोग्य स्थिती असतात. त्यात सतत वाढ होत जाते. या शेतीत

जमिनीतील जंतूंना पुरेसे खाद्य मिळते. यामुळे त्यांची संख्या वाढण्यास मदत होते. यातून वनस्पतींच्या वाढीस पोषक अशी संप्रेरके निर्माण होतात. यामुळे कीटकनाशकांचा वापर कमी होतो. सेंद्रिय शेती ही एक साधी आणि पर्यावरणास अनुकूल अशा स्वरूपाची उत्पादन प्रक्रिया आहे.

स्थानिक व जागतिक पातळीवर सेंद्रिय उत्पादनांची मागणी वाढत आहे. विषमुक्त जीवन (Poision Free Food) पुरविण्याचे साधन या दृष्टीनेही सेंद्रिय शेतीला महत्त्व आहे.

५. निरंतर शेती:

आर्थिक विकासाच्या संदर्भात निरंतरता ही एक गतिमान संकल्पना म्हणून विचारात घेतली जाते. सातत्यपूर्ण शेतीने प्रयत्न सुरू ठेवणे, ऱ्हास न होऊ देता टिकून रहाण्यास सक्षम हा निरंतरेचा मुख्य अर्थ आहे. वर्तमान पिढीची अन्नधान्याची गरज व इतर गरजा पूर्ण करताना त्यातील आधारभूत अशा निसर्गदत्त जमिनीच्या व पर्यावरणाच्या गुणवत्तेचा ऱ्हास न होऊ देणे तसेच जमिनीशी निगडीत निसर्गचक्र अबाधित ठेवून हे नैसर्गिक साधन भावी पिढ्यांसाठी जतन करणे याची जाणीव ठेवणारी शेतीची पध्दत म्हणजे निरंतर शेती होय. साध्या भाषेत जमीन व तिची सुपीकता यांच्याशी निगडीत पर्यावरणीय गुणवत्तेचे व्यवस्थापन निरंतर शेतीमध्ये अपेक्षित आहे. या दृष्टीने पुढील मुद्दे महत्त्वपूर्ण ठरतात.

१. सतत वाढत असलेल्या लोकसंख्येला अन्नधान्य व इतर उत्पादनांची गरज पडणार असून ती वाढती राहील. निरंतर शेतीमध्ये ही गरज पूर्ण व्हायला हवी.

२. वरील उद्दिष्टाने जमिनीच्या उत्पादक शक्तीचा वापर करताना तिची मूळ शक्ती नष्ट न होऊ देता कायम टिकविणे निरंतर शेतीत अपेक्षित आहे.

३.वनस्पती, किटक, प्राणी वगैरे समाविष्ट असणारे सृष्टीचक्र जमिनीच्या शक्तीशी निगडीत आहे व मानव हा सुध्दा त्याचा एक भाग आहे. म्हणूनच निरंतर शेती ही जीवनसातत्य टिकवून ठेवणारी असावी.

४.निरंतर शेतीमध्ये जमीन वापरण्याची पध्दत अशी असावी की भावी पिढ्यांना हे संसाधन सुस्थितीत उपलब्ध राहील. वरील बाबींना अनुसरून मृद संधारण अत्यावश्यक ठरते. तसेच जल-संसाधनाचे योग्य व्यवस्थापन व्हायला हवे.

## महाराष्ट्रातील कृषी क्षेत्रावर उपजिविका करणारे उद्योग:

१. महाराष्ट्रातील पशुधन :

ग्रामीण भागात प्रामुख्याने कृषी क्षेत्रावर उपजीविका भागविणाऱ्या लक्षावधी कुटुंबाना अतिरिक्त उत्पन्नासाठी मोठ्या प्रमाणात संधी उपलब्ध करण्यात पशुधन व्यवसायाची भूमिका महत्त्वाची आहे. राज्यातील पशुधनाची आकडेवारी तक्ता क्र. ४ वरून स्पष्ट होते. सन २००७ मध्ये राज्यातील एकूण पशुधन जवळपास ३६० लाख इतके असून प्रतिलाख लोकसंख्येमागे पशुधनाचे प्रमाण ३१,९९५ इतके आहे. पशुधन व कुक्कुटपालनात महाराष्ट्राचा देशात सहावा क्रमांक लागतो.

२. महाराष्ट्रातील दुग्धव्यवसाय :

दुध व्यवसाय हा महत्त्वाचा कृषीपूरक व्यवसाय आहे. दूध उत्पादनात महाराष्ट्राचा देशात सहावा क्रमांक आहे. दुधोत्पादन व प्रतिव्यक्ती दुधाची उपलब्धता तक्ता क्र. ५ दाखविली आहे. सन २००७-०८ च्या तुलनेत सन २०१२-१३

तक्ता क्र. ४

## महाराष्ट्रातील पशुधन

(आकडे लाखात)

| तपशील | पशुधन गणना | | | |
|---|---|---|---|---|
| | १९९७ | २००३ | २००७ | २००७ मध्ये २००३ च्या तुलनेत बदल % |
| गुरे | १८०.७१ | १६७.३८ | १६१.८४ | (-) ३.३ |
| म्हशी | ६०.६३ | ६०.८४ | ६०.७३ | (-) ०.२ |
| शेळया व मेंढ्या | १४८.०२ | १३६.२४ | १३३.०१ | (-) २.४ |
| इतर पशुधन | ६.९२ | ६.१२ | ३.९७ | (-) ३५.१ |
| एकूण पशुधन | ३९६.३८ | ३७०.५८ | ३५९.५५ | (-) ३.० |

*स्रोत: पशुधन गणना, भारत सरकार.*

तक्ता क्र. ५

## महाराष्ट्रातील दुग्धव्यवसाय

| वर्ष | दुधाचे उत्पादन (दशलक्ष मे.टन) | | प्रति व्यक्ती उपलब्धता (ग्रॅम प्रति दिन) | |
|---|---|---|---|---|
| | महाराष्ट्र | भारत | महाराष्ट्र | भारत |
| २००७-०८ | ७.२ | १०४.८ | १८४ | २५२ |
| २००८-०९ | ७.५ | १०८.५ | १८७ | २५८ |
| २००९-१० | ७.७ | ११२.५ | १९० | २६४ |
| २०१०-११ | ८.० | १२१.८ | १९६ | २८१ |
| २०११-१२ | ८.२ | १२७.३ | - | - |

स्रोत: *Economic Survey of Maharashtra*

मध्ये राज्यातील दुग्धोत्पादन वाढले आहे. महाराष्ट्रातील सरकारी व सहकारी दुग्धशाळांचे एकत्रित सरासरी दैनिक दुधसंकलन सन २०१०-११ मध्ये ३७.५७ लाख लिटर होते. सन २०११-१२ मध्ये ते ३६.१६ लाख लिटर होते.

३. महाराष्ट्रातील मत्स्यव्यवसाय :

मत्स्योद्योगाद्वारे प्रामुख्याने सागरी किनारी पट्टयांत रोजगारनिर्मिती होते. राज्याच्या स्थूल उत्पन्नातील कृषी व संलग्न क्षेत्राच्या उत्पन्नात मासेमारीचा हिस्सा सन २०१०-११ मध्ये १.७% होता. महाराष्ट्राला ७२० किमी सागरी किनारा लाभला असून १.१२ चौ.किमी क्षेत्र सागरी मासेमारीसाठी योग्य आहे. सागरी तटावर मासे उतरविण्यासाठी एकूण १६२ केंद्रे आहेत.

सन २०१०-११ मध्ये मत्स्योत्पदनाचे एकूण मूल्य २९९९ कोटी रूपये होते.

४. महाराष्ट्रातील कुक्कुटपालन :

महाराष्ट्रात कुक्कुटपालनाचा व्यवसाय प्रामुख्याने खाजगी कुक्कुटपालकांकडून केला जातो. राज्यात सन २०१०-११ मध्ये कुक्कुटपालनातून पुरवठा करण्यात आलेल्या पक्षांची संख्या ३.८७ लाख इतकी होती. महाराष्ट्रात अंड्यांचे उत्पादन वाढत असले तरी प्रतिव्यक्ती उपलब्धता राष्ट्रीय पातळीच्या तुलनेत कमी आहे. सन २०१०-११ मध्ये राष्ट्रीय पातळीवर प्रतिवर्षी दरडोई अंड्यांची उपलब्धता ५३ इतकी होती तर राज्यपातळीवर ती ३८ इतकी कमी होती.

५. महाराष्ट्रातील जंगलसंपत्ती :

महाराष्ट्राच्या स्थूल उत्पन्नात वनांचा हिस्सा सन २०१०-११ मध्ये १३.९ टक्के होता. राज्याचे एकूण जंगलक्षेत्र ६१,९३९ चौ.किमी. इतके होते. राज्याच्या भौगोलिक क्षेत्राशी वनाचे प्रमाण २०.१ टक्के इतके आहे. राज्यात एकूण जंगलक्षेत्र ५४,८०७ चौ.किमी. इतके होते. महाराष्ट्रात सामाजिक वनीकरणाचा प्रकल्प सन १९८२ पासून सुरू झाला. ग्रामीण लोकसंख्येची जळाऊ लाकडाची व वैरणीची गरज भागविण्यात सामाजिक वनीकरण विभागाची भूमिका महत्त्वपूर्ण आहे. राष्ट्रीय वनधोरण १९८८ नुसार राज्यात ३३ टक्के क्षेत्र जंगलाखाली असणे आवश्यक आहे. सध्या राज्यात २० टक्के क्षेत्र जंगलाखाली आहे. सन २०११-१२ मध्ये एकंदरीत राज्यात १.१० कोटी वृक्षांची लागवड करण्यात आली.

६. महाराष्ट्रातील फलोत्पादन :

महाराष्ट्रात राष्ट्रीय फलोत्पादन अभियान आणि राष्ट्रीय औषधी वनस्पती मंडळाच्या योजना राबविण्यासाठी सन २००५ मध्ये महाराष्ट्र राज्य फलोत्पादन व औषधी वनस्पती मंडळाची स्थापना करण्यात आली. सन २०१०-११ मध्ये राज्यात विविध फळ पिकांअंतर्गत १५.३७ लाख हेक्टर इतके क्षेत्र होते. महाराष्ट्र शासनाने फलोत्पादन विकासाला चालना देण्याकरिता फळ रोपवाटिकांची स्थापना करणे, सीमांत व अल्पभूधारकांना फळझाडे वाढविण्यासाठी भांडवली सहाय्य देणे असे कार्यक्रम हाती घेतले आहेत. सन २०१०-११ मध्ये या योजनेवर ११०.५८ कोटी रूपये खर्च करण्यात आले आहेत.

७. महाराष्ट्रातील पुष्पसंवर्धन :

पुष्पसंवर्धन हा शेती व्यवसायातील महत्त्वाचा घटक आहे. अलिकडील काळात विविध प्रकारच्या फुलांची मागणी वाढत आहे. वाहतूक क्षेत्रातील सुधारणांमुळे संपूर्ण देशभरात फुलांची उपलब्धता होते. पुष्पसंवर्धन उद्योग मोठ्या प्रमाणात रोजगारनिर्मिती होत आहे. महाराष्ट्रातून अनेक फुलांची निर्यात अनेक देशांना होत आहे. तथापि, अद्यापही हा उद्योग बाल्यावस्थेत आहे.

समारोपः

अशा प्रकारे महाराष्ट्रातील शेती उद्योगांना कच्चा माल पुरवणे, रोजगार निर्मिती करणे आणि परकीय चलन मिळवून देते. तथापि महाराष्ट्रातील शेतीस पाणीपुरवठ्याची गरज आहे. कोरडवाहू जमिन सिंचनाखाली आणली तर शेतीमधील उत्पादन मोठ्या प्रमाणात वाढेल याबाबत शंका नाही.

संदर्भ सूची:

१. रायखेलकर दामजी (२०१३) *भारतीय अर्थव्यवस्था*, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, पृ.५४०, ५४३
२. कविमंडन विजय (२०१२) *कृषि व ग्रामीण अर्थशास्त्र*, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, पृ. ३०७
३. गंगाधर वि. कायंदे-पाटील (२००७) *शेतीचे अर्थशास्त्र*, चैतन्य पब्लिकेशन, नाशिक, पृ.५.१

## मराठी अर्थशास्त्र परिषद

### महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

### अर्थसंवादसाठी अनुदान

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या विनंतीला प्रतिसाद देऊन महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई यांचेकडून २०१४-१५ या वर्षात अर्थसंवादसाठी रु.४५,०००/- अनुदान प्राप्त झालेले आहे. त्याबद्दल मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या वतीने मी महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई यांचा ऋणी आहे.

- डॉ. अविनाश निकम,
प्रमुख संपादक, अर्थसंवाद
मराठी अर्थशास्त्र परिषद

# महाराष्ट्रातील सहकारी चळवळ : सद्यस्थिती व भवितव्य

**हनुमंत पोपट शिंदे, पुणे,**
पीएच्.डी. संशोधक,
अर्थशास्त्र विभाग, पुणे विद्यापीठ.
भ्रमणध्वनी: ८६००१७२५८०

आर्थिक विकासाच्या वेगवेगळ्या टप्प्यात मानव आपल्या गरजांच्या पूर्ततेसाठी निरनिराळ्या पद्धतीने आर्थिक व्यवहारांचे संचलन करीत असतो. काही वेळा व्यक्ती वैयक्तिक पातळीवर तर काही प्रसंगी सामुहीक पातळीवर अर्थव्यवहारांचे संघटन केले जाते. १८४४ साली इंग्लडमधील रॉशडेल पायोनिअर्स यांनी एका ग्राहक भांडाराची स्थापना केली व भांडाराचा व्यवहार करण्यासाठी जे निती-नियम पाळले त्यातुनच सहकाराचा उदय झाला. १८९५ साली इंटरनॅशनल कोऑपरेटिव्ह अलायन्स (International Cooperative Alliance) या जागतिक संघटनेची स्थापना झाल्यापासून विविध देशातील सहकारी संस्थांच्या प्रगतीस खऱ्या अर्थाने सुरवात झाली.

*सहकारी सोसायटी ही व्यक्तिसमूहांची किंवा समाजाची एक अशी संघटना आहे की, ज्या संघटनेच्या सभासदांचे आर्थिक व सामाजिक कल्याण साध्य करण्यासाठी परस्पर साहाय्य आणि नफ्याचे विलोपण यावर अधारलेला एखादा उद्योग-व्यवसाय स्थापन केला जातो व याद्वारे समाजाच्या सामान्य आर्थिक गरजांची तृप्ती होते.* भारतातील सहकारी चळवळीची सुरवात ही १९०४ च्या *सहकारी पतपुरवठा संस्था* या कायद्याने झाली. त्यानंतर १९१२ व १९१९ मध्ये या कायद्यात दुरुस्त्या करण्यात आल्या. सहकार हा विषय प्रांतिक सूचीमध्ये समाविष्ट असल्याने स्वातंत्र्यानंतर अनेक घटकराज्यांनी चळवळीच्या विकासासाठी आपले सहकार विषयक कायदे व धोरण आखले. महाराष्ट्रातील अहमदनगर जिल्ह्यात लोणी बुद्रुक येथे सहकारी पतपेढी स्थापन करून २३ जानेवारी १९२३ रोजी पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील यांनी राज्यात सहकाराची मुहूर्तमेढ रोवली त्यांच्याच प्रयत्नांनी प्रवरानगर येथे १७ जून १९५० रोजी आशिया खंडातील

पहिला सहकारी साखर कारखाना सुरु झाला. सध्या राज्यात ५८ प्रकारच्या सहकारी संस्था असून कृषि वित्तपुरवठा, नागरी पतसंस्था, शेतमाल खरेदी-विक्री, शेतमाल प्रक्रिया उद्योग, ग्राहक भांडारे, गृहनिर्माण, दुग्ध उत्पादन व प्रक्रिया, पाणी पुरवठा, श्रमिकांचे कल्याण, महिला विकास, शिक्षण, वाहतूक-दळणवळण इत्यादी क्षेत्रांत सहकारी चळवळीने आपले स्वतंत्र अस्तित्व निर्माण केले आहे. २०१२ मध्ये राज्यात २,२७,९३८ सहकारी संस्था असून त्यांच्या सभासदांची संख्याही ५२,४९५ हजार इतकी होती एकूण सहकारी संस्थांच्या संख्येत सहकारी गृहनिर्माण संस्थांची संख्या ८८,४७२ (३८.८१ टक्के) इतकी सर्वाधिक असून सभासद संख्येच्या बाबतीत बिगर कृषि पतसंस्था १९,९९७ (३८.०९ टक्के) आघाडीवर आहेत. याच कालखंडात उपलब्ध माहिती प्रमाणे राज्यातील ३३,१२७ (१४.५३ टक्के) सहकारी संस्था तोट्यात असून तोट्याची रक्कम २,६२७.२७ कोटी रुपये इतकी होती. अलिकडील काळात राजकीय हस्तक्षेप, भ्रष्टाचार, थकबाकी, अकार्यक्षमता, वाढता तोटा हे दोष सहकारी क्षेत्रात निर्माण झाले असून जागतिकीकरणाच्या युगात या क्षेत्रापुढे अस्तिवाची समस्या निर्माण झाली आहे. राज्यातील सहकारी चळवळीचा ऱ्हास थांबवून तिच्या सबलीकरणासाठी सुचविलेल्या उपाययोजनांची अंमलबजावणी करावी लागेल. तसेच स्वार्थी राजकीय प्रवृत्ती दूर ठेवल्यास ही चळवळ महाराष्ट्राच्या आर्थिक व सामाजिक विकासात आणखी मोठे परिवर्तन घडवून आणू शकेल. परंतु त्यासाठी गरज आहे ती शासकीय पातळीवरील धोरणात्मक बदल व राजकिय इच्छाशक्तीची.

**अभ्यासाची उद्दीष्ट्ये:**

प्रस्तुत अभ्यासासाठी पुढील उद्दीष्ट्ये निश्चित केली आहेत-

१) सहकाराची संकल्पना, तत्वे व प्रारंभ यांचे विश्लेषण करणे.

२) महाराष्ट्रातील सहकारी चळवळीचा उदय, विकास व सद्यस्थितीचा आढावा घेणे.

३) सहकारी चळवळीच्या समोरील आव्हाने व भविष्यकालीन वाटचालीचे अध्ययन करणे.

४) महाराष्ट्रातील सहकारी चळवळी समोरील समस्या दूर करण्यासाठी उपाय योजना सुचविणे.

**संशोधन पद्धती:**

प्रस्तुत शोधनिबंधाचा अभ्यासविषय हा समग्रलक्षी स्वरूपाचा असल्याने अध्ययनासाठी प्रामुख्याने द्वितीय स्त्रोतांद्वारे उपलब्ध झालेल्या माहिती व आकडेवारीचा वापर केला आहे. यामध्ये विविध संदर्भग्रंथ, शासकीय अहवाल, नियतकालिके, महाराष्ट्राची आर्थिक पाहणी-२०१२-२०१३, संशोधनपर लेख, महाराष्ट्र राज्य सहकारी संघाची विविध प्रकाशने आणि विविध संकेतस्थळे (Websites) या साधनांचा वापर करण्यात आला आहे. संकलित माहितीचे शास्त्रीय वर्गीकरण, सारणीयन व विश्लेषण करण्यासाठी शेकडेवारी (Percentage) आणि वार्षिक संयुक्त अभिवृद्धी दर (Annual Compound Growth Rates) या साधनांचा वापर करण्यात आला आहे.

**सहकाराचा अर्थ व संकल्पना:**

सर्वसाधारणपणे समाजातील दुर्बल व्यक्ती समुह स्वयंप्रेरणेने एकत्र येतात व परस्पर

सहकार्याने भांडवल उभारणी करुन व्यवसाय व उद्योग संस्था स्थापन करतात व ती सहकारी तत्वांवर चालवितात. सहकाराचा अर्थ स्पष्ट करण्यासाठी अनेक तज्ज्ञांनी व्याख्या दिल्या आहेत. एच्.कॅलव्हर्ट यांच्या मते, *सहकार हा संघटनेचा असा एक प्रकार आहे की, ज्यात काही व्यक्ती-मानव म्हणून स्वेच्छेने व समतेच्या तत्वावर एकत्र येतात आणि स्वतःच्या आर्थिक हितसंबंधाचे संवर्धन करतात.* तर पी.ई.वीरामन यांच्या मते, *सहकारी सोसायटी ही व्यक्तिसमूहांची किंवा समाजाची एक अशी संघटना आहे की, ज्या संघटनेच्या सभासदांचे आर्थिक व सामाजिक कल्याण साध्य करण्यासाठी परस्पर सहाय्य आणि नफ्याचे विलोपण यावर अधारलेला एखादा उद्योग-व्यवसाय स्थापन केला जातो व याद्वारे समाजाच्या सामान्य आर्थिक गरजांची तृप्ती होते.* थोडक्यात *सहकार* ही समान निष्ठा असणाऱ्या समाजाने आपल्याच कल्याणासाठी निर्माण करावयाची एक आदर्श समाजव्यवस्था होय.

**सहकाराची तत्त्वे:**

१९४४ च्या सुमारास ब्रिटनमधील *रॉशडेल* या औद्योगिक शहरातील २८ कामगारांनी व काही समाजसुधारकांनी स्थापन केलेल्या *रॉशडेल सोसायटी ऑफ इक्विटेबल पायोनियर्स* संस्थेने तयार केलेली नियमावली हीच सहकाराची तत्वे म्हणून संबोधली जातात. त्यानंतर १९६६ मध्ये आंतरराष्ट्रीय सहकारी संघटनेने या तत्वांची फेर मांडणी केली. ही तत्त्वे पुढील प्रमाणे:

अ) अत्यावश्यक तत्वे:

१) लोकशाही नियंत्रण, २) खुले सभासदत्व, ३) भांडवलावर मर्यादित व्याज, ४) नफा आणि वाढाव्याचे न्याय वाटप, ५) सहकारी शिक्षण व ६) सहकारांतर्गत सहकार.

ब) सामान्य तत्वे :

१) राजकीय व धार्मिक तटस्थता, २) रोख व्यवहार, ३) काटकसर, ४) मानदसेवा, ५) सहकारी तत्वांची प्रसिद्धी.

**महाराष्ट्रातील सहकारी चळवळ:**

१ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाल्यानंतर राज्यात १९६० मध्ये *महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०* हा कायदा संमत करण्यात आला. त्यानंतर सहकारी संस्थाविषयक तपशीलवार नियम करण्याच्या दृष्टीने १९६१ मध्ये *महाराष्ट्र सहकारी संस्था नियम* १९६१ हा अधिनियम पास करण्यात आला. गेल्या ५५ वर्षातील राज्याच्या आर्थिक विकासात सहकारी चळवळीचे योगदान खूप मोठे आहे.

सहकारी चळवळीचा विकास:

तक्ता क्र. १ मध्ये दर्शविल्याप्रमाणे १९६०-६१ ते २०११-१२ या काळात सहकारी संस्थांची संख्या, सभासद संख्या, खेळते भांडवल, स्थूल कर्ज येणे कर्ज व एकूण उलाढाल या वार्षिक संयुक्त अभिवृद्धीदर हा अनुक्रमे ३.९५, ५.०८, १४.१५, १२.६५, १३.८४ व १२.२६ इतका राहीला म्हणजेच नियोजनकाळात राज्यातील सहकारी क्षेत्राने चांगली प्रगती केल्याचे दिसून येते.

सद्यस्थिती:

महाराष्ट्र हे भारतातील सहकारी क्षेत्रात अग्रेसर असलेले एकमेव राज्य आहे. तक्ता क्र. २ मध्ये दर्शविल्याप्रमाणे २०१२ मध्ये राज्यात २,२७,९३८ सहकारी संस्था असून त्यांच्या सभासदांची संख्याही ५२,४९५ हजार इतकी होती एकूण सहकारी संस्थांच्या संख्येत सहकारी

गृहनिर्माण संस्थांची संख्या ८८,४७२ (३८.८१ टक्के) इतकी सर्वाधिक असून सभासद संख्येच्या बाबतीत बिगर कृषि पतसंस्था ११,११७ (३८.०९ टक्के) आघाडीवर आहेत. याच कालखंडात उपलब्ध माहिती प्रमाणे राज्यातील ३३,१२७ (१४.५३ टक्के) सहकारी संस्था तोट्यात असून तोट्याची रक्कम २,६२७.२७ कोटी रुपये इतकी होती. जिनिंग व प्रोसेसिंग संस्थांमध्ये तोट्याचे प्रमाण सर्वाधीक म्हणजे ७६.४० टक्के असून सहकारी पणन संस्था, प्राथमिक कृषि पतसंस्था, सहकारी दुध संस्था व दूध संघातील तोट्याचे प्रमाण हे अनुक्रमे ६०.०६ टक्के, ५२.४५ टक्के व ५०.७३ इतके आहे. प्राथमिक कृषि पतसंस्था मधील तोट्याची रक्कम सर्वाधिक म्हणजे १२१४ कोटी रुपये असून सहकारी सूत गिरण्याकडील तोट्याची रक्कम ही ८६८.४५ कोटी रुपये इतकी असल्याचे निदर्शनास येते.

**महाराष्ट्रातील सहकारी चळवळीसमोरील आव्हाने:**

सहकारी चळवळ ही राज्याच्या विकासात महत्वपूर्ण भूमिका बजावत असली तरी अलिकडील काळात सहकारी चळवळीत निर्माण झालेल्या अंगभूत दोषांमुळे तिचा प्रभाव कमी झाला आहे. हे दोष किंवा आव्हाने पुढील प्रमाणे

**कृतीशील सभासदांचा अभाव:**

राज्यातील सहकारी संस्थामधील असंख्य सभासद हे निष्क्रीय स्वरुपाचे असून काही सदस्य हे केवळ निवडणूकीत सहभागी होऊन अध्यक्ष, संचालक अशा उच्चपदावर आरुढ होतात अशा निष्क्रीय पदाधिकाऱ्यांना दूर करण्याची प्रक्रिया देखील किचकट असल्याने सहकारी संस्थांच्या कार्यक्षमतेवर विपरीत परिणाम होतो.

तक्ता क्र.१

महाराष्ट्रातील सहकारी चळवळीची प्रगती (१९६०-६१ व २०११-१२)

| अ.क्र. | बाब | १९६०-६१ | २०११-१२ | संयुक्त अभिवृद्धी दर |
|---|---|---|---|---|
| १. | सहकारी संस्थांची संख्या | ३१,५६५ | २,२७,९३८ | ३.९५ |
| २. | सभासद संख्या (लाख) | ४,१९१ | ५२,४६५ | ५.०८ |
| ३. | खेळते भांडवल (रू.कोटी) | २९१ | २,४८,८२५ | १४.१५ |
| ४. | स्थूल कर्ज (रू.कोटी) | २७० | १,१७,४०६ | १२.६५ |
| ५. | येणे कर्ज (रू.कोटी) | १७१ | १,२७,१२९ | १३.८४ |
| ६. | उलाढाल (तयार माल विक्री मुल्य) | १०७ | ३९,०६२ | १२.२६ |

स्रोत : महाराष्ट्राची आर्थिक पहाणी (२०१२-१३), पृष्ठ क्र.१११ ते १२५

**अकार्यक्षम व्यवस्थापन:**

जागतिकीकरण, आधुनिकीकरण व खाजगीकरणाच्या युगात बदलत्या गरजा, नवीन उत्पादन तंत्र, आधुनिक व्यवस्थापन, जागतिक बाजारपेठेशी स्पर्धा या आव्हांनाना सामोरे जाण्यासाठी गतिशील, कुशाग्र व कृतीशील या व्यवस्थापनाची गरज आहे. परंतु सहकारी संस्थांच्या व्यवस्थापनात सहकारी तत्वांचे तसेच बदलत्या परिस्थितीचे ज्ञान नसलेल्या नेतृत्वाचा

भरणा अधिक असल्याने नविन संधीचा लाभ घेता येत नाही. त्यामुळे चळवळीच्या विकासात अनेक अडचणी येतात.

व्यावसायिकता आणि जबाबदारी:

व्यावसायीक पर्यावरणात प्रशिक्षित व पात्र मनुष्यबळाची आवश्यकता असते परंतु सहकारी क्षेत्रातील बहुतेक संस्थांवरील मुख्य कार्यकारी अधिकारी हे शासन नियुक्त असून त्यांची वारंवार बदली होते, याशिवाय सहकारी संस्थांना त्यांचे कर्मचारी, वेतन व भत्ते, सेवाशर्ती ठरविण्याचे स्वातंत्र्य नसल्यामुळे त्यांच्यातील व्यावसायीकता नष्ट होऊन तोट्यात वाढ होते.

४) भांडवलाची कमतरता

सहकारी संस्थांचे सभासद हेच आर्थिकदृष्ट्या दुर्बल असल्याने भागभांडवल व ठेवी द्वारे या संस्थांना पुरेसे भांडवल उभारता आले

तक्ता क्र. २

महाराष्ट्रातील सहकारी चळवळीची सद्यस्थिती (मार्च २०१२ पर्यंत)

| सहकारी संस्था | संस्थाची संख्या | सभासद संख्या (हजार) | तोट्यातील संस्था | तोटा (कोटी रू.) |
|---|---|---|---|---|
| जिल्हा मध्य.सह.बँका | ३१(०.०१) | १५८(०.३०) | ला.ना. | ला. ना. |
| प्राथमिक कृषि पतसंस्था | २१,४४३(९.४१) | १५,३५२(२९.२४) | ११,२४६(५२.४५) | १२१४ |
| जिनिंग व प्रोसेसिंग संस्था | १६१(०.०७) | २,१५१(०.४१) | १२३(७६.४०) | २.०० |
| सहकारी सुत गिरण्या | १६६(०.०७) | ६,७८५(१२.९३) | ५६(३३.७३) | ८६८.४५ |
| सहकारी हातमाग/यंत्रमाग | २,१४१(०.९४) | १४१.३(०.२७) | ८८३(४१.२४) | २२.४५ |
| साखर कारखाने | २०२ (०.०९) | २,४४५(४.६६) | ८९(४४.०५) | उ.ना. |
| सहकारी दुग्ध संस्था | २५,५२१(११.२०) | १,२६४(२.४१) | १२,९४६(५०.७३) | १४.२३ |
| सहकारी पनन संस्था | १,७६८(०.७८) | १,४१०(२.६९) | १,०६२(६०.०६) | २० |
| बिगर कृषि पतसंस्था | २२,८४७(१०.०२) | १९,९१७(३८.०९) | ५,५०२(२४.०८) | ३९५ |
| सहकारी ग्राहक भांडारे | २,९६१(१.३०) | ३४७७.४(६.६२) | १०२०(३४.४५) | ११.१४ |
| सह. गृहनिर्माण संस्था | ८८,४७२(३८.८१) | २,३११(४.४०) | उ.ना. | उ.ना. |
| इतर सहकारी संस्था | ६५,१८६(२८.६०) | ८,५२३.१(१६.२४) | उ.ना. | उ.ना. |
| एकूण महाराष्ट्र | २,२७,९३८(१००) | ५२,४९५(१००) | ३३,१२७(१४.५३) | २,६२७.२७ |

*स्त्रोत: महाराष्ट्राची आर्थिक पहाणी (२०१२-१३) पृष्ठ क्र. १३२ ते १३३.*

*टीप: कंसातील अंक एकूणाशी शेकडा प्रमाण दर्शवितात.*

*ला. ना. : लागू नाही, उ.ना. : उपलब्ध नाही.*

नाही. तसेच सहकारी क्षेत्राच्या विकासासाठी रिझर्व्ह बँक अल्प व्याजदराने कर्ज देण्यास तयार असूनही राज्य सहकारी बँकेला याचा पुरेसा फायदा करून घेण्यात वेळोवेळी अपयश आले. त्यामुळे अपुरे भांडवल हे सहकारी चळवळीसमोरील एक प्रमुख आव्हान आहे.

वाढते आजारपण:

राज्यातील बहुतांश सहकारी संस्था

तोट्यात असून आजारी व बंद पडणाऱ्या संस्थांच्या संख्येत वाढ होत आहे. २०१२-१३ मध्ये राज्यातील २,२७,९३८ सहकारी संस्थांपैकी ३३,१२७ संस्था तोट्यात होत्या यामध्ये सहकारी दुध संस्था व दुध संघाची संख्या सर्वाधिक १२९४६ असून ५०.७३ टक्के प्राथमिक कृषि पतसंस्था, बिगर कृषि पतसंस्था, सहकारी पनन संस्था व सहकारी ग्राहक भांडारे यांचे तोट्यातील संस्था व तोट्याची रक्कम अनुक्रमे ११,२४६ व १,२१४ कोटी रू. ५,५०२ व ३९५ कोटी रू. १,०६२ व २० कोटी रूपये आणि १,०२० व ११.१४ कोटी रुपये इतका होती.

सरकारचा वाढता हस्तक्षेप:

महाराष्ट्रातील सहकारी क्षेत्र हे मोठ्या प्रमाणात राजकीय नेत्यांच्या ताब्यात आहे. सत्ताधारी राजकारणी हे सहकारी संस्थांच्या अधिकारपदांवर आपल्या निकटवतीयांची नियुक्ती करुन साखर उद्योग, सहकारी वित्तसंस्था व इतर सहकारी संस्था आपल्या नियंत्रणात ठेवतात व अशा सहकारी संस्थांचे पदाधिकारी हे सहकारी तत्वांपेक्षा राजकिय हितसंबंध व नेतृत्वाच्या अपेक्षांना अधिक महत्व देतात. त्यामुळे या संस्थांची व्यावसायकिता, स्पर्धाक्षमता व कार्यक्षमता कमी होते.

शासनाच्या मदतीवरील अवलंबित्व:

राज्यातील प्रत्येक साखर कारखान्याला प्रकल्प किमतींच्या ३२.५ टक्के भागभांडवल सरकारी निधीतून दिलेले असून साखर कारखान्यांनी बँक व वित्तसंस्थांकडून घेतलेल्या प्रकल्प खर्चाच्या ६० टक्के कर्जाला राज्य सरकार हमी देतो. म्हणजेच सरकार एकूण गुंतवणुकीच्या १९२.५ टक्के खर्चाचा भार उचलते. याशिवाय उभारणी खर्च वाढल्यास सरकार थेट कर्ज देते. साखर कारखान्यांबरोबरच इतर संस्थाही मोठ्या प्रमाणावर शासकीय मदतीवर अवलंबून आहेत. त्यामुळे राजकारणाचा शिरकाव होऊन संस्थांची कार्यक्षमता घटते.

थकबाकी:

सभासदांची आर्थिक दुर्बलता, राजकीय हस्तक्षेप व शासनाचे बदलते धोरण यामुळे सहकारी वित्तसंस्थांच्या थकबाकीत प्रचंड वाढ होत आहे. सहकारी वित्तसंस्थांचे कर्ज हे सरकारी मदत आहे अशी भावना सभासद शेतकऱ्यांमध्ये असल्याने प्राथमिक कृषी पतसंस्थांना कर्ज वसुली करणे अवघड झाले आहे. ३१ मार्च २०१२ च्या आकडेवारीनुसार स्थुल कर्जापैकी थकीत कर्जाचे प्रमाण हे प्राथमिक कृषी पत संस्था, जिल्हा मध्यवर्ती बँका व बिगर कृषी पतसंस्था मध्ये अनुक्रमे ८३.५३ टक्के, २०.३६ टक्के व ११.३१ टक्के इतके होते. वाढत्या थकबाकी मुळे असंख्य संस्था बुडीत निघाल्या आहेत.

भ्रष्टाचार:

सेवाभाव व सामुहिकतेतून प्रगती हा सहकाराचा मुख्य उद्देश असला तरी राज्यातील बहुतांश सहकारी पतसंस्था, बँका, भ्रष्टाचाराचे कुरण बनल्या आहेत. राजकीय नेते मंडळी, संस्थेचे संचालक, नातेवाईक, स्वतःच्या फायद्यासाठी सहकारी संस्थांचा वापर करतात. भ्रष्टाचारामुळे अनेक सहकारी संस्था बंद पडल्या असून त्यांच्या पुनरुज्जीवनाचा निधीही ही मंडळी स्वतःच्या खिशात घालतात.

असमतोल विकास:

महाराष्ट्रातील सहकारी चळवळीचा विकास हा प्रामुख्याने पश्चिम महाराष्ट्रात केंद्रीत

झालेला आढळून येतो. पश्चिम महाराष्ट्र व कोकण या विभागांतर्गत राज्यातील ६० टक्के सहकारी संस्थाचे केंद्रीकरण झाले असून विदर्भ व मराठवाड्यात सहकारी चळवळीचा विकास कमी झाला आहे. प्रादेशिक असमतोलाबरोबरच राज्यातील सहकारी संस्थांच्या प्रगतीत क्षेत्रीय असमतोल ही आढळून येतो. सध्या एकूण सहकारी संस्थांच्या सभासदांपैकी बिगरकृषी पतसंस्था मध्ये सर्वाधिक म्हणजे १९,९९७ (३८.०९) टक्के सभासद तर प्राथमिक कृषि वित्तपुरवठयाच्या क्षेत्रात १५३५२ (२९.२४ टक्के) सभासद एकवटलेले आहेत. परंतु प्रक्रिया उद्योग विपणन, पाणीपुरवठा याबाबत सहकारी क्षेत्र फारसे यशस्वी होऊ शकले नाही.

लोकसहभागाचा अभाव:

व्यापक लोकसहभागाशिवाय कोणतीही चळवळ यशस्वी होऊ शकत नाही. राज्यातील ग्रामीण भागातील लोक अज्ञानी व अशिक्षित असल्याने त्यांना सहकाराचा उद्देश, महत्व व अर्थ नीट समजत नाही. तसेच ग्रामीण भागातील लोक हे स्वार्थी व संकुचित मनोवृत्तीचे असल्याने चळवळीला व्यापक स्वरुपात सहकार्य मिळत नाही. परिणामी चळवळीचे फायदे तळागाळापर्यंत पोहोचत नाहीत.

इतर आव्हाने व समस्या:

राज्यातील सहकारी चळवळीसमोर इतरही काही आव्हाने आहेत यामध्ये १) जागतिक स्पर्धा २) आधुनिक तंत्रज्ञानाचा अभाव ३) वाहतुक व दळणवळण संसाधनांची कमतरता ४) वाढता उत्पादन खर्च ५) संशोधनाकडे दुर्लक्ष ६) अनावश्यक नोकर भरती ७) कुशल श्रमिकांचा अभाव इत्यादी.

अशा प्रकारे राज्यातील सहकारी चळवळीत अनेक दोष व समस्या निर्माण झाल्या आहेत. त्यामुळे या चळवळीचे अस्तीत्व धोक्यात आले आहे.

उपाययोजना व भविष्यकालीन वाटचाल:

राज्यातील सहकारी चळवळीत अनेक दोष निर्माण झाले असले तरी या चळवळीचे राज्याच्या विकासातील योगदान लक्षात घेता हे दोष दूर करुन सहकारी क्षेत्राचे पुनरुज्जीवन होणे गरजेचे आहे. त्यासाठी पुढील उपाययोजना सूचविता येतील.

१) सहकारी उत्पादन व प्रक्रिया उद्योगात आपल्या उत्पादन खर्चात कपात करणे, २) वस्तु व सेवांच्या दर्जात वाढ करणे, ३) आधुनिक व्यवस्थापन शास्त्र आणि कुशल व्यवस्थापन तंत्राचा वापर, ४) विक्रेत्यांपर्यंत वस्तु वेळेत पोहोचण्यासाठी स्वतंत्र वितरण यंत्रणा उभारावी, ५) व्यावसायीक दृष्टीकोणाचा स्वीकार करून बाजारातील बदलांनुसार उत्पादन व विपनन विषयक निर्णय घ्यावेत, ६) आधुनिक तंत्रज्ञान, यंत्रसामग्री व संस्थानांचा वापर करावा, ७) शासकीय हस्तक्षेप दूर करून सहकारी संस्थांच्या वाढीसाठी पोषक व निकोप वातावरण निर्माण करावे, ८) थकबाकी, भ्रष्टाचार, अनावश्यक नोकरभरती, राजकीय हस्तक्षेप, अकार्यक्षम व्यवस्थापन हे दोष दूर करण्यासाठी शासकीय तसेच संस्थेच्या पातळीवर धोरणात्मक निर्णय घेऊन त्यांची कडक अंमलबजावणी करावी, ९) सहकारी संस्थांनी तज्ज्ञ, अनुभवी व पात्र असा कर्मचारीवर्ग नेमावा तसेच अप्रशिक्षित कर्मचाऱ्यांना सक्तीने प्रशिक्षण देऊन त्यांच्या कार्यक्षमतेत वाढ घडवून आणावी, १०) राष्ट्रीय

सहकारी विकास महामंडळाकडून अर्थसाहाय्याचा लाभ घेऊन सहकारी संस्थांनी प्रकल्प उभारणी करावी, ११) केंद्र सरकारने केलेल्या ९७ व्या घटना दुरुस्तीप्रमाणे राज्यातील सरकारने आपल्या कायद्यात दुरुस्ती करून या क्षेत्राच्या विकासात पोषक वातावरण निर्माण करणे.

सहकारी क्षेत्र आणि जागतिकीकरण:

१९९१ पासून देशात जागतिकीकरणाची प्रक्रिया सुरु असून उदारीकरणामुळे सर्वच क्षेत्रात स्पर्धा वाढली आहे. त्यामुळे सहकारी क्षेत्राने आपले अंतर्गत दोष दूर करून जागतिक स्पर्धेला सामोरे जाणे आवश्यक आहे. त्यासाठी पुढील पावले उचलावी लागतील.

१) सहकारी क्षेत्राने आपली क्षमतावृद्धी करून पारंपारिक क्षेत्राबरोबरच करार शेती, जलसंधारण, सुक्ष्म वित्तपुरवठा माहिती तंत्रज्ञान, दूरसंचार, पर्यटन, अतिथीगृहे, सामुहीक शेती, शेतमालाची विक्री, कृषि आदानांचा वापर या क्षेत्रात देखील प्रवेश करुन खासगी क्षेत्राला एक उत्तम पर्याय उपलब्ध करुन द्यावा.

२) युनोने जाहीर केलेल्या *सहस्त्रकातील विकास लक्ष्ये* गाठण्यात भारत खूपच मागे आहे. त्या दृष्टीने ग्रामीण आरोग्य, लिंग समानता, दारिद्र्य निर्मुलन यासारखा क्षेत्रात सहकारी क्षेत्र महत्वपूर्ण भूमिका पार पाडू शकते.

३) सहकारी क्षेत्राच्या मदतीने देशातील सांस्कृतिक आणि नैतिक मुल्यांचे जतन करुन जागतिकीकरणाची प्रक्रिया ही सुरळीत होऊन जागतिक एकात्मतेचे उद्दीष्टे साध्य करणे शक्य होईल.

४) अलिकडेच किरकोळ विक्री क्षेत्रात देखील विदेशी कंपन्यांनी प्रवेश केला असून त्याचे विपरीत परिणाम टाळण्यासाठी सहकारी क्षेत्राने किरकोळ विक्रीच्या क्षेत्रात पुढाकार घेऊन आपली क्षमता सिद्ध करावी.

५) जागतिक स्पर्धेत टिकून राहण्याच्या दृष्टीने शेतकऱ्यांनी सहकारी तत्त्वावर शेतमालाचे पॅकिंग प्रतवारी, वाहतुक, निर्यात यासाठी एकत्रीतपणे प्रयत्न करणे गरजेचे आहे.

निष्कर्ष:

आर्थिकदृष्ट्या दुर्बल गटातील लोकांना दारिद्र्याच्या दुष्टचक्रातून बाहेर काढण्यासाठी तसेच खाजगी क्षेत्रातील नफेखोरी व पिळवणुकीला आळा घालण्याच्या दृष्टीने सहकार हा एक उत्तम पर्याय आहे. महाराष्ट्रात सहकारी क्षेत्राचा विकास मोठ्या प्रमाणात झाला असून कृषी व ग्रामीण भागातील विकासात सहकाराचा मोठा वाटा आहे. परंतु असे असले तरी अलिकडील काळात राजकीय हस्तक्षेप, भ्रष्टाचार, थकबाकी, अकार्यक्षमता, वाढता तोटा हे दोष सहकारी क्षेत्रात निर्माण झाले असून जागतिकीकरणाच्या युगात या क्षेत्रापुढे अस्तित्वाची समस्या निर्माण झाली आहे. राज्यातील सहकारी चळवळीचा ऱ्हास थांबवून तिच्या सबलीकरणासाठी सुचविलेल्या उपाययोजनांची अंमलबजावणी करावी लागेल. तसेच स्वार्थी राजकीय प्रवृत्ती दूर ठेवल्यास ही चळवळ महाराष्ट्राच्या आर्थिक व सामाजिक विकासात आणखी मोठे परिवर्तन घडवून आणू शकेल. परंतु त्यासाठी गरज आहे ती शासकीय पातळीवरील धोरणात्मक बदल व राजकिय इच्छाशक्तीची.

संदर्भ सूची:

१. बिरादार माधव (२०१२) *महाराष्ट्राची*

*अर्थव्यवस्था*, विद्या बुक पब्लिशर्स, औरंगपुरा, औरंगाबाद.

२. चौगुले व्ही टी व पठाण के.जी.(२००७) *सहकारी मुलतत्वे*, कॉन्टीनन्टल प्रकाशन, पुणे-३०.

३. कविमंडन विजय (२०१२), 'कृषी व ग्रामीण अर्थशास्त्र', श्री मंगेश प्रकाशन, नागपूर.

४. महाराष्ट्राची आर्थिक पहाणी (२०१२-१३), *अर्थ व सांख्यिकी संचालनालय नियोजन विभाग*, महाराष्ट्र शासन, मुंबई.

५. Prasad Chandra Shekhar (July 2012), 'Agriculture and Sustainable Development In India', New Century Publication, New Delhi.

६. सोनाळकर वंदना व जाधव राजू (२०१३), *भारतीय अर्थव्यवस्था*, पिअर्सन पब्लीकेशन्स, दिल्ली.

# पंतप्रधान जनधन योजना

**वसंत नथ्थू हिस्सल, उमरगा,**
श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय,
जि. उस्मानाबाद.
भ्रमणध्वनी: ९४२३३४१६३२

आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत निर्माण होणारी विकासाची फळे देशाच्या ग्रामीण व नागरी भागाच्या तळागाळातील लोकांना मिळाली तरच सर्वसमावेशक वृद्धीचे ध्येय गाठता येईल. वित्तीय समावेशन हा याचाच एक भाग आहे. वित्तीय समावेशन राष्ट्रीय मिशन अंतर्गत १५ ऑगस्ट २०१४ रोजी भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पंतप्रधान जन-धन योजनेची घोषणा केली. यात २६ जानेवारी २०१५ पर्यंत देशात ७.५ कोटी लोकांचे बँकेत खाते उघडण्याचे निश्चित करण्यात आले आहे. भ्रष्टाचारमुक्त, पारदर्शी व्यवहार आणि न्यायव्यवस्थेचा बँकिंग हा पाया आहे. या दृष्टीने पंतप्रधान जनधन योजना एक महत्त्वपूर्ण योजना आहे.

**जनधन योजनेची पार्श्वभूमी:**

जागतिकीकरणाचा एक भाग म्हणून आणि भ्रष्टाचारास पायबंद घालण्यासाठी भारतीय अर्थकारणाला नवी दिशा देणारे माजी पंतप्रधान मनमोहनसिंग यांनी सामाजिक सुरक्षिततेच्या योजनेद्वारे सबसिडी व अनुदानाच्या रूपाने उपलब्ध पैसा थेट बँकेत लाभधारकाच्या खात्यावर जमा करण्यासाठी प्रयत्न केलेत. परंतु केंद्र व राज्य सरकारने उपलब्ध केलेला पैसा सर्वसामान्यापर्यंत पोहचण्यात तांत्रिक अडचणी निर्माण झाल्यामुळे भ्रष्टाचारास पायबंद घालता आला नाही. यावर उपाय म्हणून आधार कार्ड बँकेच्या खात्याशी जोडण्याची प्रक्रिया राबविण्यात आली. यातील मुख्य अडचण म्हणजे अनेक लोकांचे बँकेत खातेच नव्हते. याशिवाय आधार कार्डास न्यायालयाचा आधार न मिळाल्याने ही प्रकिया खंडित झाली. देशातील नागरिकांचे बँकेत खाते असावे, देशात बँकिंग आणि पारदर्शी व्यवहार वाढावेत यासाठी त्यांच्या कारकिर्दीच्या अखेरीस 'स्वाभिमान योजना' सुरू करण्यात आली होती. देशातील सर्व नागरिकांपर्यंत बँकिंग पोहचावे आणि त्यांना स्वाभिमानाने जगता यावे हा या योजनेचा मुख्य उद्देश होता. या योजनेचे नाव स्वाभिमानाशी जोडले गेले. स्वाभिमान योजनेचा प्रचार आणि प्रसार करण्यात आघाडी सरकार अयशस्वी ठरले. स्वाभिमान योजनेचा फारसा गवगवा झाला नाही आणि सरकारनेही

या योजनेस प्राधान्यक्रम दिला नाही. त्यामुळे ती विस्मरणात गेली. नरेंद्र मोदी यांनी ती योजना 'जन-धन' म्हणून आणली आणि या योजनेस सरकारने प्राधान्यक्रम दिला. त्याचा परिणाम म्हणजे ही योजना केवळ सरकार नव्हे तर देशवासियांचा विषय झाला. जन-धन योजनेत बँकेत खाते उघडण्याकरिता असलेल्या कागदपत्र व किमान शिल्लक रक्कम यामध्ये सवलत देण्यात आली. योजनेच्या यशस्वितेसाठी व लोकांना आर्थिक प्रवाहात समाविष्ट करून घेण्यासाठी बँकांचे सहकार्य घेण्यात आले. या योजनेच्या सुरुवातीच्याच काळात योजनेस भरपूर प्रतिसाद मिळाला. या योजनेचा परिचय करून घेण्याच्या दृष्टीने परिचयात्मक संशोधन आराखड्यानुसार या योजनेचा थोडक्यात आढावा घेण्याचा प्रयत्न प्रस्तुत शोधनिबंधात केला आहे.

**जनधन योजनेचे ध्येय व उद्दिष्टे:**

भारतातील दारिद्र्य, आर्थिक विषमता, निरक्षरतेचे प्रमाण, नगण्य आर्थिक साक्षरता यामुळे आर्थिक अस्पृश्यतेस लढा देण्याचे मुख्य ध्येय या योजनेत ठेवले आहे. आर्थिक सबलीकरण, महिला सबलीकरण, दारिद्र्य निर्मूलन, गोरगरीब जनतेला अनुदान व सबसिडीद्वारे वित्तपुरवठा करणे, भ्रष्टाचारास आळा घालणे अशी विविध प्रकारची उद्दिष्टे समोर ठेवून ही योजना तयार करण्यात आली. देशातील आर्थिक विषमता दूर करून आर्थिक समावेशनाचे ध्येय समोर ठेवून देशाच्या कानाकोपऱ्यातील, तळागाळातील लोकांना मूलभूत सोयीसुविधांचा लाभ उपलब्ध करून देणे हा हेतू या योजनेत आहे. जनसामान्य लोकांपर्यंत बँकिंग सुविधांचा लाभ उपलब्ध करून देणे, शासकीय योजनांचे अनुदान नागरिकांच्या खात्यात जमा करून योजनांचा थेट लाभ मिळवून देणे, दुर्लक्षित वर्गाला किमान आर्थिक सुविधा पुरविणे, नारीशक्तीला बळ देशासाठी जनधन योजनेच्या माध्यमातून महिला सबलीकरण करणे अशा प्रकारची उद्दिष्टे या योजनेत ठेवण्यात आली आहेत. यासाठी देशातील प्रत्येक कुटुंबाला बँकसेवा उपलब्ध करून देऊन प्रत्येक कुटुंबातील किमान दोन सदस्यांचे बँकेत खाते असणे अपेक्षित आहे.

**जनधन योजनेचा अर्थ:**

वित्तीय समावेशन राष्ट्रीय मिशन अंतर्गत देशातील सर्व आर्थिक व्यवहार बँकेमार्फत व्हावेत या दृष्टीने समाजाच्या प्रत्येक घटकातील सामान्य व्यक्तीचे बँकेत खाते काढण्यासाठी राबविण्यात येणारा कार्यक्रम म्हणजेच जनधन योजना होय.

**जनधन योजनेचे स्वरूप:**

केंद्र शासनाने मागील वर्षी आधार कार्ड व बँक खाते यांची सांगड घालून सरकारी अनुदान लाभार्थ्यांच्या खात्यात थेट जमा करण्याच्या योजनेची अंमलबजावणी केली. परंतु अनेक लोकांचे बँकेत खाते नसल्याने व इतर तांत्रिक कारणामुळे ही योजना बंद करावी लागली. याच योजनेचे पुनरुज्जीवन करण्याच्या दृष्टीने जनधन योजना सुरू करण्यात आली आहे. जनधन योजनेत खाते उघडणाऱ्यांपैकी अनेक खातेदार पहिल्यांदाच बँक व्यवहार करणारे असू शकतात. जनधन अंतर्गत जास्तीत जास्त खाते उघडल्या जावीत म्हणून ज्या लोकांनी आजपर्यंत बँकात खाते काढलेली नाहीत त्यांचे गाव, वाड्या-वस्त्यामध्ये ३० सप्टेंबर २०१४ पर्यंत सर्वेक्षण केले गेले. प्रत्येक जिल्ह्यातील अग्रणी बँकेद्वारे जनधन अंतर्गत खाती उघडण्यासाठी प्रत्येक बँकेला सर्व्हिस एरिया ठरवून देण्यात आला आहे. *बिझनेस करस्पाँडंट*

तसेच बचत गट, ग्रामसेवक आदींची मदत घेतली गेली आहे. शिवाय रेशन विभाग, एक खिडकी वगैरे सरकारी विभागाकडील तपशीलही जमा केला गेला आहे. ही योजना यशस्वी व्हावी म्हणून लोकांना प्रोत्साहन म्हणून विमा, ओव्हरड्राफ्टसारखे प्रलोभन दाखविण्यात आले. मुख्य म्हणजे या योजनेत बँकेत खाते उघडण्यासाठी पूर्ण कराव्या लागणाऱ्या के.वाय.सी. कागदपत्रांसाठी रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया आग्रही नाही. खाते उघडल्यानंतर ही कागदपत्रे निश्चित कालावधीत देण्याची मुभा देण्यात आली आहे. बँकेच्या मुख्यालयाकडून मिळालेल्या निर्देशाप्रमाणे विशेष पथकाने सर्व कर्मचाऱ्यांना याबाबत प्रशिक्षण दिले असून त्यासाठी शिबिरे घेण्यात आली. जनधन योजनेसाठी बँकांमध्ये विशेष कक्ष स्थापन केले असून यासाठी खास सुटसुटीत फॉर्म बनविण्यात आले आहेत.

**जनधन योजनेची वैशिष्ट्ये:**

१. केंद्र सरकार पुरस्कृत जनधन योजनेत शून्य शिलकीवर (Zero Balance) बचत खाते काढता येते. आता खातेदाराच्या खात्यावर कोणत्याही प्रकारची रक्कम शिल्लक नसली तरी बँकेला खाते बंद करता येणार नाही व किमान रकमेमुळे दंडही लावता येणार नाही.
२. जनधन योजनेत खाते काढण्यासाठी विशेष शिबिरे घेण्यात आली. सदर खाते बँकेत तर काढता येतेच शिवाय संगणक परिचालकाकडून सुद्धा काढून घेता येते.
३. सर्वसामान्यपणे बँकेत खाते काढण्यासाठी अनेक कागदपत्रांची पूर्तता करावी लागते. या योजनेत सर्व कागदपत्र नसताना देखील केवळ १० ते १५ मिनिटांत अर्ज जमा करून घेतला जातो व अर्ज दिल्यानंतर ७२ तासात खाते कार्यान्वित केले जाते.
४. जनधन खात्यावर दिले जाणारे एटीएम कार्ड (रुपे) हे स्वदेशी कार्ड असून आपल्या देशात याचा वापर सर्व राज्यांत करता येईल. तसेच कार्डाचा वारंवार वापर झाला तरी कोणताही आर्थिक भुर्दंड खातेदारांना लागणार नाही, असे सांगण्यात आले आहे. पण एटीएम वापरावर मर्यादा येऊ शकतात किंवा वापराबद्दल एक विशिष्ट रकमेची आकारणी केली जाऊ शकते.

**जनधन योजनेचे फायदे:**

जनधन योजनेतील खात्यांमुळे एकाच दगडात दोन पक्षी मारले जाऊ शकतात. या योजनेमुळे खातेदारांना लाभ होत असला तरी सरकारच्या अनुदानात खूप मोठ्या प्रमाणात बचत होणार आहे. बँकिंग सुविधेमुळे आर्थिक देवाणघेवाणीची प्रक्रिया सुलभ होते. या योजनेमुळे सर्व घरकुले बँकिंग क्षेत्राशी जोडली जाणार आहेत. या योजनेतील खातेदारांना ३० हजार रुपयापर्यंत आयुर्विमा व एक लाख रुपयापर्यंतचा अपघात विमा असे दोन प्रकारचे विमा संरक्षण मिळणार आहे. आर्थिक व्यवहार करण्यासाठी एटीएम कार्ड उपलब्ध करून दिले जाणार असून सदर खाते सहा महिने समाधानकारकरित्या चालविल्यास ५ हजार रुपयांपर्यंत ओव्हरड्राफ्टची सुविधा उपलब्ध करून दिली जाणार आहे. जनधन योजनेमुळे स्थलांतरीत कामगार, रिक्षाचालक, घरकामगार, असंघटित कामगार यासारख्या वर्गास बचतीची सवय लागल्यास त्यांच्या दृष्टीने या योजनेचा फार उपयोग होणार आहे. कुटुंबातील महिलेचे खाते बँकेत काढल्याने महिला सबलीकरणास

सहाय्य होणार आहे. या योजनेचा फायदा विद्यार्थ्यांना सुद्धा होणार असून ज्या विद्यार्थ्यांच्या खात्यात दीर्घकाळ व्यवहार झाले नाहीत तसेच कोणत्याही प्रकारची रक्कम शिल्लक नसेल तर अशी खाती बंद न करण्याचे निर्देश रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने दिले आहेत. केंद्र व राज्य सरकारकडून शिष्यवृत्ती व इतर लाभासाठी उघडण्यात आलेल्या विद्यार्थ्यांच्या सर्व खात्यांसाठी हे लागू असल्याचे रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने म्हटले आहे. आजचे विद्यार्थी उद्याचे कुटुंबप्रमुख होऊ शकतात. त्यामुळे त्यांना आपोआपच या योजनेमुळे लाभ प्राप्त होऊ शकतात. हे खाते चालू ठेवल्याने त्यांना भविष्यात नवीन खाते उघडण्याची गरज भासणार नाही.

केंद्र व राज्य सरकारद्वारे दिली जाणारी विविध प्रकारची अनुदान, नुकसान भरपाई, इतर आर्थिक सहाय्य लाभधारकाच्या खात्यावर थेट जमा होणार असल्यामुळे या प्रक्रियेत होणारी गळती थांबून सरकारच्या खर्चात मोठ्या प्रमाणात बचत होणार आहे. लाभधारकांचे पैसे बँकेत असल्यामुळे लाभधारकांना पैशाच्या सुरक्षिततेसोबत व्याजही मिळणार आहे. सदर पैसे थेट जमा करताना बँका यावर कमिशन आकारू शकतात. त्याचा बँकेला लाभ होणार असला तरी लाभार्थ्याचे नुकसान होऊ शकते.

**जनधन योजनेची वाटचालः**

जनधन योजनेच्या अंमलबजावणीत सुरुवातीलाच जनतेला अपेक्षित असलेल्या वेगाचा प्रत्यय दिसून येतो. प्राथमिक स्तरावरील अंमलबजावणी व तंत्रज्ञानाचा वापर यामध्ये हा वेग असून पहिल्याच दिवशी दीड कोटींहून अधिक लोकांनी बँकांमध्ये खाती उघडली व डेबिट कार्ड घेतले. अनेक बँकांकडून यावर संमिश्र प्रतिक्रिया व्यक्त केल्या आहेत. आयडीबीआय आणि आयओबी यासारख्या आघाडीच्या काही बँकांनी यात पुढाकार घेतला आहे. काही राष्ट्रीयकृत बँकांनी आपल्या शाखेत किंवा शाखेबाहेर विशेष कक्षही सुरू केले आहेत. तर काही बँका यात फारसा रस घेत नसल्याचे पहावयास मिळते. या योजनेंतर्गत उघडण्यात येणाऱ्या खात्यावर मिळणारे ३० हजार रुपयांचे आयुर्विमा संरक्षण मोफत नसून या विमा संरक्षणापोटी भराव्या लागणाऱ्या हप्त्याचा काही भाग खातेधारकाला भरावा लागणार आहे. यासंदर्भात वित्त मंत्रालय आणि एल.आय.सी. यामध्ये चर्चा झाली. एच.डी.एफ.सी., एर्गो जनरल इन्शुरन्स अपघाती विमा संरक्षण पुरविणार आहे, तर आयुर्विमा संरक्षण एल.आय.सी. कडून देण्यात येणार आहे. या योजनेत पूर्वी बँकेत खाते नसणाऱ्या व्यक्तींचे खाते उघडणे अपेक्षित आहे. आधीपासून बँक खाते असणाऱ्याने 'जनधन' अंतर्गत खाते काढण्याची गरज नसली तरी ती काढली गेली आहेत. त्यामुळे अनेक खात्यांचे डुप्लिकेशन होत आहे. एकाच व्यक्तीचे अनेक बँकांत खाती उघडली जात आहेत. या योजनेत ग्रामीण भागापेक्षा नागरी भागातील खातेदारांकडून जास्त प्रतिसाद दिसत आहे. ग्रामीण भागातून या योजनेचा लाभ घेण्याचे प्रमाण तुलनेने कमी आहे.

**जनधन योजनेतील अडथळेः**

१. जनधन योजनेबाबत काही बँका उदासीन आहेत.
२. बँका अजूनही ग्रामीण भागापर्यंत पोहोचल्या नाहीत.
३. बँकांमध्ये मोठ्या प्रमाणात रांगा लावून व्यवहार करावे लागतात.

४. देशात आर्थिक साक्षरतेचे प्रमाण अतिशय कमी आहे.

५. ज्या गरिबांकडे पैसेच नाहीत, त्यांना बँकेत जाण्याची गरजच वाटत नाही.

६. ग्रामीण भागातील अनेक लोकांचे पैसे जिल्हा सहकारी बँकेत असतात. तर काही सहकारी पतसंस्था व काही जिल्हा सहकारी बँका बुडाल्यामुळे लोकांना बँकेत पैसा सुरक्षित राहील याची खात्री नाही.

७. बँकिंगद्वारे आर्थिक व्यवहार केल्यास मोठ्या प्रमाणात कर भरावा लागेल अशी भीती नागरिकांमध्ये आहे.

### जन-धन योजनेचे निष्कर्ष:

आर्थिक समावेशनाचे उद्दिष्ट ठेवून जनधन योजना तयार करण्यात आली असून समाजाच्या प्रत्येक घटकातील सामान्य माणसाचे बँकेत खाते असणे यात अपेक्षित आहे. देशातील सामान्य घटकांना याचा फायदा होणारच परंतु सरकारला सुद्धा यातून मोठ्या प्रमाणावर लाभ होणार असल्याचे दिसून येते. या योजनेमुळे सरकारची अनुदानाद्वारे मोठ्या प्रमाणावर होणारी उधळपट्टी थांबून सरकारी खर्चात घट होणार आहे. विविध वृत्तपत्रांतून या योजनेविषयी प्रतिक्रिया व्यक्त केल्या आहेत. प्रत्येक व्यक्तीला आर्थिक व्यवस्थेशी जोडण्याचा असा हा उपक्रम आहे. सामाजिक उद्देशाने पाहिल्यास ही अत्यंत चांगली योजना आहे. स्किल, स्केल व स्पीड असा मंत्र पंतप्रधानांनी दिला होता. त्यातील स्पीड व स्केल याचा प्रत्यय त्यांनी जनधन योजनेच्या प्रथम दिवशी दिला मात्र खरी कसोटी स्किल या तिसऱ्या टप्प्यावर आहे.

भारतातील कोट्यवधी लोकांची खाती शून्य शिलकीवर चालविणे आणि त्यांना विम्याचे कवच देणे कमालीचे कठीण आहे. खाते उघडून दिल्यानंतर ते चालविण्यासाठी लागणारी आर्थिक दृष्टी किंवा धनसाक्षरता लोकांकडे आली नाही तर योजना फसेल अशी प्रतिक्रिया व्यक्त केली जाते. तसेच ओव्हरड्राफ्टचे पैसे खातेदारांनी परत केले नाहीत तर बँकांच्या अनुत्पादक कर्जात मोठी वाढ होईल व सरकारला याची भरपाई करावी लागेल अशीही भीती व्यक्त करण्यात येत आहे. परंतु या परिस्थितीचा चिकित्सक आढावा घेता असे लक्षात येते की सरकारद्वारे दिले जाणारे अनुदान व इतर आर्थिक सहाय्य याच खात्यावर थेट जमा केले जाणार आहे. त्यामुळे बँकांची सरकारकडूनच आपोआप कर्जवसुली होईल. आर्थिक वर्ष २०१४-१५ मध्ये सरकारकडून गरिबांना अनुदानापोटी २,६०,००० कोटी रुपयांहून जास्त रक्कम देण्यात येणार आहे. ही रक्कम *जन-धन* खात्यातून लाभार्थींना दिल्यास या खात्याची व्यावहारिकता वाढून या खात्याचे मूल्य खातेदारांच्या लक्षात येईल असा आशावाद व्यक्त केला जात आहे. तरी जर हे खाते सरकारी पैशांवरच चालणार असेल आणि यात खातेदार स्वतःहून बचत करणार नसतील तर सरकारद्वारे मिळणारे वित्तसहाय्य जमा करण्याव्यतिरिक्त या खात्याचा फारसा उपयोग होणार नाही. या खात्यात व्यवहार न झाल्याने हे बँकांसाठी नुकसानीचे ठरेल.

### जनधन योजनेवरील प्रतिक्रिया:

जनधन योजनेवर प्रसारमाध्यमांतून सकारात्मक व नकारात्मक दोन्ही बाजूंनी प्रतिक्रिया व्यक्त केल्या गेल्या आहेत.

१. जनधन योजनेचा लाभ सर्व स्तरावरील व्यक्तींना होणार असून सरकारच्या खर्चात

यामुळे बचत होईल.

२. जनधन योजना हा एक स्तुत्य उपक्रम असून ही संकल्पना भ्रष्टाचाराच्या मुळावर घाव घालणारी आहे.

३. या योजनेला मनमोहनसिंग सरकारने चालना दिली होती. सर्व सरकारी योजनांचे आर्थिक लाभ, सबसिडी, सरकारी योजनांची मदत थेट बँक खात्यात जमा करण्याची योजना मागील सरकारच्या कार्यकाळातच आखली गेली होती. आधार या बहुचर्चित कार्डाशी ही योजना जोडली गेली होती. मात्र या योजनेचा विचका झाला.

४. *आम आदमी* प्रतिमेला पुष्टी देण्याच्या प्रयत्नांतून पंतप्रधानांनी जनधन योजनेची घोषणा केली. या योजनेमध्ये फारसे नवे काही नव्हते. नवेपणा आहे तो त्याच्या अंमलबजावणीची सुरुवात करण्यामध्ये.

५. काही मंडळींनी काळा पैसा लपविण्यासाठी अनेक खाती उघडण्याची शक्यता असून केवळ बँकेत खाती उघडल्यामुळे अर्थव्यवस्था सर्वसमावेशक होईल असे मानणे हा केवळ दूधखुळेपणाच ठरेल. शून्याधारित खाती चालविण्यासाठी बँकेच्या पदराला खार लागेल. एखादे बचत खाते चालविण्यासाठी जो काही वार्षिक खर्च येतो तो देखील नव्या जनधन खात्यातून वसूल होणार नाही. खाती हाताळण्याचा खर्च बँकेला करावा लागल्यास बँकांच्या अनुत्पादक खर्चात वाढ होईल.

६. जनधन योजना म्हणजे बँकांच्या खजिन्याला भगदाड पाडणारा निर्णय आहे. ही योजना दुसरे तिसरे काही नसून सरकारी निधीने बँकांना लुटण्याचा राजरोस प्रकार आहे. या योजनेत खाते उघडणाऱ्यांना तारणाखेरीज वित्तपुरवठा केला जाणार असल्यामुळे जनधन योजनेचे संकट बँकिंग उद्योगावर घोंघावत असून ते कित्येक लाख कोटी रुपयांची कर्जे बुडवून बसणाऱ्या लोकांकडून बँकांच्या मुळावर उठणारे आहे.

७. रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर जनरल रघुराम राजन यांनी देखील या योजनेबाबत सावधगिरीचा इशारा दिला आहे. योजना फसणार नाही याची काळजी घेणे आवश्यक आहे. राजन यांच्या मते केवळ गती आणि संख्या एवढ्यावरच लक्ष नको, तर या खात्यामध्ये व्यवहार होणे आवश्यक आहे.

८. जनधन योजनेतील खातेदारांना वाईट अनुभव आला तसेच या नव्या खात्यामध्ये व्यवहारच झाले नाहीत आणि डुप्लीकेट खाती उघडली गेली तर ही योजना म्हणजे अपव्यय ठरेल असा इशाराही राजन यांनी मुंबई येथे दिला.

### जनधन योजनेविषयी शिफारशी:

पंतप्रधान जनधन योजना यशस्वी व्हावी, या योजनेच्या ध्येय व उद्दिष्टांची पूर्तता व्हावी या दृष्टीने पुढील गोष्टी करणे आवश्यक आहे.

१. जनधन योजनेच्या प्रसारासाठी राष्ट्रीयकृत बँकांच्या अधिकाऱ्यांनी आणि कर्मचाऱ्यांनी ग्रामीण आणि दुर्गम भागातील जनतेपर्यंत प्रत्यक्ष जाऊन त्यांना या योजनेची माहिती देणे व तात्काळ त्याच ठिकाणी त्यांचे खाते उघडणे अत्यंत आवश्यक आहे.

२. जर बँका खातेदारांना चांगला अनुभव देऊ शकल्या नाहीत तर खातेदार व्यवहार करणार

नाहीत. त्यामुळे बँकेत खातेदारांना ताटकळत न ठेवता योग्य सुविधा वेळेवर देणे.

३. तळागाळातील लोकांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा करण्यासाठी त्यांना बचतीस प्रोत्साहन देऊन बचतीची सवय लावणे आवश्यक आहे.
४. या योजनेद्वारे जमा झालेल्या बचतीचा योग्य विनियोग करणे आवश्यक आहे.
५. ग्रामीण भागात बँकांच्या शाखा उघडणे अत्यावश्यक आहे.
६. भारतीय पोस्टाच्या एक लाख ५५ हजार कार्यालयांचे रूपांतर पोस्टल बँकेत करण्याची शिफारस अंमलात आणणे आवश्यक आहे.
७. ज्या लोकांचे यापूर्वी बँकेत खाते आहे, त्यांना सुद्धा जनधन योजनेचे लाभ देणे.

**समारोप:**

पंतप्रधान जनधन योजना देशाच्या व जनतेच्या हिताची असून आपल्या देशासमोरील गंभीर आर्थिक प्रश्नांना काही प्रमाणात उत्तर देणारी ही राष्ट्रीय योजना आहे. भ्रष्टाचारमुक्त व पारदर्शी व्यवहार वाढण्यासाठीचा बँकिंग हा पाया आहे. जनधन योजनेमुळे बचतीचे रूपांतर भांडवलात करता येईल. देशातील भांडवल स्वच्छ होणे, त्या माध्यमातून काळा पैसा कमी झाला की, एफडीआय ची गरज तुलनेने कमी होणे, सामाजिक सुरक्षिततेच्या योजनांची रक्कम थेट बँकेत जमा होणार असल्याने भ्रष्टाचार कमी होणे असे अनेक फायदे या योजनेमुळे होणार आहेत. या योजनेद्वारे सामाजिक कल्याण साधले जाणार असून त्यामुळे निश्चितपणे समाजातील वंचित व तळागाळातील व्यक्तींच्या सामाजिक व आर्थिक कल्याणात भर पडणार आहे.

**संदर्भ सूची:**

१. *Southern Economist*- Vol. 53, Nov. 10, 2014.
२. लोकसत्ता, दिव्य मराठी, एकमत, लोकमत, पुण्यनगरी, सकाळ, संचार या वृत्तपत्रातील अंक (ऑगस्ट, सप्टेंबर, ऑक्टोबर, नोव्हेंबर, डिसेंबर २०१४).

# लोकसंख्येची गुणात्मकता : अमापनक्षम चलांच्या विशेष संदर्भात

**बापूसाहेब आर. सोनवणे**, औरंगाबाद,
अर्थशास्त्र विभाग,
यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, सिल्लोड.
ई-मेल: drbrss@gmail.com
भ्रमणध्वनी:९४२३४५३३२५

देशातील उपलब्ध साधनसंपत्ती पुरेपूर उपयोगात आणून जनतेचे राहणीमान उंचावणे म्हणजे आर्थिक विकास होय. वरील विधानाचा योग्य तो अन्वयार्थ लक्षात घेता आर्थिक विकासाची प्रक्रीया ही पुढील दोन बाबींवर निर्भर असल्याचे ध्वनीत होते. एक म्हणजे साधन संपत्तीची उपलब्धता तर दुसरे म्हणजे लोकसंख्या (मानवी साधन संपत्ती). तात्पर्य, आर्थिक विकासाचा अभ्यास हा त्या त्या देशातील उपलब्ध भांडवल आणि लोकसंख्येचा अभ्यास असतो. यापैकी लोकसंख्या अभ्यासाचा थोडक्यात परामर्श घेऊ.

**लोकसंख्येचा अभ्यास:**

लोकसंख्येचा अभ्यास दोन अंगानी केला जातो. एक संख्यात्मक बाजू तर दुसरी गुणात्मक बाजू. लोकसंख्येतील संख्यात्मक बदल हा जैविक संख्याशास्त्राचा अभ्यास तर गुणात्मक बदल हा मानवी विकासाचा अभ्यास होय. यापैकी लोकसंख्येच्या गुणात्मक चलांचा थोडक्यात परामर्श घेऊ-

लोकसंख्येच्या गुणात्मकतेचे खालील दोन दृष्टिकोन आहेत.

अ. संकुचित दृष्टीकोन (मापनक्षम चले)

ब. व्यापक दृष्टीकोन (अमापनक्षम चले)

**अ) लोकसंख्या गुणात्मकतेचा संकुचित दृष्टीकोन(मापनक्षम चले):**

लोकसंख्येच्या गुणवत्तेचा संकुचित दृष्टीकोनानुसार सरासरी आयुर्मान, साक्षरता व तांत्रिक प्रशिक्षणाच्या सोयी इत्यादी महत्वाचे घटक आहेत. जी आर्थिक विकासाची गती वाढविण्यास सहाय्यभूत ठरतात. कारण सरासरी आयुर्मानात वाढ झाल्यास समाजाची कार्यक्षमता वाढते. आजारपण दुर होते. बालमृत्यूचे प्रमाण घटते. समाज दीर्घायुषी बनतो. साक्षरतेच्या पातळीत

वाढ झाल्यामुळे समाजाच्या जाणिवा उंचावतात. विज्ञाननिष्ठ व बुध्दीप्रामाण्यवादी समाजाची निर्मिती होते. आर्थिक विकासात लोकांचा सहभाग वाढतो. समाज अफवांवर विश्वास ठेवण्याऐवजी विवेकास प्राधान्य देतो. संशोधन प्रवृत्ती वाढीस लागते. तांत्रिक प्रशिक्षण सोयींमुळे तंत्रज्ञानाची पातळी उंचावत, त्यामुळे उत्पादन खर्च कमी होऊन राष्ट्राची उत्पादन शक्ती वाढते. समाजाच्या जास्तीच्या गरजांची पुर्तता होऊन रहाणीमान उंचावते. वस्तु स्वस्त होतात. राष्ट्र अर्थप्रणव बनते.

**ब. लोकसंख्येची गुणात्मकता: व्यापक दृष्टीकोन(अमापनक्षम चले):**

काळागणिक लोकसंख्येच्या गुणवत्ता महत्तमिकरणाचा अभ्यास बराच व्यापक होत गेला.त्यात सतत नवनवे आयाम जोडले जाऊ लागलेत. जसे - समाजशास्त्रीय घटक, मानसशास्त्रीय घटक, समाधान निर्देशांक,कायदा व सुव्यवस्था, शासनाची भुमिका, निर्णय सहभाग संधी, स्त्रियांचे समाजातील स्थान, समाज स्वास्थ्य, सामाजिक व आर्थिक सुविधांची उपलब्धता इ.या सार्‍यांव्दारे लोकसंख्येची गुणात्मकता मोजता येते. परंतु प्रश्न गुणवत्तेच्या महत्तमीकरणाचा आहे.

राष्ट्राचा विकास हे साध्य असते तर त्यासाठी गुणात्मक लोकसंख्या हे साधन असते.आरोग्य संपन्न समाज ही राष्ट्राची संपत्ती असते.तर रोगट व विकृत लोकसंख्या ही आपत्ती असते.म्हणुनच आमच्या लोकसंख्या धोरणाचे उद्दिष्ट लोकसंख्येच्या गुणात्मकतेचे महत्तमीकरण हेच असावे. कारण लोकसंख्या गुणात्मकतेचा आणि आर्थिक विकासाचा सहसंबध असतो. याचसाठी प्रत्येक राष्ट्राने उपरोक्त बाबीकंडे गांभिर्याने बघावे.

लोकसंख्या गुणात्मकतेच्या महत्तमीकरणाचे महत्व समजुन घेतल्यानंतर प्रश्न निर्माण होतो तो या गुणवत्ता महत्तमीकरणाच्या साधनांचा. तर त्यासाठी अनेक रूढ उपाय प्रचलित आहेत. त्याशिवाय आरोग्य संपन्नतेतुन लोकसंख्येच्या गुणात्मकतेचे महत्तमीकरण साधता येते व ते पटवुन देणे हीच ह्या लेखाची मध्यवर्ती भुमिका.

आरोग्य संपन्न समाज हा कर्तव्यवादी व उत्पादनक्षम असतो.उच्च बौध्दिक क्षमतेमुळे त्याच्यात संशोधन वृत्ती असते.म्हणुनच जाणिवपुर्वक लोकसंख्येच्या आरोग्याकडे लक्ष देण्याची गरज आहे. कारण देशाची लोकसंख्या आरोग्य संपन्न व उच्च बौध्दिक क्षमतेची असेल तरच त्या देशातील लोकसंख्येची गुणात्मकता उच्च दर्जाची असते.म्हणुनच समाजाची आरोग्य संपन्नता उंचावण्यासाठी रूढ उपायांसोबतच १) विवाहसंस्था २)गर्भसंगोपन व ३)अपत्यसंगोपन ह्या आरोग्यविषयक घटकांकडेही लक्ष देणे महत्वाचे आहे.म्हणुनच लेखाच्या पुढील भागात या सर्वांवर सविस्तर उहापोह केलेला आहे.

**१) विवाहसंस्था:**

विवाह आणि लोकसंख्येची गुणात्मकता या दोहोत सहसंबध असतो.भारतीय संस्कृतीत विवाह हा १६ संस्कारांपैकी एक. गृहस्थाश्रमाचे प्रवेशव्दार. स्त्री व पुरूष दोहोंना पती -पत्नी म्हणुन एकत्र आणणारा एक धार्मिक व सामाजिक संस्कार. विवाह म्हणजे विषयानंद, प्रेमप्राप्ती व अपत्यनिर्मितीचे एक माध्यम. निदान भारतात तरी. विवाह म्हटला की सामान्यपणे जात आली. बर्‍याच समाजात तर विवाह म्हणजे मामाची

मुलगी.याचा परिपाठ म्हणजे अनेक पिढ्या तेच ते रक्त फिरणार.रक्तसंकरावर निर्बंध येणार.विज्ञानाच्या मते निकृष्ट प्रतीच्या अपत्य निर्मितीचे अनेकापैकी हे देखील एक महत्वाचे कारण. म्हणुनच पुर्वी भारतीय संस्कृतीत सगोत्र,सपींड ,व सप्रवर विवाहास प्रतिबंध होता.लग्न जमवितांना बापाकडुन सात पिढ्या व आईकडच्या पाच पिढ्या एवढे लांबचे रक्त असावे असा दंडक होता.कारण तेच ते रक्त फिरत राहिल्यास होणारे अपत्य नाकर्ते, व्याधी ग्रस्त,मतीमंद तसेच छळवादी प्रवृत्तीचे निपजण्याची शक्यता अधिक.

याउलट दुरच्या रक्ताशी संकर झाला तर जन्मास येणारी प्रजा शारीरिकदृष्ट्या सक्षम, आणि बौध्दिकदृष्ट्या हुशार निपजण्याची शक्यता अधिक. ह्या समजास बळ देणारी अनेक संशोधनेदेखील झालेली आहेत.डीन इंग व मॅक्डूगल देखील ह्याच मतांचे. डीन इंग तर स्पष्टपणे बजावतात की,नेहमीच आपल्यांच जातीत विवाह करणे हा एक दुराग्रहच होय. त्यांच्या विधानाचा मतितार्थ हाच की,जाती बाह्यांशी विवाह घडवुन आणावेत, ज्यामुळे रक्तसंकर घडून अपत्ये ही गुणवंत असतील. म्हणजेच लोकसंख्येच्या गुणात्मकतेचे महत्तमीकरण साधेल.

२) गर्भसंगोपण

गर्भसंगोपनात गर्भ,गर्भाची घ्यावयाची काळजी,गर्भावर केले जाणारे संस्कार,तसेच त्यातील दोष निर्दालन हे सर्व घटक येतात.आईने जर गर्भधारणेच्या अगोदरपासुनच पौष्टीक आहार फोलिक अ‍ॅसीड,व्हीटॅमीन बी-१२ सारखी काही जीवनसत्वे नियमितपणे घेतली, योगशास्त्राने सांगितलेली आसने व प्राणायम नियमितपणे केलीत तर अर्भकाच्या मेंदु व मणक्यांची वाढ व्यवस्थित होऊन जन्मास येऊ घातलेले बाळ हे शारीरिकदृष्ट्या सुदृढ व बौध्दिकदृष्ट्या विकसित असते. त्याचप्रमाणे जर गर्भात काही दोष असतील तर त्यांचे निर्दालनही करता येते.यासाठी गर्भतपासणी आवश्यक असते.गर्भाचा संतुलित आहार,योग्यते आयर्न,कॅल्शियम व प्रोटीन्सची उपलब्धता,वेळेवर लसीकरण या सर्वांमुळे गर्भाची वाढ योग्य होऊन कुपोषण टळेल.

नोबेल प्राईज विजेते शास्त्रज्ञ John Sulston यांच्या मते प्रत्येक जोडप्यात आपले अपत्य प्रभावी निपजण्याची आकांक्षा असते. वैद्यकशास्त्राच्या प्रगतीमुळे ते शक्यही झालेले आहे. त्याबाबत थोडक्यात चर्चा करू. शरीर हे अनेक अवयवांनी, अवयव हे विविध उतींनी,उती ह्या अनेक पेशींनी बनतात.तसेच प्रत्येक पेशींची रचना ही अनेक रंगसुत्रानी,रंगसुत्रे ही अनेक जनुकांनी व जनुके ही प्रथिनांपासुन तयार होतात.प्रथिने अनेक अमिनो आम्लांपासुन बनतात.त्याचप्रमाणे मानवाच्या शरीरात रंगसुत्राच्या एकुण २३ जोड्या कार्यरत असतात.ह्या जोड्यांची विविधता प्रत्येक पेशीत वेगवेगळी असते.त्यानुसार आपली स्वभाव वैशिष्ट्ये म्हणजे बुध्दीमत्ता,व्यक्तिमत्व, शरीराची ठेवण, रंग, रूप तसेच व्याधीदेखील ठरतात.

त्यातील काही गुणवैशिष्ट्ये पित्याकडुन तर काही आईकडुन जन्मास येणाऱ्या अपत्यात संक्रमित होतात.विशेष म्हणजे त्यातील काही जणुके ही अत्यंत प्रभावी तर काही प्रभावहीन असतात.काही दोषपुर्ण देखील असतात. त्यामुळे होणारे अपत्य अपंग,मतीमंद किंवा व्याधीग्रस्त असू शकते.त्याचसाठी गर्भतपासणी आवश्यक

ठरते.दुर्दैवाने भारतात फक्त लिंग निदानासाठीच गर्भतपासणी केली जाते.गर्भतपासणीसाठी देशात अत्याधुनिक प्रकारच्या वैद्यकिय सोयी सुविधा आणि संशोधन संस्थाची गरज भासणार. ह्या अत्याधुनिक सोयींच्या उपलब्धतेतुन निरोगी संतती जन्मास येईल.परिणामस्वरूप लोकसंख्येची गुणात्मकता वाढेल.ज्यामुळे संपुर्ण मानवजात व मानवता उत्क्रांत होईल.

३) अपत्य संगोपनः

काळागणिक कुटुंबसंस्थेचे स्वरूप बदलत असुन एकत्र कुटूंब पध्दतीच्या जागी विभक्त कुटूंबपध्दती रूजते आहे.त्यामुळे अपत्य संगोपनाचा प्रश्न निर्माण होत आहे.मात्र एकत्र कुटुंबात घरातील वृध्दांचा विशेषत:आजीबाईचा तो आवडता उद्योगच असायचा. आता स्वातंत्र्य,स्त्री सक्षमीकरण, शिक्षण आणि अर्थार्जन ह्या स्त्रियांच्या नवीन आभुषणांमुळे वेळेच्या कमतरतेतून अपत्य संगोपनाचा प्रश्न निर्माण झालेला आहे. जर दुधगृहे, पाळणागृहे, संस्कारगृहे यांच्या स्थापनेतून तसेच प्रशिक्षित नर्स, बालमानसशास्त्राचे समुपदेशक यांच्या देखरेखीखाली अपत्य संगोपन झाले तर एका बाजुने बालकांवर योग्य ते संस्कार घडतील आणि दुसऱ्या बाजुने महिलांचा वेळ वाचुन तो इतर क्षेत्रात त्यांना आपली प्रतिभा फुलविण्यासाठी सत्कारणी लावता येईल. त्यामुळे अखिल मानवजातीचे कल्याण साधण्यास मदतच होईल.

समारोपः

गुणात्मक लोकसंख्या देशाच्या आर्थिक विकासाच्या यज्ञातील समीधा असते.याऊलट विकृत मानसिकता व रोगट लोकसंख्या ही राष्ट्रावर ओझे असते. त्याचसाठी शासनाने जन्माला येणाऱ्या प्रत्येक अपत्याविषयी सजग राहुन जन्मास येणारा आपला प्रत्येक नागरिक हा सक्षम,कार्यक्षम व निरोगी कसा असेल,या बाबत दक्ष असावे.या गुणात्मक समाजाचा आर्थिक उन्नयनाशी जवळचा संबंध असतो.याचसाठी भारतासारख्या विकसनशील राष्ट्राने आपल्या लोकसमुहाची गुणात्मकता महत्तम करण्यासाठी विविध अंगानी प्रयत्न करावेत.ज्यामुळे देशाचा भविष्यकाळ उज्ज्वल असेल.

संदर्भ सुची:


१ काचोळे रा.ध. (२००९) *सामाजिक संस्था आणि आधुनिकिकरण*, कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद.

२ साळुंके आ.ह.(२००३), *हिंदु संस्कृती आणि स्त्री*, लोकवाङमयगृह, मंबई.

३ सहस्त्रबुध्दे पु.ग.,(१९८८),*विज्ञानप्रणित समाजरचना* मधुबन ग्रंथ प्रकाशन, मुंबई.

४ श्रीवासन एस.सी.,(१९९९)*जनांकिकीय अध्ययन के प्रारूप*, हिमालया पब्लिकेशन्स हाऊस, मुंबई

५ Eugenics Science वरील विविध वेबसाईट्स

६ Panigrahi Santoshkumar, 2004, *Role of the NGO's in the Empowerment of the Disabled,* Radha Publications, New Delhi.

७ दैनिक लोकमत, दैनिक सकाळ विविध अंक

८ डॉ. कुलकर्णी एस. एन.(१९९८) *लोकसंख्याशास्त्र आणि लोकसंख्या शिक्षण*, विद्या प्रकाशन, नागपूर.

९ www.indiacensus.com

१० योजना मासिक (विविध अंक)

# महाराष्ट्रातील पाणी प्रश्न: सद्यस्थिती व भवितव्य

**बंडू जयसिंग कदम, कोल्हापूर,**
अर्थशास्त्र विभाग,
शिवाजी विद्यापीठ,
भ्रमणध्वनी ९९७०५३५७२३

**जगन्नाथ शामराव पाटील, कोल्हापूर,**
प्राचार्य, शिक्षणमहर्षी बापूजी
साळुंखे महाविद्यालय,कराड
अधिष्ठाता, सामाजिकशास्त्रे,
शिवाजी विद्यापीठ.
भ्रमणध्वनी ९४२३२६१७९६

पाणी म्हणजे जीवन. मानव, पशु, पक्षी, प्राणी व वनस्पतीच्या अस्तित्वासाठी व संवर्धनासाठी पाणी हा अनिवार्य घटक आहे. पाणी हे विश्वाच्या निर्मितीतील असे विलक्षण द्रव्य आहे की जे अमृत आहे. पृथ्वीचा जवळपास ३/४ भाग पाण्याने व्यापलेला आहे. सर्वव्यापकता असतानाही विरोधाभास असा आहे की संपूर्ण जगाला पाण्यासाठी संकटाचा सामना करावा लागत आहे. विश्वजल विकास रिपोर्ट २००३ मध्ये वैश्विक जलसंकटाबाबत असा उल्लेख आहे की, विकसनशील देशात अनेक भागात प्रतिव्यक्ती पाण्याची कमतरता वाढत जाणारी आहे.

वाढत्या जलसंकटामुळे राज्याराज्यात तणाव, संघर्ष, स्वार्थाची भावना वाढत आहे. नदीवरील धरणे, कालवे या विषयांना घेऊन संघर्षात दिवसेंदिवस वाढ होत आहे. एवढेच नव्हे तर नदीचे पाणी वळविण्यात व नदीच्या सीमेवर असणाऱ्या राज्यात, गावांमध्ये विकासाचा मुद्दा घेवून विकासाचे राजकारण करत भीषण संघर्ष होणे हे विषय आता टाळता येण्यासारखे नाही. कर्नाटक, तामिळनाडू राज्यामध्ये कावेरी नदीच्या पाणी वाटपावरून संघर्ष निर्माण झाला आहे. त्याचबरोबर सरदार सरोवर हादेखील चिंतेचा विषय आहे.

महाराष्ट्र राज्यातील अनेक भाग अवर्षणग्रस्त आहेत. नुकतेच महाराष्ट्रातील

१२३ तालुके दुष्काळग्रस्त म्हणून घोषित करण्यात आले आहेत. पर्जन्यमानाच्या असमतोलामुळे महाराष्ट्रात पाणी टंचाईचा प्रश्न नेहमीच भेडसावत असतो. पेयजलाची समस्या ही कायम आहे. काही भागात टँकरने किंवा इतर मार्गांनी पाणीपुरवठा केला जातो व समस्येचे तात्पुरते समाधान शोधले जाते. मुंबईमध्ये प्रतिव्यक्ती ११० लिटर पाणी पुरवठा होत असताना मात्र महाराष्ट्राच्याच अनेक भागात दूरवरून पाणी आणावे लागते. हा विरोधाभास लक्षात घेण्यासारखा आहे.

महाराष्ट्रात लोकसंख्या व त्याचे नागरीकरण मोठ्या प्रमाणात वाढत आहे. जीवनशैलीत झपाट्याने परिवर्तन घडून येत असताना मात्र निसर्गातून होणाऱ्या पाण्याच्या उपलब्धतेत त्याच प्रमाणात वाढ झालेली दिसून येत नाही. राज्यातील मोठ्या शहरांना पाणीपुरवठा करण्यासाठी धरणातून पाणी आणावे लागते. धरणातील पाणी पिण्यासाठी व दैनंदिन उपयोगासाठी अधिक पाण्याची उचल केली जाते. त्यामुळे कृषीसिंचन योग्य पाण्याच्या पुरवठ्यात तूट निर्माण होते. अशाप्रकारे शेती वापराच्या पाण्यातील तूट अर्थात असे पाणी आवश्यकतेनुसार वळते केले गेले तर भविष्यात नवीनच समस्या निर्माण होण्याची शक्यता आहे. प्रस्तुत शोधनिबंधामध्ये महाराष्ट्रातील पाणी प्रश्नावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

पृथ्वीवरती ७१% पाणी आणि २९% जमीन आहे पण क्षारयुक्त पाण्याचे प्रमाण जास्त आहे. आज जगामध्ये २२ देशामध्ये पाणीटंचाई मोठ्या प्रमाणावर जाणवते. मुळातच प्रत्येक व्यक्तीला प्रती वर्षी १००० घन मीटर पाण्याची आवश्यकता असताना कमी पाण्यात गरज भागवावी लागते. पाणी टंचाई भेडसावणाऱ्या देशाची संख्या २१० पर्यंत आहे. व त्यामुळे ४०० कोटी लोक या समस्येने ग्रस्त होतील. भारतामध्ये १९४७ दरडोई पाण्याची उपलब्धता ६००० घनमीटर इतकी होती. जवळजवळ ५० वर्षानंतर म्हणजे २००७ मध्ये १२५० दरडोई पाण्याची उपलब्धता इतकी कमी झालेली आहे. जागतिक पातळीवरील पाण्याच्या उपलब्धतेपेक्षा कितीतरी पटीने कमी आहे. (जागतिक दरडोई पाण्याची उपलब्धता ४३०० घन मीटर) थोडक्यात पाण्याची समस्या गंभीर स्वरूप धारण करू लागली आहे.

### पाण्याची आवश्यकता:

पाणी ही एक प्रमुख नैसर्गिक साधनसंपत्ती आहे. मानवी जीवनामध्ये पाण्याला अनन्यसाधारण महत्व आहे. किंबहुना असे म्हणता येईल की, मानवी जीवनाचा एक अविभाज्य घटक पाणी हा आहे. ग्रामीण उपजीविकेकरिता, ग्रामीण अर्थव्यवस्था कणा असणाऱ्या कृषी उत्पादनासाठी, उद्योगासाठी जलविद्युत निर्मितीसाठी, सर्व लोकांच्या आरोग्य व राहणीमानासाठी, पर्यावरणीय मूल्य व फायदे जोपासण्यासाठी, वाढत्या लोकसंख्येच्या पेयजलाची गरज भागविण्यासाठी, रोजगारातील वाढ अवलंबून असलेल्या व्यापार व उद्योगासाठी पाण्याची नितांत आवश्यकता आहे. वाढत्या लोकसंख्येला पुरेशा प्रमाणात अन्नपुरवठा करायचा असेल तर कृषी उत्पादनामध्ये वाढ होणे गरजेचे आहे. यादृष्टीने पाणी हे कृषी विकासामधील आणि प्रामुख्याने ग्रामीण विकासामधील महत्वपूर्ण आदान आहे.

### पाण्याचे स्त्रोत :

तक्ता क्र. १

महाराष्ट्रातील पाण्याची सद्य स्थिती (२०१२-१३)

| अ.नं. | घटक | पाणी |
| --- | --- | --- |
| १) | सरासरी पाणी उपलब्धता | ५७८२ ८ टी.एम.सी. |
| २) | प्रत्यक्षात वापरास उपलब्ध पाणी | ४४४७ ८ टी.एम.सी. |
| ३) | कोकण विभागातील | २४४३ टी.एम.सी. |
| ४) | कोकणेत्तर विभाग | २००४ टी.एम.सी. |

*स्त्रोत: दैनिक सकाळ दि.१/३/२०१३*

पृथ्वीस्तलावरील एक महत्वपूर्ण घटक पाणी हा आहे. पाण्याचा प्रमुख स्त्रोत हा नैसर्गिक पर्जन्य आहे. त्याचप्रमाणे नद्या, झरे हे देखील नैसर्गिक पाण्याचे स्त्रोत आहेत. विहीर, नळपाणी, कूपनलिका, तलाव, कालवे इत्यादी मानवनिर्मित पाण्याचे स्त्रोत आहेत.

**पाणी प्रश्नाची सद्यस्थिती:**

सामान्यपणे असे दिसून येते की, १३३५ टी.एम.सी. वाया जात आहे. कोकण विभागामध्ये प्रत्यक्ष वापरास उपलब्ध पाण्यापैकी वापरासाठी जवळजवळ ५५% पाणी आहे. तर महाराष्ट्राच्या बाकीच्या भागामध्ये केवळ ४५% पाणी वापरण्यासाठी उपलब्ध आहे. थोडक्यात महाराष्ट्रामध्ये पाणी वाटपामध्ये मोठ्या प्रमाणात विषमता पहावयास मिळते. त्यामुळे पाण्याचा प्रश्न आणखी उग्ररुप धारण करू लागला आहे.

**पाण्याची समस्या:**

महाराष्ट्रात दुष्काळी जिल्ह्यात पिण्याचे पाणी देखील मिळणे अवघड आहे. अन्न व पाणी यांच्याइतके महत्त्वाचे मानवी जीवनात दुसरे काहीही नाही. हल्ली महाराष्ट्रातील १७ जिल्ह्यांत विशेषत: अहमदनगर, पुणे, नाशिक, धुळे, सातारा, सोलापूर, उस्मानाबाद आदी जिल्ह्यात पाण्याचा प्रश्न कधी नव्हता इतका बिकट झाला आहे. एकाच पक्षाचे पुढारी एकमेकाविरुद्ध उग्र निदर्शने करू लागले आहेत. भावी काळात पाण्यावरच्या यादवी युद्धाचे व सामाजिक संघर्षाचे वातावरण प्रवरा, गोदावरी, कृष्णा खोऱ्यापुरते मर्यादित राहील असे मानण्याचे कारण नाही. शेती, उद्योग, पर्यावरण नागरी गरजा भागविण्यास ही जलसंपत्ती अपुरी आहे. मागील पाणीपुरवठा योजना आज निकामी झाल्या आहेत. पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणाऱ्या तळ्याच्या व कालव्याच्या परिसरात अनधिकृत वस्ती वाढत आहे. कालव्यामध्ये मेलेली जनावरे तर टाकली जातातच तसेच स्वच्छतागृहे म्हणूनही कालव्यांच्या पाण्याचा उपयोग केला जातो. त्यामुळे पिण्याचे पाणीही प्रदूषित झाले आहे. सतत भुजलाचा वापर केल्याने पिण्याच्या पाण्याचे प्रवाह व साठे दुर्मिळ झाले आहेत. प्रवरा, गोदावरी, मुळा नदीच्या खोऱ्यात भूगर्भातील पाणी खारे बनत चालले आहे. तक्ता क्र.२ वरून असे दिसून येते की, महाराष्ट्रामधील पाणी टंचाई समस्या उग्र बनत चाललेली आहे. जवळजवळ ३७% जिल्ह्यामध्ये दुष्काळ पहावयास मिळतो. पाण्याची टंचाई सोलापूर जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणात जाणवते. बराच भाग पाण्यापासून वंचित आहे.

पाणी टंचाई मोठ्या प्रमाणावर जाणवत

तक्ता क्रमांक - २

महाराष्ट्रातील जिल्हा निहाय दुष्काळ स्थिती (२०१२-१३)

| अ.नं. | जिल्हा | गाव | वाड्या | टॅकर्स |
|---|---|---|---|---|
| १) | सांगली | ८४ | ८९१ | १४४ |
| २) | सातारा | १९६ | ६५५ | २३१ |
| ३) | पुणे | २९ | २७९ | ६० |
| ४) | उस्मानाबाद | ८० | ०८ | १०९ |
| ५) | बीड | १७० | १९६ | २२४ |
| ६) | अहमदनगर | २३० | ८९६ | २७० |
| ७) | नाशिक | ७५ | १९७ | ९८ |
| ८) | औरंगाबाद | २०० | ०५ | २४७ |
| ९) | जालना | १७ | ६१ | २३१ |
| १०) | जळगांव | ४९ | - | ४४ |
| ११) | सोलापूर | २३६ | १२९१ | २७९ |
| १२) | बुलढाणा | ६५ | - | ७७ |
| १३) | नांदेड | ४१ | - | ६२ |
| | एकूण | १४७२ | ४४७० | २१३६ |

*संदर्भ : दैनिक सकाळ दि. ९/३/२०१३*

आहे. जलसमस्या तीव्र होण्याची कारणमीमांसा पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येतील.

१) नैसर्गिक वातावरण व हवामान बदल

२) सामाजिक जाणीवेची उदासीनता

३) राजकीय इच्छाशक्तीचा अभाव

४) वित्तीय चणचण

५) तंत्रज्ञानाच्या उपयोगाकडे दुर्लक्ष

६) वैयक्तिक उदासीनता

७) पाण्याचे राजकारण आणि राजकारणांचे पाणी इत्यादी कारणांमुळे पाणी टंचाई समस्या उग्र बनत चाललेली आहे.

**उपाययोजना:**

पाणी हे जीवनरक्षक संसाधन पाण्याला दुसरा कोणताही पर्याय आजपर्यंत तरी उपलब्ध नाही. हे लक्षात घेता पाणी हे एक अमूल्य संपत्ती आहे. हे विचारात घेवून उपलब्ध पाण्याचा योग्य पद्धतीने विनियोग संवर्धन व जपणूक व्हावा यासाठी हेतुपूर्वक आखलेले धोरण म्हणजे जलधोरण होय. महाराष्ट्रात सध्या जे धोरण आहे. २००३ मध्ये जाहीर झालेले आहे यात अशी तरतूद आहे की, दर पाच वर्षानी त्याचे पुनर्विलोकन व्हावे. आज २०१२ उजाडले तरी ते झालेले नाही. त्याची चर्चाच सुरू आहे.

**१) पाणी वापराचा प्राधान्यक्रम :**

जलधोरणात पाणी वापराच्या प्राधान्यक्रमाला विशेष महत्व आहे. कारण या पुढच्या काळात पाण्याचे योग्य व्यवस्थापन होण्याची शक्यता जास्त आहे. अन्यथा पाणी

वंचितता प्रश्न होणार आहे. २००३ च्या जलधोरणांत पाणी वापराचा पहिला क्रम पिण्यासाठी व घरगुती वापरासाठी होता. मात्र दुसरा शेतीला असण्याऐवजी उद्योगांना दिलेला होता. राष्ट्रीय जलधोरणात शेतीला दुसरा क्रम दिला असताना राज्यात मात्र उद्योगाला प्राधान्य देवून शेती सारख्या मुलभूत क्षेत्राला डावलले होते. पण त्यावर बऱ्याच चर्चेनंतर शेतीला अग्रक्रम देण्यात आला याचा अर्थ पाणी ही भांडवलदारांची मक्तेदारी करण्याची सरकारची जबर मानसिकता लक्षात घेण्यासारखी आहे. नंतर तिसरा उद्योगांना, चौथा पर्यावरण , पर्यटन व करमणुकीला दिला गेला आहे. खरे तर या दोन भिन्न गोष्टी एकाच मापाने मापण्याचा प्रयत्न केलेला आहे. पर्यावरण संरक्षणात पाणी अत्यंत महत्वाचा घटक. खरे तर पर्यावरण संरक्षणात त्याला प्राधान्य द्यायला हवे. असे पर्यावरणवाद्यांचे मत आहे, पण तो दिला गेला नाही. पाण्याचा प्राधान्यक्रम हा भावी काळात महत्वाचा ठरणारा आहे. सर्वसमावेशक जलधोरणात पिण्याच्या पाण्यानंतर, शेती व त्यानंतर पर्यावरण संरक्षणाला दिला पाहिजे व त्यानंतर उद्योग व शेवटी करमणूक व पर्यटनास दिला जावा. त्यामुळे पाण्याच्या गैरवापरास आळा बसेल.

**२) पाणी व्यवस्थापन :**

पाणी व्यवस्थापनेत त्याचे संवर्धन, साठवणूक व योग्य पद्धतीने वापर याचा समावेश होतो. पावसाचे जे पाणी वाया जाते ते साठवण्यासाठी रेनवॉटर हार्वेस्टिंगची योजना शहरामध्ये सार्वजनिक ठिकाणी म्हणजे शाळा, सरकारी इमारती बरोबरच खाजगी इमारतींनाही सक्तीचे केले पाहिजे. चेन्नई शहरात हा प्रयोग यशस्वी झाला असून त्यामुळे पाणी टंचाईवर मात करणे शक्य झाले आहे. पण त्यासाठी त्यांना कायदा करावा लागला.

**३) पाणी हक्क :**

महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण कायद्यात पाणी हक्क ठरवताना जमीन धारकांना त्यांच्या जमीनधारणेच्या क्षेत्रानुसार जेवढे पाणी आजवर मिळत आले आहे तेवढाच पाणी हक्क देण्याची तरतूद केलेली आहे. त्यामुळे श्रीमंतांना, जमीनदारांना पाण्याचा हक्क जास्त मिळणार आहे. त्यातून सीमांत, छोटे, मध्यम् शेतकरी पाण्यापासून वंचित राहणार आहेत. व श्रीमंताचीच पाण्यावर मालकी राहणार हे उघड आहे. हे धोरण सर्वसमावेशक नसून वंचितता निर्माण करणारे आहे. त्यामुळे प्रत्येक जमीन मालकांना त्यांच्या कुटुंबाच्या उपजीविकेची हमी मिळेल अशी पाणी हक्काची व्यवस्था जलधोरणात असली पाहिजे. त्यातून पाणी वाटप समन्यायी होण्यास मदत होईल.

**४) पाणी हक्कांचे हस्तांतर :**

पाणी हक्काचे हस्तांतर हा मुद्दा फार महत्वाचा आहे. पाणी पुरवठादारांना व्यापारी तत्त्वावर घाऊक दरात पाण्याचा हक्क प्रदान केलेला आहे. तो हक्क इतर कुणालाही कोणत्याही वापरासाठी इतराकडे हस्तांतरीत करण्याची तरतूद सद्याच्या जलधोरणात आहे. याचा साधा अर्थ पाणी इतरांना कोणत्याही वापरासाठी विकता येईल. उदा. प्रथम प्राधान्यक्रमाचे पाणी इतर कोणालाही म्हणजे चौथ्या प्राधान्यक्रमाला म्हणजे हॉटेल, करमणुकीसाठी देता येईल. यामुळे शेतकऱ्यांना अमिष दाखवून मोठमोठ्या कंपन्या (शीतपेय तयार करणाऱ्या) पाणी विकत घेतील.

(उत्तरप्रदेश मेंहंदीगंज) यात पाण्याच्या व्यापारी प्रवृत्तीला चालना दिली गेली आहे. पाण्यासारख्या अमूल्य, सामुदायिक हक्क असणाऱ्या घटकांना विकाऊ करणे योग्य नाही. त्यातून समाजाचे हीत साधणार नाही.

### ५) जलक्षेत्राचे खाजगीकरण:

भारताच्या सामाजिक, आर्थिक व राजकीय चौकटीत जलक्षेत्राच्या खाजगीकरणावर अनेक मर्यादा आहेत. उदारीकरणाच्या चौकटीत जलक्षेत्राचे खाजगीकरण प्राधान्याने पुढे येत आहे. काही मर्यादित अंतरावर त्याला थांबविणे आवश्यक आहे. अथवा त्यावरची सार्वजनिक मालकी ठेवता आली पाहिजे. स्पर्धा वृत्ती निर्माण करणे आणि सार्वजनिक उपक्रमात सहभागी होऊन जबाबदारी पेलण्याची वृत्ती निर्माण करणे गरजेचे आहे. या अनुषंगाने जलक्षेत्राचे खाजगीकरण काही मर्यादित अर्थानी मान्य करावे लागणार आहे. कारण या क्षेत्रातील सरकारी गुंतवणूक प्रशासकीय व्यवस्थेला परवडणारी नाही. अथवा ती यापुढे अशक्य आहे. याही पलीकडे जाऊन जलक्षेत्राचे व्यवस्थापन शासनव्यवस्थेला पूर्णत: अशक्य होणार आहे. म्हणून काही मर्यादित घटकामध्ये अथवा क्षेत्रामध्ये खाजगीकरणाची स्थिती निर्माण करता येते.

### ६) सामुहिक मालकी:

पाण्यावर मालकी कुणाची? हा आजच्या विकास प्रक्रियेतील जिव्हाळ्याचा मुद्दा आहे. खरं तर पाणी ही सामाजिक संपत्ती आहे. राज्यघटनेत ७३ व्या घटना दुरूस्तीत ग्रामसभेला अधिकार दिलेले आहेत. त्यामुळे गावातील पाण्यावर गावाची मालकी असायला हवी. जगण्याची मूलभूत गरज भागवण्याची ताकद पाण्यात असल्याने पाण्याचा हक्क मिळायला पाहिजे. संविधानात मानवाच्या मूलभूत गरजा भागवण्याची हक्काची तरतूद केली आहे. त्यामुळे पाण्यावर सामुदायिक मालकी प्रस्थापित झाली पाहिजे.

### ७) अन्न सुरक्षा:

येत्या काळात वाढत्या लोकसंख्येला आवश्यक असणाऱ्या अन्न धान्याची उपलब्धता निर्माण करणे हे देशासमोरील खरे आव्हान आहे. हे आव्हान पाण्याशिवाय पूर्ण होणार नाही. त्यामुळे पाणी टंचाईचे संकट दूर करून शेतीला पाणी पुरवठा करण्याची नितांत गरज आहे. तरच शाश्वत अन्न सुरक्षितता प्राप्त करता येईल.

### ८) प्रदूषण नियंत्रण :

आज मानव सर्वच प्रकारच्या प्रदूषणाच्या विळख्यात सापडलेला आहे. आज पाणी प्रदूषणाचा प्रश्न गंभीर बनलेला आहे. सर्वच उपलब्ध पाण्याचे स्त्रोत प्रदुषित होत आहेत. भुपृष्ठावरीलच नव्हे तर भूपृष्ठाखालील पाणीही प्रदूषित झालेले आहे. त्यामुळे या प्रदूषणावर नियंत्रण ठेवणे त्याची तीव्रता कमीतकमी करणे ही सक्षम जलधोरणाची पहिली पायरी आहे. प्रदुषण करणाऱ्या घटकावर कायदेशीर कारवाई करणे, प्रदूषण कर आकारणे या सारख्या बाबीची तरतूद जलधोरणात असली पाहिजे.

### ९) दुष्काळ निवारण :

सुकथनकर समितीच्या मते, ज्या प्रदेशात वार्षिक सरासरी ७५० मि. मि. पेक्षा कमी पाऊस पडतो तो भाग अवर्षणग्रस्त होय. यानुसार महाराष्ट्रातील १४ जिल्हे अवर्षणग्रस्त मध्ये येतात. या दुष्काळामुळे जनता हैराण झालेली आहे. दुष्काळी भागात पाण्याचा कायम पुरवठा व्हावा

या दृष्टिने जलधोरण असले पाहिजे. पाण्याच्या विपुलतेच्या भागाकडून कमतरतेच्या भागाकडे पाणी आणणारी व्यवस्था विकसित केली पाहिजे कारण जगण्याचा संबंध हा मुलतः पाण्याशी असतो. जनावरे, चारा, शेती, उद्योग, रोजगार या सर्वच बाबी पाण्यावर अवलंबून असतात.

१०) जलसाक्षरता:

पाणी टंचाईची ओरड उन्हाळयात सार्वजनिक स्वरुपात होते. विशेषतः ग्रामीण भागातील महिलांना पाणी प्रश्नांची तीव्रता अधिक जाणवते. कारण सर्वाधिक झळ महिला वर्गालाच बसते. पाणी टंचाईच्या काळात टँकर सुरू केले जातात. परंतु त्यासाठी शासनाला नियमांची पूर्तताही करावी लागते. तसेच सिंचनासाठी पाण्याची गरज असते. वारंवार उद्‌भवणारी अवर्षणाची परिस्थिती, अपुरा व अवेळी पडणारा पाऊस यामुळे पाण्याच्या नियोजनाला महत्व प्राप्त होते, जलसंधारणात महत्त्व प्राप्त होते. पाण्याचा प्रत्येक थेंब वाचविणे महत्वाचे आहे. पाण्याच्या बचतीचे महत्व पटले तर आपोआपच त्याच्या कुटूंबात पाणी वाचविण्यास सुरूवात होईल. त्यासाठी शाळा, महाविद्यालयांनी प्रत्येक विद्यार्थ्याला पाण्याचे महत्व कळण्यासाठी जलसाक्षरतेची गरज आहे.

जलसाक्षरतेसाठी विविध बाबींचे महत्व लक्षात घ्यावे लागते. ग्रामीण भागात पुनर्भरण, पाण्याच्या उपशाचे नियोजन, उन्हाळ्यासाठी राखीव भूजल इ. चा विचार करावा लागतो. त्याचबरोबर पाण्याचा पुनर्वापर करणे महत्वाचे आहे. वाढते शहरीकरण, औद्योगिकीकरण यामुळे पाण्याचा वापर वाढला आहे. पाण्याची गरज लक्षात घेता पर्यायी स्त्रोत म्हणून सांडपाण्याचे सिंचन व इतर बाबींसाठी पुनर्वापर करणे आवश्यक आहे. जलसाक्षरतेसाठी पुस्तिका, घडीपत्रके तयार करून प्रबोधनासाठी वाटप करणे आवश्यक आहे. या पुस्तिकीतुन नागरी भागासाठी तांत्रिक तसेच आर्थिक तपशील नागरिकांपुढे मांडणे आवश्यक आहे.

सध्या घरावर पडणारे पावसाचे पाणी साठविण्याची व वर्षभर वापरण्याची नवी व चांगली कल्पना रूढ होत आहे. राजस्थान, सौराष्ट्र या प्रदेशात जमिनीत हौद बांधून या पावसाच्या पाण्याचा साठा करायचा व पावसाळ्यानंतर पुढे ६ ते ७ महिने तेच पाणी वापरायचे ही पूर्वीची पद्धत नव्याने विकसित करून वापरण्यासारखी आहे.

उपसंहार:

पाणी ही निसर्गाने दिलेली देणगी आहे. पाण्याचा वापर काटकसरीने होणे आज काळाची गरज बनली आहे. पाण्याचा पुनर्वापर, सांडपाण्यावर प्रक्रिया, पाण्याची मोजणी, पाण्याचा बाष्पीभवनापासून बचाव इत्यादी मार्गांनी पाण्याचा योग्य वापर योग्य करणे गरजेचे आहे. आर्थिक उन्नती, सामाजिक न्याय आणि पर्यावरणाच्या समतोलासाठी पाण्याचा योग्य वापर सर्वसामान्यांनी करावा एवढेच नव्हे तर बाजारातील मागणीचा विचार करून पीकरचना शेतकऱ्यांनी करावी. कृषीमध्ये ठिबक सिंचन व तुषार सिंचन पद्धतीचा वापर सक्तीचा करणे आवश्यक वाटते. ठिबक सिंचन व तुषार सिंचनासाठी उपलब्ध असणाऱ्या अनुदानामध्ये वाढ करण्याची आवश्यकता आहे.

महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री वसंतदादा पाटील यांनी असे म्हटले आहे की, पाणी अडवा,

पाणी जिरवा. शेतीला सायफन पद्धतीने पाणी देण्यात यावे.आरफल सारख्या योजनाची अंमलबजावणी करण्यात यावी उपसा जलसिंचनापेक्षा जलस्वराज्य प्रकल्पामधील लोक सहभागाला महत्व देणे आवश्यक आहे.

## संदर्भ सूची:


१) जे. एफ. पाटील (संपादक), (२०१०) *सुवर्ण महोत्सवी महाराष्ट्राची बदलती अर्थव्यवस्था*, सकाळ प्रकाशन, कोल्हापूर, पृ.१२१.

२) विजय कविमंडन, (२००८) *कृषी अर्थशाळा*, श्री मंगेश प्रकाशन, प्रथम आवृत्ती, पृ.१०४.

३) राघवेंद्र कुलकर्णी, (२००२) विलास पवार, *जल आशय*, ओम पब्लिकेशन ठाणे, पृ.२१.

४) दि. मा. मोरे, (२०१०) *सिंचन साधना*, महाराष्ट्र सिंचन सहयोग, औरंगाबाद, पृ.२२.

५) दक्षिण युग, *पाणी एक ज्वलंत समस्या*, दिपावली विशेषांक, पृ.४०.

६) मराठी अर्थशास्त्र परिषदेचे ३६ वे राष्ट्रीय अधिवेशन.

७) अर्थसंवादचे विविध अंक.

८) जलसिंचन आयोगाचे अहवाल.

९) समाज प्रबोधन पत्रिका.

१०) दैनिक सकाळ दि. ९ मार्च २०१३.

# राष्ट्रीय उच्च शिक्षा अभियान: शिक्षणाचे खासगीकरण

**माधुरी प्रदीप लेले, नागपूर,**
श्री. बिंझाणी नगर महाविद्यालय
भ्रमणध्वनी: ९४२३४०५०९७

*The time has come to create wave of institutional building and of excellence in the field of educational research and capability building.*

-Ex.Prime Minister Dr. Manmohan Singh

भारतातील उच्च शिक्षणाचे सकल नोंदणीचे प्रमाण (Gross Enrolement Ratio) १३. २ टक्के आहे. जागतिक उच्च शिक्षण सकल नोंदणीचा दर सरासरी २४ टक्के आहे. प्रगत देशांमध्ये हे प्रमाण ५८ टक्के आहे, तर विकसनशील देशांमध्ये सकल नोंदणी दर १८ टक्के इतके आहे. याचा अर्थ भारताचा उच्च शिक्षणाचा सकल नोंदणी दर तुलनात्मकरित्या अतिशय कमी आहे. भारताअंतर्गत देखील शहरी भाग आणि ग्रामीण भाग यांच्यात प्रचंड तफावत आढळते. शहरात उच्च शिक्षणाचा सकल नोंदणी दर (GER) २७.२ टक्के तर ग्रामीण भागात तो केवळ ७.८ टक्के इतक्या निम्न स्तरावर आहे.

ही असमानता म्हणजे भारतातील सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक असमानतेचे दृश्य स्वरुप आहे. यु. एन. डी. पी. ने सहस्त्रकाच्या विकास उद्दिष्टांतर्गत (Millenium Development Goal) जगाचा उच्च शिक्षणाचा सकल नोंदणी दर २०१५ पर्यंत १५ टक्के तर २०२० मध्ये तो ३० टक्के करण्याचे लक्ष्य निर्धारित केले आहे.

**राष्ट्रीय उच्च शिक्षा अभियानाचे स्वरुप :**

वरील पार्श्वभूमीवर विद्यापीठ अनुदान आयोग (UGC) व केंद्र सरकारचे मानव संसाधन विकास मंत्रालय यांनी बाराव्या पंचवार्षिक योजनेअंतर्गत (२०१२-१७) भारतातील उच्च शिक्षणाचे धोरण ठरविण्यासाठी पुढाकार घेऊन *सर्वसमावेशक व दर्जेदार उच्च शिक्षणाचा विकास* या नावाने

१२९ पानांचे व्हिजन डॉक्युमेंट प्रसिध्द केले. या अंतर्गत संधी, प्रावीण्य आणि समता या तीन तत्वांच्या आधारे भारताला उच्च शिक्षण सकल नोंदणी दर २५ टक्क्यापर्यंत नेण्याचे उद्दिष्ट निर्धारित करण्यात आले. ज्या जिल्ह्यांमध्ये हा दर कमी आहे अशा जिल्ह्यांमध्ये १६ नवीन केंद्रीय विद्यापीठे, ३७४ मॉडेल महाविद्यालये आणि २० महिला विद्यापीठे स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला.

२) त्याचबरोबर विद्यापीठ अनुदान आयोग व केंद्र सरकार यांनी राष्ट्रीय उच्च शिक्षा अभियान (Rashtrya Ucch Shiksha Abhiyan RUSA) *रुसा* या नावाने एक योजना तयार केली आहे. सदर योजनेच्या यशस्वितेसाठी सरकारला १,८४,७४० कोटी डॉलर्सची भांडवली गुंतवणुक करावयाची आहे. ही केंद्र सरकारची एक धोरणात्मक योजना आहे. भारतातील शहरी आणि ग्रामीण भागातील सकल नोंदणीच्या दरातील दरी भरुन काढण्यासाठी या योजनेचा समावेश *सर्वसमावेशक व दर्जेदार उच्च शिक्षणाचा विकास* या योजने अंतर्गत करण्यात आला.

राष्ट्रीय उच्च शिक्षा अभियान योजनेत उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात अनेक आमुलाग्र बदल सुचविण्यात आले आहेत. त्यातील महत्वपुर्ण बदल पुढीलप्रमाणे:

१) महाविद्यालयांच्या संलग्नीकरण पध्दतीत संपूर्णपणे सुधारणा करुन नविन पध्दती अंमलात आणणे.

२) *उच्च शिक्षणातील बहुविधतेचा निर्देशांक* हे नवीन परिमाण बनविणे.

३) राष्ट्रीय स्तरावर नियंत्रणासाठी National Assesment & Accreditation Council NAAC यासारखी National Monitering Cell स्थापन करणे.

४) उच्च शिक्षणाचे व्यवस्थापन तत्पर, पारदर्शक व सुविहित करण्यासाठी या क्षेत्रातील सरकारी दफ्तरदिरंगाई नष्ट करणे.

५) राज्यस्तरावरील विद्यापीठांना स्वायत्तता देणे.

६) उच्च शिक्षणात राज्य सरकार व राज्यस्तरीय विद्यापीठे यांच्या जबाबदाऱ्या निश्चीत करणे.

७) उच्च शिक्षणाचे नियोर्जन आणि पर्यवेक्षण याबाबत केंद्रसरकार इतकीच जबाबदारी राज्य सरकारलाही देणे.

८) सध्या भारतात उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात ज्या संस्था कार्यरत आहेत; त्यांची यथायोग्य भागीदारी ठरवून त्यांना उच्च शिक्षणासाठी जबाबदार ठरविणे.

९) युजीसीच्या संघटनात्मक मर्यादा आहेत, त्या लक्षात घेऊन त्या उच्च शिक्षण धोरणात अडसर ठरणार नाहीत याकडे लक्ष देणे.

उच्च शिक्षणाचे नियोजन आणि पर्यवेक्षण, तसेच निधीबाबतची जबाबदारी राज्य सरकारवर टाकल्याने प्रत्येक राज्याला उच्च शिक्षणासाठी एक स्वतंत्र *उच्च शिक्षण मंडळ* स्थापन करणे आवश्यक आहे. प्रत्येक महाविद्यालयाला उच्च शिक्षण क्षेत्रातील बदल व अपेक्षा यांना अनुसरुन स्वत:मध्ये आर्थिक व तांत्रिक बाबतीत जगाशी जुळवून घेण्याची क्षमता निर्माण करावी लागेल. प्रत्येक महाविद्यालयाला *राष्ट्रीय उच्च शिक्षा अभियान* या अंतर्गत सहभाग निश्चित करण्यासाठी संलग्नीकरण करावे लागेल.

एकंदरीत या अभियानामुळे उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात अनेक बदल घडून येणार आहेत, असे चित्र रंगविण्यात आले आहे.

*राष्ट्रीय उच्च शिक्षा अभियान* राबविण्यासाठी सरकार सार्वजनिक व खाजगी भागीदारी (PPP) या सूत्राचा अवलंब करणार आहे. केंद्रीय विद्यापीठे, तसेच राज्यस्तरीय विद्यापीठांना बऱ्याच मोठ्या प्रमाणात स्वायत्तता देण्यात आली आहे. या अभियानात सार्वजनिक व खाजगी भागीदारीची (PPP) तीन प्रारुपे (Models) मांडण्यात आली आहेत, त्यांना न्यु मॉडेल्स असे संबोधण्यात आले आहे.

१) पहिले प्रारुपः

खाजगी क्षेत्र उच्च शिक्षणासाठी आवश्यक पायाभूत संरचना आणि भौतिक सुविधा निर्माण करणार, त्यासाठी आवश्यक ती भांडवली गुंतवणूक करणार आणि सरकार प्रत्यक्ष शिक्षण देण्याचे कार्य करणार. पायाभूत संरचना निर्माण करुन दिल्याबद्दल सरकार खाजगी क्षेत्राला योग्य तो मोबदला देणार. या प्रारुपाला बेसिक इन्फ्रास्ट्रक्चर मॉडेल असे नाव देण्यात आले.

२) दुसरे प्रारुपः

या प्रारुपाला आऊट सोर्सिंग मॉडेल असे म्हटले आहे. यानुसार खाजगी क्षेत्र उच्च शिक्षणासाठी आवश्यक पायाभूत संरचना आणि भौतिक सुविधा निर्माण करणार आणि उच्च शिक्षण देण्याचे कार्य देखील करणार. फक्त त्यावर नियंत्रण आणि पर्यवेक्षण सरकारद्वारे करण्यात येईल. तसेच खाजगी क्षेत्राच्या सक्रिय सहभागाबद्दल सरकारकडुन योग्य मोबदलादेखील देण्यात येईल.

३) तिसरे प्रारुपः

या प्रारुपाला हायब्रीड किंवा इक्विटी मॉडेल असे संबोधण्यात आले आहे. या प्रारुपात सरकार आणि खाजगी क्षेत्र एकत्रितपणे पायाभूत संरचना आणि भौतिक सुविधा निर्माण करतील, तसेच त्यासाठी एकत्रितपणे भांडवल गुंतवणूक देखील करणार. उच्च शिक्षण देण्याची जबाबदारी मात्र संपूर्णतः खाजगी क्षेत्राकडे सोपविण्यात येईल.

### राष्ट्रीय उच्च शिक्षा अभियानाचे मूल्यमापनः

विद्यापीठांच्या परंपरागत चौकटीतून बाहेर काढून उच्च शिक्षण जागतिकीकरणाच्या आव्हानांना सामोरे जाणारे आणि आजच्या बाजारव्यवस्थेला पूरक ठरणारे असावे, या उद्देशातून राष्ट्रीय उच्च शिक्षा अभियान योजना आखण्यात आली असली तरी वरील प्रारुपांचे सखोल निरीक्षण केल्यास अनेक त्रुटी आढळुन येतात.

१) उच्च शिक्षणाची जबाबदारी अत्यंत हुशारीने सरकारने स्वतःच्या खाद्यांवरुन दूर करुन खाजगी क्षेत्राकडे ढकलली आहे.

२) या अभियानात समाविष्ट असणाऱ्या महाविद्यालयांना व राज्यस्तरावरील विद्यापीठांना बऱ्याच प्रमाणात स्वायत्ता देण्यात आली आहे. त्यानुसार शिक्षण शुल्कात दर तीन वर्षांनी १०% वाढ करण्याची परवानगी देखील या स्वायत्तेत समाविष्ट आहे. शिक्षण शुल्कातील ही वाढ खाजगी क्षेत्रातील गुंतवणुकदारांचे हित जपण्यासाठीच आहे, हे उघड सत्य आहे.

३) राष्ट्रीय उच्च शिक्षा अभियानांतर्गत समाविष्ट तीनही प्रारुपे खाजगी क्षेत्राला उच्च शिक्षा शिक्षणात सहभागी करुन घेण्याशी संबंधित आहेत. ही तीनही प्रारुपे सरकारला उच्च

शिक्षण देण्याच्या स्वतःच्या जबाबदारीतून तर मुक्त करतातच, पण त्याचबरोबर हे सर्व नफा प्राप्तीचे नवउदारमतवादी मार्ग आहेत, हे लक्षात घेतले पाहिजे.

४) सर्वात महत्वाचे म्हणजे ज्या शहरी व ग्रामीण भागातील शैक्षणिक दरी नष्ट करण्यासाठी राष्ट्रीय उच्च शिक्षा अभियानाचा प्रारंभ करण्यात आला, त्या सर्वसमावेशक व दर्जेदार उच्च शिक्षणाचा विकास या मुलतत्वालाच या प्रारुपांमुळे धक्का बसतो. खाजगी क्षेत्र शहरी व ग्रामीण भागातील शैक्षणिक दरी (असमान सकल नोंदणीदर) दूर करण्यासाठी खरेच प्रयत्न करील का? की या प्रारुपांमुळे ही दरी अधिकच रुंदावेल?

५) देशात अस्तित्वात असलेल्या महिला विद्यापीठांचे प्रश्न वेगळे आहेत. या अभियानात त्यांचे स्थान किंवा भूमिका काय? याचे स्पष्टीकरण नाही.

६) या अभियानामुळे उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात आमुलाग्र बदल होतील. जागतिक आर्थिक, तांत्रिक बदलांशी सामंजस्य साधले जाईल. जागतिक दर्जाचे शिक्षण भारतीय विद्यार्थ्यांना प्राप्त होईल हा सरकारचा आशावाद खरच फलद्रुप होईल का?

७) राष्ट्रीय उच्च शिक्षा अभियानाच्या अवलोकनातुन असेच स्पष्ट होत आहे की, सरकारला स्वतः उच्च शिक्षणाच्या जबाबदारीतून मुक्त व्हावयाचे आहे. त्यासाठी उदारीकरणाच्या नावाखाली उच्च शिक्षणाचे खाजगीकरण करण्याचे धोरण अवलंबिले आहे.

उच्च शिक्षणाचे आधुनिकीकरण करणे हे जेवढे आवश्यक आहे, त्यापेक्षा त्यासाठी नक्की काय करणे आवश्यक आहे यावर सखोल विचार करण्याची आवश्यकता आहे. असे जर केले नाही तर भविष्यात उच्च शिक्षणाच्या सर्व दोऱ्या शिक्षण सम्राटांच्या हातात जाण्याचा धोका आहे. सद्यस्थितीतही अनेक राज्य सरकारांनी अनेक तथाकथित शिक्षण सम्राटांना स्वस्त दराने जमिनी दिलेल्या आहेत. याच मोहाने भविष्यात बहुराष्ट्रीय कंपन्या देखील स्वतःची विद्यापीठे स्थापन करुन सरकार कडून विविध प्रकारची मदत प्राप्त करतील. नविन सांपत्तिक साम्राज्ये निर्माण होतील, मात्र खरे उच्च शिक्षण हे दूरचे स्वप्नच राहील.

**संदर्भसुची:**


1) An article on Academia Industry Interaction-Daily Maharashtra Times Dated 21st July 2013.
2) Recommedations of National Knowledge Commission.
3) National Policy on education 1992.
4) Approach paper on 12th Five year plan.
5) An article in 'Daily Loksatta' Dated 4th March 2014.

# आदिवासी जमाती: आर्थिक-सामाजिक समस्या

**मनोज गायकवाड, शहादा,**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख
वसंतराव नाईक महाविद्यालय, शहादा, जि. नंदुरबार.
ई-मेल: dr.manojgaikwad358@gmail.com
भ्रमणध्वनी: ०९४२३११९४७३४

संविधानाची सहा दशके पूर्ण झालेली असतांना सुद्धा संविधानाच्या प्रास्ताविकेतील न्याय, स्वातंत्र्य, समता, बंधुता निर्माण करण्याचे अभिवचन देशातील दलित-आदिवासी, भटके, स्त्रिया, इतर मागासवर्गीयांसाठी पूर्ण होऊ शकले नाही. त्यांच्या सामाजिक दर्जात फारसा बदल झालेला नाही. या वर्गाच्या सर्वांगीण विकासासाठी संविधानात विविध तरतूदी दिलेल्या असतांना फक्त सदर तरतूदींची प्रामाणिक अंमलबजावणी होत नसल्याने संविधानातील अभिवचन पूर्ण होतांना दिसत नाही. परिणामी आदिवासी व बिगर आदिवासी समाजात विकासाबाबत असंतुलन दिसून येते या वंचनेसाठी शासन, प्रशासन, आदिवासी नेते व स्वतः लाभार्थी सुद्धा बऱ्याचशा प्रमाणात जबाबदार असल्याचे जाणवते. विकासाचे तौलनिक मोजमाप साक्षरता, अनारोग्य, रोजगार, कुपोषण, दारिद्रय इत्यादी घटकांच्या माध्यमातून करण्यात येत आहे. या मूल्यमापनातून आदिवासी जमातीच्या सामाजिक व आर्थिक विकासाची चिकित्सा करण्यात येते.

महाराष्ट्रात गेल्या ४ दशकात विकासाची जी घोडदोड सुरू आहे. त्यात विकासाबाबत प्रादेशिक असमतोल मोठ्या प्रमाणात निर्माण झालेला आहे. त्याचा अप्रत्यक्ष परिणाम आदिवासी जमातीचे मागासलेपण टिकून राहण्यावर झालेला दिसून येतो. २००१ च्या जनगणनेनुसार देशात सर्वाधिक आदिवासींची लोकसंख्या महाराष्ट्रात आहे ती जवळपास ८.८५% असून ती राज्याच्या सीमावर्ती भागात प्रामुख्याने सह्याद्री, सातपुडा, गोंडवन या डोंगरदऱ्याच्या विभागात वास्तव्यास आहे. परिणामी सदर जमाती विकासाच्या मुख्य प्रवाहा बाहेर फेकल्या गेल्याचे दिसून येते. १९९६-९७ च्या बेंचमार्क सर्वेक्षणाने उपयोजना क्षेत्रात ९१.११% आदिवासी कुटूंबे आजही दारिद्रय रेषेखाली असल्याचे म्हटले आहे. यात आजही फारसा फरक झालेला दिसत नाही.

## आदिवासी व बिगर आदिवासींचा आर्थिक-सामाजिक विकास:

सामाजिक व आर्थिक विकासाचे निर्देशक तपासतांना आदिवासी व बिगर आदिवासी समाज याचे तुलनात्मक अध्ययन करून आदिवासी जमातीचे सामाजिक-आर्थिक परिस्थितीची वास्तवता दर्शविण्यात आली आहे. यासाठी विकास निर्देशक म्हणून चार घटकांचा स्वतंत्र अभ्यास करण्यात आला आहे. १) साक्षरता, २) विद्यार्थ्यांवरील शैक्षणिक वार्षिक खर्च, ३) कष्टकरी विद्यार्थ्यांचे प्रमाण, ४) आरोग्य इ.

अ) राज्यातील आदिवासी व बिगर आदिवासी यांच्यातील साक्षरता प्रमाण:

२००७-०८ मध्ये बिगर आदिवासीची साक्षरता ७७.८% तर आदिवासी जमातीची ५५.४% साक्षरता होती. त्यात पुरूष ८६.३ व ६९.१% व स्त्रिया ६९.१ व ४०.९% अशी अनुक्रमे साक्षरता दिसून येते. तसेच शाळेतील एकूण पटनोंदणीचे प्रमाण या काळात या दोन्ही समाजामध्ये साधारणपणे उच्च प्राथमिकमध्ये अनुक्रमे ८६.८ व ८०.३% होते तर माध्यमिक व उच्च माध्यमिकमध्ये हे प्रमाण निम्मेच्या जवळपास अनुक्रमे ५६.५ व ३५.१% होते आणि निव्वळ उपस्थितीच्या प्रमाणातही या दोन्ही समाजात तफावतीची मोठी दरी दिसून येते. प्राथमिक शाळेतील मुला-मुलींच्या उपस्थितीचे प्रमाण अनुक्रमे बिगर आदिवासींचे ८६.५% व ८६.७% तर जमातीचे ७०.२% व ६५.६% असे दिसून येते. अर्थात जमातीच्या शाळेतील अनुपस्थित राहण्याचे प्रमाणे ३५% पेक्षा जास्त दिसून येते. तसेच या काळात ६ ते १७ वय वर्षे असलेल्या शाळाबाह्य मुला-मुलींचे प्रमाणही या दोन्ही समाजात अनुक्रमे साधारण समाजात १५.९% त्यात मुले १४.३% व मुली १७.६% होते तर जमातीतील हे प्रमाण अनुक्रमे ३४.५% त्यात मुले २९.८% व मुली ४०.७% असे होते. अर्थात सामाजिक स्तर उंचावण्यासाठी शिक्षण हा घटक महत्वाची भूमिका बजावत असतो. साधारण समाजापेक्षा जमातीचे साक्षरतेचे अल्प प्रमाण तर दिसून येतेच पण त्यात ही शाळेतील गळतीचे प्रमाण मोठे आहे व उच्च शिक्षणात अल्प बनते. तसेच शाळाबाह्य मुला-मुलींचे प्रमाणही तुलनात्मक दृष्ट्या खूप मोठे आहे. ही सामाजिक दरी कमी करणे शासन व समाजातील कर्त्या सुधारकांना आव्हानच आहे. कारण यातून जमातीचे सामाजिक व आर्थिक प्रश्न बिकट बनत चालल्याचे दिसून येत आहे.

ब) विद्यार्थ्यांमागे सरासरी वार्षिक खर्चाचे प्रमाण (२००७-०८) :

शासनाच्या विद्यार्थी निहाय खर्च करण्याचे प्रमाण वास्तवता दर्शवते. साधारण समाजातील विद्यार्थ्यास वार्षिक ४५११/- रूपये खर्च केले जातात तर आदिवासी जमातीतील विद्यार्थ्यांसाठी फक्त रू. १२९७/- एवढेच खर्च केले जातात. शैक्षणिक खर्चाचा परिणाम शिक्षणाच्या गुणवत्तेवर तीव्र स्वरूपात होतो. त्यामुळे स्पर्धाक्षम होण्यास हे विद्यार्थी कमी पडतात. परिणामी उच्च दर्जाच्या व चांगल्या वेतनी रोजगाराच्या संधीना त्यांना मुकावे लागते. शासनाचा हा दुजाभाव सामाजिक दरी निर्माण करणारा आहे. परिणामी त्याचे आर्थिक व सामाजिक मागासलेपण दीर्घकाळ टिकून राहण्यास शासनाची नितीच कारणीभूत ठरते.

तक्ता क्र. १

आरोग्याबाबतचे निदर्शक

| अ.क्र. | निदर्शक (२००५-०६) | बिगर आदिवासी समाज | आदिवासी जमाती |
|---|---|---|---|
| १. | १८ वर्षे असणाऱ्या स्त्रियांचे प्रमाण | ३१.७ | ५१.६ |
| २. | कोणताही ॲनेमिया असलेल्या स्त्रियांचे प्रमाण | ४५.८ | ५८.९ |
| ३. | अर्भक मृत्यू दर | ४०.५ | ५१.४ |
| ४. | पाच वर्षाखालील बालमृत्यू दर | ४७.४ | ६९.८ |
| ५. | लसीकरण झालेल्या मुलांची संख्या | ६२.५ | ३९.३ |

*(स्त्रोत:प्लॅनिंग कमिशन - २०११, पृ.२५३-४०३)*

क) कष्टकरी मुलांचे प्रमाण (२००४-०५):

५ ते १४ वयोगटातील कष्ट करणाऱ्या मुला-मुलींचे प्रमाण आर्थिक विषमतेचे वास्तव दर्शविते साधारण समाजातील मुला-मुलींपेक्षा आदिवासी मुला-मुलींचे प्रमाण शाळा सोडून कुटुंबाला उत्पन्नाचा आधार म्हणून श्रमाची कामे करण्याला पसंती देतांना दिसतात. शाळा बाह्य असलेले आदिवासी जमातीतील मुला-मुलींचे प्रमाण साधारण समाजापेक्षा जादा आहे व ते शाळा सोडून बालमजूरीचे प्रमाण वाढत असल्याचे दिसून येते. कमी वयात कमी वेतनाची कष्टाची कामे करून त्याचे आर्थिक-मानसिक-शैक्षणिक शोषण होत असल्याने त्याचे आर्थिक व सामाजिक विकासावर दूरगामी परिणाम झालेले दिसून येतात.

चांगले आरोग्य हे सुदृढ समाज व देशाचे भूषण समजले जाते किंबहुना भारताची महासत्ताही या घटकावरच अवलंबून आहे. त्यात स्त्रिया व बालकांचे आरोग्य महत्वाचा घटक आहे. वरील तक्त्यात आरोग्याबाबत साधारण व आदिवासी जमातीबाबत सर्वच प्रमाण अधिक असल्याचे दिसून येते. ॲनेमिया, अर्भक मृत्यू दर, बाल मृत्यू दर, लसीकरणाच्या अभावी इत्यादी घटकाचे शेकडा प्रमाण जादा असणे आदिवासी जमातीचे आरोग्य अत्यंत धोकादायक स्थितीत असल्याचे जाणवते. तसेच साधारण समाजातील हे प्रश्नही थोड्या फार प्रमाणात तीव्र असल्याचे आकडेवारीवरून दिसून येते. अर्थात शासन आरोग्याकडे फारसे लक्ष देत नसल्याचे दिसून येते. शासनाने आरोग्याच्या सेवा, औषधी अत्यंत महाग केल्याने सामान्य लोकांना त्या परवडत नाहीत व शासनाच्या आरोग्य सेवा सुमार दर्जाच्या असल्याने लोक त्यांच्याकडे पाठ फिरवितांना अनुभवास येते. एकंदरीत शासनाची आरोग्यनिती सामान्य माणसांना प्रामुख्याने स्त्रिया व बालकांना केंद्रस्थानी ठेवून आखली गेली पाहिजे व तिच्या काटेकोर अंमलबजावणी होण्यावर कटाक्ष ठेवला पाहिजे. त्यासाठी स्वयंसेवी संस्थांना

तक्ता क्र. २

**अंदाजपत्रकीय तरतूद व वास्तव स्थिती**

**वर्ष १९९३-९४ ते २०१०-११ (रु. कोटीत)**

| राज्य योजना नितव्य | योजनेचा प्रत्यक्ष खर्च | ९% प्रमाणे तरतूद | आदिवासी उपयोजना प्रस्तावित तरतूद | आदिवासी उपयोजना प्रत्यक्ष खर्च | अनुशेष निधी | आउयो खर्चाशी वार्षिक योजना खर्चाशी % | आउयो खर्चाशी प्रस्तावित तरतूदीशी % |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २५४८०५.९६ | २२५५२४.४४ | २२९३२.५ | १७८५७.२९ | १५३२४.६० | ७६०७.६० | ६.२८ | ८५.६३ |

*(स्रोत: महाराष्ट्र राज्य वार्षिक योजना व आदिवासी उपयोजना २०११-१२)*

तसेच ग्राम समित्यांना अधिकार प्रदान केले पाहिजे तेव्हा सामाजिक आरोग्याचा निर्देशांक वाढू शकतो.

## आदिवासी उपक्षेत्रातील विकास निधी व निधी अनुशेष:

१९९३-९४ ते २०१०-११ या कालखंडात आदिवासी जमातीच्या विकासासाठी ज्या विविध योजना राबविण्यात आल्या त्यासाठी लोकसंख्येच्या प्रमाणात सांविधानिक तरतूदीनुसार अर्थात ९% प्रमाणे अंदाजपत्रकात तरतूद करणे आवश्यक आहे. फार कालखंडापर्यंत हा नियम न पाळल्याने आदिवासी जमातीच्या विकासावर त्याचे प्रतिकुल परिणाम झालेले दिसून येतात. याला अंमलबजावणी यंत्रणा व दलाल यांच्या भ्रष्ट्राचाराच्या साखळीचाही संबंध आहे. योजनेतील लाभ लाभार्थ्यांपर्यंत पुरेशा प्रमाणात पोहचलेले दिसून येत नाही. निधी बाबतची वास्तव्यस्थिती वरील तक्त्यात दर्शविली आहे. अंदाज पत्रकातील ४ अन्वये २२९३२.५ कोटी तरतूद अपेक्षित होती पण प्रत्यक्षात फक्त १५३२४.६० कोटी एवढीच तरतूद खर्ची झाल्याचे दिसते. जवळपास सात हजार सहाशे सात कोटी साठ लाख एवढा निधीचा अनुशेष दिसून येतो. सदर निधीचा अनुशेष विकासावर प्रतिकूल परिणाम घडवून आणतो म्हणून शासनाने संविधानिक तरतूदींचे प्रामाणिकपणे पालन करणे आवश्यक आहे. परिणामी संविधानिक अभिवचने पूर्ण होण्यास मदत होवू शकते.

## शासनाची मद्यनिती व आदिवासीचा विकास:

आदिवासीच्या सांस्कृतिक परंपरेत मद्याला महत्त्वाचे स्थान देण्यात आलेले दिसते. परंतु सदर परंपरेवर प्रासंगिक मर्यादेची चौकट उभी करणे सर्वंकष विकासाच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. परंतु शासनाची गेल्या पाच दशकातील मद्यनिती आदिवासींच्या जीवनावर प्रतिकूल परिणाम करणारी दिसून येत आहे. त्यामुळे आदिवासी जमाती मद्याच्या व्यसनात अडकल्याने त्यांच्या आर्थिक व सामाजिक विकासात ऱ्हास होतांना दिसत आहे. शासनाच्या विकास योजनाची परिणामकारकता दिसून येत नाही. शासनाच्या मद्यनितीचा नंदुरबार जिल्ह्यावर झालेला परिणाम

तक्ता क्र.३: नंदुरबार व नवापूर तालुक्यातील मद्यविक्रीचा तपशील

| मद्य प्रकार | नंदुरबार शहर | | नवापूर शहर | |
|---|---|---|---|---|
| | नोव्हेंबर -२०११ | नोव्हेंबर -२०१२ | नोव्हेंबर -२०११ | नोव्हेंबर -२०१२ |
| देशी दारू | ४१७७६ | ५५२८५ | १००१४३ | ११६३३० |
| फॉरेन लिकर | २३२८८ | ३४३१८ | ८९७३ | २६२९७ |
| फर्मेंटेट बिअर | ४३७५४ | ५३०३८ | ९४३०८ | ११३२९४ |
| माईल्ड बिअर | ३६७८ | ४०५९ | २१४३७ | १५१२४ |
| वाईन | १८५ | १४२ | ४९ | ७२ |
| एकूण (लिटर) | **११२०८१** | **१४६८४२** | **२२४९१०** | **२७११११७** |

स्त्रोत: http://stateexcise.maharashtra.gov.in/EXCISE/liqur/c/.html

भयावह वास्तवता समोर आणतांना दिसतो.

शासनाच्या अबकारी खात्याच्या वेबसाईडवरील माहिती प्रमाणे नंदुरबार या आदिवासी बहुल जिल्ह्यात २००२-०३ या वर्षात ३,१२,००० लिटर देशी दारूची विक्री झाली आणि पुढच्या सात वर्षात हे प्रमाण सात पट वाढले. २०१०-११ पर्यंत तब्बल ३९६४००० लिटर देशी दारू विकली गेली. सध्याच्या बाजार भावाप्रमाणे (२०० रू. लिटर) ही दारू ८० कोटी रूपये इतक्या किंमतीची होती. जिल्ह्यातील देशी दारूचे उपभोक्ते सर्वसाधारण समाजाच्या पेक्षा आदिवासी बांधवच जास्त असल्याचे लोकसंख्येच्या आधाराने सांगत येते. नंदुरबार शहर व नवापूर तालुक्यात मद्यविक्रीची स्थिती तक्ता क्र.३ मध्ये दर्शविली आहे. या तक्त्यातील स्थिती नोव्हेंबर महिन्याची दर्शविली आहे. यात सातत्याने वाढ होत आहे. धक्कादायक बाब ही की, नंदुरबार पेक्षा नवापूर तालुक्यात देशी दारू व बिअर जवळपास दुप्पट प्रमाणात विकली जाते. नवापूर तालुक्यात जवळपास ८४.८८% संख्या आदिवासी जमातीची आहे. अर्थात ही दारू संख्यात्मक दृष्ट्या आदिवासी जमातीनी प्राशन केली असेल यात शंका नाही. नवापूर तालुक्यात एका महिन्यातील देशी दारूची विक्री २,३२,६६,०००/- (रू.२०० लिटर प्रमाणे) तर विदेशी दारूची विक्री किंमत १,३१,४८,५००/- (रू.५०० लिटर प्रमाणे) इतकी आहे. सर्व प्रकारच्या दारूची किंमत महिन्याला सुमारे पाच कोटी तर वार्षिक ६० कोटी होते. तर प्रत्येक व्यक्तीमागे सरासरी वार्षिक रू. २५००/- एवढी आहे. हे फार भयानक वास्तव आहे. ज्यामुळे सामाजिक व आर्थिक स्थिती बिकट असल्याचे दिसून येते.

आदिवासी उपयोजनेचे २०११-१२ वर्षाचे सार्वजनिक आरोग्याचे बजेट रू. ३२.११ कोटी इतकेच होते. या पेक्षा सुमारे दुप्पट किंमतीची दारू फक्त एकाच तालुक्यात विकली जात असेल तर आरोग्य बजेटच्या

तरतूदीचा काय अर्थ निघतो.

तंबाखू उपभोगाबाबतही असेच दिसून येते. आदिवासी भागात ६०% लोक तंबाखूचे व्यसन करतात. गडचिरोली सारख्या एका जिल्ह्यात वर्षाला ७३ कोटी रूपये यावर खर्च होतात. असे 'सर्च' संस्थेच्या अभ्यासावरून दिसून आले आहे. मद्यनिती, गुटखा, तंबाखू इ. बाबत शासन गंभीर नसल्याचे दिसून येते.

निष्कर्ष :

आदिवासीच्या सामाजिक व आर्थिक विकासाची विंवचना स्वातंत्र्याच्या ६४ वर्षा नंतरही संपलेली दिसून येत नाही. शासनाने केलेले प्रयत्न अपूर्ण व पुर्ण कार्यक्षमतेचे दिसून येत नाही. शासकीय धोरणाची अंमलबजावणी धरसोडीची असून आदिवासी जमाती-बिगर आदिवासी समाजापेक्षा आपल्या हक्क व अधिकारा बाबत फारशा जागृत झालेल्या दिसत नाही. योजनांबाबत पूर्ण माहितीचा अभाव दिसून येतो व सदर योजनाचे लाभ प्राप्त करून घेण्याच्या क्षमतांचा अभाव दिसून येतो. शिक्षण व आरोग्य हे कुटुंबाच्या राहणीमानाचे महत्वाचे निदर्शक समजले जातात पण त्या बाबत जाणीव जागृतीचा अभाव त्या बाबत संरचनात्मक संसाधनाच्या सोयीचा अभाव, निधीच्या अनुशेषाचा व योजनातील भ्रष्ट्राचाराचे प्रश्न आदिवासींच्या विकासावर प्रतिकुल परिणाम घडवून आणतांना दिसून येतात. शाळाबाह्य व कष्टकरी मुलांचे प्रमाण कमी होवून या विद्यार्थ्यांना मुख्य प्रवाहात आणून स्पर्धाक्षम करणे आवश्यक आहे व विकासाबाबतचा क्षेत्रीय असमतोल आदिवासी जमातीच्या विकासावर परिणाम करणार नाही याकडे सर्व घटकांनी लक्ष देणे आवश्यक आहे. असे झाले तरच सामाजिक, आर्थिक विकासाची विंवचना संपुष्टात येवू शकते व खऱ्या स्वातंत्र्याची अनुभूती आदिवासी जमातींना व तत्सम परिस्थितीत खितपत पडलेल्या लोकांना होऊ शकते सांविधानिक अभिवचने पूर्ण होवू शकतात हे सांगता येते.

उपाय:

१) घटनात्मक हक्क व कायदेशीर हक्क या बाबत जाणीव जागृती करून धोरणाची काटेकोर अंमलबजावणी, लाभार्थ्यांच्या हक्क पूर्तीचे सामाजिक अंकेक्षण करणे.

२) जल, जमीन व जंगल या नैसर्गिक साधन संपत्तीवर त्यांचा मालकी हक्क प्रस्थापित होईल अशी परिस्थिती निर्माण करणे.

३) शिक्षण व आरोग्य यांची आदिवासी जमातीशी त्यांच्या भौगोलिक परिस्थितीला अनुरूप अशी सुसंगत निती तयार करून तिची प्रामाणिक अंमलबजावणी करणे.

४) आदिवासी जमातीच्या विकासासाठी घटनात्मक तरतूदीनुसार निधीची तरतूद व वितरण करणे आवश्यक आहे.

संदर्भ सूची:

१) नियोजन आयोग भारत सरकार, नवी दिल्ली २०११ (पृ. २५३ ते ४०३)

२) यशदा, पुणे २०१२

३) महाराष्ट्र राज्य वार्षिक योजना व आदिवासी उपयोजना, २०११-१२

४) आसंप्रस, आश्रमशाळा मुल्यमापन अहवाल २००८-०९ आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणे, २००९

५) टीआरटीआय - ह्युमन डेव्हलपमेंट इंडिकेटर्स अभंग ४ शेड्युल ट्राईब ऑफ

महाराष्ट्र, ट्रायबल रिसर्च इन्स्टीट्युट पुणे, २००९.

६) महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र राज्य सांख्यिकीय गोषवारा, २००७-०८ अर्थ व सांख्यिकी संचालनात्मक मुंबई- २०१०

७) महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०११-१२

८) http/state. excise. maharashtra. gov. 14/EXCISE/Liqur/c/html

## 'अर्थसंवाद' चे लेखक व्हा
## *ग्रामीण अर्थव्यवस्था विशेषांक*

***अर्थसंवादः एप्रिल-जून २०१५*** हा ***ग्रामीण अर्थव्यवस्था विशेषांक*** प्रकाशित करावयाचा आहे. या विशेषांकासाठी आजीव सदस्यांनी सामान्यपणे ५/६ पृष्ठांचा लेख प्रमुख संपादकाकडे दि.१० मे २०१५ पर्यंत पाठवावा. या विश्लेषणात्मक लेखांमध्ये शक्यतो तक्ता घेऊ नये. अगदीच आवश्यक असेल तर लहान आकाराचा तक्ता घ्यावा. या विशेषांकात जास्तीत जास्त संशोधनपर लेख प्रकाशित करता यावेत यासाठीच हे सूचित करण्यात आले आहे.

विशेषांकासाठी लेखांचे विषय याप्रमाणे आहेत-

१) ग्रामीण अर्थव्यवस्था आणि संरचनात्मक बदल, २) शेती आधारित ग्रामीण उद्योग ३) ग्रामीण भागाच्या विकासासाठी शासन योजना, ४) ग्रामीण भारतातील पर्यटन उद्योग, ५)ग्रामीण भारतातील शेती क्षेत्राची वाटचाल, ६) जागतिकीकरणाच्या काळात ग्रामीण अर्थव्यवस्थेतील बदल, ७) ग्रामीण भागातील लघु, मध्यम व मोठ्या उद्योगांचा विकास, ८) भारतातील/महाराष्ट्रातील ग्रामीण भागाची आर्थिक वाटचाल, ९) बँकिंग क्षेत्र व ग्रामीण विकास १०) ग्रामीण भारतातील/महाराष्ट्रातील बेकारी व दारिद्र्य, ११) ग्रामीण भारतातील/महाराष्ट्रातील जलसिंचन व शेतीविकास, १२) नवीन आर्थिक धोरणाचे ग्रामीण अर्थव्यवस्थेवर परिणाम १३) ग्रामीण क्षेत्रातील प्रादेशिक असमतोल, १४) ग्रामीण अर्थव्यवस्थाः विविध पैलू.१५) ग्रामिण पायाभुत सुविधा (वाहतुक, दळणवळण, शिक्षण, आरोग्य, पाणी पुरवठा).

शोधनिबंध पाठविताना कृपया लेखकांनी फॉण्ट व इतर बाबींसंबंधी पृष्ठ क्र.३४२ वरील चौकट पहावी.

- प्रमुख संपादक, अर्थसंवाद.

# नागपूर जिल्ह्यातील लिंबूवर्गीय फलोत्पादन योजना

लिलाधर धनसिंग खरपुरिये, मोहपा,
बॅरि.शेषराव वानखेडे महाविद्यालय,
ता.कळमेश्वर,जि.नागपूर,
भ्रमणध्वनी:८८०६५७१३२४

भारतीय अर्थव्यवस्थेत कृषीक्षेत्रास अतिशय महत्वाचे स्थान असून या क्षेत्राच्या विकासावरच देशातील औद्योगिक विकास व आर्थिक विकास अवलंबून आहे. देशाच्या एकूण लोकसंख्येपैकी ५२ टक्के लोक आजही उपजिविकेकरिता कृषीक्षेत्रावरच अवलंबून आहे. विशेषतः हे लोक खेड्यामध्ये राहतात. कृषी व कृषीशी संलग्न कार्यात गुंतलेली असतात व अंगमेहनतीची कामे करतात. सन २०११ च्या जनगणनेनुसार देशातील एकूण लोकसंख्येपैकी ६८.८४ टक्के लोक ग्रामीण भागात राहतात व या लोकांपैकी ९० टक्क्याहून अधिक लोक उदरनिर्वाहाकरिता कृषीवर अवलंबून आहेत. तसेच देशातील एकूण श्रमशक्तीपैकी ५२ टक्क्याहून अधिक श्रमशक्ती शेती व्यवसायात गुंतलेली असून त्यांची आर्थिक स्थिती कमकुवत आहे. याचाच एक भाग भारतीय शेतकरी आहे. म्हणून शेतीचा व शेतकऱ्यांच्या सर्वांगीण विकासाकरिता कृषीक्षेत्राच्या विकासाला प्राधान्य देणे काळाची गरज आहे. या करिता व्यापारी, दलाल व सावकार यांच्याकडून होणारी लुट थांबविणे आवश्यक आहे. आर्थिक प्रगती कितीही झाली तरी त्याचा फायदा गरजवंतांना मिळणे आवश्यक आहे. या संदर्भात प्रो.कोल व हूबर हे अर्थशास्त्रज्ञ म्हणतात की, संपूर्ण अर्थव्यवस्थेच्या विकासाकरिता सर्वप्रथम कृषीचा विकास होणे आवश्यक आहे आणि जर एखाद्या अविकसीत क्षेत्रामुळे दुसऱ्या क्षेत्राच्या विकासात अडचण येत असेल तर ते अविकसीत क्षेत्र कृषीच असेल, जे इतर क्षेत्राच्या विकासात अडचण निर्माण करित आहे. म्हणून पीक व पीक लागवड पद्धतीत बदल, नवीन तंत्रज्ञानाचा उपयोग, विपणन व्यवस्थेत सुधारणा, सिंचन व्यवस्थेत बदल होणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र सरकारने इ.स.१९७२-७३ मध्ये रोजगार हमी योजना सुरु केली. या योजनेनुसार महाराष्ट्रातील कोणत्याही प्रौढ व्यक्तीस अकुशल शारीरिक काम देण्याची हमी सरकारने घेतलेली असते. या योजनेचा उद्देश ग्रामीण भागातील आर्थिकदृष्ट्या कमकुवत असलेल्या वर्गाला विशेषतः भूमिहीन शेतमजूर व अत्यल्प

भूधारक शेतकऱ्यांना मदत करणे हा आहे. महाराष्ट्रातील हवामान, शेतीविषयक पर्यावरण संबंधित प्रश्न, ग्रामीण भागात रोजगार निर्मिती व पीक रचना या सर्व गोष्टींचा विचार केल्यास फळबाग लागवडीस राज्यात भरपूर संधी आहे. हे लक्षात घेता शेतकऱ्यांची आर्थिक प्रगती घडविणे व पडीत जमिनीचा विकास करणे. या हेतुने रोजगार हमी योजनेशी निगडीत फळबाग लागवड कार्यक्रम राज्यात १९९०-९१ मध्ये तत्कालिन मुख्यमंत्री व भारत सरकारचे माजी कृषीमंत्री शरद पवार यांच्या दूरदृष्टीने ही योजना अंमलात आली.

महाराष्ट्रातील चार विभागांपैकी विदर्भ एक विभाग आहे. विदर्भाचे भौगोलिक क्षेत्र ९७.३३ लाख हेक्टर असून पीक लागवडी खालील क्षेत्र ६०.२७ लाख हेक्टर व पडित जमीन ४.१२ लाख हेक्टर आहे. ओलिताची सोय फक्त १३.३५ टक्के क्षेत्रावर असल्यामुळे मुख्यतः कोरडवाहू शेती प्रचलित आहे. परंतु विदर्भातील ११ जिल्ह्यांपैकी नागपूर जिल्ह्यातील जमीन व हवामान लिंबूवर्गीय फळांना खूप पोषक आहे. लिंबूवर्गीय फळांमध्ये संत्रा, मोसंबी व कागदी लिंबू ही प्रमुख फळे आहेत. प्रस्तुत अध्ययन या तिन्ही फळापर्यंत मर्यादित आहे. तेव्हा फलोत्पादन योजनांचा या फळांच्या लागवडीवर, उत्पादनावर व उत्पादकांच्या उत्पन्नावर काय परिणाम झाला हे अभ्यासण्याचा या लेखात प्रयत्न केला आहे.

**लिंबूवर्गीय फळांचा इतिहासः**

फळे मानवांचे अन्न म्हणून प्राचीन काळापासून ज्ञात आहे. आपल्या वेद पुराणात व धार्मिक ग्रंथात फळांचा उल्लेख आढळतो. चरकसंहिता व सुश्रृतसंहिता या वैद्यकविषयक ग्रंथात अनेक फळांचा उल्लेख आहे. लिंबूवर्गीय फळप्रकारात अनेक फळे येत असली तरी संत्रा,मोसंबी व कागदी लिंबू ही प्रमुख फळे आहेत. लिंबूवर्गीय फळांची लागवड अतिप्राचीन काळापासून भारत, चीन व हिमालयाच्या पायथ्याशी असलेल्या भागात होत आहे. ख्रिस्तासन सुरु होताच या फळांची लागवड भारतातून इतर देशात प्रसारित होऊ लागली. ह्यूम नामक शास्त्रज्ञाच्या मते, रुटेसी घराण्यातील ७८ प्रकारची लिंबूवर्गीय फळझाडे भारतात दिसून येतात. संत्र्यामधील काही प्रकार मोगलसम्राट काळापासून समोर आलेले आहेत. शान नावाचे लोक चीन मधील येन्ना प्रांतातून दक्षिण पूर्व आसाम प्रदेशात ख्रिस्ताच्या काळात आले. त्यांनी आपल्या बरोबर संत्र्याच्या बऱ्याच जाती येथे आणल्यात . संत्रा फळाचा प्रसार सुमारे २०० ते २५० वर्षे ख्रिस्तपूर्व असून भारतातून तो युरोप व अमेरिकेत झाला आहे. नागपूरचे राजे रघुजी भोसले यांनी १८ व्या शतकाच्या शेवटी म्हणजे सुमारे २०० वर्षापूर्वी औरंगाबादवरुन संत्र्याची रोपे आणून नागपूरला लावली.

मोसंबी किंवा गोड नारंगी या फळाचे मूळ स्थान दक्षिण स्पेन किंवा कोचीन चायना हे असून हजारो वर्षापूर्वी तेथून ते भारतात प्रसारित झाले, असे मानले जाते. भारतातून मोसंबी फळाचा प्रसार पुढे पूर्व आफ्रिका व आफ्रिकातून युरोपमध्ये पोर्तुगिज व इतर खलाशांच्या मार्फत झाला असे समजण्यात येते.

कागदी लिंबूचे मुळस्थान मलेशिया असून युरोपमध्ये १७ व्या शतकात प्रसारित झाले. पुढे मलेशियातून ते दक्षिण अमेरिकेत पोहचले. जाड लिंबू किंवा लेमन हे मूलतः भारतातील असून नंतर त्याचा इतर देशात प्रसार झाला.

देशात फलोत्पादनात महाराष्ट्राचा दुसरा क्रमांक लागतो. भारताच्या एकूण फलोत्पादनात महाराष्ट्राचा हिस्सा १४ टक्के आहे. राज्याच्या एकूण क्षेत्रफळापैकी २४ टक्के क्षेत्रावर फळउत्पादन घेतले जाते. लिंबूवर्गीय फळांच्या उत्पादनात मात्र राज्य पहिल्या क्रमांकावर आहे. लिंबूवर्गीय फळात महत्त्वाची फळे संत्रा, मोसंबी व कागदी लिंबू हे आहेत. नागपूर जिल्ह्यात २००० ते २००९ या अध्ययन काळात फलोत्पादन योजनेमुळे लिंबूवर्गीय फळांच्या लागवड क्षेत्रात, उत्पादनात व शेतकऱ्यांच्या उत्पन्नात काय बदल झाले, हे अभ्यासणे आवश्यक आहे.

**अध्ययनाची उद्दिष्ट्ये:**

१) लिंबूवर्गीय फळांच्या लागवड क्षेत्राचा व उत्पादनाचा अभ्यास करणे.

२) लिंबूवर्गीय फळप्रक्रिया केंद्राचा अभ्यास.

३) लिंबूवर्गीय फळांचे बाजारभाव व विक्रीव्यवस्थेचा अभ्यास करणे.

४) लिंबूवर्गीय फळांच्या क्षेत्रातील समस्या सांगून उपाय सूचविणे.

**संशोधन पद्धती:**

प्रस्तुत संशोधनाकरिता प्राथमिक माहिती सर्वेक्षण पद्धतीचा वापर करुन गोळा करण्यात आली आहे. याकरिता प्रश्नावली, अनुसूची व मुलाखती या तंत्राचा उपयोग केला गेला. नागपूर जिल्ह्यातील १३ तालुक्यातून ६५० लिंबूवर्गीय फळ उत्पादक शेतकऱ्यांची निवड करण्यात आली. या निवडीसाठी साधा यादृच्छिक नमुना पद्धतीचा उपयोग केला गेला. या पद्धतीनुसार प्रत्येक तालुक्यातून १० गावे आणि प्रत्येक गावातून ०५ लिंबूवर्गीय फळ उत्पादक घेतलेले आहेत.

तक्ता क्र.१

**नागपूर जिल्ह्यातील लिंबूवर्गीय फळांच्या लागवडीखालील क्षेत्र व उत्पादन**

क्षेत्र-हेक्टर/उत्पादन-मेट्रीक टन

| वर्ष | संत्रा | | मोसंबी | | कागदी लिंबू | |
|---|---|---|---|---|---|---|
| | लागवड क्षेत्र | उत्पादन | लागवड क्षेत्र | उत्पादन | लागवड क्षेत्र | उत्पादन |
| २०००-०१ | ३२६०१.२७ | ८२१५२.१४ | १९८८.४५ | ९३०९.३० | ३३७.७० | ८४३.५५ |
| २००१-०२ | ३०४६८.४७ | २३५९७.६८ | २१०८.४५ | ९८४७.८५ | ३६६.६० | ९१३.९० |
| २००२-०३ | २२६४७.५८ | १०६६३८.५० | २२१२.१६ | १०८७३.५२ | ४१७.८३ | १०१८.१० |
| २००३-०४ | २२९२६.८१ | ७४९७२.४७ | २४९४.३६ | १२८३१.०७ | ४६७.७४ | ११४४.१३ |
| २००४-०५ | २२३०३.४७ | १६०६३३.६१ | ४११४.७३ | २७००२.२० | ४५२.२६ | १६०५.४३ |
| २००५-०६ | १८७०३.९८ | १४०२५६.४२ | ४३०४.३४ | ३००४४.४८ | ५०६.६३ | ७९७.३८ |
| २००६-०७ | २०१६६.६८ | ११६१०१.१७ | ३६८१.०४ | २५४१८.४९ | ५३७.८३ | ११३२.०३ |
| २००७-०८ | ११३६५.२० | ६११७३.८५ | ३८२६.८८ | २११६१.३० | ३७६.१८ | ८१३.३१ |
| २००८-०९ | २५३२४.५८ | ५०१४०.०० | ३८१७.२५ | १६४००.०० | ३१२.०३ | ८१५.२० |
| एकूण | २१४५०८.०४ | ८२४४६५.८४ | २८६२७.६६ | १६२८८८.२१ | ३८५४.८० | ९८८३.०३ |
| सरासरी | २३८३४.२३ | ९१६०७.३२ | ३१८०.८५ | १८०९८.६९ | ४२८.३१ | १०९८.११ |

*स्रोत: जिल्हा अधीक्षक, कृषी अधिकारी कार्यालय, नागपूर*

तक्ता क्र.१ वरुन असे दिसून येते की, अध्ययन काल २००० ते २००९ या वर्षात संत्रा फळाचे एकूण लागवड क्षेत्र २१४५०८.०४ हेक्टर असून सरासरी लागवड क्षेत्र २३८३४.१३ हेक्टर इतके आहे. तर एकूण उत्पादन ८२४४६५.८४ मेट्रिक टन आहे व सरासरी उत्पादन ९१६०७.३२ मेट्रिक टन आहे. मोसंबी फळाचे एकूण लागवड क्षेत्र २८६२७.६६ हेक्टर असून सरासरी लागवड क्षेत्र ३१८०.८५ हेक्टर आहे. एकूण उत्पादन १६२८८८.२१ मेट्रीक टन असून सरासरी उत्पादन १८०९८.६९ मेट्रिक टन आहे.

कागदी लिंबूचे एकूण लागवड क्षेत्र ३८५४.८० हेक्टर आहे व सरासरी लागवड क्षेत्र ४२८.३१ हेक्टर इतके आहे. एकूण उत्पादन ९८८३.०३ मेट्रिक टन असून सरासरी उत्पादन १०९८.११ मेट्रिक टन आहे.

थोडक्यात प्रस्तुत तक्त्याचा अभ्यास करता असे निदर्शनास आले की, फलोत्पादन योजनेअंतर्गत संत्रा फळाची सर्वाधिक लागवड झाली आहे. या फळाची उत्पादकता प्रतिहेक्टर ३.८४ मे.टन आहे. मोसंबी फळाची उत्पादकता प्रतिहेक्टर ५.६९ मे.टन असून कागदी लिंबूची उत्पादकता प्रतिहेक्टर २.६५ मे.टन आहे. म्हणजेच मोसंबी फळाची उत्पादकता इतर दोन फळांपेक्षा जास्त आहे. म्हणून अलिकडे जिल्ह्यात मोसंबी फळांच्या लागवडीत वाढ होत आहे असे दिसून आले.

**फळ प्रक्रिया केंद्र:**

फळ प्रक्रियाद्वारे लिंबूवर्गीय फळातील प्रत्येक भागाचा उपयोग शक्य असल्याने विदेशात जवळजवळ ९५ टक्के फळांवर प्रक्रिया करुन त्यापासून टिकाऊ पदार्थ तयार केले जातात. या लिंबूवर्गीय फळांपासून लायमोनिन नावाचे तेल किंवा अर्क मिळतो. हा अर्क पेय, मद्य, अत्तरे व सुगंधीद्रव्याच्या निर्मितीत वापरतात. लिंबूवर्गीय फळांच्या सालीमध्ये पेक्टीन भरपूर प्रमाणात असते. कॅन्डी व मार्मालेडमध्ये त्याचा उपयोग केला जातो. त्या सालीपासून लॅक्टिन ॲसिडची निर्मिती केली जाते. फळांतील बियांपासून उत्तम प्रतीचे तेल मिळते. बियांची टरफले व रस काढल्यानंतर जो चोथा(कचरा) शिल्लक राहतो. त्यापासून पशु खाद्य तयार केले जाते. लिंबापासून सायट्रिक ॲसिड तयार करतात. या फळांतील हेस्पीरीजन व नारींडीन प्लेवोनाईड्स औषधी द्रव्ये, पेय निर्मितीत वापरतात. हे सर्व फळांवर प्रक्रिया केल्यास शक्य आहे. नागपूर जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर लिंबूवर्गीय फळांचे उत्पादन होते. मात्र या फळांवर प्रक्रिया करणारे कारखाने उपलब्ध नाहीत. जिल्ह्यात ग्रामीण भागात एकमेव प्रक्रिया कारखाना काटोल तालुक्यात असून कित्येक वर्षापासून तो बंद आहे. परिणामी, फळांच्या विविध भागांचा उपयोग होत नाही व फळांना योग्य भाव मिळत नसल्यामुळे फळउत्पादकांचे फार नुकसान होते, असे दिसून आले.

**लिंबूवर्गीय फळांचा बाजारभाव व विक्री व्यवस्था:**

लिंबूवर्गीय फळांची विक्री जिल्ह्यात कळमना बाजार(पं.जवाहरलाल नेहरु कृषी उत्पन्न बाजार समिती, नागपूर) येथे केली जाते. कागदी लिंबूची विक्री मात्र कॉटन मार्केट नागपूर, येथे करण्यात येते. संत्रा व मोसंबीची विक्री लिलाव पद्धतीने होत असून लिंबू फळांची विक्री कट्टा किंवा हारा प्रमाणे होते. संत्रा व मोसंबीची विक्रीनंतर दलाल प्रतिटन ५० किलो काट(सूट)

घेतात. वेळप्रसंगी एक क्विंटलपर्यंत अधिकची सूट घेण्यात येते. जेव्हा की ही सूट बेकायदेशीर असून फळ उत्पादकांवर हा अन्याय आहे. तसेच दलाल दर शेकडा ८ ते १० रुपया पर्यंत दलाली घेत असतात. शिवाय इतर खर्च ही फळ उत्पादकांकडून वसुल केला जातो. हा खर्च फळ उत्पादकांच्या दृष्टीने अधिक असून हानीकारक आहे.

लिंबूवर्गीय फळांचा बाजारभाव फळांच्या मागणी व पुरवठ्यावर अवलंबून असतो. बाजारभाव लिलाव पद्धतीने निर्धारित केला जातो. परंतु, संघटित दलाल व व्यापाऱ्यांच्या लॉबीमुळे फळ उत्पादकांना त्यांच्या फळांकरिता योग्य भाव मिळत नाही. तसेच फळांच्या हमी भावाचा अभाव असल्यामुळे प्रचलित भावानेच फळांची विक्री करावी लागते. परिणामी, फळ उत्पादकांचे अतोनात नुकसान होते, असे निदर्शनास आले.

**लिंबूवर्गीय फळांच्या क्षेत्रातील समस्या:**

१) फळझाडांच्या लागवडीकरिता रोगग्रस्त व निकृष्ट जातीच्या कलमांचा पुरवठा केला जातो.
२) फलोत्पादन योजनांतर्गत मिळणारे अर्थसहाय्य अपूर्ण व चुकीच्या पद्धतीने वितरित केले जाते.
३) फळझाडांची लागवड अयोग्य जमिनीत केली जाते.
४) फळबागांना पाणी देण्याकरिता पर्याप्त सिंचन साधने उपलब्ध नाही.
५) सिंचनाकरिता आधुनिक ठिबक व तुषार सिंचन पद्धतीचा वापर कमी केला जातो.
६) वीज कपातीमुळे फळबागांना नियमित पाणी पुरवठा होत नाही.
७) रासायनिक खताच्या कमतरतेमुळे फळबागात सूक्ष्म अन्नद्रव्याची कमतरता निर्माण होऊन उत्पादन घटते.
८) जास्त काळपर्यंत फळे झाडांवर ठेवली जात असल्यामुळे झाडांची कार्यक्षमता कमी होते.
९) बुरशीसारख्या रोगांचा फळबागेत मोठ्या प्रमाणात प्रादुर्भाव आहे.
१०) शासकीय शिफारशींप्रमाणे फळबागेची मशागत करण्यात येत नाही.
११) रोग व कीडीचा बंदोबस्त करण्याकरिता पीक संरक्षण उपायांचा अवलंब करण्यात येत नाही.
१२) फळांची विक्री करण्याकरिता राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय बाजारपेठांची कमतरता आहे.
१४) फळबागेतील मातीचे परीक्षण केले जात नाही.
१५) फळांच्या हमीभावाचा अभाव आहे.
१६) फळांवर प्रक्रिया करणाऱ्या कारखान्यांचा अभाव आहे.
१७) पक्के तसेच डांबरी रस्त्यांची दैनावस्था आहे.
१८) हवामानावर आधारित पीक विमा योजनेची संरक्षित रक्कम कमी असून शेतकऱ्यांवर विम्याचा हप्ता अधिक आहे.

**उपाययोजना:**

१) फलोत्पादन योजनांचा लाभ समाजातील गरिब, गरजवंत शेतकऱ्यांना प्रथम मिळावा. जसे-विधवा महिला शेतकरी, अपंग शेतकरी किंवा त्यांचे कुटुंबातील सदस्य व अत्यल्पभूधारक शेतकरी यांना प्राधान्य द्यावा.
२) शासनाद्वारे फलोत्पादन योजनेमार्फत देण्यात येणारे अर्थसहाय्य वेळेवर व सारख्या दोन

हप्त्यात द्यावा.

३) फलोत्पादन योजनेमार्फत निरोगी व चांगल्या जातीच्या लिंबूवर्गीय फळझाडाच्या कलमा पुरविण्यात याव्यात. रोपवाटिकाधारक रोगग्रस्त कलमा पुरवित असल्यास असे करणाऱ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करावे.

४) फळांच्या लागवडीकरिता नवीन तंत्रज्ञानाचा वापर व प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करावे.

५) जास्तीत जास्त फळउत्पादक शेतकऱ्यांनी आधुनिक सिंचन पद्धतीअंतर्गत ठिबक व तुषार सिंचन पद्धतीचा वापर करावा.

६) फळउत्पादकांनी फळझाडे लावण्यापूर्वी मातीचे परीक्षण करावे.

७) फळउत्पादकांनी लागवड योग्य जमिनीतच फळझाडांची लागवड करावी. चोपण किंवा पाणी साचणाऱ्या जमिनीत फळझाडांची लागवड करु नये.

८) फळउत्पादकांनी जास्तीत जास्त फळझाडांना रासायनिक खते व सूक्ष्म अन्नद्रव्ये पाण्याच्या माध्यमातून ठिबक सिंचन पद्धतीने द्यावीत.

९) फळउत्पादक शेतकऱ्यांनी शासकीय शिफारशींप्रमाणे जमिनीची मशागत करुन फळझाडांची लागवड करावी.

१०) अधिक भाव मिळण्याच्या आशेने फळांची तोडणी न लांबविता ती योग्य वेळेवर करावी.

११) रोग व कीडिचा बंदोबस्त करण्याकरिता शासनाने बुरशीनाशक औषधींचा पूर्ण अनुदानावर वाटप करावा.

१२) फळउत्पादक शेतकऱ्यांनी फळझाडांवर वेळेवर औषधी फवारणी करावी.

१३) शासनाने लहान-लहान कोल्हापुरी बंधारे बांधावे, विहिरीचे पुनर्भरण करावे व फळउत्पादकांनी या कार्याला सहकार्य करुन पाण्याची पातळी वाढविण्यास मदत करावी.

१४) शासनाने लिंबूवर्गीय फळांच्या विक्रीकरिता राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय बाजारपेठांची व्यवस्था करुन द्यावी.

१५) शासनाने बाजारातील लिलाव पद्धत, काट यांच्यात सुधारणा करावी.

१६) शासनाने लिंबूवर्गीय फळांना हमीभाव जाहीर करावा.

१७) शासनाने ग्रामीण भागात फळांच्या साठवणूकीकरिता शीतगृहाची व्यवस्था करावी. तसेच शीतगृहातील फळांवर बँका कर्ज देतील अशी व्यवस्था करावी.

१८) फळांवर प्रक्रिया करणारे बंद कारखाने सुरु करावेत तसेच नवीन कारखाने उभारावेत.

१९) फळांच्या वाहतुकीकरिता चांगले रस्ते तयार करुन द्यावेत.

२०) शासनाने मॅग्नेशियम, लोह,झिंक, ताग, मॉलिबेडनम, बोरॉन व मॅग्नीज या सूक्ष्म अन्नद्रव्याचा पुरवठा पूर्ण अनुदानावर करावा.

२१) ग्रामीण भागात शासनाने वीजकपात कमी करावी.

२२) राज्य शासनाने फळपीक योजनेची संरक्षित रक्कम वाढवून द्यावी व विम्याची २० टक्के रक्कम फळ उत्पादकांनी, ५० टक्के केंद्र शासनाने व ३० टक्के राज्यशासनाने भरावी.

**सारांश:**

नागपूर जिल्ह्यात २००० ते २००९ या अध्ययन काळात फलोत्पादन योजनांमुळे

लिंबूवर्गीय संत्रा, मोसंबी व कागदी लिंबू या फळांच्या लागवड क्षेत्रात व उत्पादनात वाढ झालेली आहे. मात्र सर्वाधिक लागवड संत्रा फळांची झाली आहे. तसेच अलिकडे जिल्ह्यात मोसंबी फळांची लागवड मोठ्या प्रमाणावर होत आहे तर थोड्या फार प्रमाणात कागदी लिंबूचीही लागवड झालेली आहे. संत्राफळाची लागवड अधिक असल्यामुळे या फळांचे उत्पादन सुद्धा अधिक आहे. मात्र उत्पादकतेच्या बाबतीत मोसंबी हे संत्रा फळाच्या पुढे आहे. मोसंबी फळाची प्रतिहेक्टरी उत्पादकता ५.६९ मे.टन असून संत्रा फळाची उत्पादकता प्रतिहेक्टरी ३.८४ मे.टन आहे तर लिंबू फळाची उत्पादकता प्रतिहेक्टरी २.५६ मे.टन आहे. जिल्ह्यात फलोत्पादन योजनेअंतर्गत नरखेड, काटोल व कळमेश्वर या तालुक्यात मोसंबी फळाची अधिक लागवड झाली आहे. तसेच मोसंबी फळाच्या लागवडीचे दुसरे कारण म्हणजे संत्रा व कागदी लिंबूपेक्षा मोसंबी फळाला येणारा कमी उत्पादन खर्च होय.

वर्तमान स्थितीत फलोत्पादन योजनांमुळे लिंबूवर्गीय संत्रा,मोसंबी व कागदी लिंबू फळांच्या लागवड क्षेत्रात व उत्पादनात वाढ झाली असली तरी अपेक्षित लक्ष्य गाठता आले नाही. कारण फळ उत्पादकांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा झालेली नाही. कारण त्यांना योजनेचे पूर्ण अनुदान मिळाले नाही. रोगग्रस्त कलमांचा पुरवठा करण्यात आला. तसेच फळांच्या हमीभावाच्या अभावामुळे त्यांच्या फळांना योग्य भाव मिळत नाही. दलाल व व्यापारी कमिशन, काट(सूट) च्या माध्यमातून फळ उत्पादकांची लुट करतात. फळ उत्पादक असंघटित आहे. फळांच्या निर्यातीला संधी नाही, फळ प्रक्रिया केंद्र नाही. अशा परिस्थितीचा फायदा दलाल व व्यापारी घेतात. कमीत कमी किंमतीला फळे खरेदी करुन अधिकाधिक किंमतीला इतर राज्यात विकून जास्त नफा मिळवितात. दरशेकडा ८ ते १० रुपयापर्यंत कमिशन घेतात. म्हणून फलोत्पादन योजनांचा खरा फायदा फळ उत्पादकांना मिळण्याकरिता फळांच्या लागवड व उत्पादन वाढीबरोबर विपणन व्यवस्थेत सुधारणा होणे आवश्यक आहे. यास्तव, महाराष्ट्र शासनाने फळ उत्पादकांच्या समस्येकडे विशेष लक्ष देऊन त्यांच्या समस्या सोडवून फलोत्पादन योजना सार्थक करावी.

**संदर्भ सूची:**


१) नाफडे अरुण, (२००६) *व्यावसायिक फलोत्पादन*, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, विजयनगर, पुणे.

२) काटोल रवींद्र, (२०१०) *संत्रा लागवड व प्रक्रिया उद्योग*, गोडवा कृषी प्रकाशन, पुणे.

३) कदम बी.ए., (२००८) *मोसंबी लागवड व प्रक्रिया*, साहित्यविश्व प्रकाशन, पुणे.

४) चौधरी के.जी., (१९९०) *लिंबूवर्गीय फळझाडे*, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, विजयानगर, पुणे.

५) आवाळे मनोज, (२००५) *केंद्र व राज्य शासनाच्या शेती विकासाच्या योजना व विविध पुरस्कार*, कृषीदूत प्रकाशन, शिवाजीनगर, पुणे.

६) कापसे भगवानराव, (२००९) *शेतकरी मासिक*, कृषी आयुक्तालय, पुणे.

७) जिल्हा अधीक्षक, कृषी अधिकारी कार्यालय, नागपूर.

८) Indian Horticulture Database 2010, Government of India.

# ठिबक सिंचन पध्दतीचे कृषी विकासातील महत्त्व

**मदन राधाकिसन शिंदे, पाटोदा,**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
ज.भ.शि.प्र.मंडळाचे,कला व विज्ञान महाविद्यालय, जि.बीड.
भ्रमणध्वनी: ९४२२६१७५११
ई-मेल: dr.madan.shinde@gmail.com

मानवी जीवनामध्ये पाण्याला अनन्य साधारण महत्व आहे. पंचतत्वापैकी पाणी एक तत्व आहे. पाण्याचा प्रत्यक्ष उपयोग मानवाला आपल्या दैनंदिन गरजा पुर्ण करण्याकरिता होत असतो. त्याच प्रमाणे पाणी शेती,उद्योग व इतर कार्यासाठी वापरले जाते. अन्नधान्य व इतर विविध प्रकारची पिके,कृषी उत्पादने घेण्याकरिता पाण्याची अत्यंत गरज पडत असते. प्रस्तुत शोधनिबंधामध्ये पाण्याचा उपयोग कृषी क्षेत्राला योग्य रित्या व्हावा व पाण्याची बचत करुन कमी पाण्यामध्ये अधिक कृषी उत्पादन प्राप्त कसे करता येईल त्या अनुषंगाने ठिबक सिंचन या आधुनिक सिंचन पध्दतीचा कृषी विकासामध्ये काय लाभ झाला ते अभ्यासण्याचे काम करण्यात आलेले आहे.

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये अभ्यासाकरिता पुढील उद्दिष्टांचा समावेश करण्यात आलेला आहे.

१. ठिबक सिंचन पध्दतीचा अवलंब कृषी क्षेत्रात केल्यामुळे कृषी उत्पादनात होणाऱ्या बदलाचा अभ्यास करणे.
२. ठिबक सिंचन पध्दतीमुळे पाण्याची बचत होते काय ते तपासणे.
३. देशात विविध क्षेत्रासाठी वापरण्यात येणाऱ्या पाण्याचे प्रमाण अभ्यासणे.
४. कृषी क्षेत्रातील सिंचन क्षेत्राचे प्रमाण अभ्यासणे.

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये ठिबक सिंचन पध्दतीमुळे कृषी उत्पादनात वाढ होते असे गृहित धरुन तसेच ठिबक सिंचन पद्धतीमुळे पाण्याची बचत होते या गृहितकावर आधारित वरिल स्पष्ट केल्याप्रमाणे एकूण चार उद्दिष्टे अभ्यासा करिता निवडण्यात आलेली आहेत.शोधनिबंधाच्या शेवटच्या भागात अभ्यासांती काढण्यात आलेले निष्कर्ष आणि त्या अनुषंगाने काही सुचना देण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे.

**संशोधन पध्दती:**

शोधनिबंधाच्या अभ्यासाकरिता संशोधन पध्दती म्हणुन दुय्यम स्वरुपाची साधने उदाः जर्नल,मासिके, पुस्तके इ. विचारात घेऊन अप्रत्यक्ष संशोधनपध्दती वापरण्यात आलेली आहे.

भारताची लोकसंख्या जगाच्या लोकसंख्येपैकी १६.५% आहे. तसेच जमिनीसाठी आवश्यक संसाधने मात्र फक्त २.५ % इतकी कमी आहेत. त्याच बरोबर ताज्या व शुध्द पाण्याचे प्रमाण फक्त ४% आहे. त्यामुळे भारतातील लोकसंख्याकरिता शुध्द पाण्याचा पुरवठा उपलब्ध करणे हे सर्वात मोठे आव्हान आहे.

भारतामध्ये विविध क्षेत्राकरिता वापरण्यात येणारे पाणी किती आहे. हे तपासल्यानंतर लक्षात येते की, सर्वात जास्त पाणी म्हणजे एकूण पाण्याच्या ७६% पाणी एकटया कृषी क्षेत्राला लागते त्यानंतर ऊर्जा निर्मिती (वीज निर्मिती) करिता ६.२%, उद्योगांकरिता ५.७%, घरगुती उपयोगाकरिता ४.३% आणि स्थलांतर व इतर उपयोगांकरिता ७.८% या प्रमाणात वापरले जाते. थोडक्यात सर्वात जास्त पाणी वापर हा कृषी क्षेत्रासाठी होतो. त्यामुळे कृषी क्षेत्रासाठी वापरण्यात येणारे पाणी ठिबक सिंचन सारख्या आधुनिक सिंचन पध्दतीचा अवलंब करुन बचत करता येऊ शकेल याविषयीचे चिंतन प्रस्तुत शोधनिबंधात केलेले आहे.

कृषीला पाणी दिल्यामुळे, कृषी क्षेत्र सिंचित केल्यामुळे आशिया खंडामध्ये पिक उत्पादनातील मुल्य ६०% पर्यंत वाढलेले दिसुन आले आणि हे कृषी क्षेत्र सिंचीत केल्याचा परिणाम आहे, हे स्पष्ट होते. अलिकडच्या दशकामध्ये कृषी उत्पादकता सिंचित क्षेत्रातील कमी होताना दिसते. कारण पाण्याचा वापर कृषी व्यतिरिक्त इतर क्षेत्रात अधिक वाढलेला दिसुन येतो. त्यामुळे कृषी उत्पादकता वाढीला मर्यादा निर्माण होतात.

पाण्याच्या उपलब्धतेविषयी अभ्यास करित असताना असे निदर्शनास आले आहे की, जगातील एकूण देशापैकी तृतीयांश राष्ट्रे या शतकामध्ये भिषण पाणी टंचाईला सामोरे जात आहेत. पाणी टंचाई हा गंभीर विषय त्या एक तृतीयांश राष्ट्रापुढे निर्माण झालेला आहे. यावरुन असे स्पष्ट होते की,पाणी बचत होणे ही काळाची गरज ठरते.प्रामुख्याने सध्या ३१ राष्ट्रे ही आफ्रिका आणि पुर्वेकडील असुन ती पाण्याच्या दुर्मिळतेचा सामना करताना दिसतात.

कृषी क्षेत्रासाठी पाणी उपलब्ध करुन देणे, त्याच बरोबर पाण्याची बचत करणे आवश्यक ठरते.कारण कृषीवर आधारित लोकांचे जीवन असल्यामुळे अन्नधान्य आणि इतर जीवनावश्यक पिके व फळे उपलब्ध होण्याकरिता कृषी क्षेत्राचा विकास होणे महत्वाचे ठरते.

भारतातील एकूण कृषी क्षेत्रापैकी ६४% क्षेत्र हे पावसाच्या पाण्यावर अवलंबुन आहे. त्यामुळे कृषी क्षेत्राचे पावसाच्या पाण्यावरील अवलंबित्व कमी करण्याची गरज निर्माण झालेली आहे. त्याकरिता ठिबक सिंचन या आधुनिक सिंचन पध्दतीचा अवलंब कृषी क्षेत्रात करणे आवश्यक ठरते.

ईस्त्राईल मधील वाळवंटी भागातील शेतकऱ्यांच्या गरजेतुन खऱ्या अर्थाने सुक्ष्म सिंचन तंत्रज्ञानाची सुरुवात झाली. कमी पाण्यातही पीक उत्पादनाचे सुत्र या तंत्रातुन मिळाले. अमित गद्रे

यांनी सकाळ अॅग्रोवन मध्ये सुक्ष्म सिंचनामुळे झालेल्या लाभाविषयी मत मांडले आहे. त्यांच्या मते सुमारे ११० देशांतील विविध पीक पध्दती शेतकऱ्यांच्या गरजा लक्षात घेऊन सुक्ष्म सिंचनातील तंत्रज्ञान विकसित केले. शेतीला शाश्वत पाण्याची सोय झाली.

जग आणि भारताचा विचार करता सुक्ष्म सिंचनाच्या अवलंबनामध्ये दरवर्षी सुमारे १५% नी वाढ होताना दिसते. जगाचा विचार करता चीन शेती आणि सुक्ष्म सिंचनाच्या अवलंबामध्ये गतीने पुढे चालला आहे. भारताचा विचार करता सुक्ष्म सिंचनाचा अवलंब अजुनही टप्या-टप्याने होताना दिसतो.

सुक्ष्म सिंचन तंत्रज्ञानात बदल होत आहे. चांगले पिक उत्पादन उपकरणांची कमी किंमत, वापरण्यास सोपे, सुटसुटीत, जास्त टिकवण क्षमता हे सुक्ष्म सिंचनातील नवे उद्धिष्ट आहे.

आतापर्यंत ठिबक सिंचन म्हणजे लॅटरलच्या माध्यमातुन पिकाच्या मुळाच्या कार्यक्षेत्रात गरजेइतके पाणी पुरविणे,अशी संकल्पना होती. आता हे तंत्रज्ञान केवळ पाण्याचा वापर काटेकोर वापरापुरतेच मर्यादित राहिले नाही तर स्वयंचलित यंत्रणेतुन पिकाच्या गरजेनुसार अन्नद्रव्यांचा वापर केला जातो.

**ठिबक सिंचनाची तत्त्वे:**

ठिबक जलसिंचन ही एक नविन संकल्पना असुन तिची काही खास वैशिष्ट्ये आहेत ती पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१. ठिबक जलसिंचनामुळे पाणी अगदी कमी प्रमाणात व ठराविक प्रमाणात पिकांना दिले जाते.
२. पाण्याचा पुरवठा दीर्घकाळ पर्यंत केला जातो.
३. पाणी वरचेवर थोडया थोडया वेळाने गरजेनुसार दिले जाते.
४. पाणी थेट रोपाच्या मुळांना दिले जाते.
५. ठराविक दाबाचा उपयोग करुन पाण्याचा सिंचनदर नियमित ठेवला जातो.
६. पोषक द्रव्ये व रासायनिक खतेसुध्दा पाण्यात मिसळुन दिली जातात.

उत्सर्जनाच्या प्रत्येक बिंदुतून (एमिटरमधुन) रोपाच्या मुळाच्या ठिकाणी अगदी थोडया अचुक नियंत्रित आणि समान प्रमाणात पाण्याचा, पोषक द्रव्यांचा रोपाच्या वाढीसाठी आवश्यक अन्य घटकांचा पुरवठा थेटपणे होतो.त्यामुळे रोपांचा दर्जा, त्यांची पर्याप्त वाढ आणि अधिक उत्पादने या बाबतीत निश्चित सुधारणा होते.

जणगणना २००१ नुसार राज्यातील एकूण रोजगारापैकी सुमारे ५५% इतक्या मोठया प्रमाणात रोजगार कृषी क्षेत्र उपलब्ध करते. त्यामुळे कृषी क्षेत्राचा विकास होणे आवश्यक ठरते. कृषी विकासाकरिता कृषीक्षेत्रातील जलसिंचनाचे प्रमाण वाढविण्याकरिता ठिबक सिंचन पध्दतीचा अवलंब आवश्यक ठरतो.

ठिबक सिंचन पध्दतीमुळे कृषी उत्पादनात झालेले बदल याविषयीचे विविध अभ्यास अभ्यासल्यानंतर आपली खात्री होईल की,ठिबक सिंचन पध्दती ही कृषी उत्पादन वाढी बरोबरच पाण्याची बचत करण्यात यशस्वी झालेली आहे. विविध तज्ञांनी केलेल्या अभ्यासापैकी काही अभ्यासांचा उल्लेख येथे करण्यात आलेला आहे.

ठिबक सिंचनाचा अवलंब करणाऱ्या पैकी देवळाणकर के.पी व फिरके एन.एन. यांनी जर्नल ऑफ महाराष्ट्र अॅग्रीकल्चरल युनिव्हर्सिटीज्

या जर्नलमध्ये सन १९९९ या वर्षी प्रकाशित झालेल्या इफेक्ट ऑफ फर्टीगेशन ऑन सॉलीड सोलुबल फर्टिलायझर्स ऑन ग्रोथ अँड यिल्ड ऑफ चिली, या संशोधन पर लेखात सन १९९९ मध्ये महाराष्ट्रातील रब्बी हिवाळी मिरची पिकाचा अभ्यास केला असता ठिबक सिंचन पध्दतीद्वारे द्रवात विरघळणाऱ्या घनरुप खताचा डोस दिल्यामुळे फायदा झाल्याचे निदर्शनास आले. त्यांनी शिफारस केल्याच्या १२५% उत्पन्न मिरची या पिकाचे वाढले.त्याच वेळी ५८%पाण्याची बचत प्रवाही (सरफेस) सिंचनाच्यातुलनेत झालेली दिसुन आली.

नारायणमुर्ती ए., यांनी 'इंडियन जर्नल ऑफ अॅग्री कल्चर इकॉनॉमिक्स,' (१९९७) या भारतीय पातळीवरच्या कृषी अर्थशास्त्राच्या जर्नलमध्ये प्रकाशित झालेल्या इकॉनॉमिक व्हायाबिलीटी ऑफ ड्रिप इरिगेशन ऑन इंपिरिकल ऑफ अॅनालिसीस फ्रॉम महाराष्ट्रा, या संशोधनपर लेखात सन ११९३-९४ मध्ये केलेल्या पाहणीच्या आधारे ठिबक सिंचनामुळे जळगावच्या केळी व नाशिकच्या द्राक्षे यापिकांची निवड करुन निष्कर्ष काढले. निष्कर्षा मध्ये केळी व द्राक्षे या दोन पिकांचे खर्च-नफा प्रमाण ठिबक सिंचनामुळे सुधारले.म्हणजे खर्च कमी व नफाअधिक राहिला त्याबरोबर पाणी वापर कार्यक्षमता वाढली. पारंपरिक (प्रवाही सिंचन) सिंचन पध्दती पेक्षा ठिबक सिंचन पध्दतीमुळे खर्च-नफा प्रमाण २.०७ - २.३६ केळी करिता राहिले.तसेच १.४८ - १.८ द्राक्षे या पिकाकरिता राहिले. म्हणून त्यांच्या मते ठिबक सिंचन पध्दती आर्थिकदृष्ट्या पारंपरिक सिंचन पध्दती पेक्षा फायद्याची राहिली आहे.

शिंदे व जाधव, यांनी 'शुगर टेक्नॉलॉजिस्टस असोशिएशन ऑफ इंडिया,' (२०००) या जर्नलमध्ये प्रकाशित झालेल्या वॉटर मॅनेजमेंट विथ ड्रिप इरिगेशन सिस्टिम फॉर शुगरकेन, या शोधनिबंधामध्ये 'ऊसाकरिता' ठिबक सिंचनाच्या सहाय्याने पाणी व्यवस्थापन याविषयी आपले मत मांडले. अभ्यासाकरिता वसंतदादा शुगर इन्स्टिटयुटचा (पुणे) अनुभव विचारात घेतला आहे. सन १९९६-९७ ते १९९८-९९ या कालावधीत पुणे येथील ऊस शेतीचा अनुभव दाबामुळे होणारी नुकसान भरपाई,दाब न दिल्यामुळे होणारी नुकसान भरपाई व रेषीय ठिबक सिंचन पध्दतीचा अभ्यास केला, अभ्यासांती वरिल तीन प्रकारापैकी दाबामुळे होणारी नुकसान भरपाई (प्रेसर कॉम्पेनसेटींग) व रेषीय ठिबक सिंचनपध्दतीमुळे ५०% पाणी बचत, १७ते २०% ऊस उत्पन्नात वाढ आणि २.४६ वेळा अधिक वापर कार्यक्षमता दिसुन आली. सरासरी (पारंपरिक) सिंचनापेक्षा रेषीय ठिबक सिंचन पध्दतीमुळे पाणी बचत,पाणी वापराची कार्यक्षमता दिसुन आली. भारतातील सिंचीत क्षेत्राचे प्रमाण पुढील पानावरील तक्त्यामध्ये दर्शविण्यात आलेले आहे. तक्ता क्र.१ मध्ये निव्वळ लागवडी खालील क्षेत्र, निव्वळ सिंचित क्षेत्र आणि निव्वळ लागवडी खालील क्षेत्राशी निव्वळ सिंचित क्षेत्राची टक्केवारी दर्शविण्यात आलेली आहे. निव्वळ लागवडी खालील क्षेत्राशी निव्वळ सिंचित क्षेत्राची टक्केवारी भारतीय पातळीवर सन १९५०-५१ मध्ये १७.४५%होती. ती २००३-०४ ला ३८.६१% आणि २०१२-१३ ला ती ४८.३% पर्यंत गेलेली आहे.अजुनही देशपातळीवर सिंचित क्षेत्र ५०% पेक्षाही कमीच आहे. त्याकरिता ठिबक सिंचन पद्धतीचा अवलंब केला तर सिंचन क्षेत्राचे प्रमाण दुप्पटीने वाढविणे शक्य होईल.

तक्ता क्र. १

**भारतातील निव्वळ लागवडीखालील क्षेत्र व निव्वळ सिंचित क्षेत्र**

(क्षेत्र हजार हेक्टरमध्ये )

| अ.क्र. | क्षेत्र | १९५०-५१ | १९७०-७१ | १९८०-८१ | २००३-०४ | २०१२-१३ |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | निव्वळ लागवडीखालील क्षेत्र | ११८७४६ | १४०७८४ | १४०२९९ | १४२८१९ | - |
| २. | निव्वळ सिंचीत क्षेत्र | २०८५३ | ३११०३ | ३८८०६ | ५११४३ | - |
| ३. | निव्वळ लागवडी खालील क्षेत्राशी निव्वळ सिंचित क्षेत्राची टक्केवारी | १७.४५ | २२.०९ | २७.६६ | ३८.६१ | ४८.३ |

*स्रोत : १. शिंदे एम.आर., कृषी विकास व आधुनिक सिंचनपध्दती, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, २०१३, पृ.१८.*

*२. www.en.wikipedia.org Dt. 23-11-2014, P.2*

वरील विविध तज्ज्ञांचा ठिबक सिंचनावरील अभ्यास पाहता पाणी बचतीचे प्रमाण ५०% सरासरीने झालेले दिसून येते. याचाच अर्थ असा की,सिंचन क्षेत्र दुपटीने(प्राप्त सिंचन क्षेत्राच्या) वाढविणे शक्य होते. त्याचबरोबर इतरही फायदे होताना दिसतात.

**निष्कर्ष:**

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये केलेल्या ठिबक सिंचन पध्दतीच्या अभ्यासावरुन असे स्पष्ट होते की, ठिबक सिंचन पध्दतीमुळे पाण्याची बचत ही सरासरी ५०% ने होताना दिसते. विविध पिकांच्या बाबतीत हे प्रमाण कमी अधिक असले तरी सरासरी ५०% पाणी बचत झालेली दिसून येते. तसेच उत्पादनाचा दर्जा, उत्पादनात झालेली २०-२५% वाढ इत्यादी परिणामही झालेले दिसून येतात.

वरील एकंदरित अभ्यासाअंती असे स्पष्टपणे सुचवावेसे वाटते की भारतात सिंचनाचे प्रमाण कमी असल्यामुळे एकूण सिंचन क्षेत्र वाढविण्याकरिता ठिबक सिंचन पध्दतीचा अवलंब मोठ्या प्रमाणात करण्यात यावा. तसेच ज्या भागामध्ये पाण्याचे दुर्भिक्ष आहे,त्याप्रदेशात किंवा भागात ठिबक सिंचन पध्दतीचा मोठया प्रमाणात अवलंब करण्याची आवश्यकता आहे. तसेच ऊसासारख्या अधिक पाणी घेणाऱ्या पिकांसाठी ठिबक सिंचन पध्दतीचा वापर सक्तीचा करण्याची गरज आहे. कारण एकूण पाण्याच्या ७०% पाणी एकट्या ऊस या पिकाला लागत असल्यामुळे या पिकाकरिता ठिबक सिंचन पध्दती सक्तीची करणे आवश्यक ठरते. त्याकरिता शासन स्तरावरुन विशेष प्रयत्नाची गरज आहे. तसेच लोकसहभागही मोठ्या प्रमाणात असल्याशिवाय ठिबक सिंचन पध्दतीचा वापर मोठया प्रमाणात होणार नाही, असे वाटते.

**संदर्भ सूची:**


- मुख्यसंपादक-थोरात सुखदेव, दास गॅरींद्र, डिसेंबर २०११, द *इंडियन इकॉनॉमिक जर्नल*, पृ.१०८-११०.

२. नरसय्या एम.एल.,(२००७) *इरिगेशन अँड इकॉनॉमिक ग्रोथ*,डिसकव्हरी पब्लिसिंग हाऊस, नवी दिल्ली, पृ. ७-९, १५-१९.

३. वेब:डब्लु.डब्लु.डब्लु. इएन. विकिपिडीया. ऑर्ग, दि.२३-११-२०१४, पृ. १, २.

५. गद्रे अमित, नोव्हेंबर २०१४, *सुक्ष्म सिंचनात गुंतवणुक वाढायला हवी*, दै. सकाळ, अॅग्रोवन, पृ. १३

६. संपादक, शिंदे जगन्नाथ, (२००७) *ड्रिप इरिगेशन*, गोदावरी पब्लिकेशन, नाशिक, पृ. ४४-४५

७. डब्लु.डब्लु.डब्लु.स्टॅटिस्टीक्स ऑफ महाराष्ट्रा, दि. ४-१०-२०१३, पृ. ६९.

८. देवळाणकर के. पी. व फिरके एन.एन., २०००, *इफेक्ट ऑफ फर्टिगेशन ऑन सॉलीट सोलुबल फर्टिलायझर्स ऑन ग्रोथ अँड यिल्ड ऑफ चिली*, जर्नल ऑफ महाराष्ट्र अॅग्री युनिव्हर्सिटीज् १९९९, पृ. २४२-२४३.

९. नारायण मुर्ती ए., १९९७ *इकॉनॉमिक व्हायाबिलीटी ऑफ ड्रिप इरिगेशन ऑन इंपिरिअल अॅनॉलिसीस फ्रॉम महाराष्ट्रा*, इंडियन जर्नल ऑफ अॅग्रीकल्चरल् इकॉनॉमिक्स पृ. ७२८.

१०. शिंदे पी.बी.व जाधव एस.बी., ऑगस्ट २०००, *वॉटर मॅनेजमेंट विथ ड्रिप इरिगेशन सिस्टिम फॉर दी शुगरकेन प्रोसिडिंग्ज ऑफ दी* ६२, पी अॅन्युअल कन्व्हेन्शन ऑफ दी शुगर टेक्नॉलॉजिस्ट असोशिएशन ऑफ इंडिया, आग्रा- इंडिया १९२१. अ-३६-४१.

११. शिंदे एम.आर., २०१३ *कृषी विकास व आधुनिक सिंचनपध्दती*, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, पृ.१८.

१२. अमित गद्रे, *सुक्ष्म सिंचनात गुतवणुक वाढायला हवी*, दै.सकाळ,अॅग्रोवन,१६ नोव्हेंबर २०१४, पृ.१३

पीएच.डी. प्रबंधाचा सारांश

# जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्राची बेरोजगारी निर्मूलनातील भूमिका

मार्गदर्शक : सुलोचना कृ. मानकर
संशोधक : नितीन ज्ञानदेव चौधरी, अकोला
शिवस्पर्श सहनिवास, आगरकर मार्ग, रामदास पेठ.
भ्रमणध्वनी: ८२७५२२०८०९
ई-मेल : ndchaudhari1981@gmail.com

भारतात विकासाच्या गतीपेक्षा लोकसंख्या वाढीची गती जास्त असल्यामुळे बेरोजगारी मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे. दोन जागतिक युध्दांमुळे जागतिक स्तरावर बेरोजगारीच्या प्रश्नाने गंभीर स्वरूप धारण केले आहे. प्रत्येक माणसाला आज बेरोजगारीच्या प्रश्नाला तोंड द्यावे लागत आहे. सद्यस्थितीत बेरोजगारी ही जगातील बहुसंख्य देशांना भेडसावणारी एक गंभीर स्वरूपाची समस्या आहे. भारत हा एक विकसनशील देश असून भारतात निवडक क्षेत्रातच औद्योगिक विकास झाला आहे. त्यामुळे भारतात रोजगारीच्या संधी फार कमी प्रमाणात उपलब्ध आहेत. त्याचप्रमाणे भारत हा एक अतिलोकसंख्येचा देश असल्याने येथे काम शोधणाऱ्या लोकांची संख्या फार जास्त आहे. भारतात या समस्येची तिव्रता फार जास्त आहे. रोजगार विनिमय केंद्र हे देशातील मनुष्यबळ व देशात उपलब्ध असलेल्या रोजगाराच्या संधी यांच्यामध्ये दूवा साधण्याचे काम करते. त्यामुळे अशा प्रकारची समस्यानिवारण्याकरिता या रोजगार विनिमय केंद्राची भूमिका महत्त्वपूर्ण राहू शकते.

विषयाची निवड व व्याप्ती :

देशाच्या आर्थिक व सामाजिक क्षेत्रात उद्योग विनिमय संस्था महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडू शकतात. त्या अनुषंगाने देशात असलेल्या रोजगाराच्या परिस्थितीच्या संदर्भात येथे उद्योग विनिमय संस्थेची आवश्यकता आहे. ही संस्था रोजगार शोधणाऱ्या व्यक्तिंना सहाय्य करते व स्वयंरोजगारासाठी प्रोत्साहन देते. ही संस्था मनुष्यशक्तींची बँक असून श्रमबाजारपेठेशी संबंधित आवश्यक आकडेवारी संकलित करण्याचे कार्य करते. जुलै १९४५ मध्ये राष्ट्रीय रोजगार

सेवा या स्वरूपात अस्तित्वात आलेल्या उद्योग विनिमय संस्था देशातील प्रत्येक राज्यात, प्रत्येक जिल्ह्यात स्थापन करण्यात आली आहे. देशात जुलै २०१४ पर्यंत ९६९ रोजगार विनिमय केंद्र असून महाराष्ट्रात ३६ जिल्ह्यात ५४ रोजगार विनिमय केंद्र आहेत. त्यांचे नामकरण १ मे १९९८ रोजी रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र असे करण्यात आले आहे.

देशातील वाढत असलेली बेरोजगारी शासनासमोर मोठे आव्हान ठरले असून लाखो बेरोजगारांच्या भवितव्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. कामगार ह्या घटकाचे अध्ययन करून त्यांना रोजगार पुरविण्यात जिल्हा रोजगार व स्वंयरोजगार मार्गदर्शन केंद्राची भूमिका किती प्रमाणात यशस्वी ठरली आहे याचे अध्ययन करण्यासाठी संशोधकाने अकोला जिल्हा रोजगार व स्वंयरोजगार मार्गदर्शन केंद्राची बेरोजगारी निर्मूलनातील भूमिका- एक व्यष्टी अध्ययन (२००२ ते २००७) या विषयावर अध्ययन केले आहे.

**संशोधनाची उद्दिष्ट्ये :**

१. जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्रामार्फत निर्माण झालेल्या रोजगार संधीचा अभ्यास करणे.
२. जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्रामार्फत निर्माण झालेल्या स्वयंरोजगार संधीचा अभ्यास करणे.
३. रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्रात नोंदणीकृत उमेदवारांना अर्हतेनुसार रोजगार प्राप्त होतो का? याचे अध्ययन करणे.
४. मार्गदर्शन केंद्राद्वारे नोंदणीकृत उमेदवारांना स्वयंरोजगारासाठी कशा प्रकारे प्रोत्साहित केले जाते? याचे अध्ययन करणे.
५. रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्राला बेरोजगारांना रोजगार मिळवून देतांना येणाऱ्या अडचणीचा अभ्यास करणे.
६. रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्राद्वारे कोणकोणत्या प्रकारचे कार्यक्रम राबविले जातात? याचा अभ्यास करणे.
७. आस्थापना, उद्योग, संस्था यांच्या कडील रिक्त पदांच्या वेळोवेळी रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्रामध्ये होणाऱ्या नोंदणीचा अभ्यास करणे.
८. विविध संस्था, आस्थापना, कार्यालये, कारखाने यामध्ये रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्रामार्फत विविध पदावर नियुक्त उमेदवारांच्या अनुभवाचा अभ्यास करणे.

**संशोधनाची गृहितकृत्ये :**

१. जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्रामार्फत विविध क्षेत्रात रोजगार संधी पुरविल्या जातात.
२. जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्रद्वारे नोंदणीकृत उमेदवारांना अर्हतेनुसार रोजगार प्राप्त होतो.
३. जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्रद्वारे नोंदणीकृत उमेदवारांना स्वयंरोजगारासाठी प्रेरित केले जाते.
४. नोंदणीकृत उमेदवारांना रोजगार प्राप्त करून देत असतांना जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्राला विविध अडचणींना सामोरे जावे लागते.
५. जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्रमार्फत रोजगार संधी निर्माण करून देण्यासाठी विविध रोजगार विषयक कार्यक्रम राबविले जातात.

६. जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्रात आस्थापना, उद्योग संस्था यांचेकडील रिक्त पदांची वेळोवेळी नोंद होते.

**संशोधन पध्दती :**

प्रस्तुत संशोधनात संशोधनाच्या व्यष्टी अध्ययन पध्दतीचा वापर करण्यात आला आहे. संशोधकाने अकोला जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र ही एक संस्था एकक मानून या एककाचे बेरोजगारी निर्मूलनातील अध्ययन करण्यासाठी संशोधनाच्या व्यष्टी अध्ययन पध्दतीने संशोधन केले आहे. त्याच प्रमाण संशोधन आराखड्याचा विचार करता वर्णनात्मक आणि निदानात्मक आराखड्याचा वापर करण्यात आला आहे. तथ्य संकलनासाठी प्राथमिक तसेच दुय्यम समंकाद्वारे माहिती संकलित करून विश्लेषण करण्यात आले आहे. त्यासाठी सांख्यिकीच्या माध्य, सहसंबंध गुणक, प्रमाप विचलन, कार्यवर्ग आणि वृध्दी दर या साधनांचा उपयोग करण्यात आला आहे.

नमुना निवडीच्या संभाव्यता नमुना निवडपध्दती मधील स्तरीय यादृच्छिक नमुना निवड पध्दतीचा करण्यात आला आहे. याकरिता संशोधन कालावधीतील अकोला जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्रातील नोंदणीकृत उमेदवारांच्या आधारावर नमुना निवडला आहे.

अकोला जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्रात संशोधन कालावधी २००२ ते २००७ ह्या पाच वर्षात नव्याने नोंदणी केलेले एकूण ७१,३४९ बेरोजगार उमेदवारांपैकी १% म्हणजे ७१४ उमेदवार नमुना म्हणून निवडले आहेत. नोकरी प्राप्त एकूण ४३६ उमेदवारांपैकी १०% म्हणजे ४४ उमेदवारांची नमुना म्हणून निवड करण्यात आली व स्वयंरोजगार प्राप्त ३,६१४ उमेदवारांपैकी १०% उमेदवार म्हणजे ३६१ उमेदवार नमुना म्हणून निवडले आहेत. म्हणजेच एकूण १११९ उमेदवार नोंदणीकृत उमेदवार नमुना म्हणून निवडले आहेत व त्यांची अनुसूचिद्वारे माहिती संकलित करण्यात आली आहे.

प्रस्तुत संशोधनात प्रकरण २ मध्ये संशोधन विषयाशी संबंधित साहित्याचा आढावा घेण्यात आला आहे. यामध्ये विषयाशी संबंधित शोध प्रबंध, प्रकल्प अहवाल, पुस्तके, त्रैमासिके व मासिके, अहवाल, वृत्तपत्रातील लेख आणि विषयाशी संबंधित ई-लेखन इत्यादींचा आढावा घेण्यात आला आहे.

प्रकरण ३ मध्ये रोजगार विनिमय केंद्राचा इतिहास तसेच जागतिक पातळीवर झालेला विकास व भारतातील इतिहास व झालेला विकास इत्यादीबाबत चर्चा करण्यात आली आहे.

प्रस्तुत संशोधनात प्रकरण ४ मध्ये भारतातील आर्थिक दृष्ट्या दूर्बल घटकांना स्वयंरोजगारासाठी आर्थिक सहाय्य करुन त्यांचा विकास साधन्यासाठी प्रत्येक रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्रामार्फत राबविल्या जाणाऱ्या रोजगार व स्वयंरोजगार विषयक विविध योजना व कार्यक्रमांचे विवेचन केले आहे.

प्रकरण ५ व ६ मध्ये रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्राची बेरोजगारी निर्मूलनातील भूमिकेचे परीक्षण केले आहे. परीक्षणासाठी अनुसूचीद्वारे नोंदणीकृत उमेदवारांकडून संकलित माहितीचे विश्लेषण करण्यात आले आहे.

प्रस्तुत संशोधनात प्रकरण ७ मध्ये अकोला जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन

केंद्राला भेडसावणाऱ्या विविध समस्यांचे विश्लेषण करण्यात आले आहे.

**निष्कर्ष :**

१. २००२ ते २००७ या कालावधीतील एकूण बेरोजगारांपैकी २००२-०३ या वर्षी बेरोजगारीचे प्रमाण सर्वात जास्त (२१.८२%) होते.

२. संशोधन कालावधीत २००३-०४ या काळात सर्वात जास्त (२१.३६%) नोंदणीकृत उमेदवारांना नोकरी प्राप्त झाली.

३. संशोधन कालावधीत नोंदणीकृत उमेदवारां पैकी सर्वात जास्त उमेदवारांचे शिक्षण हे एस.एस.सी. झालेले होते.

४. संशोधन कालावधीत २००२-०३, २००३-०४, व २००६-०७ या वर्षी खाजगी क्षेत्रात सर्वात जास्त उमेदवारांना नोकरी प्राप्त झाली.

५. नोंदणी करतेवेळी कमी बेरोजगार उमेदवारांना अकोला जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्रातर्फे मार्गदर्शन मिळाल्याचे अनुसूचिद्वारे प्राप्त माहितीवरून दिसून येते.

६. नमुना म्हणून निवडलेल्या एकूण बेरोजगार उमेदवारांपैकी सर्वात कमी (१८.२१%) नोंदणीकृत बेरोजगार उमेदवारांना जिल्हा रोजगार व स्वंरोजगार मार्गदर्शन केंद्रामार्फत रोजगार संधी विषयी मार्गदर्शन मिळाले.

७. नमुना म्हणून निवडलेल्या एकूण बेरोजगार उमेदवारांपैकी सर्वात कमी (०७.७०%) उमेदवारांना प्रशिक्षण शिबीरासाठी कॉल प्राप्त झाला होता.

८. १४४ नोकरी प्राप्त उत्तरदात्या उमेदवारांपैकी सर्वात जास्त (८३.३३%) उमेदवारांना मिळालेले कॉल हे त्यांच्या अर्हतेप्रमाणे होते.

९. नमुना म्हणून निवडलेल्या एकूण बेरोजगार उमेदवारांपैकी स्वयंरोजगारासाठी मार्गदर्शन केंद्रातर्फे प्रोत्साहन मिळत नाही असे सांगणाऱ्या बेरोजगार उमेदवारांची संख्या सर्वात जास्त (८०.२५%) आहे.

१०. नोंदणीकृत नोकरीप्राप्त उमेदवारांमध्ये १८ ते ३० या वयोगटातील उमेदवारांचे प्रमाण हे सर्वाधिक आहे.

११. नमुना म्हणून निवडलेल्या नोकरी प्राप्त उमेदवारांपैकी शासकीय क्षेत्रात काम करणाऱ्या उमेदवारांचे प्रमाण सर्वाधिक (५६.८२%) होते.

१२. नमुना म्हणून निवडलेल्या एकूण नोकरी प्राप्त उमेदवारांपैकी जाहिरातीद्वारे नोकरीप्राप्त उमेदवारांचे प्रमाण सर्वाधिक (५०%) आहे.

१३. जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्रामार्फत पाठविण्यात येणारे नोकरीचे कॉल हे पात्रतेप्रमाणे असतात.

शिफारशी / उपाययोजना :

१. बेरोजगारी कमी करण्यात मोलाची भूमिका असणाऱ्या जिल्हा रोजगार व स्वंयरोजगार मार्गदर्शन केंद्रातील कर्मचाऱ्यांची रिक्त पदे त्वरीत भरण्यात यावीत.

२. मार्गदर्शन केंद्रात नोंदणीकरिता आलेल्या उमेदवारांना मार्गदर्शन केंद्राविषयी मार्गदर्शन करण्यात यावे.

३. मार्गदर्शन केंद्रात अधिसूचीत असलेल्या रिक्तपदांची माहिती वेळोवेळी ठळक स्वरूपात दृष्य फलकावर लावण्यात यावी.

४. शाळा व महाविद्यालय परिसरांमध्ये शिबिरे आयोजित करून बेरोजगार विद्यार्थ्यांची नोंदणी मार्गदर्शन केंद्रामार्फत करण्यात यावी.

५. २०११ पासून मार्गदर्शन केंद्रामार्फत दिल्या जाणाऱ्या एस.एम.एस. सुविधेचा उपयोग अधिक प्रभावीपणे करण्यात यावा.
६. शासनाच्या रिक्त पदांची वेळोवेळी नोंदणीकृत उमेदवारांना माहिती मिळण्याकरिता नवीन तंत्रज्ञानाचा वापर करण्यात यावा.
७. मार्गदर्शन केंद्रातील विविध योजना व कार्यक्रमांद्वारे उमेदवारांना स्वयंरोजगार सुरू करून देतांना बँकाकडून सहकार्य मिळावे.
८. शासनाद्वारे मार्गदर्शन केंद्राला आपले कार्य सुरळीत पार पाडता यावे याकरिता तज्ञ, कुशल कर्मचारी वर्गाची नेमणूक करण्यात यावी.
९. जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्राद्वारे आधुनिक तंत्रज्ञानाचा मोठ्या प्रमाणात यथायोग्य वापर करण्यात यावा.

जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र हे काम मागणारे बेरोजगार व काम देणारे उद्योजक किंवा मालक ह्यांच्या मधील दुवा आहे. जर या कार्यालयाच्या कार्याची यशस्वीरित्या अंमलबजावणी झाली तर निश्चितच देशातील बेरोजगारी कमी झाल्याशिवाय राहणार नाही. ह्या कार्यालयाची बेरोजगारी निर्मूलनाच्या दृष्टीने असलेली आवश्यकता लक्षात घेता शासनाने हे कार्यालय अधिक कार्यक्षम बनविण्याच्या दृष्टीने प्रयत्न करावयास पाहिजे.

प्रस्तुत संशोधनाचा देशातील उपलब्ध मनुष्यबळाचे नियोजन करण्यासाठी तद्वतच कार्यालयाच्या अडचणी सोडविण्यासाठी, बेरोजगारी कमी करण्यासाठी शासनाला निश्चितच उपयोग होईल.

---

## निवेदन: अर्थसंवाद

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या ज्या आजीव सदस्यांना अंक मिळत नसेल किंवा पत्त्यात बदल झाला असेल त्यांनी प्रमुख संपादक, अर्थसंवाद यांच्याकडे तशा आशयाचे पत्र शहाद्याच्या पत्त्यावर पाठवून त्या पत्रात आपला नवीन पत्ता लिहून पाठवावा. मात्र या पत्रात आजीव सदस्य क्रमांकाचा उल्लेख असणे अत्यंत गरजेचे आहे.

- प्रमुख संपादक, अर्थसंवाद

# ग्रंथ परीक्षण

# गुंतवणूक पंचायतन

(पाच श्रेष्ठ गुंतवणूक गुरुंच्या गुंतवणूक शैलीची सुरस कहाणी)

**मंजूषा मुसमाडे, पुणे,**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
नौरोसजी वाडिया महाविद्यालय,
भ्रमणध्वनी: ९८८१३४०७२५
E-mail: manjushamusmade@gmail.com

चंद्रशेखर टिळक यांनी आपले पहिले पुस्तक *गुंतवणूक गुरु* याच्या यशानंतर त्याच विषयाच्या सखोल अभ्यासानंतर जागतिक पातळीवर सातत्याने गाजणाऱ्या गुंतवणूक सम्राटांच्या कार्यशैलीचा, यश व अपयशाचा मागोवा घेऊन प्रस्तुत पुस्तक लिहिले आहे. यात बेंजामिन ग्रॅहम, जॉन टेम्पलटन, वॉरेन बफे, जॉर्ज सोरोस आणि पीटर लींच अशा पाच प्रमुख गुंतवणूक गुरुंच्या कारकीर्दींचा आढावा घेतला आहे.

अनिश्चितता हा अविभाज्य गुण असलेल्या जागतिक भांडवल बाजाराचे सांगोपांग चित्रण लेखकाने पाच दिग्गज गुंतवणूक गुरुंच्या कार्यपद्धतीच्या माध्यमातून यथार्थतेने केले आहे. त्या अनुषंगाने भारतीय भांडवल बाजाराविषयीही नेमके भाष्य जागोजागी केलेले आढळते. १५०-१६० वर्षांपूर्वी मुंबईत वडापिंपळाच्या झाडाखाली मोजक्या गुजराथी-मारवाडी मंडळींनी निवडक सरकारी कंपन्यांच्या कर्ज रोखे व भागांची खरेदी-विक्री करण्यापासून आजच्या अतिशय विकसित भारतीय भांडवलबाजाराची मुहूर्तमेढ रोवली गेली. सुरूवातीच्या काळातील प्रेमचंद रायचंद ते अलिकडे हर्षद मेहता, केतन पारेख अशा अनेक गैरप्रकारांना तोंड देत देत भारतीय भांडवल बाजाराचा विकास अतिशय झपाट्याने झाला, ही वस्तुस्थिती लेखक आपल्यापुढे मांडतात. भारतीय वित्त क्षेत्राबाबत लेखकाने एक ठळक विरोधाभास असा दाखविला आहे की, १९६९ मध्ये १४ प्रमुख बँकांचे राष्ट्रीयीकरण झाल्याने तोपर्यंत रूढ असणाऱ्या *क्लास बँकींगपेक्षा मास बँकींग* तत्त्वावर भर दिला गेला आणि राष्ट्रीयीकरणासारख्या एका अर्थाने समाजवादी स्वरूपाच्या संकल्पनेने भांडवल

बाजाराच्या विकासासारख्या पक्क्या भांडवलशाही संकल्पनेला नकळत चालना दिली. ही आपल्या देशाच्या भांडवल बाजाराच्या इतिहासातील *मोठी गमतीची गोष्ट* आहे, असे लेखक म्हणतात.

भांडवलबाजारात आर्थिक गुन्हे आणि अफरातफरी होत असल्या तरी अॅडम स्मिथ, रिकार्डो, केन्स सारखे अर्थतज्ज्ञही ज्याची भलावण करतात त्या शेअरबाजाराचे आकर्षण सर्व सामान्यांमध्ये टिकून आहे, हे सुरूवातीलाच लेखक सांगतात.

१) बेंजामिन ग्रॅहॅम (१८९४-१९७६):

जागतिक पातळीवरील गुंतवणूक क्षेत्रांचा आद्य कुलगुरू म्हणजे बेंजामिन ग्रॅहॅम असे स्पष्ट करताना लेखकाने म्हटले आहे की, अफाट अनुभव आणि अथक परिश्रम यांच्या जोरावर गुंतवणूक क्षेत्राला शास्त्रीय दृष्टिकोन मिळवून देण्याचा आटोकाट प्रयत्न त्यांनी अतिशय डोळसपणे केला. पोर्टफोलिओ मॅनेजमेंट, फंडामेंटल अॅनालिसिस, सिक्युरिटीज अॅनालिसिस, मूल्याधिष्ठित गुंतवणूक अशा कल्पनांना आज मिळणारी सर्वमान्यता प्राप्त करून देण्याचे श्रेय त्यांच्याकडे निर्विवाद जाते. तीस वर्षांची प्राध्यापकी, वॉरेन बफे, आयर्विंग कान्ह इ. सारखे शिष्य, हजारो लेख व व्याख्याने, अनेक पुस्तके याद्वारे आपल्या शास्त्रशुद्ध तत्त्वांचा प्रचार आणि प्रसार त्यांनी केला व 'अमेरिकेचा सर्वांत जास्त मान्यताप्राप्त आर्थिक विचारवंत' व 'या शतकातील सर्वांत मोठा गुंतवणूकतज्ज्ञ' अशा शब्दांत *फोर्ब्स* मासिकाने त्यांचा केलेला उल्लेख असे ग्रॅहॅम यांचे वर्णन केले आहे. त्यांच्या नैतिक मूल्ये आणि प्रतिष्ठित वर्तन अशा सद्‌गुणांना भांडवलबाजारासारख्या स्पर्धात्मक आणि लबाडीने केल्या जाणाऱ्या क्षेत्रातही स्थान आहे, याचे विवेचन वाचकाला अंतर्मुख करते.

ग्रॅहॅम यांना शेअरबाजार आणि कमॉडिटी बाजार (धान्य बाजार) अशा आर्थिक विषयांबरोबरच गणित, तत्त्वज्ञान, नृत्यकला, टेनिस, साहित्य तसेच लॅटिन, पोर्तुगीज, ग्रीक अशा भाषांमध्येही गती होती. प्राणीसंग्रहालयाचे विश्वस्त म्हणूनही त्यांनी जबाबदारी पार पाडली होती.

ग्रॅहॅम यांच्या १९४९ साली प्रसिद्ध झालेल्या *दि इंटेलिजंट इन्व्हेस्टर* या पुस्तकाच्या अनेक आवृत्त्या निघाल्या. या पुस्तकाने गुंतवणूक विश्लेषकांवर अतिशय मोहिनी घातली व भांडवलबाजारावरील ज्ञानाचा मूळ पाया तयार केला असे लेखकाने स्पष्ट करताना म्हटले आहे की, गुंतवणुकीच्या कुरुक्षेत्रावर संभ्रमाच्या चक्रव्यूहात अडकलेल्या गुंतवणूकदारांना ग्रॅहॅमरूपी श्रीकृष्णाने सांगितलेली ही भगवद्गीताच आहे. गुंतवणूक क्षेत्राचा धर्मग्रंथ होण्याचा मान या ग्रंथाने पटकावला आहे, हे आपल्या लक्षात येते. त्यापाठोपाठ त्यांनी गुंतवणूकदारांना सोयीचे वाटेल अशा पद्धतीने पुस्तके लिहिण्याचा सातत्याने प्रयत्न केला.

सट्टेबाजीला कडवा विरोध करणाऱ्या ग्रॅहॅम यांनी गुंतवणूकदारांना एक कळकळीचा सल्ला दिला होता, तो म्हणजे बाजारभावात वाढ झाल्यानंतर ताबडतोब शेअर्स विकण्याचा प्रकार चुकूनही कधीही करू नये. ग्रॅहॅमच्या या मतामुळे वाचकाच्या मनात शेअरबाजार आणि सट्टेबाजी यांचे हे दृढ समीकरण झालेले आहे, ते दूर होण्यात

मदत होते. सुरक्षितता हे गुंतवणुकीचे महत्त्वाचे सूत्र आहे, असे ग्रॅहॅम मानत असत व त्यांचे हे धोरण सर्वसामान्य भारतीय गुंतवणूकदाराच्या स्वभावाला साजेसे आहे, असे लेखक म्हणतात. ज्या गोष्टी समजत नाहीत, त्यात गुंतवणूक करू नये व न पटणाऱ्या गोष्टींना *नाही* म्हणण्याची तयारी असावी, असे व इतर अनेक उपयुक्त नियम ग्रॅहॅम यांनी मांडले होते, ते वाचून सामान्य वाचकाला केवळ भांडवलबाजारातीलच आचारसंहिता उमगते असे नव्हे, तर एकंदरीत अर्थपूर्ण व प्रामाणिक वर्तनाचाच वस्तुपाठ मिळतो असे वाटते. शेवटी लेखक म्हणतात की, जसे मार्क्सशिवाय कम्युनिझमचा विचार करता येत नाही, तसेच बेंजामिन ग्रॅहॅम यांचा विचार केल्याशिवाय गुंतवणूक क्षेत्राचा विचार होऊच शकत नाही.

२) सर जॉन टेम्पलटन (१९१२-२००८):

गुंतवणूक पंचायतनातले दुसरे नाव आहे ते सर जॉन टेम्पलटन यांचे त्यांना डीन ऑफ ग्लोबल इन्व्हेस्टिंग (जगातील गुंतवणूकीचे अधिष्ठाता) असे संबोधले आहे, कारण जेव्हा १९६० मध्ये जपानचा भांडवलबाजार विकसनशील समजला जात होता, त्यावेळी जपानमध्ये गुंतवणूक करणारे ते पहिले अमेरिकन गुंतवणूकदार होते. उदयोन्मुख भांडवलबाजारात गुंतवणूक करण्याच्या त्यांच्या धोरणामुळे टेम्पलटन समूहाने भारतातही गेली अनेक वर्षे जम बसवल्याचे आपल्याला दिसून येते. त्यांच्या गुंतवणूक क्षेत्रातील प्रदीर्घ अनुभव व कौशल्यावर आधारित गुंतवणुकविषयक १६ तत्त्वे त्यांनी दिली आहेत. आश्चर्याची गोष्ट म्हणजे ही तत्त्वे बहुतांशी ग्रॅहॅमच्या विचारांशी मिळतीजुळती आहेत. तसेच, शेअरबाजारापेक्षा भौगोलिकदृष्ट्या लांब राहणे टेम्पलटन यांच्याप्रमाणेच ग्रॅहॅम आणि वॉरेन बफेही पसंत करतात हे साम्य आवर्जून लक्षात घेण्याजोगे आहे असे लेखक म्हणतात. *भाऊगर्दीपेक्षा वेगळेपणाने वागण्यातूनच बाजारात यश मिळते,* या सूत्रावर ठाम विश्वास बाळगणारे टेम्पलटन *फंडामेंटल ॲनालिसिस* वर भर देतात. मात्र, सर्वसामान्य गुंतवणूकदाराजवळ अशा दिग्गज अर्थविचारवंताकडे असणारी आर्थिक व मानसिक ताकद कुठून असणार, असा प्रश्न लेखक उपस्थित करतात. आयुष्याच्या अखेरीला सर जॉन टेम्पलटन यांनी गुंतवणूक क्षेत्रातून निवृत्ती पत्करून आपल्या संस्थेच्या माध्यमातून अनेक परोपकारी योजना तसेच धार्मिक-अध्यात्मिक संशोधनावर भर दिला, हे वाचून आपण विस्मयचकित होतो.

३) वॉरन बफे (१९३०- )

माझा गुंतवणूक बाळगण्याचा काळ कायमचा असतो (My Favourite Holding time is Forever) असे मत असणाऱ्या अमेरिकेच्या बर्कशायर हाथवे या कंपनीच्या संस्थापक अध्यक्ष असणाऱ्या वॉरन बफेंचे नाव सर्वसामान्यांच्याही परिचयाचे आहे. एका आजारी कापडगिरणीचे रूपांतर २०,००० कोटी डॉलर्सची गुंतवणूक असलेली ही कंपनी आज आइस्क्रीमपासून अंतर्वस्त्रापर्यंत आणि विम्यापासून कॉर्पोरेट जेट लिजिंगपर्यंत नानाविध क्षेत्रात कार्यरत आहे. १९८७ ते २००७ या काळात या कंपनीच्या शेअरचा भाव ३६०० टक्क्यांनी वाढला. अगदी २००८ च्या सबप्राईम

घोटाळ्याच्या काळातही या कंपनीचे बाजारभाव चढेच राहिले होते. ही अप्रतिम कामगिरी वॉरन बफे यांनी दैवी देणगीतून केली नसून स्वतःच्या प्रत्येक चुकीतून शिकत जाण्याने केली आहे, हे लेखकाचे मत खरोखरच उद्बोधक आहे. श्रीमंत देशातील सर्वाधिक श्रीमंत व्यक्तींच्या यादीत पहिल्या पाच जणांत बफे याचा समावेश गेली कित्येक वर्षे असला, तरी अमेरिकेतील सर्वांत मोठ्या २०० कंपन्यांच्या संचालकांमध्ये सर्वांत कमी पगार बफे घेतात ही बाब लेखकाने विशेष करून सांगितली आहे. इतकी श्रीमंती असूनही बफे अतिशय साधेपणाने राहतात व गुंतवणूकीकडे पैसा मिळवण्याचे साधन म्हणून नव्हे, तर एक बौद्धिक व्यायाम आणि उत्साहपूर्ण खेळ म्हणून पाहतात, हाही दृष्टिकोन वाचकांना नाविन्यपूर्ण आहे. *पैशाने माणसाला निर्माण केलेले नसून माणसाने पैसा निर्माण केला आहे*, हे लक्षात ठेवावे असा मोलाचा सल्ला बफे तरुणांना देतात, हेही लक्षणीय आहे.

४) जॉर्ज सोरोस(१९३०- ):

*मी गरीब म्हणून जन्माला आलो, पण गरीब म्हणून मरणार नाही* असे प्रतिपादन करणाऱ्या गूढ आणि चमत्कारिक व्यक्तिमत्त्वाच्या सोरोससारखी माणसे जागतिक भांडवलबाजारात तुरळकच आहेत, असे लेखक म्हणतात. विरोधाभास आणि सातत्य यांची विचित्र गुंफण म्हणजे जॉर्ज सोरोस यांचे सततच स्वतःच्या नावाभोवती वादळी वारे घेऊन फिरणारे व्यक्तिमत्त्व हेही लेखक सुरूवातीलाच सांगतात. अनेक सुप्रसिद्ध आणि वादग्रस्त पुस्तकांचे लेखक असणारे सोरोस या पुस्तकांचे वर्णन *गोंधळलेल्याचे कबुलीजबाब* (Confessions of a Cofused) अशा शब्दांत करतात. पक्का भांडवल बाजारी व्यावसायिक ते सामाजिक तत्त्वज्ञानाचा आर्थिक आविष्कार घडवण्याचा प्रयत्न करणारा विचारवंत कार्यकर्ता आणि बुश राजवटीचा कट्टर विरोधक असे अनेक पैलू सोरोस यांच्या व्यक्तिमत्त्वाचे आहेत. त्यांच्यामुळे १९९२ साली इंग्लंडचे जॉन मेजर यांचे आणि २००३ साली जॉर्जियाचे सरकार कोसळले होते, ही माहिती निश्चितच त्यांच्या प्रभावाची कल्पना देते. बफे आणि सोरोस यांच्या विचार व कार्यपद्धतीची तुलना करून लेखक दोघांतील काही साम्ये दाखवून देतात. या दोघांचेही खासगी सहाय्यक भारतीय वंशाचे असल्याची माहिती वाचकांना गौरवाची वाटते. मात्र, *चलनबाज़ारातील अट्टल सट्टेबाज* अशी सोरोस यांची प्रतिमा आहे व ते ती पुसून टाकून *एक आर्थिक विचारवंत* अशी आपली ओळख निर्माण करण्याच्या प्रयत्नात आहेत; त्यांचा हा प्रयत्न कितपत यशस्वी होईल याबाबत लेखक शंका व्यक्त करतात. पूर्व आशियायी अर्थव्यवस्थांतील चलनातील घसरगुंडीला सोरोस यांनाच कारणीभूत ठरवले गेले आहे व या देशांचे सत्ताधीश त्यांच्यावर कमालीचे नाराज आहेत कारण अर्थव्यवस्था समर्थ बनवण्यास अनेक वर्षे कष्ट करावे लागतात, परंतु सोरोस यांच्यासारख्या आंतरराष्ट्रीय सट्टेबाजांच्या खेळीमुळे एका मिनिटात होत्याचे नव्हते होऊन जाते असा मतप्रवाह असल्याचे लेखक नमूद करतात. पण मुळातच एकंदरीत भांडवलबाजारात नैतिक-अनैतिक असे काहीही नसते, असेच सोरोस यांचे ठाम मत आहे. बाजारात महत्त्वाचे असते ते *यश* अशी त्यांची अढळ श्रद्धा आहे. त्यामुळे कोणताही विधिनिषेध

ते बाळगत नाहीत. पॉल क्रूगमन यांनी *फॉर्च्युन* मधील (२३ नोव्हेंबर १९९८) लेखात गमतीने म्हटलेले विधान लेखक उद्धृत करतात. *सोरोस यांच्या सट्टेबाजीवर उपाय म्हणून जगभरातील चलनांची संख्या कमी केली पाहिजे. काय सांगावे कदाचित त्याबाबतही सोरोस नवीन विसंगती निर्माण करतील!* २००८ च्या अनिश्चिततेवर उपाय म्हणून भक्कम भांडवली पाया व कडक नियम असणाऱ्या नाणे-बाजाराची आवश्यकता सोरोस मांडू लागले आहेत, ही अलिकडच्या काळातील त्यांच्या वर्तनातील विसंगती लेखक अखेरीस स्पष्ट करतात.

५) पीटर लींच (१९४४- ):

*शेअर बाजारात प्रवेश करण्यापूर्वी उद्दिष्टांची निश्चितता करून घेणे आणि स्वतःच्या वृत्ती आणि प्रवृत्ती चा स्पष्टपणाने विचार करणे या गोष्टी महत्त्वाच्या आहेत, अन्यथा तुम्ही बाजारात बळीचा बकरा बनण्याची फार मोठी शक्यता असते, अशी विचारसरणी असणारे पीटर लींच हे अतिशय लोकप्रिय पुस्तकांचे लेखक आणि मॅग्लेन फंडाचे माजी प्रमुख व भारतीय गुंतवणुकदारांच्या मनोवृत्तीचे अचूक जाणकार आहेत* असे लेखक म्हणतात. कर्जरोख्यातील गुंतवणूक ही शेअर्समधील गुंतवणूकीला पर्याय नाही, कारण १९२९ च्या महामंदीनंतरच्या काळात फक्त एकाच दशकात कर्जरोख्यांनी शेअर्सपेक्षा अधिक उत्पन्न दिले आहे. त्याचे मुख्य कारण म्हणजे कोणत्याही अर्थव्यवस्थेला दीर्घकाळ व्याजदर चढे ठेवणे परवडणारे नाही असे लींच यांचे ठाम मत वाचून सामान्य भारतीय गुंतवणुकदाराला नक्कीच मार्गदर्शन मिळते. ज्या कंपनीचे शेअर्स खरेदी करावयाचे आहेत त्या कंपन्या नेमके काय करीत आहेत, हे आधी समजून घेणे आणि नंतर वारंवार तपासून पाहणे आवश्यक आहे, हेही लींच यांचे मत लेखकाने स्पष्ट केले आहे.

पीटर लींच यांची मिस्कील वृत्ती सांगताना लेखकाने *डाएटिंग आणि शेअर्समधील गुंतवणूक* या दोन्हींचे निकाल संबंधित व्यक्तीच्या डोक्यापेक्षा निश्चय आणि धीर यावर जास्त अवलंबून असतात हे त्यांचे विधान उद्धृत केले आहे. शेअर्समध्ये गुंतवणूक करण्याआधी घरामध्ये गुंतवणूक करावी हे लींच अगदी आपल्या मनातले बोलत आहेत, असे भारतीयांना वाटेल, असे लेखक म्हणतात.

शेअरबाजारात गुंतवणूक करताना टाळण्याजोग्या बाबींचा लींच यांचा दृष्टिकोन इतर गुंतवणूक तज्ज्ञांप्रमाणेच आहे. एकंदरीत धोके टाळण्यासाठी अभ्यासातून विविध कंपन्यांची संपूर्ण माहिती घेऊनच गुंतवणूक केली पाहिजे, हे विधान सार्वत्रिक व सार्वकालीन सत्य आहे. हे वाचकांच्या मनावर ठसते. मात्र, फार विविधीकरण करणाऱ्या कंपन्यात गुंतवणूक करू नये कारण बरेचदा Diversification divorcification ठरते असे वाचून लींच यांचा दृष्टिकोन लक्षात येतो.

पीटर लींच यांना वित्तक्षेत्र, लष्करी सेवा, समाजकार्य अशा विविध क्षेत्रातील दांडगा अनुभव आहे. गुंतवणुकीबाबत मांडलेल्या आठ सूत्रांमध्ये नावीन्य नसले तरी त्यांची एकत्रित गुंफण सातत्याने करूनच लींच यशस्वी झाले. सर्वसामान्य गुंतवणूकदारांना हे जमू शकते, असा विश्वास लेखकाने व्यक्त केला आहे.

पुस्तकाच्या अखेरीस लेखकाने बाप-

लेक आणि गाढव यांच्या बोधकथेतून अयोग्य सल्लागारांपासून सावध राहण्याचा उपदेश वाचकांना केला आहे. एकंदरीत शेअरबाजारासारख्या कमालीच्या अनिश्चित क्षेत्रात ज्या पाच बिनीच्या गुंतवणूक तज्ज्ञांनी आपली हयात घालवली, अशांच्या कार्यशैलीचे यथार्थ दर्शन या पुस्तकातून घडते व आपल्या भांडवलबाजारातील गुंतवणुकीबाबतच्या ज्ञानात भर पडते हे निश्चित!

**समारोपः**

गुंतवणूक पंचायतन हे चंद्रशेखर टिळक यांचे पुस्तक खरोखरच गुंतवणूकदार, अर्थतज्ज्ञ व सामान्य वाचकाला अतिशय प्रेरणादायी व खिळवून ठेवणारे आहे. लेखनात काही त्रुटी व चुकाही झाल्या आहेत. उदा. ग्रॅहॅम यांनी ॲडम स्मिथच्या *दि मनी गेम* या अतिशय प्रसिद्ध पुस्तकातील ग्रीक सुभाषितांमधील चुका स्मिथना दाखवल्या होत्या, हा उल्लेख चुकीचा आहे. परंतु अशा तपशिलाच्या किरकोळ चुका वगळल्या तर एकंदरीत पुस्तक अत्यंत वाचनीय व अभ्यासपूर्ण झाले आहे.

(गुंतवणूक पंचायतन-चंद्रशेखर टिळक, राजहंस प्रकाशन, पुणे - २००८)

---

हे त्रैमासिक प्रकाशक डॉ.आर.बी.भांडवलकर (प्रमुख संपादक डॉ.अविनाश निकम) यांनी मराठी अर्थशास्त्र परिषद या संस्थेकरिता सातपुडा ऑफसेट, एम.आय.डी.सी. एरिया, अजिंठा रोड, जळगाव येथे छापून मराठी अर्थशास्त्र परिषद, गजानन नगर, पिंपळगावरोड, यवतमाळ - ४४५ ००१ येथे प्रसिध्द केले.

## 'अर्थसंवाद' चे लेखक व्हा

जानेवारी-मार्च २०१५ अंकासाठी त्वरित लेख पाठवा

*आर्थिक, सैध्दान्तिक, नवीन संकल्पना, नवं संशोधन.... असं काही ना काही अनेकांपर्यंत पोचावं असं वाटतं ना? तर मग उचला लेखणी अन् व्यक्त करा आपले विचार.... 'अर्थसंवाद' च्या माध्यमातून.... तुमच्या लेखनाचं इथं स्वागत आहे....*

**फक्त एवढंच् करा....**

- लेखकांनी आपला शोधनिबंध Shree-Dev7-2336 या फॉन्टमध्ये PageMaker 6.5 अथवा PageMaker 7 सॉफ्टवेअरमध्ये टाईप करावा. फॉन्ट साईझ 14 व लिडींग 17 असावी. गरज असल्यास एखादा तक्ता घ्यावा. लेखातील तक्त्याचा आकार सामान्यपणे अर्धा कागद इतका असावा. तक्त्याची रुंदी १३ सें.मी.पेक्षा जास्त नसावी.
- PageMaker 6.5 किंवा 7 या सॉफ्टवेअरमध्येच टाईप करावा. MS-Word किंवा PDF मध्ये लेख पाठवू नयेत. आवश्यक असेल तरच इंग्रजी प्रति-शब्द द्यावा.
- दोन हार्ड कॉपीज् व एक सॉफ्ट कॉपी (सीडी) प्रमुख संपादकाकडे पाठविणे अत्यावश्यक आहे.
- एक सॉफ्ट कॉपी ई-मेल द्वारे प्रमुख संपादकाकडे awinashnikam@gmail.com या ई-मेल अॅड्रेसवर पाठवावी.
- शोधनिबंध पूर्वमुद्रित नसावा. त्यामध्ये कॉपीराईटचा भंग न करता संदर्भाचा उल्लेख करावा. आजीव सदस्य क्रमांक, भ्रमणध्वनी क्रमांक लिहिणे आवश्यक आहे.
- लेखाच्या शीर्षकाखाली लेखकांनी स्वत:चे संपूर्ण नाव देवनागरीतूनच लिहावे.
- शोध निबंध खास अर्थसंवादसाठीच लिहिलेला असावा. माहिती व आकडेवारी अद्ययावत असावी. लेखांची गुणवत्ता पाहून प्रसिध्दीसाठी निवड केली जाईल.
- भाषा संचालनालयाने प्रकाशित केलेल्या अर्थशास्त्र परिभाषा कोश यातील परिभाषेचा शक्यतो उपयोग करावा. लेखनाची एक प्रत स्वत:जवळ अवश्य ठेवावी.
- लेखकांनी कृपया शोधनिबंध टाईप केल्यानंतर प्रूफ शुध्दलेखन आणि व्याकरण अचुक तपासून नंतरच अंतिम प्रिन्ट काढून पाठवावी.
- **संदर्भ सूची देताना पुढील पध्दतीने देणे आवश्यक आहे:** कुरुलकर र. पु., *महाराष्ट्राची अर्थव्यवस्था*, प्रथमावृत्ती, २००६, विद्या प्रकाशन, नागपूर, पृ.१०.

\- प्रमुख संपादक, अर्थसंवाद.

# अर्थ शब्दांची वाट पाहे
# व्यल्पगम्य
# (Esoteric)

**ज. फा. पाटील, कोल्हापूर,**
माजी अध्यक्ष,
मराठी अर्थशास्त्र परिषद
भ्रमणध्वनी: ९४२२०४६३८२

व्यल्पगम्य (Esoteric):

अर्थशास्त्रातील नोबेल पारितोषिक बहुधा अशा अर्थशास्त्रज्ञांना दिले जाते की ज्यांचे संशोधन esoteric स्वरुपाचे असते असे एक निरीक्षण वाचण्यात आले. साकलिक अर्थशास्त्रातील आंतरकालीन परिणाम वाटणी (trade offs) किंवा बदलत्या अस्थिरतेच्या आर्थिक कालशृंखलांचा अभ्यास अशा प्रकारच्या अमूर्त (abstract) संशोधनासाठी नोबेल प्राईज दिले गेले आहे. असे संशोधन esoteric मानले जाते. या शब्दाचे वेस्टर्न सेव्हन्थ न्यूकॉलेजिएट डिक्शनरीमध्ये पुढील पर्यायी अर्थ दिले आहेत.

- अ Knowledge designed for or understood by the specially initiated alone.
- ब Knowledge that is restricted to a small group.
- क Knowledge limited to a small group
- ड Private and confidential

यापैकी क तथा ड हे चर्चेच्या विषयात ठरतात. कारण नोबेल पुरस्कार विजेत्या कोणत्याही अर्थशास्त्रज्ञाला आपले लेखन खाजगी, गोपनीय ठेवायचे नव्हते. तसेच ते छोट्याश्या गटालाच उपलब्ध व्हावे, असेही त्यांची भावना नव्हती. कारण असे सर्व लेखन, संशोधन सर्वांना खुल्या असणाऱ्या माध्यमातून उपलब्ध आहे.

ब मधील अर्थ संबंधित ज्ञान सर्वांना उपलब्ध होऊ नये अशी व्यवस्था कोणतरी करीत असते असे ध्वनित करते. पुरस्कार विजेत्या लेखकांची अशीही

धारणा असत नाही साहजिक अ मधील अर्थ हा अधिक योग्य वाटतो. संशोधनाची अती प्रगत पातळी, अमूर्त संकल्पनांचा भरपूर वापर, विश्लेषणासाठी अर्थमिती पध्दतीचा सर्वाधिक वापर, संशोधन विषयाचा सर्वसामान्य वाचकांसाठी असणारा अपरिचितपणा अशा कारणांमुळे संशोधन प्रकाशित, प्रसिध्द व जाहीर होऊनही, अमूर्त संकल्पना, अतिप्रगत अर्थमिती तंत्रे, संशोधनाची क्लिष्टता या कारणांनी, असे संशोधन, ज्यांना या अडचणींवर मात करता येते त्यांनाच समजते (गम्य) व उपलब्ध होते असा अर्थ व्यक्त होण्यासाठी प्राथमिक स्वरुपात पुढील शब्द सुचतात -

- मर्यादाबध्द
- सीमाबध्द
- सहजागम्य
- अल्पगम्य
- व्यल्पगम्य

यापैकी मर्यादाबध्द, सीमाबध्द हे शब्द अर्थाशी जुळत नाहीत. सहजागम्य म्हणजेच सहज न समजणारे हाही शब्द समजणाऱ्यांची अल्प संख्या व्यक्त करीत नाही. म्हणून मोजक्या लोकांना समजणारे संशोधन असा अर्थ अल्पगम्य या शब्दाचा होतो. पण हे अल्प लोक विशेष क्षमतेचे असावे लागतात म्हणून, व्यल्पगम्य या शब्दातून तसा अर्थ व्यक्त होतो. अमूर्त व अर्थमीतीय तंत्राचा वापर करणारे संशोधक मोजके व विशेष असतात. म्हणून Esoteric या शब्दाच्या ध्वनित अर्थासाठी मराठी व्यल्पगम्य असा शब्द प्रस्तावित करीत आहे.

(निवेदन: अर्थसंवादच्या खंड ३८, अंक १ (एप्रिल-जून २०१४) या अंकात अर्थ शब्दांची वाट पाहे - खाद्य सुरक्षा या सदरात कंसात दिलेला शब्द Food Security नव्हे तर Feed Security असा वाचावा. - प्रमुख संपादक अर्थसंवाद.)

मनुष्याणाम् वृत्तीरर्थः।

International Research Journal

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक

# अर्थसंवाद

## जाहिरातीचे दर

| | कृष्णधवल(B/W) | रंगीत |
|---|---|---|
| १) समोरचे आतील पृष्ठ | रु.५,०००/- | रु.११,०००/- |
| २) मागील(आतील) पृष्ठ | रु.५,०००/- | रु.११,०००/- |
| ३) मागील शेवटचे पृष्ठ | रु.६,०००/- | रु.१५,०००/- |

आपल्या जाहिरातीचा मजकूर-डिझाईन (1/5=150X210 mm) आणि सोबत वरील रकमेचा ड्राफ्ट खालील पत्त्यावर पाठवावा. ड्राफ्ट मराठी अर्थशास्त्र परिषद या नावानेच काढावा. जाहिरात प्रसिध्द होताच अर्थसंवादचा अंक आपणास मिळेल. आपल्या सहकार्याबद्दल धन्यवाद !

डॉ. श्रीराम जोशी,
अध्यक्ष
सार्थक, प्लॉट नं.२०, विवेकानंदनगर,
रामानंदनगर जवळ,
जळगाव-४२५ ००१,
भ्रमणध्वनी:९४२१००८७७६

प्रा. चारुदत्त गोखले,
कार्याध्यक्ष
प्लॉट नं.१०, प्रोफेसर कॉलनी,
जिल्हा उद्योग केंद्राच्या मागे,
जळगाव, जिल्हा-जळगाव-४२५००१,
भ्रमणध्वनी: ९४२२६१८४१०

डॉ. आर. बी. भांडवलकर,
कार्यवाह खजिनदार
गजानन नगर,
पिंपळगावरोड,
यवतमाळ-४४५ ००१
भ्रमणध्वनी: ९४२३१३४८८६

डॉ.अविनाश निकम,
प्रमुख संपादक
मातृपितृ कृपा,प्लॉट नं.३०,
परिमल कॉलनी,
यशवंत क्लासेसच्या मागे,
शहादा-४२५४०९,
जिल्हा नंदुरबार,
भ्रमणध्वनी:९८२२६६५१४१

## 'अर्थसंवाद' या त्रैमासिकाच्या स्वामित्व व इतर बाबींविषयी निवेदन

(फॉर्म ४, नियम ८ नुसार)

| | | |
|---|---|---|
| १. प्रकाशन स्थळ | : | मराठी अर्थशास्त्र परिषद, द्वारा/डॉ.आर.बी.भांडवलकर, गजानन नगर, पिंपळगावरोड, यवतमाळ - ४४५ ००१. |
| २. नियतकाल | : | त्रैमासिक. |
| ३. मुद्रकाचे नाव | : | डॉ.आर.बी.भांडवलकर |
| राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| पत्ता | : | गजानन नगर, पिंपळगावरोड, यवतमाळ - ४४५ ००१. |
| ४. मुद्रण स्थळ | : | सातपुडा ऑफसेट, एमआयडीसी एरिया, जळगाव |
| ५. प्रकाशकाचे नाव | : | बाब क्र.३ प्रमाणे |
| ६. संपादकाचे नाव | : | डॉ.अविनाश रामलाल निकम |
| ७. राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| पत्ता | : | मातृपितृ कृपा, प्लॉट नं.३०, परिमल कॉलनी, यशवंत क्लासेसच्या मागे, शहादा-४२५ ४०९, जिल्हा - नंदुरबार. |
| ८. मालकाचे नाव | : | मराठी अर्थशास्त्र परिषद, द्वारा:सेंटर फॉर दी स्टडी ऑफ सोशल चेन्ज, एम्.एन्.रॉय ह्यूमन डेव्हलपमेन्ट कॅम्पस, प्लॉट क्र.६, एफ् ब्लॉक, कार्डिनल ग्रेशियस स्कूल जवळ, सरकारी वसाहत इमारत क्र.३२३ समोर, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१. |

मी आर.बी.भांडवलकर असे जाहीर करतो की वर दिलेला तपशील माझ्या माहिती आणि समजुतीनुसार खरा आहे.

डॉ.आर.बी.भांडवलकर,
मुद्रक व प्रकाशक